# पश्चिमवारे

यशवंत कानिटकर



म. ग्रं. सं. ठाणे
विषय मू-५
सं. क्र. ६०७

REFBK-0022699

# पश्चिमवारे

यशवंत कानिटकर

REFBK-0022699

वरदा बुक्स

'वरदा', सेनापती बापट मार्ग, पुणे १६.

प्रकाशक

ह. अ. भावे
वरदा बुक्स
'वरदा', सेनापती बापट मार्ग
पुणे ४११ ०१६

© यशवंत कानिटकर
९०, रेड लायन रोड
हेनरिटा,
न्यूयॉर्क स्टेट १४४६७

पहिली आवृत्ती ऑगस्ट १९७९

मुखपृष्ठ सालकर

किंमत : एकवीस रुपये

मुद्रक

प्रमोद वि. बापट
प्रमोद प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०.

श्री ग वा बेहेरे याच्या
'सोबत' साप्ताहिकास

—यशवत कानिटकर

## अनुक्रम


१) नदी थेम्सच्या किनारी

| | |
|---|---|
| ब्रिटनमधील आम्ही उपरे | ७ |
| चित्रपटांची दुनिया | ४१ |
| घूसखोरांचा कायदेभंग | ४६ |
| राजा ईडिपस | ५१ |
| अविस्मरणीय चित्रपट | ५५ |
| लंडनमधील सायंकाळ | ६१ |
| लंडनचे हिप्पी | ७१ |
| टॉयन्बी आणि महमद | ७८ |
| माउंटबॅटन आणि सेसिल किंग | ८१ |
| वृद्ध आणि तरुण | ८९ |
| २) भारतीय इस्लामचे प्रश्नचिन्ह | ९३ |
| ३) महात्मा गांधी योगी आणि कोमिस्सार | १५१ |
| ३) महात्मा गांधी फॉक्स ऑर सेंट | १८५ |

(स्थळ प्रत)

## मनोगत

शाळाकॉलेजात असताना वाचलेली इग्रजी पुस्तके, त्यानतर पाहिलेले इग्रजी चित्रपट या साऱ्यांच्या परिणामी पाश्चात्य जगाबद्दल एक प्रचड कुतूहल माझ्या मनात साचलेल होत त्यांतही इग्लड ही तर जणू स्वप्न-भूमीच होती लडनमध्ये पाय ठेवल्यापासून एखाद्या लहान मुलाच्या उत्साहाने जे जे नवीन दिसेल ते ते माझी नजर टिपून घेत होती १९६८ साली इग्लड म्हणजे सारी आबादीआबाद नव्हती, पण मुबईच्या जीवनातून आलेल्या मला, लडनमध्ये आणि आसपास सर्वत्र समृद्धीच दिसत होती गाड्याना गर्दी नव्हती, बसेस स्वच्छ होत्या, पिकॅडिली सर्कस किंवा ट्राफलगार स्क्वेअर इथल्या नाक्यावरच्या कारज्यांना पाणी होत, रस्त्यावर भिकारी नव्हते आणि झोपडपट्टी तर कुठेच नव्हती प्रत्येक वेळी मनाला मोहून टाकणारी एखादी वस्तू किंवा दृश्य पाहिल की त्या पार्श्वभूमीवर मला मुबई, पुणे किंवा कोकणाची आठवण येई खुद्द भारतात असतांना तिथल दारिद्र्य आणि दैन्य कधी छळीत नव्हत, पण आता इग्लडमध्ये, पदोपदी भारताच्या गरिबीची जाणीव तीव्रतेने टोचू लागली इग्लडमध्येही गरिबी होती, पण दैन्यावस्था नव्हती लाचारी तर अजिबात नव्हती अगदी कनिष्ठ थरातला कामगारसुद्धा ताठ मानेने आणि हसतमुखाने सर्व व्यवहार करीत होता याउलट भारतातल्या सर्वसामान्य माणसाच्या पाठीचा कणा मोडलेला आहे ही गोष्ट माझ्या नव्याने लक्षात आली इग्लड आणि दक्षिण आफ्रिकेला राहून भारतात परतल्यावर गाधीजींनी जे समाजकारण सुरू केल त्याचा अर्थ आता मला उमगला आणखीही एक गोष्ट थोड्याच दिवसात लक्षात आली ती ही की गाधी आणि नेहरू त्या दोन नावाखेरीज

इतर कुणाही भारतीय माणसाचं नाव या देशात बहुतेकांना माहीत नव्हतं टिळक, सावरकर किंवा शिवाजी ही नावे उच्चारलेलीसुद्धा यांनी कधी ऐकली नसावीत मग त्यांच्याबद्दल काही माहिती असणं अशक्यच. पैकी स्वतंत्र भारताचा पहिला पंतप्रधान म्हणून नेहरूंचं नाव लोकांना माहीत असणं हे अपेक्षित होतं पण अशिक्षितांपासून तो गाढ्या पंडितापर्यंत सर्वांच्या तोंडी 'गांधी' हे नाव होतं पुस्तकांच्या दुकानातून गांधींवर आणि त्यांच्या विचारांवर पुस्तकं होती वृत्तपत्रें– मासिकांचे संपादक, आपल्या अग्रलेखा-तून त्या नावाचा उल्लेख करीत होते 'गांधी' या नावाबद्दल आता एका नवीन सहानुभूतीचा अनुभव मी घेत होतो पुढची पन्नास-साठ वर्षे तरी भारताला 'गरिबी हटाओ' या इतका महत्त्वाचा दुसरा कोणताही कार्यक्रम असणं शक्य नाही याबद्दल माझी खात्री पटली होती मुसलमानांचा प्रश्न त्यामानाने गौण वाटू लागला होता इंग्लंडमध्ये मी स्वतं एक 'काळा आदमी' होतो अल्पसंख्य जमातीचा होतो. भारतातल्या अस्पृश्यांना रोजच्या जीवनात कोणती दुःखं छळीत असतील याचा मी कल्पनेनं अनुभव घेऊ शकत होतो इंग्लंडमधला मजूर पक्ष (Labour Party) आम्हा उपऱ्याच्या प्रश्नाबाबत बराच समजुतीने वागत होता. माझी आणि बहुसंख्य आशियाई किंवा आफ्रिकी उपऱ्यांची सहानुभूती मजूर पक्षालाच होती याच न्यायाने भारता-तल्या मुसलमानांनी आणि ख्रिश्चनांनी वर्षानुवर्षे काँग्रेस पक्षाला मते द्यावीत हे मग मला तर्काच्या आधारे समजू शकलं भविष्यात आपण कधी भारतात परत गेलो तर गांधीजींनी जे समाजकारण केलं तसलं समाजकारण करण्यापलीकडे फारसं काही आपल्याला करता येणार नाही इतपत विचारांची मजल पोचली

लंडनला पोचल्यावर दोन-तीन महिन्यांतच माझ्या मोठ्या भावाला (वि ग कानिटकर) एका पत्रात मी लिहिलं, 'इथून लिहिण्याजोगं खूपच आहे' त्याच्या आलेल्या उत्तरात त्यानं लिहिलं होतं, 'साप्ताहिक 'सोबत'चे श्री बेहेरे छापायला तयार आहेत तू लिहायला लाग'

मी लिहू लागलो सुरुवातीला ही वार्तापत्रे लहान होती जास्त काही लिहिलं तर संपादक छापणार नाहीत असं वाटायचं पण लिहीत गेलो आणि वार्तापत्रांची लांबी हळूहळू वाढली मी जे काही लिही ते 'सोबत'मध्ये

छापून येत होत काटछाट नव्हती की बदल नव्हते तसं काही घडल असत तर मी बहुधा लिखाण बद केल असतं. सुदैवाने हवा तसा सपादक मला सापडला होता अमुक एका विषयावर लिहा असही श्री बेहऱ्याच म्हणण नव्हत माझ्या लिखाणाचे विषय माझ्या राजकीय आणि सामाजिक पिंडाला मानवणारे, भारत आणि भारतीय याच्याशी सबधित असेच असणार होते. रीजन्ट स्ट्रीट किंवा ऑक्सफर्ड स्ट्रीट यासारखे रून्द रस्ते, ट्राफल्गार स्क्वेअरमधल्या उच उच खांबावरचा नेल्सन्चा पुतळा, पिकॅडिली सर्कसचे कारजे किंवा तिथला इरॉस्चा पुतळा, राणीचा राजवाडा, टॉवर ऑफ लडनमधल जडजवाहीर, पार्लमेंट हाऊसची इमारत, बिग्बेनच घड्याळ या आणि इतर अनेक चीजा सुदर होत्या पण मला त्याची वर्णने करायला उत्साह नव्हता ब्रिस्टल्च्या समुद्रकिनाऱ्यावर गेलो तेव्हा तिथल्या कोणत्या खडकावर बसून सावरकरानी 'सागरा प्राण तळमळला ही कविता लिहिली असेल हाच विचार प्रथम मनात आला मुबईला रेल्वे फलाटावर खूप गर्दी असल्याने फलाटाच्या कडेला उभे राहिलेल्या माणसाला गाडीचा धक्का लागून झालेले अपघात मी स्वत पाहिले होते असले अपघात टाळा-यचे तर फलाटाची ही कडा मुद्दाम तिरपी (Sloping) बाधली पाहिजे किंवा फलाटाच्या कडेपासून एक फूट अंतरावर एखादा पांढरा पट्टा मारला तर तिथपर्यंत जाऊन उभे राहण्याची प्रवृत्ती कमी होईल अस वाटायच लडनच्या रेल्वे फलाटांच्या कडेला असा पांढरा पट्टा मारलेला मी पाहिला, आणि या सुशिक्षित देशात माणसाच्या प्राणाची किती पर्वा केली जाते, या विचारा-बरोबरच आपण केली तीच कल्पना कुणा दुसऱ्याला सुचली होती याची गमत वाटली साध्यासाध्या Lever आणि Pully च्या कल्पना वापरून कितीतरी छोटी छोटी यत्रे नेहमीच्या व्यवहारात ते लोक वापरीत होते आयर्लंडमध्ये कॅथॉलिक्स् आणि प्रॉटेस्टटस् यांची जी भाडाभांडी चालू होती तिच्यात आणि भारतातील हिंदू-मुसलमानाच्या भाडणातही खूप साम्य होत विशेष म्हणजे या भाडणाना तोंड देण्याची ब्रिटिशांची पद्धतही दोन्ही ठिकाणी सारखी होती.

मला लिहायच होत ते असल्या गोष्टीबद्दल ! याला कारण होत भारतात असतांना माझ्यावर झालेले सास्कृतिक आणि राजकीय सस्कार.

वयाच्या सहाव्या वर्षीच कुणाच तरी बोट धरून मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघात गेल्याच आठवत तेव्हापासून तो वयाच्या सोळाव्या वर्षांपर्यंत, म्हणजे एस् एस् सी ची परीक्षा होईपर्यंत, संघशाखा हा माझ्या रोजच्या जीवनाचा एक भाग होता पुढे कॉलेजमध्ये जाऊ लागल्यावर शाखेवरच्या उपस्थितीत मधूनमधून खंड पडला, तरी बी एस्सी होईपर्यंत वेळ मिळेल तेव्हा मी शाखेवर जात होतो भारताच्या राजकारणातील अतिशय महत्त्वाच्या अनेक घटना या काळात घडल्या त्याची सुखदु ख– खर तर दु ख, इतरांप्रमाणे मीही अनुभवली. १९४७ साली देशाची फाळणी झाली, त्यापाठोपाठ पंजाब आणि बंगालमध्ये दंगली उसळल्या. या दोन्ही ठिकाणी मुसलमानानी केलेल्या अत्याचाराच्या हकीगती ऐकल्यावर एकूण मुसलमानांबद्दल प्रेम वाटणे शक्यच नव्हते पुढे गांधीजींची हत्या झाली, संघावर बंदी आली माझ्या दिवंगत भावाने ( कै द ग कानिटकर ) संघसत्याग्रहात तीन महिने तुरुंगवास भोगला सत्याग्रहाच्या दिव्यानंतर बंदी उठली या सर्वच काळात भोवती घडणाऱ्या राजकीय घटनाची समज मला होती आणि स्वत ची अशी राजकारणातील मतेही कळत नकळत बनत गेली होती भारताच्या फाळणीला गांधीजी जबाबदार आहेत ही त्यातली एक पक्की कल्पना होती

मी रा स्व संघात कधी गेलो नसतो तर माझा राजकीय पिंड काही वेगळा झाला असता का ? या प्रश्नाच उत्तर 'नाही' असच मी देईन माझे काका कट्टर सावरकरभक्त होते ते म्हणत 'संघवाले निव्वळ दक्ष–आराम करतात देशाला आग लागला असताना या निव्वळ दक्ष–आरामाचा उपयोग काय ? हा त्यांचा संघावर जन्मभर आक्षेप होता खरतर कोणत्याच राजकीय किंवा सामाजिक प्रश्नावर नेमक काही उत्तर मिळण्याची कसलीही तरतूद संघाच्या दैनंदिन कार्यक्रमांत नव्हती. इतक कशाला, पण संघाची जी घोषणावाक्ये मी अनेकदा बौद्धिकांतून ऐकली होती, (एकचालकानुवर्तित्व, हिंदूचा हिंदुस्थान इत्यादी) ती योग्य कशी हे सांगणार एकही तर्कशुद्ध विवेचन संघशाखेवर कधी ऐकल्याच मला आठवत नाही

अस असूनही संघसंस्काराचं माझ्यावरच ऋण मला आवर्जून सांगावस वाटत, याच कारण वेगळच आहे

लहानपणापासून माझ्या शरीरात दोन अगदी भिन्न स्वभावाची माणसं दडून बसलेली आहेत याबद्दल माझी खात्री आहे यातल्या पहिल्याचा स्वभाव चैनी आहे त्याला प्रचंड श्रीमतीची हौस आहे स्वत'च मोठ घर– भोवती प्रचड मोकळी जागा– त्यांत क्रिकेटच एक मैदानसुद्धा आहे– घरा-भोवती सुरेख बाग आहे– आपली बायको मोटार चालवते आहे आणि इतर लोक ते कौतुकाने पाहत आहेत असली स्वप्ने अगदी लहानपणापासून मी अनेकदा पाहत आलो आहे एका रेल्वे कारकुनाच्या पाच मुलामधला हा क्रमाक तीनचा मुलगा इतका श्रीमत कसा होणार असा विचारही तेव्हा माझ्या मनात येत नसे या ' चैनी ' माणसान माझ्या आयुष्याचा कबजा केला असता, तर माझ आजच जीवन म्हणजे घर, ससार, मोटार, चित्रपट --नाटके, सहली, स्वैरसचार, मित्राबरोबर बीयर-व्हिस्कीच्या पार्टी या आणि असल्या गोष्टींची एक जत्री झाली असती सघसस्कारामुळे या चैनी उधळच्या माणसाला माझ्या शरीराचा कबजा करण अशक्य झालं माझ्या शरीरातला दुसरा माणूस याच्या अगदी विरुद्ध वृत्तीचा आहे सर्वसगपरि-त्याग करून देशाचा उद्धार करण्याकरता बाहेर पडण्याची त्याला हौस आहे, भोवतीच दु'ख, दैन्य आणि दारिद्र्य दूर करण्याची त्याची सततची धडपड आहे हजारो दीन-दुबळ्या, गांजलेल्या माणसांचा आधार त्याला बनायचं आहे त्याचा शब्द मग ती माणस बिनतक्रार ऐकणार आहेत– लाखोच्या सभातून, तो भाषणे करणार आहे ! 'इग्रजी भाषेत सागायच तर हा Messiah Syndrome ' आहे आणि लहानपणापासून असलीही स्वप्ने मी अनेकदा ' पाहिली ' आहेत सघसस्कारातच मी वहात गेलो असतो, तर या दुसऱ्या इसमाने माझा कबजा केला असता तस घडल मात्र नाही

सघामध्ये जात होतो तेव्हाही सघीयांच्या काही गोष्टी मला खटकत होत्या सघशाखेवर हिंदु तितुका मेळवावा ' म्हणणारे बरेचजण शाखा सुटताच ' कट्टर ब्राह्मण' बनत होते ज्या गावात मी शाखेत जात होतो त्या गावातल्या संघवाल्यांच्याच प्रमुख कार्यकर्त्यांच्या जोरावर ब्राह्मणांचा वेगळा गणेशोत्सव चालू करण्यात आला होता या गोष्टीला आम्हा कानिटकर भावांचा सक्त विरोध होता आणि सर्व हिंदूचा एकच एक सार्वजनिक

गणेशोत्सव करण्याकरता माझ्या मोठ्या भावान (वि ग कानिटकर) जो धडपडाट केला, त्यांत मी सहभागी होतो पुढे पंढरपूरचा विठोबा महारा-मांगांना खुला करण्याकरता साने गुरुजींनी आपले प्राण पणाला लावले तेव्हाही मला हे कोडं पडल, की हे दिव्य करणारी व्यक्ती सावरकरी संस्कारांतून न येता गांधी संस्कारातून कशी आली ? पूर्वाश्रमी, हरिजनांना विभक्त मतदारसंघ मिळू नयेत म्हणून गांधीजींनीही असच दिव्य केल होत. गांधीजी आणि साने गुरुजी यांच्या राजकारणाबद्दल मला राग होता, तरीही या दोघांचे हिंदुसमाजावर हे प्रचंड उपकार आहेत, त्या उपकाराच ऋण खुल्या मनान मान्य केल पाहिजे अस मी म्हणत असे पण अस काही म्हणण्याची बहुसंख्य संघीयांची त्या वेळी तरी तयारी नसे

१९५४ साली माझी रिझर्व्ह बँकेत नोकरी सुरू झाली पण राजकारणात सक्रीय भाग घेण्याची इतकी जबरदस्त इच्छा, की, १९६० साली मी पार्ले इथल्या कॉमर्स कॉलेजात प्राध्यापकाची नोकरी घेतली. काही थोडीफार [illegible] मी जनसंघ आणि मजदूर संघात केली, पण आपल कुणाशीच संपूर्ण-पणे पटणार नाही याची कल्पना पांच सहा वर्षांत मला आली पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या एका सभेत, 'भारताच्या लोकसंख्यावाढीचा वेग कमी केला पाहिजे त्या वेगाची सांगड भारताच्या आर्थिक प्रगतीच्या वेगाशी घातलीच पाहिजे' असा विचार मी जोरदारपणे मांडताच, एका प्रस्थापित पक्ष पुढाऱ्याने माझ्या भाषणानंतर त्यावर टीका केली– आणि 'वेळ आली तर आपण समुद्रांतूनही अन्न काढू शकू' असले हास्यास्पद् विचार गंभीरपणे मांडले पुढच्या एक-दोन वर्षांत एकूण प्रत्यक्ष राजकारणाबाबतचा माझा उत्साह कमी कमी होत गेला इतका की आता भारत सोडून निदान बाहेरचं जग तरी पाहाव हा विचार बळावत गेला तशी संधी अखेर १९६८ च्या मे महिन्यांत आली आणि मी इंग्लंडला जाणाऱ्या विमानांत पाय ठेवला होता

१९६९ सालांत लंडनमधून जी वार्तापत्रे मी लिहिली त्यांतली बरीचशी या पुस्तकाच्या पहिल्या भागात आहेत पुस्तकाच्या दुसऱ्या भागात एक प्रदीर्घ आणि दोन छोटे लेख आहेत गांधी जन्मशताब्दी निमित्त ऑब्जर

कोस्लर सारखा लेखक काय किंवा किंग्स्ले मार्टिन् सारखा विचारवंत काय, यानी लिहिलेले आणि गांधींच्या व्यक्तिमत्त्वाचं परखड निरीक्षण आणि चिकित्सा करणारे असले लेख आपल्याकडे लिहिलं जाणं कठीणच 'गांधी' या विषया इतकाच आणखी एक महत्त्वाचा विषय मुसलमानाचा। इस्लाम-वरील माझा लेख प्रथम 'सोबत' मधून प्रसिद्ध झाला तेव्हा त्याचं शीर्षक 'भारतासमोरील इस्लामचे प्रश्नचिन्ह' असं चुकीने देण्यात आलं होतं शीर्षकावरून हा लेख मुसलमानांच्या विरोधी आहे असं कुणालाही वाटणं साहजिक होतं पण कॅनेडियन् लेखक श्री स्मिथ् यानी मुळांत लिहिलेला हा लेख इस्लामविरोधी नाहीच या लेखात जागोजागी 'इस्लाम' ऐवजी 'हिंदू' असा शब्द घातला तर यातल्या अनेक गोष्टी हिंदुनाही लागू होतील 'इस्लामी राज्या'च्या कल्पनेत असलेले धोके 'हिंदुराष्ट्रा'च्या कल्पनेतही असू शकतात भारतात खऱ्या अर्थी एका धर्मातीत राजवटीची स्थापना झाली आणि सर्व भारतीयांना एक सरसकट, समान नागरी कायदा लागू झाला तर भारतातल्या इस्लामसमोर कोणते प्रश्न उभे राहतील, याचं विवेचन या लेखात आहे हे स्पष्ट होण्यासाठी या लेखाचा मथळा 'भारतीय इस्लामचे प्रश्नचिन्ह' असा आता योग्य बदलला आहे भारतांतील मुसलमानांच्या सुदैवाने या लेखातल्या काही समस्या त्यांच्यासमोर उभ्या ठाकण्याची शक्यता सध्यातरी नाहीच सौदेबाजी हे आजच्या भारतांतल्या राजकारणाचं एक अविभाज्य अंग आहे सत्तेवर कॉंग्रेस असो की जनता पक्ष असो, या सौदेबाजीचा फायदा घेऊन, धर्मस्वातंत्र्याच्या नावाखाली प्रत्येक संघटित धर्मगटाला ज्या पाहिजे असतील त्या बाष्कळ सवलती मिळण्याची सोय सध्याच्या भारतात आहे

तूर्त इतकं पुरे

हे पुस्तक प्रकाशात येत आहे याला दोन गोष्टी कारणीभूत आहेत मी जे जे लिहिलं ते ते आपल्या साप्ताहिक 'सोबत' मधून श्री ग वा. बेहरे यानी अगत्याने छापलं आणि मला लिहिता ठेवला हे एक कारण. 'काळे दिवस' या माझ्या पहिल्या पुस्तकाचे प्रकाशक श्री ह अ भावे यानी 'पश्चिम वारे'चं प्रकाशन पत्करलं हे दुसरं कारण

या दोघांचेही आभार मानणं तसं सोपं आहे पण मी ते आजच करीत

नाही कारण भविष्यात उभयताची आणखीही मदत घेण्याची माझी इच्छा आहे

यशवन्त ग कानिटकर

१२ जून १९७९

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | असे आहे | असे वाचावे |
|---|---|---|---|
| ८ | १५ | Country | County |
| ९ | ४ | Wesernised | Westernised |
| १४ | १५ | सरासरी दोन किंवा तीन इतकीच आहे | सरासरी वीस ते तीस इतकीच आहे. |
| १६ | ३ | Commonwelth | Commonwealth |
| ३१ | १ | Mortage | Mortgage |
| ३७ | १७ | Cap | Cup |
| ३८ | २६ | Weltare | Welfare |
| ४४ | १८ | existentialiasm | existentialism |
| ५८ | २७ | Deneveue | Denevue |
| ७२ | ११ | Gorilla | Guerilla |
| ७९ | १८ | Jesus | Jesus's |
| ८३ | ६ | Subaltrn | Subaltern |
| ८५ | १६ | Memoris | Memories |
| ८६ | १० | blufing | bluffing |
| ८७ | ११ | unatractive | unattractive |
| ८७ | २७ | reesentmnt | resentment |
| १०६ | ४ | Quershi | Quereshi |
| १०६ | १४ | मुलमान | मुसलमान |
| १०७ | २० | वृत्तपत्रातील दिसते. | वृत्तपत्रातील बातम्यांत दिसते |
| ११६ | १ | परिस्थिती ती गैर लागू आहे | परिस्थितीर नी कल्पना गैर लागू आहे |

| | | | |
|---|---|---|---|
| १४२ | १० | ' शरीयत म्हणजे | ' शरीयतमध्ये |
| | ११ | कुराणात सांगितलेले कायदे ' असे तो म्हणाला, त्याला विचारलं, ' मग सुन्नाहूचा संबंध प्रेषित महमदाशी जास्त आहे– पण सर्वांत महत्त्वाच आहे त कुराण ! ' | कुराणात सांगितलेले कायदे आहेत ' असं तो म्हणाला त्याला सुन्नाबद्दल विचारल्यावर तो म्हणाला– ' सुन्नामध्येही कायदे आहेत पण त्यांचा संबंध महमदाशी अधिक आहे पण सर्वात महत्त्वाच आहे ते कुराण । |
| १६० | १२ | हरिलासच्या | हरिलालच्या |
| १६१ | १९ | कस्तुबाच्या | कस्तुरबांच्या |
| १७० | १६ | मूल्य | मूल्यें |
| १८८ | १० | दिनचर्चा | दिनचर्या |
| १९१ | २७ | राहिला पाहिजे | राहिला पाहिजे असं त्यांना वाटे |

याच लेखकाचे आणिबाणी कालखंडावरील महत्त्वाचे वरदा प्रकाशन–

## काळे दिवस

‘ लेखकाने अत्यंत आटोपशीरपणे हे काळे दिवस रेखाटले आहेत. त्याचे निरिक्षण अचूक आहे निवेदन सक्षम आहे

‘ ओघवती शैली आणि भावनिर्भरता या पुस्तकात आढळतात ’

–दुर्गा भागवत

# नदी थेम्सच्या किनारी

# ब्रिटनमधील आम्ही उपरे



I can see Tiber foaming with blood The way things are going it appears as if the nation is arranging its own funeral pyre 'इनॉक पॉवेल याच्या या कुप्रसिद्ध वक्तव्यानतर काही दिवसांतच ब्रिटनमध्ये पाय ठेवण्याची सधी मला मिळत आहे येतानाच विमानात New Statesman च्या अकातील, पॉवेलच्या या भाषणाचा समाचार घेणारा लेख वाचून बर वाटल होत ब्रिटनमधील उपऱ्यांचा प्रश्न (Immigrants) हा भासवला जातो त्यापेक्षा खूपच कमी महत्त्वाचा आहे, हे त्यात आकडेवारीनिशी सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता तरीही मुख्य प्रश्न आकडेवारीचा नव्हताच मुबईच्या एकूण सख्येत लुंगीवाल्यांच प्रमाण किती याची आकडेवारी किती जणांजवळ होती ? तरीही मुंबईची सव दु ख, सकटं लुंगीवाल्यांमुळेच आहेत असं वातावरण मराठी माणसांमध्ये होतच की प्रश्न होता अखेर वातावरणाचा– सर्व सामान्य माणूस काय समजून चालतो याचा

ब्रिटनशी पहिली ओळख झाली ती लडन शहराद्वारे लंडन हे तसं उपऱ्यांचंच शहर फ्रेंच, जर्मन, इटालियन, आफ्रिकन, भारतीय आणि पाकिस्तान्याचा खूपच भरणा झालेला त्यामुळे रोज व्यवहारात वशवादाचं अस्तित्व तसं कुठेच जाणवत नाही मात्र वृत्तपत्रांत जी चर्चा– लेख पत्रं येतात, त्यातली बरीचशी मनाला बोचण्याइतकी जहरी सुरुवातीला हा विरोधाभास मला उलगडत नव्हता नवख्या इसमाला समोरून येणारा, गाडीत शेजारी बसलेला गोऱ्या कातडीचा प्रत्येक मनुष्य ब्रिटिशच वाटतो प्रथम तर कुणीही गोरा मनुष्य जरा बारकाईनं पाहत गेला, तर तो तिरस्काराने पाहत गेला असं मला वाटे एका मित्राबरोबर बोलताना मी

म्हटलही, ' इथ आल्यापासून आपण मागासलेल्या जातीजमातीचे आहोत अस सतत वाटतय ' पण वेळीप्रसंगी गोऱ्या कातडीच्या माणसांशी जो सपर्क आला, तो आश्चर्य वाटावं इतका चागला होता कुणाही गोऱ्याला एखादा पत्ता विचारावा, तो सविस्तरपणे सागेल एकदा सांगून नीट समज-लस वाटल नाही तर सर्व वर्णन पुन्हा ! शेवटी 'All right?' म्हणून हसून स्वारी वाट धरील माल विकणारा दुकानदार अचानकपणे 'रामराम' नाहीतर 'सलाम आलेकुम करीत होता कसलीही लहान-सहान मदत करण्यासाठी सर्वजण जणू वाटच पाहत असतात, असा अनुभव येत होता लडन शहराच बहुरंगी (Cosmopolitan) स्वरूप हेच याच कारण नसाव-लहानपणापासून झालेले सामाजिक सस्कार याला मुख्यत्वे कारणीभूत म्हटले पाहिजेत इथे आल्यानतर थोड्याच दिवसांनी लिहिलेल्या पत्रात मी लिहिल होत–' आमच्याबद्दल काळजी नसावी उद्या सर्व काळ्या लोकांना परत पाठवण्याचा कायदा पास झाला, तरीही हे लोक आम्हाला सन्मानाने विमानतळावर टाटा करायला येतील '

### ब्रिटनमधले काळे

इथे आल्यावर एका आठवड्यातच इथल्या Country Councils च्या निवडणुका झाल्या (मे ६८) एकजात सर्व ठिकाणी टोरी पक्षाचे लोक निवडून आले मजूर पक्षाचे बालेकिल्ले इतक्या धडाधड कोसळले की वृत्त-पत्रानी मथळे दिले, ' Out Mr Wilson out !' काही काळापूर्वी झालेल पौंडाच अवमूल्यन, त्यापाठोपाठ वाढलेली महागाई, सरकारने सर्व तऱ्हेच्या खरेदीवर घातलेले निर्बंध, वेतन गोठवणूक इ गोष्टी याला कारणीभूत होत्याच पण तितकच महत्त्वाच होत, मजूर पक्षाच Immigration बाबतच धोरण ! कॉमन्स सभागृहात याच वेळी Race Relations Bill वर चर्चा चालू होती Sunday Telegraph या कट्टर टोरी वृत्तपत्रातून, उपरे कमी भाड्यात कसे येतात, अधिकाऱ्याची नजर चुकवून त्याना इंग्लडमध्ये घुसव-ण्याचे मार्ग कोणकोणते, यावर सचित्र लेखमाला चालू होती अमुक एका रस्त्यावर बहुतेक सर्व घर काळ्यानी व्यापल्यामुळे उरलेल्या थोड्या

गोऱ्यांनीही घर कशी सोडली, यासारख्या हकीगती जबाबदार माणसांकडूनही सांगितल्या जात होत्या या साऱ्यांचा परिणाम झाला नसता तरच नवल होत वातावरण बदलत होतं निश्चित एखाद्या ठिकाणी भिंतीवर ' Powell speaks for all Wogs out (wog म्हणजे Wesernised oriental Gentleman) यासारख्या घोषणा लिहिलेल्या आढळत होत्या आता टोरी पक्षाच्या हाती आलेल्या काही नगरपालिकांनी सर्व त-हेच्या उपऱ्यांना आमच्या हद्दीत येण्यास बंदी घाला नाहीतर त्यांच्या मुला-बाळांच्या आरोग्य शिक्षणाकरता जो जादा खर्च लागेल, त्याची सरकारी मदतरूपान तरतूद करा ' असे ठराव पास केले

ब्रिटनमध्ये उपऱ्याची समस्या खरोखर इतकी गभीर आहे का ? साडेपाच कोटी वस्तीच्या या देशात सध्या १२ लाख काळे लोक आहेत टक्केवारी काढली तर हे प्रमाण शेकडा २ २ इतक पडत, पण हे सर्व काळे लोक देशभर सारखे विखुरलेले नाहीत मुख्यत्वे मध्य आणि दक्षिण इग्लडमध्येच त्यांची दाटी झाली आहे, तर स्कॉटलड, वेल्स्, उत्तर आयर्लंड याठिकाणी त्यांची सख्या नगण्य आहे बर्मिगहॅम, मँचेस्टर, ब्रॅडफर्ड, लडनचे काही विभाग हे तर परके वाटू नयेत इतकी भारतीय व पाकिस्तान्यांची दाटी तिथे आहे (ब्रॅडफर्डला इथे आम्ही गमतीन पाकिस्तानची तिसरी राजधानी म्हणतो ) या सर्व शहरातून उपऱ्याच प्रमाण पाचपासून दहा-बारा टक्क्यापर्यंत आहे लडनचा Southhall हा विभाग तर जलधर– लुधियाना वाटावा इतका पजाबी वस्तीचा आहे, बर्मिगहॅमसारख्या शहरात काही प्राथमिक शाळातून २५ टक्के मुल काळ्यांची आहेत ज्या Wolverhampton मतदारसघातून इनॉक पॉवेल निवडून आला, तो विभागही उपऱ्यांनी असाच गजबजलेला आहे या शतकाअखेर इथल्या काळ्याच एकूण प्रमाण ५ टक्क्यापर्यंत वाढेलसा अदाज आहे नुसत्या टक्केवारीचाच विचार केला तर काळ्या लोकांचा प्रश्न तसा गंभीर नाही पण ब्रिटनच दुखण केवळ इतकच नाही दरवर्षी हजारो लोक हा देश सोडून अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया या ठिकाणी जात असतात १९६७ सालाची आकडेवारी पाहिली तर ब्रिटनमध्ये परतलेल्या ब्रिटिश लोकांपेक्षा, ब्रिटन सोडून गेलेल्या ब्रिटिशाची सख्या ८४००० ने जास्त होती याउलट इथ येऊन स्थिरावलेले उपरे १ १० या

प्रचंड प्रमाणात आपले नातेवाईक आणीतच आहेत हा दुहेरी प्रवाह असाच चालू राहिला तर भविष्यात ब्रिटनमधील काळ्याच वर्चस्व खूपच वाढेल ही गोष्ट हेरलेल्या काही माणसांनी या प्रश्नाला अखेर वाचा फोडली सर्व-सामान्य ब्रिटिश माणसान Keep Britain white या घोषणेला मनोमन प्रतिसाद दिला याला कारण दोन कातडीच्या रंगामुळे गोऱ्याच्या मोठ्या जमावातील एखाददोन काळेही उठून दिसतात इथल्या गोऱ्याला जाता येता मग इतके काळे दिसतात की काळ्याच प्रमाण इतक कमी आहे, हे त्याला खरच वाटू नये त्यातून ब्रिटिशाचे mannerisms हे एका वेगळ्या लेखाचा विषय होण्याइतके विपुल रस्त्यात चालताना भरभर चालण, उगीच कुणाशीही गप्पा करीत रस्त्यात उभ न रहाण, जे बोलायच ते हळू आवाजात-- पुटपुटल्यासारख बोलणं, जाता येता Thank you-Bye--its all right ' यासारख्या शब्दाचा मारा, पोषाखाबाबतचे काही आग्रह. इथे आल्यावर थोड्याच दिवसात या साऱ्यांची सवय झाली तरीही मनात या साऱ्याबद्दल कुठेतरीं वैतागच दडी मारून बसलो

कालपरवापर्यंत या साऱ्या काळ्यावर ब्रिटिश माणसाची अबाधित सत्ता होती आता ती सत्ता तर संपली होतीच, पण ब्रिटनबद्दलच्या साऱ्या अभिमानाला धक्का बसावा इतकी भोवतीची परिस्थिती बदललेली होती. युरोपियन कॉमन मार्केटमध्ये प्रवेश मिळावा या हेतून पौडाच अवमूल्यन करूनही फ्रान्सन अखेर त्या प्रवेशावर बंदी घातली होती ब्रिटन हे जगातल एक छोट राष्ट्र बनताना तो पाहत होता मध्यपूर्व आणि इतर ठिकाणच्या फौजा घरी परतत होत्या राष्ट्रकुल ही ब्रिटिशांच्या एके काळच्या वैभवाची खूण पण त्याच राष्ट्रकुलाचा आधार घेऊन काळे लोक भराभर ब्रिटनमध्ये घुसत होते नोकरी मिळवून आपल्या बायको-मुलाना-- आईवडिलाना बोलावून घेत होते गरजा त्या मानानं कमी असल्यान सुखासमाधानान राहू लागले होते

## सुशिक्षित काळे

१९६२ सालपर्यंत ब्रिटनमध्ये प्रवेशाबाबत निर्बंध नसल्याने बरेचसे अशिक्षित लोक ब्रिटनमध्ये आले आपल्याकडील पजाबमधील लोक बहुतेक

या काळात आलेले १९६२ साली राष्ट्रकुलातील नागरिकांकरिता नोकरी परवान्याची पद्धत सुरू झाली. त्यानंतर इथे सुशिक्षित काळ्याची रीघ सुरू झाली आता एक नवीनच समस्या निर्माण होत होती इथले बरेच लोक विश्वविद्यालयीन पदव्या न घेतलेले जे घेतात ते बरेचसे बाहेर निघून जातात या उलट नोकरी परवान्यावर येणारे बहुसंख्य उपरे डॉक्टर, इंजिनियर, आर्किटेक्ट, शिक्षक इत्यादि या सान्यानी इथ यावं, इतर अनेक ब्रिटिशाहून चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळवाव्यात, हे सामान्य ब्रिटिश नागरिकाला कस रुचणार? इथले बहुतेक लोक G C E. O level (आपल्याकडील S S C) पर्यंत शिकतात न शिकतात तोच नोकरी करू लागतात इथल्या शिक्षणक्रमात रोमन साम्राज्यापासून आजपर्यंतचा युरोप, ब्रिटनचा इतिहास, फारतर ख्रिश्चन धर्माचा इतिहास शिकताना मिळणारी इजिप्त जेरुसलेम पर्यंतच्या विभागाची माहिती, या व्यतिरिक्त अतिपूर्वेकडील भारतासारख्या देशाना खूपच कमी स्थान। भारताचा उल्लेख वृत्तपत्रातून झाला तर तो बहुधा भुकेच्या संदर्भात दरवर्षी दुष्काळ पडणारा, हजारो माणस उपासमारीन मरू देणारा-अन्नासाठी दाही दिशा याचना करणारा देश हे इथल्या नवीन पिढीच्या दृष्टीन भारताचं प्रतिमा चित्र आहे (The nation of hungry millions!) तरीही शैक्षणिक पात्रता आणि बुद्धी यांचा विचार केला तर इथे येणाऱ्या उपऱ्यात भारतीयांचा क्रमांक पहिला लागावा आफ्रिकेतून जे नीग्रो इथे येतात ते बहुतेक कामगारवर्गातील ब्रिटिश रेल्वे, लंडन ट्रान्स्पोर्ट इ ठिकाणी अगर खासगी कारखान्यातून कष्टाची अगर बिनबुद्धीची काम करताना हे आढळतात. या उलट भारतीय लोकांच्या नजरा 'बाब' कामावर असतात इथल्या वर्गवारीनुसार त्यांची गणना Executive and Professional या वर्गात होत आपापल्या क्षेत्रातील प्रत्येकाच यश आनंदास्पद असत (स्वत ची 'प्रॅक्टिस' सोडून आलेले डॉक्टर्स, बहुधा प्रथमश्रेणीत पास झालेले इंजिनिअर्स विज्ञानशाखेचे पदवीधर इ०) voucher मिळाल म्हणजे जणू एखादी नवीन पदवी मिळाली ही भावना इथे येणाऱ्या नवख्या भारतीयाच्या मनात असते आपल्याला voucher मिळाल, याचाच अर्थ ब्रिटनला आपली गरज आहे— तेव्हा आता नोकरी लगेच मिळणार असा भाव त्याच्या बोलण्या-चालण्यात असतो.

नोकरीच्या जाहिरातीही तशा खूप असतात नोकरीचे अर्ज सुरू होतात.

—२

नोकरीच्या जाहिराती खूपच असतात नोकरीचे अर्ज सुरू होतात एक-दोन नव्हे– दिवसाकाठी कमीत कमी आठ-दहा! आणि कल्पनाविश्वाला पहिला धक्का बसतो जितक्या वेगाने अर्ज करावेत तितक्या वेगाने नकार गोळा करावे लागतात पांढऱ्या स्वच्छ कागदावर सुबक अक्षरात मुद्रित केलेले विनयशील नकार! अर्ज केल्याबद्दल आभार मानलेले असतात, नोकरी न देता आल्याबद्दल खेद प्रदर्शित केलेला असतो तुमच्या लायकीची नोकरी तुम्हाला लवकरच सापडेल, ही साखरपेरणीही असते एकदा हा खेळ सुरू झाला की तो संपेपर्यंत किती दिवस, नव्हे, महिने लागतील ते लागतील खेळाडू हळूहळू मनात खचत असतो एखादा मग धीर सोडून मिळेल ती नोकरी पत्करतो इथे येणाऱ्या इंजिनियरांची अवस्था सर्वांत कठीण भारतातील कोणतीही पदवी इथे मानीत नाहीत तिचा दर्जा इंटर सायन्स इतका! पोस्ट ग्रॅज्युएट मनुष्य हा पदवीधर समजला जातो पण पदवी मग ती इंजिनियरची असो की डेंटिस्टची असो, तिला या लोकांच्या दृष्टीने दर्जा कमी अर्ज करून कंटाळलेला इंजिनियर मग साधा कारकून म्हणून पोस्ट, टेलिग्राफ, रेल्वे इ ठिकाणी काम पत्करतो एखादा सुपरवायझर म्हणून नळांची जाडी-लांबी मोजण्यावर समाधान मानतो हे असं का घडतं? याला दोन-तीन कारणं असावीत इथल्या सर्व कारखान्यातून नोकरवर्गाला तांत्रिक शिक्षण देण्याची पद्धत आहे एकूण पगाराच्या सुमारे दोन टक्के इतकी रक्कम याकरता खर्च करण्याची सक्तीच आहे तेव्हा S S C पातळीच्या परीक्षापर्यंत पोचलेले १६–१७ वर्षांचे इथले तरुण शिकाऊ म्हणून घेऊन त्यावर तो पैसा खर्च करणं ही इथली पद्धत आहे याहून उच्च शिक्षणाकरता ' 'Sandwich Courses' असतात (काही दिवस कॉलेज, काही दिवस नोकरी असा चार वर्षांचा अभ्यासक्रम) आठवड्यातून एक दिवस शिकण्याकरता सुट्टी घेऊन (Day Release) उरलेले दोन दिवस संध्याकाळी कॉलेजला जाऊनही पदवीपरीक्षेला बसणं सहज शक्य असतं साहजिकच परदेशात शिक्षण घेतलेल्या माणसापेक्षा असे शिकाऊ इथल्या कारखान्यांना व्यवस्थापकांना अधिक पसंत पडतात त्यातूनही

एखादा आपल्या विषयातील तज्ज्ञ काळा मनुष्य, त्या मानानं कमी दर्जाच्या कामासाठी घेण्यास त्यांची हरकत नसते. कामगाराचा तुटवडाही भरून निघतो आणि पगार थोडा कमी द्यावा लागून पैसेही वाचतात गेल्या पाव शतकात इतके काळे लोक इथे आले पण यांपैकी एकहीजण A. E. I., G. E. C. सारख्या नाणावलेल्या एखाद्या कारखान्यात मोठ्या हुद्द्याच्या जागी पोचलेला नाही तसं घडणार नाही याची योग्य ती खबरदारी हे धूर्त लोक घेतात

**इनॉक पॉवेल**

मार्च ६८ मध्ये Walsall इथे इनॉक पॉवेलने आपलं पहिलं भाषण केल्यानंतर विरोधी पक्षनेते श्री हीथ् यांनी आपल्या Shadow cabinet मधून पॉवेलची हकालपट्टी केली याचा परिणाम इतकाच झाला की, तो राजकीय अर्थी हुतात्मा झाला पुढे ऑगस्ट ६८ मध्ये टोरी पक्षाच अधिवेशन ब्लॅकपूल इथे भरल या अधिवेशनात इनॉक पॉवेल बोलणार हे कळताच त्याच्या भाषणाचे वेळी तुडुंब गर्दी झाली इनॉक पॉवेलन या वेळी एक पाऊल अधिक पुढ टाकल ब्रिटनमध्ये यापुढे सर्व तऱ्हेच्या Immigration वर संपूर्ण बंदी तर असावीच, पण अशी बंदी घातली तरीही या देशात अगोदरच इतके उपरे आलेले आहेत की ब्रिटिश लोक आपल्या देशातच परके ठरण्याची भीती आहे तेव्हा यांपैकी शक्य असेल तितक्या लोकाना परत आपापल्या देशी जाण्यास उत्तेजन देऊन त्याकरता त्याना आवश्यक ती आर्थिक मदत देऊन त्यांची स्वगृही बोळवण केली पाहिजे, अशी त्यान मागणी केली इनॉकच्या या भाषणाच काही टोरी प्रतिनिधींनी अतिशय उत्साहान स्वागत केल तर काहींनी टवाळीचे सूरही काढले Send them home, says Enoch यासारख्या सनसनाटी मथळ्यानिशी साऱ्या वृत्तपत्रानी या भाषणाला प्रसिद्धी दिली टोरी पक्षाच्या या अधिवेशना-पाठोपाठ मजूर पक्षाच अधिवेशन त्याच जागी भरल या अधिवेशनात पंत-प्रधान विल्सन यानी भावी सार्वत्रिक निवडणूक मजूरपक्ष जिंकीलच या आत्मविश्वासान सर्व पक्षकार्यकर्त्यांनी यापुढे आक्रमक वृत्तीन काम कराव अस सांगितल आणि पॉवेलप्रणीत विचारसरणीवर अतिशय कडाडून हल्ला चढविला खुद्द पॉवेलचा उल्लेख त्यानी that Guru from Wolver

hampton ' या उपरोधिक शब्दात केला (यापूर्वी राष्ट्रकुल पतप्रधान परिषदेतही ' Please do not ask me to explain the phenomenon that goes by the name of Enoch Powell असे उद्गार विल्सनें यांनी काढले होते ) Eastbourne इथे १५ नोव्हेंबरला पॉवेलन पुन्हा या विषयावर भाषण केल त्यात त्यान सागितलं, ' इथे येणाऱ्या उपऱ्याच जनन-प्रमाण वर्षाला दर हजारी २३ इतक प्रचड आहे ब्रिटनच्या जनन-प्रमाणाच्या सरासरीहून हे खूप जास्त आहे परिणामी, वेगान लोकसख्या वाढविण्याची सवय पडलेले हे उपरे (Who grow faster by habit) थोड्याच दिवसात ब्रिटनची हिरवीगार रम्य कुरणाची भूमी खराब करून टाकणार आहेत इतराहून स्वत'ला जास्त समजत या थाटात वावरणारे तथाकथित मानवतावादी, राजकारणी आणि साम्यवादी लोक वगळले तर, तर ब्रिटनमधील जनतेला ही गोष्ट कधीच रुचणारी नाही ' इनॉक पॉवेल यांची आकडेवारी सकृद्दर्शनी चूक नव्हती यामागील गोम इतकीच की, इथे येणारे बहुतेक उपरे ३० ते ४० या वयोमानाचे असतात आणि या गटातील दर हजारी जननप्रमाणाची इथली सरासरी दोन किंवा तीन इतकीच आहे इनॉकच्या भाषणातील हा फोलपणा इथे अनेक जणानी उघड केला (खर तर इनॉक पॉवेलच्या अगर इतर टोरी पुढाऱ्याच्या या विषयावरील वक्तव्यानतर इथे होणाऱ्या प्रतिक्रियेचाही एक साचा आता ठरून गेला आहे ) इनॉक पॉवेल, पक्षनेते हीथ्, क्विंटिन् हॉग्, अलेक् डग्लस् होम्, सेल्विन लॉईड ही टोरी पक्षाची सारी माणस हुषार आहेत बिलदर आहेत ब्रिटनबाबत या साऱ्याना एक खास अभिमान आहे आणि काळ्या कातडीच्या लोकाबाबत खूपच अविश्वास आणि दुरावा आहे (ब्रिटिशानी भारत सोडावयास नको होता– भारतावर ते सहज राज्य करू शकत राहिले असते, अस इनॉक पॉवेलच मत नुकतच प्रसिद्ध झाल आहे ) खुद्द इनॉक पॉवेल याच इग्रजी भाषेवर चांगलंच प्रभुत्व आहे आणि याचा पुरेपूर उपयोग करून आपल्या भाषणातील शब्द तो असे काही निवडतो की त्याचा अपेक्षित परिणाम ते ऐकणाऱ्या-वाचणाऱ्यावर हटकून व्हावा ब्रिटिशाच्या सततीचा उल्लेख तो British Babies असा करील तर काळ्याच्या सततीचा उल्लेख ' off-springs of the coloured ' असा होईल Tiber foaming with

blood ' ' British being made foreigners in their own homes ' plush green pastures of England ' या आणि इतर अशाच वाक्याच्या साहित्यिक सौंदर्याचा आणि परिणामकारितेचा आढावा घेणारा एक खास लेखच New Society या इथल्या साप्ताहिकान प्रसिद्ध केला होता उपरा, लुंगीवाला हे मुबईत रूढ करण्यात आलेले शब्द आणि 'मुबई बहुरगी झाली तरी चालेल— बहुढगी झाली तरीही चालेल पण बहुलुगी होता कामा नये ' यासारख्या विधानाची अशा वेळी सतत आठवण होत राहते पोर्तुगालच्या सालाझार प्रमाणेच इनॉक पॉवेलचाही इतिहासाचा चागला व्यासग आहे पूर्वायुष्यात काही काळ यान प्राध्यापकी केलेली आहे आतापर्यंत चार पुस्तक प्रसिद्ध केली आहेत टोरी पक्षाच्या भूतकाळातील कार्याचा आढावा घेणार एक पुस्तक गेल्याच वर्षी त्यान प्रसिद्ध केल. पॉवेलला या प्रकरणी साथ देणारे टोरी पक्षाचे आणखी एक पुढारी श्री क्विटिन् हॉग् हे कवी आहेत सर होम्, लॉईड, हीथ् ही तर मत्रीपद भूषविलेली माणस आहेत त्याच कर्तृत्व एरवी सर्वमान्य आहे Immigration च्या प्रश्नावर ही सारी माणस जे काही बोलतात, करू पाहतात त्याच्या परिणामाची नेमकी कल्पना त्यांना असते आणि त्याचे हेतू आजतागायत बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाले आहेतस म्हटल पाहिजे इनॉक पॉवेल बोलताना एखादा नवीन मुद्दा मांडतोच पण प्रत्यक भाषणात त्याला आलेल्या पत्रातील म्हणून काही सनसनाटी हकीगतीही सांगतो पोस्टाच्या पेटीजवळ विष्टेचे कागद टाकणे, रात्री अपरात्री नाचगाणी, आरडाओरडा करून मालकाला त्रास देणे यासारख्या दर्शनी पोरकट हकीगती तो सागतो आणि या हकी-गतीचा खरेखोटेपणा पडताळून पाहाण्याबाबत पुढे टाळाटाळ करतो ब्रिटिश लोकमत हळूहळू पण निश्चितपणे आपल्या बाजूला झुकत आहे या गोष्टीची त्याला जाणीव आहे आणि म्हणूनच याबाबत मजूर पक्षीय नेते, डाव्या विचारांची New statesman सारखी साप्ताहिक, साम्यवादी विचार-सरणीन भारलेले महाविद्यालयातील विद्यार्थी आणि राष्ट्रकुलातील राष्ट्र यांची क्षिती तो बाळगीत नाही मजूर पक्षाचा याबाबत बरीच केविलवाणी अवस्था आहे या पक्षांतील ' back benchers समजल्या जाणाऱ्यापैकी बरेचसे पॉवेलच्या मताशी सहानुभूत आहेत मात्र विल्सन् याची पक्षनेतेपदी

पुरती मांड असल्याने काही मोठा धोका तूर्त तरी त्या पक्षास नाही Immigration वर बंदी घातली तर राष्ट्रकुलातील ऑस्ट्रेलिया, कॅनडा, न्यूझीलंड या गोऱ्या राष्ट्रांतील लोक रागावतात, Commonwelth immigrants ना इतर देशातून ब्रिटनमध्ये येणाऱ्या aliens 'हून मिळणाऱ्या जादा सवलती काढून घेतल्या तर राष्ट्रकुलाचा पायाच उखडला जातो केवळ ब्रिटिश समाजाचा विचार केला तरीही डॉक्टर, नर्सेस् शिक्षक इ चा तुटवडा भरून काढण्याच्या दृष्टीने voucher पद्धत पूर्णपणे बंद करता येत नाही मात्र यामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक असंतोषाचा बळी म्हणून प्रत्येक पोटनिवडणुकीत टोरी पक्षाकडून मार खावा लागतो तेव्हा vouchers वर संपूर्ण बंदी घातली नाही तरी त्यांची संख्या कमी करण्याचा आणि Immigrants वर इतरही काही निर्बंध घालून ब्रिटिश लोकमत चुचकारण्याचा मार्ग मजूर पक्षाने स्वीकारला होता पण नशीब असं खडतर की आफ्रिकेतील आशियाई लोकांची हकालपट्टी कमी न होता उलट वाढली आणि ब्रिटिश नागरिक म्हणून याही लोकांना ब्रिटनमध्ये प्रवेश देणं भाग पडलं परिणामी पुढील आठ-दहा वर्षांतरी आशियाई उपऱ्यांचा लोंढा असाच चालू राहणार आहे दरम्यान हाँगकाँग बेट चिन्यांच्या हवाली करण्याची वेळ आली तर तिथल्या चिन्यांचा लोंढा इथे सुरू होईल कारण तेही सारे ब्रिटिश नागरिकच आहेत

—२

पुढील सार्वत्रिक निवडणुकीत टोरी पक्ष निवडून आला तरीही तो काय करू पाहील ? याचीही थोडीफार कल्पना काही दिवसांपूर्वी आली

पुढील सार्वत्रिक निवडणुकीत टोरी पक्षाच्या हाती सत्ता आली तर तो पक्ष उपऱ्यांच्या या प्रश्नाबाबत काय करील ? टोरी पक्षनेते श्री हीथ् यांनी स्वत च या प्रश्नाचं उत्तर अचानकपणे देऊन टाकलं

### हीथ आणि पॉवेल

राजकीय पक्ष आणि नेत्यांची लोकप्रियता अजमावून पाहाणारे चाचणी अंदाज इथे दर महिना-पंधरादिशी प्रसिद्ध होत असतात. जानेवारी ६९ पूर्वीचे काही महिने, या सर्व लोकमतपाहाणी अंदाजातून एक गोष्ट पुन पुन्हा दिसत होती मजूर पक्षाची लोकप्रियता सतत घसरून टोरी पक्षाची

लोकप्रियता जरी वाढत होती, तरी या पक्षाचे पुढारी श्री विल्सन आणि श्री हीथ् यांच्या वैयक्तिक कर्तृत्वाबाबत लोकमत फारस बदललं नव्हत टोरी पक्षनेते श्री हीथ् हे सनसनाटी भाषणाची आवड नसलेले, अतिसभ्य, काहीसे मवाळ गृहस्थ आहेत बहुधा यामुळेच टोरी पक्षातील सेल्विन् लॉईड्, क्विटिन् हॉग्, इनॉक पॉवेल इ नेते हीथ् याची पर्वा नसल्यासारखे वागतात– या साऱ्या जणावर हीथ् याची हवी तितकी पकड नाही याउलट मजूर पक्षातील सर्व प्यादी विल्सन् याच्या पूर्णपणे हातात आहेत या काळात इनॉक पॉवेल यानी तर सनसनाटी भाषणाचा सपाटाच चालवला होता केवळ immigration वर नव्हे तर इतर अनेक विषयांवरची त्याची भाषण गाजली होती एक भाषणात ब्रिटनची आयात-निर्यात व्यापारातील घसरगुडी थाबवण्याकरता floating Pound ची कल्पना त्यानी माडली होती आणखी एका भाषणात सर्व सरकारी खर्चास कात्री लावून आणि सरकारप्रणीत Training Boards बरखास्त करून त्या योगे होणाऱ्या बचतीच्या परिणामी कराचा बोजा खूप कमी करण्याची योजना माडली होती एकामध्ये सर्व Council Houses खासगी घरमालकाना विकून टाकण्याची सूचना केली होती परिणामी 'इनॉक पॉवेल हा एक मूर्ख मनुष्य आहे, इथपासून तो 'चर्चिलनतर प्रथमच इतका महान् पुढारी ब्रिटनला लाभला आहे' इथपर्यंत भिन्न प्रतिक्रिया पॉवेलबाबत बोलताना व्यक्त होत होत्या मात्र काही जहाल डावे सोडले, तर बाकी बहुसख्य ब्रिटिश माणसाचा पॉवेल हा अधिकाधिक लाडका बनत होता Sunday Telegraph 'न घेतलेल्या एका gallup-poll मध्ये, जगातील सर्वात आवडत्या पुढाऱ्याच्या यादीत, पतप्रधान विल्सन् याच्यापेक्षा दुप्पट मत मिळवून पॉवेलन पहिला क्रमांक घेतला विल्सन् यांचा क्रमाक दुसरा तर हीथ् याचा बारावा लागला ( आवडत्या स्त्री पुढाऱ्याच्या यादीत सौ बार्बरा कॅसल् या मत्रीणबाईंनी राणीपेक्षा ५ टक्के मत जास्त मिळवून पहिला क्रमांक घेतला अमेरिकेचे माजी अध्यक्ष जॉन्सन्, लॉर्ड माऊटबॅटन, डॉ बर्नार्ड, ऱ्होडेशियाचा स्मिथ्, ही या यादीतली इतर काही नाव होती ) इनॉक पॉवेलन immigration बाबत चालवलेली सारी आदळआपट, हा हीथ् याना नेतेपदावरून बाजूला सारून स्वत टोरी पक्षाचा नेता बनण्याच्या खेळाचा एक भाग आहे, असही

बऱ्याच जणाना वाटत होत स्वत पॉवेल मात्र सागत होता,

' The sleeping nation will not be awakened by lullabies It must be taken firmly by the shoulders and given an almighty shake If giving lead means being exhorted and preached at, cajoled and bullied, that is the last thing we want The lead Britain needs will come from that party that is prepared to break the dreams or the nightmare.'

पॉवेलच्या या वाढत्या लोकप्रियतेमुळे अस्वस्थ होऊन की काय टोरी पक्षनेते हीथ् यांनी २५ जानेवारीला वॉल्सॉल् इथे एका पक्षसभेत immigration च्या प्रश्नावर विस्तृत भाषण केल त्यात ते म्हणाले ' या प्रश्नाचा विचार करताना, ब्रिटनमध्ये यापूर्वीच प्रवेश केलेले लोक आणि भविष्यात येऊ पाहणारे लोक याचा वेगवेगळा विचार केला पाहिजे ब्रिटन मध्ये प्रवेश केलेल्या लोकांना इतर ब्रिटिश नागरिकांप्रमाणेच समान सधी आणि न्याय मिळाला पाहिजे आणि प्रवेश करतेवेळी स्वत ची पत्नी-मुल इ नातलग इथे आणण्याबाबत त्यांना मिळालेली आश्वासन पाळली गेली पाहिजेत मात्र या प्रश्नामुळ लोकाच्या मनात जो सशय आणि भीती निर्माण झाली आहे, ती दूर केलीच पाहिजे १९६२ साली आम्ही राष्ट्र-कुलातून येणाऱ्या लोकांकरिता कायदा पास केला, तेव्हा मजूर पक्षान आम्हाला कडाडून विरोध केला त्यांची चूक त्यांना एव्हाना उमगली असेलस मी धरून चालतो भविष्यात टोरी पक्ष सत्तेवर येताच राष्ट्रकुलातून येणाऱ्या या माणसाना इतर देशातून येणाऱ्या परक्या नागरिकाचेच नियम लागू केले जातील, राष्ट्रकुलाचे नागरिक म्हणून त्यांना मिळणाऱ्या सवलतीचा जो भयानक गैरफायदा घेतला जातो आहे, तो बद केला जाईल

'याकरता, नव्याने प्रवेश करणाऱ्या लोकाना पुढील निर्बंध लागू केले जातील (१) या देशात कायम वास्तव्य करण्याचा त्याना अधिकार असणार नाही विशिष्ट तऱ्हेच्या कामाकरता, विशिष्ट ठिकाणाकरता, विशिष्ट काळ चालू शकणारे नोकरी परवाने त्यांना मिळतील (२) ब्रिटनमध्ये राहाण्याकरिता मिळणाऱ्या परवान्याची मुदत त्याना दरवर्षी वाढवून घ्यावी लागेल एक नोकरी सोडून दुसरी पकडतानाही परवानगी घ्यावी लागेल

ज्या विभागात उपऱ्याची अगोदरच दाटी झाली आहे, अशा विभागात नवीन उपऱ्यांना प्रवेश द्यायचा की नाही याचा विचार करून याबाबत अधिकारी निर्णय घेऊ शकतील ब्रिटनमध्ये कायम वास्तव्याकरता परवानगी देण्याचा विचार चार वर्षांनंतरच करता येईल याकरता त्याची वर्तणूक ध्यानी घेतली जाईल (३) आपल्या निकटच्या नातलगांना इथे आणण्याबाबत कोणताही अनिर्बंध अधिकार त्याना असणार नाही याबाबतचे निर्णय ब्रिटिश अधिकारी आपल्या अधिकारात घेतील (४) कुणाही व्यक्तीला ब्रिटनमध्ये प्रवेश देण्याबाबतचा निर्णय त्या त्या व्यक्तीच्या देशातच घेतला जाईल ब्रिटनमध्ये प्रतिवर्षी अमुक इतक्या लोकाना प्रवेश द्यायचा ही कोटा पद्धती (quota system) बंद केली जाईल किती– लोकांना कोणत्या लोकांना प्रवेश द्यायचा हे सरकार परिस्थितीनुसार ठरवील '

भाषणाच्या अखेरीस मात्र ते थोडे वहावले असावेत कारण पॉवेलच्या पद्धतीनं ते म्हणाले, ' टोरी पक्ष सत्तेवर आल्यावर या गोष्टी करीलच पण या प्रश्नाची निकड आणि गांभीर्य ध्यानी घेता सध्याच्या मजूर सरकारनंच ऑगस्टच्या लोकसभा बैठकीपूर्वी या गोष्टी कराव्यात असं मी सुचवतो या प्रश्नाबाबत सरकार जागरूक आहे, अशी लोकाची खात्री पटली की सध्याच संशयाच आणि भीतीचं वातावरण झपाट्यानं दूर होईल मात्र अन्यथा याबाबत सर्व थरात निर्माण झालेल्या असंतोषाच्या परिणामाची जबाबदारी सरकारवर राहील '

या भाषणाला हजर असलेल्या ८०० पक्ष कार्यकर्त्यांनी हीथ् याच्या या भाषणाचं खूपच उत्साहानं स्वागत केलं त्याचं भाषण संपल्यावर दीड मिनिटपर्यंत सर्वांनी उभं राहून टाळ्या वाजवून त्याना अभिवादन केलं व्यासपीठावर टोरी पक्षाचे जे काही नेते बसले होते, त्यातील एक व्यक्ती होती इनॉक पॉवेल ! इतरांबरोबर त्यानही उभं राहून टाळ्या वाजवल्या– हा तर त्याचाच विजय होता श्रोत्यांपैकी एकजण ओरडलाच, ' आता पॉवेलला आपण Shadow cabinetमध्ये परत केव्हा घेता याची आम्ही वाट पाहत आहोत '

**उपन्यांचे नातेवाईक**

हीथ् याच्या या भाषणावरील प्रतिक्रिया अपेक्षित अशाच झाल्या 'Take heed' या मथळ्याखाली Sunday Telegraph न अग्रलेख लिहिला आणि हीथ्सारखा जबाबदार नेता जे सागतो ते सरकारन ऐकावं, असा साळसूद सल्ला दिला खर तर हीथ् यांच्या उपाययोजनेने या प्रश्नाची उकल होणार नव्हतीच राष्ट्रकुलातील नागरिकाना मिळणान्या परवान्याची संख्या १९६५ साली १२८८० इतकी होती ती १९६६ सालापासून ५००० इतकी कमी करण्यात आलेलीच होती ही सख्या आणखीही कमी करण्याचा– शून्यावर आणण्याचा अधिकार सरकारजवळ होताच खरा प्रश्न निर्माण केला होता तो प्रचड सख्येनं येत राहिलेल्या नातेवाईकांनी ! १९५६ पासून आजवर इथ आलेल्या कित्येक जणानी अद्यापही आपले नातेवाईक इथे आणलेले नव्हत आता याबाबत काही निबंध येऊ पाहताच प्रवेश घेणान्या नातेवाईकाची संख्या खूपच झपाट्याने वाढली १९६५ ते १९६८ या चार वर्षांतील नातेवाईकांचे आकडे ५७०६२, ५०४६५, ६१३७७ आणि ५३०६९ असे अनुक्रमे होते यात आणखीही एक गोम होती नातेवाईकाना प्रवेश घेताना entry certificate आवश्यक नव्हत तेव्हा प्रथम इथे येऊन स्थायिक झालेल्या एखाद्याने स्वत चे आई, वडील, पत्नी, मुल आणताना त्यातच दुसन्या कुणाच्या तरी आई-वडिलाना अगर मुला-मुलीला इथ आणायच– या खोट्या नातलगांनी कालांतरान आपल्या खन्या-खोट्या नातलगांकरता अर्ज करायचे, अशी ही नातेवाईकाची साखळी चालू झाली की तिला अत असा नाहीच ! एका उपन्यामागे दहा नातलग अशी सरासरी काय उगीच होते ? याच सख्येन पुढील पाच-दहा वर्षे तरी नातलगांचे लोंढे चालूच राहणार आहेत प्रतिवर्षी १५०० या सख्येनं प्रवेश परवाने मिळवून इथे येणारे आफ्रिकेतील आशियाई वशाचे लोक व त्याचे नातेवाईक शिवाय येत राहतील ते निराळे !

या प्रश्नाच हे स्वरूप ध्यानी येताच, नातेवाईकांच्या प्रवेशाला बदी करा, या मागणीचा जोरही खूप वाढला होता हीथ् यांनी आपल्या भाषणात अस करण्याला तर स्पष्ट नकार दिला होता या भाषणानंतर लगोलग

टेलिव्हिजनवर मुलाखत देताना 'तुम्ही पतप्रधान होताच नोकरी परवाने देणं पूर्णपणे बद कराल काय ?' या प्रश्नाला उत्तर देताना तर हीथ् म्हणाले 'या देशातील डॉक्टर, नर्सेस आणि शिक्षक याचा तुटवडा लक्षात घेता, निदान या लोकांना तरी परवाने देण थांबवता येणार नाही'

अस्तित्वात असलेल्या कायद्यातील फटी बुजवण आणि भविष्यात राष्ट्र-कुल नागरिकांना इतर परकीय नागरिकांप्रमाणे वागवण, एवढच मग हीथ् यांच्या भाषणाचं सार उरल 'Commonwealth or aliens या आपल्या अग्रलेखात Times न गोष्ट स्पष्ट केली मजूर पक्षाची व इतर जहाल डाव्याची प्रतिक्रिया अर्थात् याहून कडक होती' 'Heath's disgraceful outburst या मथळ्याखाली New Statesman' न त्याच्या भाषणाचा समाचार घेतला. हीथ् हे पॉवेलच्या सुरावर नाचत असल्याचा आरोप तर अनेकांनी केला मात्र या भाषणाने सरकारवर परिणाम केलाच अवघ्या चार दिवसांनी ३० तारखेला गृहसचीव कलाहन यांनी याबाबत नवीन निर्बंध जारी केले आणि 'नियोजित वराना' प्रवेशबंदी केली पाठोपाठ काही दिवसांनी ब्रिटनमध्ये प्रवेश करण्याकरता प्रवेश परवाना आवश्यक करण्यात आला हा परवाना त्या त्या देशातच घेतला पाहिजे असही जाहीर झाल

ज्या उपऱ्याचा बंदोबस्त करण्याकरता हा आटापिटा चालू आहे, त्या आमची इथली स्थिती आहे तरी कशी ?

—४

वशवादाच्या प्रश्नानं ब्रिटनमधील साऱ्या राजकारणाच अतरंग ढवळून निघत असताना इथे आलेल्या उपऱ्याची याबाबत काय प्रतिक्रिया होते ? त्याची ब्रिटनमधील आजची वर्गवारी आहे तरी कशी ?

**वेस्ट इडियन काळे**

कॅरिबियन बेटे, हिदुस्थान आणि पाकिस्तान या तीन ठिकाणांहून आलेले कृष्णवर्णीय उपरे, सस्कृती आणि धर्मदृष्टया एकमेकांहून खूपच भिन्न आहेत या तीन गटांतील सर्वांत आनदी गट वेस्ट इडियनांचा ! ब्रिटनमध्ये सध्या एकूण तीन-साडेतीन लाख वेस्ट इडियन असावेत यातले बहुसंख्य लंडन

आणि मध्य इंग्लंडमधील प्रमुख शहरातील बस-रेल्वे वाहतूक आणि खाजगी कारखान्यातून कष्टाची काम करतात या तऱ्हेच्या कामांना आवश्यक ते मनुष्यबळ तुटपुंजं वाटू लागल्यावर १९५६ साली या लोकाना इंग्लंडमध्ये आणण्याची एक खास योजना London Transport च्या अधिकाऱ्यानी तयार केली बार्बडोस बेटातून आवश्यक त्या लोकांची निवड करून त्यांना आयात करण्यात येई निवड झालेल्या या लोकांची वैद्यकीय तपासणी इ झाल्यावर बार्बडोस सरकारतर्फे त्याना इथे येण्याचा खर्च कर्जाऊ दिला जाई. नोकरी सुरू होताच कर्जफेडीला सुरुवात होई इथे आल्यावर त्याच्या राहण्याची व्यवस्था होईपर्यंत आवश्यक ती मदत त्याना मिळे १९६२ सालानतर त्रिनिदाद आणि जमेका बेटांनाही ही योजना लागू झाली

एका खास रागडच्या शैलीतल यांच इंग्लीश बोलण भारतीयांना तरी कळण कठीणच संगीत-नृत्याबाबतची यांची आवड तर प्रसिद्धच आहे रात्री-अपरात्री यांच्या घरातून नाच-गाण्याचा धुडगूस चालतो ही इथल्या गोऱ्याची कायमची तक्रार. एकूण व्यवहारातही आरडाओरडा जास्त स्त्रियाही पुरुषाइतक्याच धटिंगण असल्याने स्त्री पुरुष संबध बरेचसे स्वैर. एखादी वेस्ट इंडियन मुलगी गाडीत-बसमध्ये दिसल्यावर, ओळख असो वा नसो, तिच्याशी सरळ बोलू लागायच, तिला शीळ घालायची– थोडी-फार ओळख होताच पुढचा धांगडधिंगा सुरू करायचा हे प्रकार सर्रास चालतात याच धीट प्रवृत्तीमुळे गोऱ्या मुलीशी ससार करणाऱ्या नीग्रोच प्रमाण भारतीय अगर पाकिस्तान्याहून जास्त आहे मात्र एरवी इतर कुणाच्या वाटेला हे लोक जात नाहीत ब्रिटनमध्ये वर्षानुवर्षे राहिल्यावरही जमेका बेटावरील उबदार हवामान आणि तिथल्या स्वच्छ निळ्या आकाशाच आकर्षण कायमच राहिलेल असत परिणामी यातले अनेकजण कालातराने स्वदेशी परततात वेस्ट इंडियन बेटातून इथे येणाऱ्या लोकापेक्षा तिथे परतलेल्या लोकांची सख्या गेल्या वर्षी जास्त होती

यांतले बहुतेकजण धर्माने ख्रिश्चन म्हणून इथल्या इंग्लिश माणसांनी याच्याबाबत थोडी जास्त जवळीक दाखवली पाहिजे पण प्रत्यक्षात तस घडत नाही आशियाई माणसापेक्षा वेस्ट इंडियनाचा शेजार हे इथल्या गोऱ्यांना खूपच मोठ सकट वाटत बाहुचात्कारी गोड बोलणारी इंग्लीश

माणस, आपल्याला त्याच्या समाजाचा भाग मानण्यास तयार नाहीत, ही गोष्ट याच्या लक्षात येण्यास वेळ लागत नाही. या गोष्टीची फारशी पर्वाही याना नाही था लोकांच स्वतःच अस एक वेगळ जग आहे या जगात शिरण्याची अगर ढवळाढवळ करण्याची गोऱ्या ब्रिटिशाना कधी हिंमत होईलस वाटत नाही भारतीय लोकाप्रमाणे हे लोक इथे भिऊन सकोचून वावरत नाहीत तस पाहिल तर इथल्या सामाजिक जीवनात बाचाबाचीचे प्रसग येण्याच्या वेळा खूपच कमी येतात मात्र पब्मध्ये ( public Bar शब्दाच सक्षिप्त रूप.) अगर इतर कुठे एखादा गोरा पोरगा थोडाफार वाकडेपणान वागलाच तर त्याला तिथल्या तिथे ठोकून काढायलाही हे लोक कमी करणार नाहीत ब्रिटनमध्ये वांशिक दगली होण्याची शक्यता तूर्त तरी नाहीच मात्र भविष्यात केव्हातरी अशी वेळ आलीच तर इथल्या भारतीयांना या रागड्या आफ्रिकनाचा खूपच आधार असेल स्वतःच्या शारीरिक कुरूपतेच्या शापान कोळपलेल्या या लोकांनी, एके काळी गोऱ्या लोकांकडून अनेक तऱ्हेचे अन्याय सहन केले आता तो काळ सपला आहे अमेरिकेतील नीग्रोना जाग आली आहे तिथल्या Black power चळवळीन सर्व ठिकाणच्या निग्रोंना एक नवीन दृष्टिकोण दिला आहे ' Black is beautiful ' ही नवीन भावना सर्वत्र मूळ धरीत आहे खुद्द अमेरिकेतील निग्रोंमध्येही वेस्ट इडियन निग्रो हे धडाडी आणि कर्तृत्वाकरता प्रसिद्ध आहेत त्यांचा उल्लेख यामुळ ' काळे ज्यू ' असा केला जातो ही धडाडी आणि निर्धार आता ब्रिटनमधील वेस्ट इडियन जमातीत वाढत्या प्रमाणावर दिसतो आहे ' Notting Hill ' इथल्या चर्च आणि इतर सामाजिक सघटनांनी काळ्या-गोऱ्यांना एकत्र आणणाऱ्या समिश्र सस्था स्थापन केल्या होत्या गोऱ्यांच्या कृपाछत्राखाली काळ्याचा उत्कर्ष साधण्याच्या या प्रयत्नानी फारस काही साधणार नाही हे लक्षात येताच, गोऱ्याची मदत न घेताच वेस्ट इडियनाची चळवळ उभी राहिली पाहिजे हा विचार आता खूपच बळावला आहे

इथल्या अनेक वेस्ट इडियन संस्थांना एकत्र साधणारी ' West Indian standing conference ' ही सस्था १९५९ साली स्थापन झाली तेव्हा तीत बहुसंख्य गोरेच होते आता तिच स्वरूप सपूर्ण पालटल असून, बरच लढाऊ बनलं आहे तरीही अमेरिकेप्रमाणे इथे Black power नावाची

शक्ती खऱ्या अर्थी अस्तित्वात नाहीच, कारण भिन्न-भिन्न बेटांवरून इथे आलेले हे लोक आपापल्या बेटांबाबतचा ' राष्ट्रीय ' अभिमान विसरू शकलेले नाहीत St Anguilla–kitts–Nevis यांच्या सघराज्यातून St. Anguilla बेट बाहेर फुटल्यानतर ही दुफळी आता अधिकच वाढली आहे मात्र ब्रिटनमधील वातावरण जसजस बदलत आहे तसतसे भिन्न सामाजिक स्तरातील वेस्ट इडियन्स एकमेकांच्या अधिक जवळ येत आहेत शिकले सवरलेले इडियन्स बिनशिकलेल्या इतर वेस्ट इडियनांच्या प्रश्नात अधिक रस घेऊ लागले आहेत ' आपण सारेच काळे ' ही ऐक्यभावना वाढत आहे या साऱ्याला कारण इनॉक पॉवेल ! म्हणून मग पॉवेलवरचा या लोकाचा रागही कमी होतो इथले ब्रिटिश उदारमतवादी अगर डावे, पॉवेलबाबत बोलताना जो तिरस्कार प्रकट करतात, तो वेस्ट इंडियन पुढाऱ्याच्या बोलण्या-चालण्यात नाही ' West Indian League या संस्थेच्या अध्यक्षानी एकदा सागितल, ' we have known all along that British are prejudiced and we can cope with it better now, it is out in the open '

**काळे मुस्लिम**

मार्टिन ल्यूथर किंग यांच्या तोलाचा एखादा नेता लाभेपर्यंत ब्रिटनमधील काळ्यांच्या चळवळीला खरा जोम येणार नाही हे खर असलं तरी या चळवळीला आपल्या परीन दिशा देऊ पाहणारे लहान-मोठे लढाऊ नेते ब्रिटनमध्ये आहेत गोऱ्याना सुसंस्कृत बनवण ही याची घोषणा आहे. मायकेल अब्दुल मलिक हा नेता ३६ वर्षांपूर्वी त्रिनिदादहून इथे आला १९६२ साली Immigration Act पास होताच यान अमेरिकेतील काळ्या मुस्लिमांचा नेता Malcolm X याची भेट घेतली त्यानंतर यालाही Michael X हे नाव इथल्या वृत्तपत्रांनी दिलं १९६५ साली Malcolm X यान ब्रिटनला भेट दिली त्यानतर मलिक यान आपल्या सहकाऱ्याना उद्देशून काढलेल्या एका पत्रकात लिहिल, ' Brothers and Sisters you have got to learn how to deal with this white man You used to turn your cheek when he hit you Stop

turning ..hit him back ' जुलै १९६७ मध्ये एका भाषणात यानं गोऱ्याच वर्णन Vicious, nasty people ' असं केलं आणि आपण एक खून पूर्वी पचवल्याची प्रौढी मिरवली Race Relations Act खाली त्याच्यावर लगेच खटला भरण्यात आला आणि त्याला वर्षभराची शिक्षा दिली RAAS (Racial Adjustment Action Society) चा ' Director of Planning ' म्हणून उत्तर लंडनमध्ये २॥ लाख पौंड खर्चून काळ्या राष्ट्राकरता दुकान, घरं इ ची तजवीज करण्यात ही स्वारी सध्या गुतली आहे ('We will compete with the white man and in doing so, we will civilise him Powell is right. We are a threat to the core of his nationhood ')

१९६७ च्या ऑगस्टमध्ये अमेरिकेतील काळ्यांचा आणखी एक नेता, त्रिनिदादमध्येच जन्मलेला स्टोक्ली कारमायकेल हा ब्रिटनमध्ये आला Malcolm X च्या नेतृत्वानं काळ्यांच्या चळवळीवर केलेले इस्लामी संस्कार पुसून यान तिला मार्क्सिस्ट वळण देण्यास सुरुवात केली तेव्हापासून आजतागायत इथली काळ्याची चळवळ कम्युनिस्ट नेत्याच्याच हाती आहे गियानामधून आलेला पस्तिशीतला रॉय शॉ हा निमगोरा मार्क्विस्ट पुढारी हाइडपार्कवरील सर्वांत लोकप्रिय वक्ता आहे बर्मिंगहॅममध्ये Black Peoples Alliance च्या नावाखाली चळवळी करणारा जगमोहन जोशी हा माओवादी कम्युनिस्ट आहे व्हिएटनाम युद्धापासून जनरल याह्या-खानच्या राजवटीपर्यंत [illegible] तारिक अली हाही माओवादी आहे. Obi Egbuna हा बिआफ्राहून आलेला कादंबरी-नाटककार ' Black Panther ' (काळ्यांच्या चळवळीचा सैनिकी विभाग) चा पुरस्कर्ता आहे हा एके ठिकाणी लिहितो, At this stage, Africa should be producing her own pre-revolutionary Gorki मॉस्को, पेकिंग, दार्-ए-सलाम इत्यादी ठिकाणाहून या साऱ्या चळवळीला पैशाचा पुरवठाही यथास्थित होतो आहे खुद्द ब्रिटनमधील कम्युनिस्ट पार्टी ज्या हिरीरीनं काळ्याची बाजू घेते, ती पाहता ब्रिटन-मधील मार्किस्ट चळवळ अखेर काळ्यांच्या आधारानच प्रभावी होईलशी खात्री त्या पक्षाला वाटते हे स्पष्ट आहे मात्र इथल्या वेस्ट इंडियन

काळ्यांनी मार्क्सवादी आशेला थोडा उजाळा दिला तरी उपऱ्याचे बाकीचे दोन्ही गट– पाकिस्तानी आणि भारतीय– या साऱ्यांपासून मनान आणि कृतीनं दूरच आहेत.

—५

जमेका, कॅरिबियन बेटे आणि पश्चिम आफ्रिका इथून आलेले काळे उपरे (blacks) वगळले तर मग राहतात ते केवळ भारतीय वंशाचे सावळे उपरे (browns) या देशातील आफ्रिकनाची संख्या साडेतीन लाख असावी, अस नेहमी वाटत होतं १० जुलै रोजी प्रसिद्ध झालेल्या एका ताज्या अहवालानुसार १९६६ साली ब्रिटनमध्ये पाच लाख आफ्रिकन्स सव्वादोन लाख भारतीय आणि सव्वा लाख पाकिस्तानी होते अस दिसत १९७१ साली हे आकडे साडेसहा लाख, पावणेचार लाख आणि सव्वादोन लाख असे असतील ) भारतीय वंशाच्या या लोकांची वर्गवारी दोन-तीन तऱ्हेनी करता येईल केवळ नागरिकत्वाचा विचार करायचा तर भारतीय, पाकिस्तानी आणि ब्रिटिश अशी वर्गवारी करावी लागेल शैक्षणिक आणि सामाजिक पातळीच्या दृष्टीन पाहिल तर १९६२ पूर्वी आलेल्या बहुसंख्य अशिक्षित कामगारांचा वर्ग, नोकरी परवान्यावर येणारे मध्यमवर्गीय आणि पूर्व आफ्रिकेतून आलेली सधन कुटुंब अशी वर्गवारी करता येईल निव्वळ धर्माच्या दृष्टीन पाहायच तर मुसलमान, शीख आणि इतर सारे अशी वर्गवारी करण सोईच होईल

## उर्दूचे वर्चस्व

राष्ट्रीय वर्गवारीचा विचार केला तर इथले पाकिस्तानी, इथल्या भारतीयापेक्षा खूपच अधिक चळवळे आणि संघटित आहेत पूर्व बंगालमधून आलेले पाकिस्तानी अंगापिंडाने लहान [आणि वर्णाने थोडे अधिक काळे आहेत त्यांच्या वागणुकीतही मार्दव जास्त आहे कारखान्यांतून कष्टाची कामं करण्यापेक्षा स्वत च छोटस दुकान किंवा हॉटेल चालवणं हा या बंगाली मुसलमानाचा व्यवसाय आहे आता पाकिस्तानचा भाग असलेल्या सिल्हेट जिल्ह्यातून यातले बरेचसे भारताची फाळणी होण्यापूर्वीच इथे आले

साहजिकच त्यांनी हॉटेल उघडली ती ' Indian Restaurants म्हणून पुढे भारताची फाळणी झाली, तरीही यातील बहुतेक जणानी ' Indian Restaurant 'च्या पाट्या बदलल्या नाहीत काहीजणांनी ' India-pak Restaurant ' असा बदल केला, तर इतर काहीजणांनी ' नूरजहान ', ' ताजमहाल ', ' काश्मीर ' यासारखी नाव घेतली इग्लडच्या जवळजवळ प्रत्येक शहरात आता या ' India-pak Restaurant 'च्या पाट्या जागो-जाग दिसतात पजाबमधून आलेले पाकिस्तानी मुख्यत्वे बर्मिगहॅम आणि आसपासच्या विभागातील कारखान्यात काम करतात उर्दू आणि इस्लाम या दोन्हीबाबतचा याचा पीळ जास्त कडक आहे टेलिव्हिजनवर दर रविवारी सकाळी अर्धा तास ' अपनाही घर समझिये ' नावाचा कार्यक्रम असतो B B C च्या बर्मिगहॅम केंद्राच्या ' Immigrants Unit 'तर्फे होणारा हा कार्यक्रम सर्वस्वी पाकिस्तान्यांच्या हाती आहे अर्थात् हा सारा कार्यक्रम उर्दूतून चालतो, हे ओघान आलच या कार्यक्रमाची जाहिरात एकदा For Indians and Pakistanis अशी आणि एकदा ' for Pakistanis and Indians अशी करतात

भारतातील बहुसख्य लोकाची भाषा उर्दू नसतान, हा कार्यक्रम केवळ उर्दूतून चालावा, याची खत इथे कुणालाही वाटत नाही हे विशेष.

ब्रिटनमधील पजाबी भारतीयाना याबाबत काही वाटत नाही, हे एक-वेळ समजू शकेल मात्र अपवाद म्हणूनही एखादा, इतर भारतीयाना ' राष्ट्रभाषा ' म्हणून परिचित असलेल्या हिंदीतून हा कार्यक्रम का होऊ नये ? या कार्यक्रमावरील पजाब्याचं वचस्वही बोचण्याइतक जास्त आह भारतात तयार होणारे तथाकथित हिंदी चित्रपट हे प्रत्यक्षात उर्दू भाषे-तूनच असल्याने, हिंदी चित्रपटसृष्टीतील कितीही साधारण दर्जाच्या कलावताची या कार्यक्रमात वर्णी लागते पण सुधीर फडके अगर किशोरी आमोणकर याच्या दर्जाच्या इतर प्रातातील कलावताची लागत नाही त्याकरता काही मुद्दाम प्रयत्न करण्याची गरजही कुणाला वाटत नाही भारतीयांची ही उदासीनता केवळ टेलिव्हिजनवरील कार्यक्रमाबाबतच आहे अस नाही थोड्याफार फरकान मला काय त्याचं ' हीच मनोवृत्ती इतरही अनक बाबतीत आह Income tax [illegible]

उर्दू, पंजाबी आणि बंगाली भाषेत आहेत– तिथेही हिंदीची नावनिशाणी नाही हाईडपार्कवरील 'Speaker's corner' मध्ये काश्मीर प्रश्नाच्या अनुषंगाने पाकिस्तानी पोरं मन मानेल ते बोलत असतात त्यांना साधे उलट प्रश्न विचारण्याचीही तसदी कुणी घेत नाही १९६५ साली भारत–पाक युद्धाच्यावेळी इथलं वातावरण बरच तापल्यावर काही भारतीयांनी भारताचं एक व्यासपीठ तिथं उभारून भाषण करण्यास सुरुवात करताच, पाकिस्तान्यांनी इतकी गुंडगिरी केली की अखेर पोलिसांना हस्तक्षेप करावा लागला त्यानंतर बहुधा तिथे बोलण्याची हिंमत कुणाही भारतीयाला झालेली नाही. पाकिस्तानी मात्र अद्यापही तावातावानं सांगत असतात, 'Bloody Indians . they poured on us in the ratio of four to one and yet could not take Lahore' १९६५ सालचं भारत–पाक युद्ध म्हणजे इथल्या लोकांच्या दृष्टीने दोन भिकाऱ्यामधील भांडण । त्यात नेमकं काय काय घडलं, याची माहिती इथल्या कित्येक भारतीयांनाही नाही, तर ब्रिटिश जनतेला कुठून असणार । भारताचं काश्मीरमधील अस्तित्व हा जणू गुन्हा आहे, असं खुद्द भारताच्या राज्यकर्त्यांचंच धोरण आहे मग दोष तरी कुणाला देणार ? काश्मीरबाबतच्या पाकिस्तानच्या भावनांची इथे खूपच जपणूक केली जाते प्रसिद्ध होणाऱ्या नकाशातून एकतर काश्मीर दाखवणार नाहीत किंवा दाखवलाच तर युद्धबंदी रेषेपर्यंतचाच दाखवतील. १९६५ सालाच्या युद्धात भारतीय सैन्यानं विजय मिळवला असं स्पष्ट विधान कुणीही स्तंभलेखक चुकूनही करणार नाही. फार फार तर एवढच लिहिल की 'Pakistan did not win that war'

**बंगाली गट**

इथे आल्यावरही भारतीय लोक आपापल्या भाषिक गटानुसारच राहतात सरसकट सर्व भारतीयांना एकत्र आणणारी एकही संस्था खऱ्या अर्थी अस्तित्वात नाही त्यातल्या त्यात चळवळचा गट बंगाल्याचा, त्यांची दुर्गापूजा खूपच उत्साहानं साजरी होते बंगाली भाषेतले चित्रपट केवळ इंग्रजी Sub-titles च्या आधारावर लंडनच्या आलिशान चित्रपटगृहातून कित्येक दिवस ठाण मांडू शकतात सत्यजित् रॉय, तपन सिन्हा, ऋत्विक घटक इत्यादी

नाव आता इथल्या चित्रपटपरीक्षकाच्याही चांगल्या परिचयाची झाली आहेत पैकी सत्यजित रॉय याचा ' महानगर ' आणि तपन सिन्हा यांचा ' अतिथी ' (The Runaway) हे चित्रपट दोन-दोन महिने चालले होते इथल्या वृत्तपत्रातील त्यावरील अभिप्राय एकजात स्तुतिपर होते (यदाच्या Berlin Film Festival मधील सत्यजित रॉय यांच्या चित्रपटानही इथे अपेक्षा निर्माण केल्या आहेत ) बगाली चित्रपटांचं हे भाग्य हिंदी–उर्दू चित्रपटाना बिलकूल लाभलेल नाही इंग्लडच्या पाच–पचवीस शहरांतील चित्रपटगृहांतून फक्त रविवारी तेवढे हे हिंदी चित्रपट दाखवले जातात त्याची जाहिरात त्या त्या चित्रगृहावर मात्र केली जात नाही ' India Weekly 'सारख्या साप्ताहिकातून आणि इथल्या पाकिस्तान्याच्या दुकानां-तून याबाबतची माहिती मिळते भारतातल्या एखाद्या चित्रगृहात असत तसलच वातावरण याही चित्रपटाचे वेळी असत बऱ्याच जणांकडे Tape Recorders असल्याने चित्रपटगृहातच गाणी टेप करून घेण्याच वेड तेवढ इथे जास्त भारतातील सर्व घडामोडी सकलित करणार आणि इथल्या भारतीयाच्या सर्व हालचालीची माहिती देणार ' India Weekly ' नावाच आठ पानी साप्ताहिक कम्युनिस्ट अगर त्यांचे सहप्रवासी असलेल्या बंगाली लोकाच्या हाती आहे भारतातल्या डाव्या-उजव्या कम्युनिस्टांच्या हालचाली आणि नेत्याची भाषणं याना तर यात भरपूर प्रसिद्धी मिळतेच, पण सर्व वृत्तांचा एकूण सकलित परिणाम कम्युनिस्टांना अनुकूल होईल, याबाबत अतिशय धूर्तपणे खबरदारी घेण्यात येते इथले सध्याचे हायकमिशनर श्री धवन हे मुबईच्या Blitz साप्ताहिकातून लेखन केलेले अर्थात या साप्ता-हिकाचे श्री धवन यांच्याशी खूपच जवळचे सबंध आहेत गांधी-नेहरू यांच्या विचारांची भलावण होतेच कृष्ण मेनन यांच्या दिल्ली इथल्या Patriot दैनिकातील मुलाखती बहुधा महिन्याआड छापल्या जातात पतप्रधान इदिरा गांधी आणि त्याच्या विश्वासातल्या माणसांना भरपूर प्रसिद्धी देऊन खूष ठेवण्यात येत याउलट मोरारजीभाईवर कुठेही चुकून धोंडा फेकला गेला तरीही त्याची माहिती तत्काळ पुरवली जाते या साप्ताहिकाचे सपादक डॉ तारापद बसू याना गेल्याच वर्षी पद्मश्रीचा बहु-मान मिळाला असा हा सारा ' अहो रूपम् अहो ध्वनी 'चा प्रकार आहे

प्रचाराची आघाडी सांभाळायची कम्युनिस्टांनी तर सेवेची आघाडी ख्रिश्चनांनी सांभाळायची, ही भारतातील श्रमविभागणी इथेही आहे 'पवित्र राष्ट्रवादी' वर्षातून सहा वेळा उत्सवाच्या निमित्ताने अगर एखाद्या 'माननीय' पुढाऱ्याच्या आगमनप्रसंगी एखाद्या चर्चच्या हॉलमध्ये एकत्र जमतात आणि इथे येणाऱ्या 'Organiser' अगर 'विवेक'मधील बातम्या एकमेकांना सांगून भारतात संघ–जनसंघ भलतेच जोरात आहेत, याबद्दल एकमेकांची खात्री पटवून आपापल्या घरी परततात

भारतातून येणारे बरेचसे लोक (यातले बहुसंख्य हिंदू!) प्रथम उतरतात ते YMCA च्या Indian Students Hostel वर हजारो पौंड खर्चून ही इमारत उभी राहिली, ती मुख्यत्वे भारत सरकार आणि भारतातल्या कंपन्यांकडून मिळालेल्या देणग्यांवर स्वस्त दरात राहण्या-जेवण्याची इथे सोय आहे तळमजल्यावर एक प्रशस्त महात्मा गांधी सभागृह आहे टेलिव्हिजन रूम आहे वाचनालयही आहे भारतातली इंग्रजी भाषेतली बहुतेक वृत्तपत्र–साप्ताहिक–मासिक इथे वाचायला मिळतात (India House च्या वाचनालयात नऊ दिवसांपूर्वीची दैनिक वाचायला मिळतात!) एकापरीने हे हॉस्टेल, हेच इथल्या भारतीयांचं सांस्कृतिक केंद्र आहे भारतातून येणारे सारे मंत्री आपल्या मुक्कामात एकदा तरी इथे येतात

**मराठी भाषिकांची तऱ्हा**

पंजाबी, बंगाल्याखालोखाल इतर गट गुजराती आणि मराठी लोकांचे गुजराती भाषिकांची संस्था कृष्णजन्म उत्साहाने साजरा करते मात्र याखेरीज इतर सामाजिक अगर राजकीय हालचाली करीत नाही 'महाराष्ट्र–मंडळ' हा इथल्या मराठी लोकांचा सांस्कृतिक आसरा दर दोन महिन्यांनी भावगीतगायन, एकांकिका नाट्यप्रयोग इत्यादींचा एखादा कार्यक्रम मंडळातर्फे केला जातो या निमित्ताने इथे येणारे संशोधक, कवी, संपादक, लेखक अगर गायक कलावंतांना जवळून पाहण्याची संधीही बरेचदा मिळते मंडळाला स्वतःची इमारत नाही तेव्हा इमारतनिधी हे मध्याचं लक्ष्य आहे पैसे जमताच एखादी इमारत घेऊन तिचं 'शिवाजी भवन' करण्याचा संकल्प जाहीर झाला आहे खुद्द मंडळाजवळ फारसे पैसे नाहीत

धनिक देणगीदारही फारसे नाहीत 'Mortage'वर इमारत घ्यायची नाही असं ठरविण्यात आलं आहे तेव्हा वीस–पचवीस वर्षांत हा संकल्प पुरा झाला तरी आनंद मानायला हवा त्यानंतर बहुधा शिवाजीचा पुतळा (साधा की अश्वारूढ ?) बसविण्याची योजना निघेल– म्हणजे त्यानंतरही आनंदच आहे

—६

येताजाता देवाधर्माचा उदोउदो करणाऱ्या आणि जीवनाबाबत बराचसा उदासीन दृष्टिकोन असणाऱ्या भारतीय समाजातून येणारी माणसं इथे येताच एका अगदी भिन्न प्रवृत्तीच्या समाजाच्या सान्निध्यात येतात

**समृद्ध समाज जीवन**

एखाद्या अंधाऱ्या गुदमरवून टाकणाऱ्या खोलीतून एकदम उघड्या मैदानात आल्यावर जो मोकळेपणा वाटेल, तसं काहीतरी भारतातून इथे येणाऱ्या कुणालाही वाटत असेलशी माझी कल्पना आहे रस्तोरस्ती वाट अडवून बसलेल्या मशिदी, दर्गे, कबरी, देवळ, गाई– बैल आणि चर्चेस पहाण्याची सवय झालेल्या डोळ्यांना प्रथम जाणवलं ते हे की, इथे एकही रस्ता या धार्मिक चिजांमुळे अडलेला नाही चर्चेस आहेत खूपच आहेत जवळजवळ प्रत्येक नाक्यावर आहेत पण प्रत्येक चर्चला भव्य आवार आहे रविवारी केव्हातरी काही वृद्ध माणसं आणि लहान मुलं या आवारातून दिसतात पण एरवी ही भव्य आवारं निर्मनुष्य आहेत आवारात लावलेल्या वृक्षवेलीतून ख्रिस्ताचा एखादा संदेश लिहिलेला दिसतो स्वच्छ– सुंदर हस्ताक्षरात ! पण या चर्चच्या इमारतीइतक्याच आसपासच्या इमारतीही नेटक्या असतात स्वच्छ असतात शांत असतात घाईगर्दीतल्या माणसाला मग या चर्चचं अस्तित्व जाणवत नाही

जो गोष्ट रस्त्याबाबत, तीच उपहारगृह, ऑफिसच्या इमारती अगर इतर कोणत्याही सार्वजनिक ठिकाणाबाबत ही सर्व ठिकाणं ख्रिस्ताच्या फोटोंनी लडबडलेली नाहीत नव्हे, धर्माची कोणतीही खूण यापैकी एकाही ठिकाणी नाही 'ब्रिटन हा सेक्यूलर देश आहे' अशी पोपटपंची इथे कुणीच

करीत नाही नव्हे ' ब्रिटन हा ख्रिश्चन देश आहे हे विधानही भयकर समजल जात नाही सामाजिक अगर राजकीय पुढाऱ्याची वक्तव्य, वृत्त-पत्रातील लेख आणि रेडिओ-टेलिव्हिजनवरील चर्चेतून ही गोष्ट गृहीत धरण्यात येऊन तिचा अगदी सहजी उल्लेख केला जातो तरीही ब्रिटनच्या वातावरणात धर्म नाही कॅथॉलिक चर्चच्या सर्व तऱ्हेच्या झोटिंगशाहीविरुद्ध या देशातील लोकानी अतिशय निकराचा लढा दिला आणि अखेर धर्म आणि राजा या दोहोंवरही मात करून राष्ट्रहिताला प्राधान्य देणारी लोकसत्ताक राज्यपद्धती दृढमूल केली तेव्हापासून धार्मिक गोष्टीबावतचा इथल्या लोकाचा उत्साहच कमी झाला भारतावर कुणातरी परकीयाची राजवट यायचीच होती, तर ती युरोपातील इतर एखाद्या धर्मान्ध सत्तेची न येता धर्मप्रसाराबाबत उदासीन असणाऱ्या ब्रिटिशाची आली, याबद्दल दैवाचे आभार मानले पाहिजेत ब्रिटिश साम्राज्यांतर्गत प्रदेशातून वळलेल्या सपत्तीच्या अफाट ओघामुळे एकोणिसाव्या शतकात झालेल्या सर्व वैज्ञानिक शोधांचा आणि औद्योगिक क्रांतीचा पुरेपूर फायदा ब्रिटनला उठवता आला परिणामी भारताच्या एक बारांश क्षेत्रफळ असलेला हा चिमुकला देश जगातील एक बड राष्ट्र बनला इथल समाजजीवन त्यामुळं इतक समृद्ध आणि सुरक्षित बनल की इहलोकाव्यतिरिक्त इतर एखाद्या उच्च-लोकाचा विचार करण्याची गरजच उरली नाही धार्मिक सहिष्णुतेच धार्मिक औदासीन्यात परिवर्तन करण्यास या समृद्धीन खूपच हातभार लावला

**भारताचें ज्ञान ?**

राणीच साम्राज्य किती दूरवर पसरल आहे, हे इथल्या मुलाच्या मनावर बिंबवण्याकरता ब्रिटिश साम्रज्यांतर्गत देशांची थोडी माहिती इथल्या शाळातून देत असत त्यातही इडिया हा तर ' Crown among the jewels ' ! त्यामुळे इतर देशांपेक्षा इडियाबद्दल थोडी जास्त माहिती सागितली जाई पण ही सारी माहिती अगदी जुजबी असे, वाघ, सिंह इ प्राण्याची चित्र दाखवायची, लाकडाचे मोठमोठाले ओडके नेणाऱ्या हत्तींची चित्र दाखवावयाची, इथून या शिक्षणाला प्रारभ होई मोठेपणी रूडियार्ड किपलिंग ची पुस्तक वाचून या इडियाबद्दलची कल्पना ती काय येणार !

पाश्चात्य जगापेक्षा अधिक मोठा भूतकाळ असलेला, धर्म–संस्कृती–तत्वज्ञान कला विज्ञान इत्यादी साऱ्या क्षेत्रातील बऱ्याच काही घडामोडी पाहिलेला हा देश आहे, हे इथे आता फार थोड्यांना ठाऊक आहे हे सारं केवळ, अपघाताने घडलेलं नाही योजनापूर्वक घडविण्यात आलेलं आहे. इथल्या माणसाला कलकत्त्याची अंधारकोठडी ठाऊक आहे, पण जालियनवाला बाग ठाऊक नाही ' Mutiny of the sepoys ' मध्ये ब्रिटिश बायकामुलांची कत्तल झाली, हे ठाऊक आहे पण जनरल हॅवलॉकने त्याचा घेतलेला बदला ठाऊक नाही बंगालमधील ठगांच्या टोळ्या ठाऊक आहेत पण ब्रिटिश अमदानीने झालेली भारताची आर्थिक पिळवणूक ठाऊक नाही या साऱ्या विषयांवर लिहिली गेलेली पुस्तकं इथल्या वाचनालयातून असली तरी ती ' इंडिया ' या नावाच्या सेक्शनमध्ये ! इथली तरुण पिढी या सेक्शनच्या वाटेला सहसा जात नाही यात अस्वाभाविक असंही काही नाही कारण सहा हजार मैल अंतरावर असलेल्या इंडिया नावाच्या एका मागासलेल्या देशापेक्षा युरोप, दक्षिण आफ्रिका ऱ्होडेशिया, अमेरिका कॅनडा अगर ऑस्ट्रेलिया, या देशाकडे इथल्या लोकांचा ओढा जास्त आहे

इथे आलो त्याचवेळी pop संगीताचे आधारस्तंभ असलेल्या बीटल्स् ग्रुपचा, महर्षी महेश योगी यांच्या आश्रमात राहण्याचा प्रयोग चालू होता अमेरिकेप्रमाणेच ब्रिटनमध्येही हिंदूधर्म आणि तत्त्वज्ञानाबद्दल वाढत कुतूहल असलं पाहिजे परिणामी, इथे आल्यावर याबाबतच्या काही प्रश्नांना उत्तर द्यावी लागतील, अशी माझी कल्पना होती. पण थोड्याच दिवसांत याबाबतीत माझा पूर्ण भ्रमनिरास झाला

## मुसलमानी दांडगाई

आशियाई वंशाच्या इथल्या लोकांची धार्मिक वर्गवारी करताना, हिंदू हा शब्द मी मुद्दामच टाळला होता कारण त्या शब्दाबद्दल ब्रिटनमधील तरुण पिढीला खरोखरच काहीही माहिती नाही एक काळ असा होता की येणारे लोक हे अमेरिकेतील Red Indians हून वेगळे आहेत, हे दाखवण्याकरता सरसकट सर्व भारतीयांना इथे हिंदू म्हणून संबोधण्यात येत असे पण धन्य धन्य, ते भारतातील कोटी कोटी हिंदू, की ज्यांनी भारतातील राज-

कारणात हिंदू हा शब्द बदनाम करून अवघ्या पचवीस-तीस वर्षांत सर्व सरकारी क्षेत्रातून त्या शब्दाची हकालपट्टी केली इथे तेव्हापासून फक्त इडियन्स् येऊ लागले त्यातूनही हिंदू धर्मियाच्या रीतिरिवाजात, विसाव्या शतकाशी विसगत अशा काही गोष्टी असत्या आणि त्या गोष्टीबाबत आग्रह धरल्याने सामाजिक सघर्षाचे काही प्रसग उद्‌भवते तर हिंदूच्या धार्मिक अस्तित्त्वाची जाणीव तरी इथल्या लोकांना झाली असती तस घडण्याची वेळच कधी आली नाही गोऱ्या मित्राच्या सहवासात असताना ' मी बीफ् खात नाही— तेव्हा अमुक एक डिश् मला नको ' एवढ म्हणण्याचही धैर्य कुणाला होणार नाही इथे आल्यावर थोड्याच दिवसात सरसकट बीफ् खाणाऱ्यांचीच सख्या जास्त याला ' पवित्र राष्ट्रवाद्यांचाही ' अपवाद नाही परिणामी, भारतातून येणारे लोक, धर्मानं मुसलमान, शीख, ख्रिश्चन किंवा फारतर बुद्ध असतात, अशी इथे सरसकट समजूत आहे (अनेक ठिकाणी माझ नाव मी सागितल्यावर ' तू Indian आहेस पण तुझं नाव तर मुसलमानी दिसत नाही, हे कस ?' असा प्रश्न मला विचारला गेला मी सागितल्यावर समोरच्या इसमाच्या चेहऱ्यावर चुकूनही काही समजल्याचे भाव उमटले नाहीत काहींनी त्यानतरही विचारल, ' Are you a Boodha then ? '

भारतातील बहुसख्य लोक धर्मानं हिंदू असूनही त्यांना मुसलमान समजले जाण्यान इथला काळ्या-गोऱ्यांचा प्रश्न सुटण्यास थोडी मदत होत असती, तर एक वेळ या गोष्टीकडे काणाडोळा करता आला असता. दुर्दैवान परिस्थिती याच्या उलट आहे मुसलमानांचे धार्मिक आग्रह इथेही सामाजिक असतोषास कारणीभूत होत आहेत इनॉक पॉवेलला पाठिंबा देण्याकरता इथे जे मोर्चे निघाले, त्यात No polygamy here यासारखे फलक होते गृहसचीव श्री कलाहन् यानी काही immigrants ना एकाहून अधिक जास्त बायका करण्याची, त्याना इथे आणण्याची परवानगी दिली, हे समजताच एका वाचकान D Telegraph मध्ये रागारागान लिहिल ' Now that the Home Secretary has allowed polygamy among the immigrants what next ? oral Divorce on the Koranic style ?' मुक्या प्राण्यांचा क्रूरतेपासून बचाव करणारी Royal Society for Prevention of Cruelty to Animals ही इथली एक राजमान्य सस्था कत्तलखान्यात

मारले जाण्यापूर्वी प्रत्येक जनावराला गुंग करण्यात यावं (Pre-stunning of animals) याकरता या संस्थेने काही दिवसापूर्वी एक चळवळ केली याकरता House of commons मध्ये एक ठरावही मांडण्याचा प्रयत्न झाला पण इथल्या मुसलमान आणि ज्यू लोकानी या गोष्टीला विरोध केला मजूर पक्षाच्या पाठिंब्याअभावी हा ठराव यावेळी बारगळला गेला असला, तरी भविष्यात केव्हातरी हा प्रश्न पुन्हा निकरावर आल्यावाचून राहणार नाही मृत माणसाचे देह उघड्यानच पुरण्याची मुस्लिम पद्धत आरोग्य-विघातक आहे, असा ठराव Hertfordshire County Council न पास केला (खुद्द ब्रिटिशांपैकी ४० टक्के माणस आता electric cremation पसत करतात त्याला खूपच कमी खर्च येतो ) रमझान ईदच्या काळात नमाज पढण्याकरिता रोज थोडी सुटी मिळावी, अशी मागणी बर्मिंगहॅमजवळील एका कारखान्यातील कामगारांनी करताच तिथल्या गोऱ्या कामगारानी याला सक्त विरोध केला ' रमझानच्या काळात उपास करणारे इस्लामभक्त या काळात इतके का शक्तिहीन असतात की, त्याना आपल काम व्यवस्थित करता येत नाही त्यातूनही त्याना सुटी मिळणार असेल, तर आम्हालाही मिळावी ' अशी त्यांनी मागणी केली ईदच्या दिवशी हलालपद्धतीनं गुर मारण्याकरता कत्तलखाना मिळाला नाही म्हणून ल्यूटन (Luton) या ठिकाणी ८०० मुसलमानानी धिंगाणा केला त्याचीही इथे खूप कुप्रसिद्धी झाली

इस्लामभक्ताच्या या वृत्तीबद्दल ब्रिटिशाइतकीच चीड भारतातून येणाऱ्या बहुसख्य लोकाना आहे, हे इथल्या गोऱ्याना कुणीतरी सागायला हव आहे या अगर कुठल्याच कामी इथल्या Indian High Commission चा काहीही उपयोग नाही India House नावाची एक प्रचड इमारत या लंडनमध्ये आहे तिथ काय काम चालत कुणास ठाऊक !

—७

स्वत च्या धार्मिक निष्ठा मुसलमानांइतक्याच कसोशीन जपणारा आणखी एक वर्ग शीखांचा ब्रिटनमधील शीखाची सख्या आता साठ हजाराच्या पुढे आहे (१९७१ साली हाच आकडा एक लाखापर्यंत जाईल ) मुस्लिमापेक्षाही अधिक निर्भयतेने हा समाज इथे रहातो आपल्या शीख नोकरवर्गाला

पागोटे घालण्यास बंदी करणाऱ्या Wolverhampton Transport Committee चं प्रकरण तसं ताजंच आहे. मनुष्यप्राण ही गोष्ट इथे भारताइतकी 'स्वस्त' नाही. राजकीय अगर सामाजिक प्रश्नांची उकल करण्याकरता मोर्चे, भाषणे, चर्चा इ. मार्ग चोखाळले जातात. रागावलेले तरुण विद्यार्थीसुद्धा Sit-in-protest च्या पलीकडे जात नाहीत. दगडफेक, गोळीबार, प्राणांतिक उपोषणे, स्वतःला पेटवून घेण्याच्या धमक्या इ. आततायी गोष्टींची इथल्या समाजाला आता सवय नाही– नव्हे या साऱ्या प्रकाराबद्दल तीव्र नापसंतीच व्यक्त केली जाते. साहजिकच पागोटी घालण्यावरील निर्बंध दूर करून घेण्याकरता श्री. सोहनसिंग जॉली या ६६ वर्षांच्या गृहस्थानं स्वतःला जाळून घेण्याची धमकी देताच इथे बरीच खळबळ उडाली. वास्तविक पाहता Wolverhampton शहराची वाहतूकव्यवस्था एप्रिलअखेर Birmingham Transport Committee कडे जाणार होती आणि या विस्तारित Birmingham Transport च्या नियमानुसार पागोटी घालण्यास मुभा होती. पण हा प्रश्न एकदा कायमचा निकालात काढायचाच असा या गृहस्थाचा बेत असावा. वर्षाच्या प्रारंभी म्हणजे १३ एप्रिलला आपण स्वतःस जाळून घेणार असा निर्धार या शीख गृहस्थानं जाहीर केला. Wolverhampton च्या वाहतूक समितीचं धोरणही आडमुठेपणाचं होतं. कारण ड्रायव्हर-कंडक्टर यांच्या गणवेषाबाबतच्या नियमांची इथली अंमलबजावणी खूपच ढिली असते. दुसऱ्या महायुद्धात अनेक शीखांनी ब्रिटिशांच्या बाजूनं लढून पराक्रम गाजवलेला– तेव्हा अनेक माजी ब्रिटिश सैनिकांनी या निर्बंधाबद्दल नापसंती व्यक्त करून श्री. जॉली यांना पाठिंबा दिला. Wolverhampton चे अधिकारी तरीही मख्ख होते. अखेर या साऱ्याचा भारतब्रिटन संबंधावर परिणाम होईलशी शक्यता निर्माण झाली. याबाबत झालेल्या निदर्शनांची हकीगत सर्वत्र प्रसिद्ध झाली. भारत सरकारकडून काही राजनैतिक हालचाल झाली असावी. कारण ब्रिटिश सरकारकडून याबाबत दडपण आल्यावर नाकदुऱ्या काढीत Wolverhampton च्या वाहतूक समितीनं पागोट्यावरील निर्बंध दूर केल्याचं जाहीर केलं. खुद्द इनॉक पॉवेलच्याच गावी ब्रिटिश हट्टाग्रहाला वेसण घालण्याचा हा प्रयोग यशस्वी झाला. 'Might is right' हेच शेवटी खरं. एरवी भारतीयाबद्दल कुत्सितपणे लिहिणाऱ्या

वृत्तपत्रांनी श्री सोहनसिंग जॉली या गृहस्थाची माहिती देताना त्याच्या 'impeccable Character'ची वाहवा केली सुदैवाने फेट्या-पागोट्यांचा हा प्रश्न सोडला, तर शीख धर्माचारात इथे संघर्षाला कारणीभूत होण्याजोग्या इतर काही प्रथा नाहीत. किंबहुना इथल्या सामाजिक जीवनाशी एकरूप होण्याबाबत इतर भारतीयापेक्षा शीख समाजच आघाडी गाठील खाणे, पिणे, नाचगाणी, पार्ट्या या गोष्टीत या समाजातील तरुणाना अधिक रस आहे केस-दाढी काढून झकपक रहाण्याची प्रवृत्ती शीखाच्या नवीन पिढीत वाढत्या प्रमाणावर आहे इथल्या गोऱ्या मुलींशी संसार थाटणारे जे थोडे भारतीय असतील त्यांत शीख तरुणही आहेत

## इंग्रजी बोली निराळीच

१९५२ सालापासून इथे येणाऱ्या बऱ्याच भारतीय आणि पाकिस्तान्याचा मुख्य प्रश्न असतो भाषेचा निरनिराळ्या भाषातील शब्द पचवून इंग्रजी भाषा समृद्ध झाली असली, तरी मूळ इंग्रजी भाषेच रचनादारिद्र्य इथे आल्यावर चांगलच लक्षात येत भारतात बोलल जाणार इंग्रजी आणि इथ बोलल जाणार इंग्रजी, यात जमीन अस्मानाचा फरक आहे द, ट, च, ड यांसारखे कठोर (hard) स्वरोच्चार हे लोक बोलताना करीतच नाहीत मग ळ, ण, ज्ञ यासारख्या उच्चाराची गोष्टच सोडा Tea हा शब्द 'ठी' असा उच्चारतील तर Cap चा उच्चार चक्क 'खप्' असा होईल इंग्रजी भाषेवर बऱ्यापैकी प्रभुत्व असलेल्या भारतीयानाही पहिले पाच-सहा महिने इथली बहुसंख्य माणस काय बोलतात, ते कळतच नाही याउलट भारतीयाच इंग्रजी बोलण इथल्या गोऱ्याना समजायला अवघड जात. 'you speak with a Hindi accent' ही भारतीयांच्या बोलण्यावरील इंग्लिश माणसाची कायमची प्रतिक्रिया ! दक्षिण भारतीयाना तर ही अडचण अधिकच भासते तामीळ-तेलगू-कन्नड भाषिक लोकाना यामुळे इतर भारतीयापेक्षा अधिक त्रास होतो (इंग्रजी भाषेकरता दंगली करणाऱ्या तामिळनाडू आणि इतर-त्रच्या विद्यार्थ्यांना जर इथे आणल, तर थोड्याच दिवसात त्यांचा इंग्रजी भाषेबाबतचा उत्साह ओसरेल, अस मला इथे आल्यापासून सतत वाटत

आल आहे ) भाषेच्या या अडचणीमुळे इथल्या माणसाशी मिळण मिसळणं तर अवघड होऊन बसतंच, पण आपापल्या क्षेत्रात एरवी तज्ज्ञ असणाऱ्या इंजिनीअर, डॉक्टर, प्राध्यापक इ क्षेत्रांतील भारतीयाच्या ज्ञानाचा संपूर्ण फायदा इथल्या समाजाला घेता येत नाही निक्सनसाहेबाच्या सध्या चालू असलेल्या आशियाई दौऱ्यात, त्याच स्वागत करताना थायलडच्या राजान इंग्रजीतून भाषण केल ' The king spoke in his incomprehensible English या एका वाक्यात त्या भाषणाची बोळवण इथल्या T V वाल्यानी केली मजूर पक्षाच्या ब्लॅकपूल येथील अधिवेशनात एका शीख गृहस्थान भाषण केल होत त्याच वर्णन करताना No one followed what he spoke ' हे भाष्य सर्वांनी केल होत भारतीयाच्या इंग्रजी बोलण्याची नक्कल करणारा इथला लोकप्रिय नट म्हणजे Peter Sellers ! ' The Millionairess या चित्रपटातील डॉ कबीर नावाच्या बगाली डॉक्टरच्या भूमिकेतील याचा अभिनय आणि इंग्रजी बोलण पहाण्याजोगं आहे

**कल्याणकारी सस्था**

सुशिक्षितांची ही अवस्था मग इंग्रजीचा गधही नसताना इथे येणारे लोक कसे वावरतात, याची कल्पनाच केलेली बरी भाषेची ही मुख्य अडचण दूर करणे, पासपोर्ट, व्हिसा, टॅक्स याबाबतीत मदत करणे, निरनिराळे अर्ज भरणे, इथे येणाऱ्या लोकांना त्याचे हक्क आणि सवलती याची माहिती देणे, प्रसगी कायदेविषयक बाबीत मदत करणे इ कामे करणाऱ्या अनेक सस्था (self-help organisations) आता स्थापन झाल्या आहेत

पाकिस्तानी लोकाना अशी मदत करणारी ' Pakistani welfare Association ' ही सस्था तेरा वर्षांपूर्वी स्थापन झाली याच तऱ्हेच्या इतर अनेक पाकिस्तानी सस्था ब्रिटनमध्ये अनेक ठिकाणी काम करीत आहेत यातील बहुतेक सस्था National Federation of Pakistani Associations या मध्यवर्ती सस्थेशी सलग्न आहेत एकूण सदस्यसख्या आता तीस हजारापर्यंत आहे दरम्यान Pakistani Welfare Association या लडनमधील सस्थेन लडनच्या पूर्व विभागात एक घर खरेदी करून तिथे

आपली कचेरी थाटली आहे घरे विकत घेऊन त्यांचा मशीद म्हणून उपयोग केला जातो अशा सत्तराच्या आसपास मशिदी आता ब्रिटनमध्ये आहेत पूर्व लंडनमधील अशा एका मशिदीचा इमाम असलेला तसलीम अल्ली आणि त्याची वेल्श् बायको (आता मुसलमान झालेली) एक कल्याणकेंद्र चालवतात-- मुलाना अरेबिक भाषा आणि कुराण शिकवतात, जुने कपडे एकत्र करून गरजू लोकांना वाटतात तसलीम अल्ली हा इथले बहुतेक दफनविधीही उरकतो एका दफनविधीला ६५ पौंडापर्यंत खर्च येतो मात्र गरीब लोकांना आवश्यक ती सूट मिळते

'Indian workers Association' ही इथल्या भारतीयाची या स्वरूपाची नाव घेण्याजोगी सस्था.लंडनच्या South hall या पजाबी वस्तीच्या विभागात १९५७ साली या संस्थेच काम सुरू झाल सुमारे सहा-सात हजार लोक सध्या सस्थेचे सदस्य आहेत या विभागातील Dominion नावाच १८५० माणस बसण्याची सोय असलेलं, एक सिनेमा थिएटर या सस्थेनं विकत घेतलं असून तिथे कायम पजाबी-हिंदी-उर्दू चित्रपट दाखवले जातात सस्थेच्या वाचनालयात भारतातील पंजाबी-हिंदी-उर्दू-इग्रजी भाषेतील वृत्तपत्रे येतात दर आठवड्याला सुमारे तीनशे लोक या वाचनालयाचा फायदा घेतात स्त्रियाना इग्रजी शिकवण्याचे वर्गही चालवले जातात याच विभागातील शीख गुरुद्वारात लहान मुलांकरता पजाबी भाषेचे वर्ग चालवले जातात श्री गुरुशीख सभा ' या सस्थेन १९६२ साली एका लहानशा सभागृहात हे गुरुद्वार स्थापन केल या विभागातील सुमारे दहा हजार शीख लोकानी दिलेल्या सढळ पाठिंब्यामुळे आता एका विस्तीर्ण सभागृहात हे हलवल गेल आहे इथे नव्याने येणाऱ्या शीखपथीय व्यक्तीस सर्व तऱ्हेची मदत या ठिकाणी मिळते ब्रिटनमध्ये आता एकूण चाळीस गुरुद्वार आहेत

इथे आलेल्या भारतीय पाकिस्तान्याची इथे इग्रजी शिक्षण घेतलेली नवीन पिढी तयार झाली की या Self-help organisations ची आवश्यकता कालातरानं कमी होईल यातील बऱ्याच सस्था मग एकतर मावळतील, नाहीतर राजकीय अगर कामगार-प्रश्नाकडे प्रामुख्याने लक्ष देणाऱ्या सस्थात त्यांच रूपातर होईल दरम्यान एक गोष्ट आणखी घडण्याची शक्यता आहे इथल्या उपऱ्याची सख्या पुरेशी वाढली की ज्यू, ग्रीक आणि रोमन

कथॉलिक लोकाप्रमाणे इथले शीख आणि मुसलमान ' अल्पसंख्य ' स्वत च्या शाळा काढतील इथल्या भारतीयाच्या अलग सस्कृती आणि धर्माचाराच्या खुणा शिल्लक राहतील त्या या मशिदी, गुरुद्वार आणि शाळाच्या रूपान !

अखेर थोडं इथे येणाऱ्या स्त्रियांबद्दल भारतीय उपखंडातून इथे येणाऱ्या स्त्रियाची सख्या आता खूपच मोठी आहे. इग्रजी भाषा आत्मसात करून इथल्या सामाजिक जीवनाशी समरस होण्याचा प्रयत्न यापैकी क्वचितच् कुणी करील बहुतेक जणींचा संबध आपापल्या भाषिक गटातील स्त्री-पुरुषाशीच येतो. त्यामुळे मातृभाषेखेरीज इतर भाषा शिकण्याची जरुरी राहत नाही मैत्रिणीबरोबर Shopping करताना आवश्यक इतक इग्रजीच जुजबी ज्ञान कसंतरी मिळवल, की बहुतेकजणी स्वत ला कृतार्थ समजतात (आपली मुल फाड् फाड् इग्रजी तेही इथल्या साहेबी पद्धतीने बोलतात, हे समाधान काय थोड आहे ? ) पैकी ज्यांना आपल्या भाषेतील मैत्रिणींचे शेजार मिळतात त्या नशीबवान अन्यथा नवरा ऑफिसमध्ये गेल्यावर सात-आठ तास घरी एकट्याने काढण ही कटाळवाणी शिक्षा अनेकजणींना असह्य होऊनही टाळता येत नाही इथे असलेल्या भारतीय वशाच्या स्त्रियांमध्ये nervous breakdown हाच प्रमुख आजार आहे. नवऱ्याला कितीही पगार असो– भोवती कितीही झगमगाट असो– या स्त्रिया मनातून एकाच गोष्टीची वाट पाहत असतात गोऱ्यापान शरीराच्या-भुऱ्यालाल केसाच्या– सपूर्ण माडघा उघडघा टाकून उन्मत्तपणे चालणाऱ्या, हसऱ्या डोळ्याच्या, भुरळ घालणाऱ्या पऱ्या नसलेल्या ' भारत ' नावाच्या सुरक्षित ठिकाणी आपण परततो केव्हा याची !

□

# चित्रपटांची दुनिया

या अफाट लंडन नगरीत ब्रिटन फ्रान्स, इटली, अमेरिका, स्वीडन, ग्रीस, जपान, झेकोस्लोव्हाकिया, हंगेरी या देशापासून तो पंजाबी, बंगाली, हिंदी (की उर्दू ?) भाषेतील अनेक भारतीय अगर पाकिस्तानी चित्रपट चालू असतात चित्रपटगृहाची सख्या खूपच आहे Rank organisation, ABC Cameo इत्यादी काही चित्रपटगृहांच्या साखळ्याही आहेत दुपारी १२–१ वाजता चित्रपटगृहाची दार उघडली, की कव्हाही आत जाऊन बसा–कंटाळा आला की बाहेर पडा रात्री अकरा वाजेपर्यंत बसलात तरी बिघडत नाही–पाव आन वडा वगैरे मिळणार नाही–चॉकलेटस–आइस्क्रीम यांवरच दिवस काढावा लागेल एकाच चित्रपटगृहात बहुतेक वेळा एकापाठोपाठ एक असे दोन चित्रपट दाखवले जातात यातील बहुतेक चित्रपट १। ते १॥ तासाचे ' ' Gone with the wind अगर Dr Zivago यासारखा जास्त लांबीचा चित्रपट असला तर Separate performances असे खास लिहितात मग मात्र एका वेळी एकच चित्रपट– तोही सुरू असेल त्याच वेळी प्रवेश करून पाहावा लागतो चित्रपटांची वर्गवारी तीन तऱ्हेने केली जाते. सोज्वळ, कौटुंबिक इ चित्रपट ' U या वर्गातले, याहून थोडे रंगेल अगर थोडीफार हाणामारी असलेले चित्रपट A वर्गातील आणि केवळ पुरुष–स्त्री सबंधा-वरच प्रामुख्याने आधारित असल्याने नग्नावस्थेतील दृश्ये असलेले अगर

बरेच खून किंवा रक्तपात दाखवणारे चित्रपट ' X ' वर्गातले ! लंडनमध्ये रोज शेकडोंनी येणाऱ्या-जाणाऱ्या पाहुण्याकरता Bed and Breakfast ची हॉटेलं आहेत– त्याच भाषेत बोलायचं तर X वर्गातील हे चित्रपट म्हणे Bed and Bathroom Movies आहेत जरा संधी मिळाली रे मिळाली, की पोरगा–पोरगी सरळ Bedroom ची वाट धरतात पुढचा प्रकार कसा दाखवायचा हे मग प्रत्येक दिग्दर्शकाच्या कौशल्यावर अवलंबून ! (स्वीडन फ्रान्स, अगर अमेरिकेच्या मानाने ब्रिटिश सेन्सॉर जरा कडकच. त्यामळे कुठेतरी काही सेकंदाची तरी काटछाट होते. या काटछाटीबाबत दिग्दर्शक आणि निर्मात्याच्या भावना खूपच नाजूक ! Rosemary's Baby या चित्र-पटातील एका दृश्याला ११ सेकंदाची कात्री लावली तर तावडतोब निर्मात्यानं निषेध नोंदवला ) Bedroom मधील काम सफल की बहुधा पोरगी Bath घेते– म्हणजे काय पुन्हा तेच ! या X चित्रपटाची संख्या आता इतकी वाढली आहे, की Dr Reeve नावाच्या चर्चच्या बिशपनं याबाबत खास चिंता व्यक्त केली (Dr Reeve said that in London a film on lesbian love took 10000 in one week and in mid April, 57 % of all films being shown had X Certificates He attacked sex before marriage, the number of abortions carried out, increasing vandalism and the high number of x films and said ' the so called permissive society has now deep roots in the nation and for the well being of the whole community the trend must be reversed') तरीही या चित्रपटामध्ये देशागुणार काही ठळक भेद जाणवतातच

### चित्रपटातील विकृती

हॉलिवुडमधून येणारे चित्रपट निर्मितीच्या दृष्टीनं भव्य असतात महा-युद्धाच्या पार्श्वभूमीवरील अगर एखाद्या गाजलेल्या साहित्यिक कलाकृतीवर आधारित चित्रपट सोडले, तर बाकी बरेचसे चित्रपट कथावस्तूच्या अगर आशयाच्या दृष्टीने वेडाचेच असतात पिस्तूलाच्या गोळीबाराच्या प्रकारांनी भरलेले चित्रपटच जास्त ! बहुधा ' A ' वर्गातले हे ' ठिशू ठिशू ' चित्रपट आवडीनं पाहण्याचही एक वय असत म्हणा ! त्यामुळे या चित्रपटांचा आपला

असा एक खास प्रेक्षकवर्ग असतो ग्रीक चित्रपटातील संगीत अगदी भारतीय वळणाचं-- शोक–आनंद व्यक्त करण्याच्या पद्धतीही हिंदी चित्रपटांप्रमाणेच अतिरेकी– मात्र स्त्रीशरीराचं प्रदर्शन करण्याच्या बाबतीत हे चित्रपटही खूपच पुढे गेलेले आहेत झेकोस्लोव्हाकिया, हंगेरी इ देशांतून आलेल्या चित्रपटांतल तांत्रिक कौशल्य खूपच जाणवतं– स्त्री-पुरुष संबंधांबाबत या चित्रपटातूनही बराच मोकळेपणा असतो. तरीही या क्षेत्रात खरी आघाडी मारली आहे ती फ्रान्स, स्वीडनमधील 'नवचित्रपटानी' अगर 'न–चित्रपटानी'।

स्त्री-पुरुष संबंधावरचं फ्रान्समधलं संशोधन लंस इतराहून बरंच जुनं स्त्रीचं अंग-प्रत्यंग दाखवून आता तिथले दिग्दर्शकही कंटाळले असावेत म्हणून की काय, फ्रेंच चित्रपटातील अनेक दृश्यांकरिता प्रतिकांचा सूचक उपयोग वाढत्या प्रमाणावर केला जातो आहे या न– चित्रपटातील काही भाग तर अगदी डोक्यावरून जातो बरेच वेळा चित्रपटात घडत असं काही नाहीच नुसतीच चर्चा चालते sub-titles च्या साहाय्यानं यातला कळेल तो भाग आपण समजून घ्यायचा इतकच Scandinavian देशातील चित्रपटातून धर्मकल्पनांची प्रच्छन्न टिंगल तर असतेच, पण त्या चित्रपटातून जे काही पाहायला मिळत, त्यावरून मुलींचे कपडे हे उतरवण्याकरिताच असतात याची खात्री पटते 'I am curious yellow' हा काही देशात बंदी घालण्यात आलेला चित्रपट गाजावाजा करीत नुकताच लंडनमध्ये आला. या चित्रपटातील एका दृश्यात भरदिवसा, रस्त्याच्या बाजूला असलेल्या एका घरच्या कठड्यावर बसून नायक–नायिका संभोग घेतात रस्त्यावरचा पोलिस ते पाहतो आणि चक्क मान फिरवतो ब्रिटनमध्ये हा चित्रपट दाखवण्यापूर्वी चांगली चार मिनिटाची काटछाट खरं तर सेन्सॉरनं केली आहे पण वरील दृश्यात अश्लीलतेपेक्षा सूचकताच जास्त असल्याने, बहुधा या दृश्यास कात्री लागली नसावी ही सारी दृश्य योजणारे दिग्दर्शक केवळ Box office साठीच हे करतात असं म्हणून या साऱ्याचं पूर्ण स्पष्टीकरण होत नाही यंत्रसंस्कृतीनं इथल्या संवेदनाक्षम माणसाच्या आयुष्यात एक भयानक पोकळी निर्माण केली आहे धर्म, संस्कृती, समाज, कुटुंबव्यवस्था, विवाहसंस्था याबाबतच्या साऱ्याच श्रद्धांना धक्का लागला आहे एकाकी अवस्थेत

भटकणाऱ्या मानवाच्या पूर्वजानी मानसिक स्वास्थ्य लाभावं म्हणून या साऱ्या संस्था निर्माण केल्या त्याकरिता व्यक्तीच्या गरजाना मुरड घालून समाजाच्या गरजा महत्त्वाच्या मानल्या. पण भांडवलदारी अर्थव्यवस्था, व्यक्ती आणि समाज यामध्ये इतकी दरी निर्माण करील की त्यातच त्या भांडवलदार समाजव्यवस्थेचा नाश होईल, हे मार्क्सचं भविष्य काही अंशी आता Permissive Society च्या रूपान खर ठरत आहे सामाजिक स्थैर्याच्या नावाखाली कोणतंही बंधन घालून घेण्याबाबत व्यक्तीकडून वाढता विरोध होतो आहे संभोगसुख, हस्तमैथन, समलिंगी संभोग शरीरसुख घेण्याबाबतचे पाशवी प्रकार (Sadism, Masochism इ ) यातील कोणताही विषय चित्रपट–नाटकाना वर्ज्य नाही माणसाच्या तऱ्हेतऱ्हेच्या मनोविकारांच अगर असमाधानाच मूळ लैंगिक विश्लेषणात शोधण्याचा प्रयत्न वाढत्या संख्येन दिग्दर्शकाकडून होतो आहे हिंदी चित्रपटातील प्रेमदर्शन बाष्कळ अगर बालिश म्हणून जितक कृत्रिम वाटतं तितकाच या नवचित्रपटातील Surrealism (अतिवास्तववाद) हाही कृत्रिम वाटतो डोक्याला शीण देतो पिअरे पावलो पॅसोलिनी हा इटलीतील सध्या गाजत असलेला असा एक नवदिग्दर्शक ! मार्क्सवादाचा पाठिराखा म्हणून याचे व्हॅटिकन चर्चबरोबर खटके उडाले आपल्या चित्रपट–नाटकातून हा अस्तित्ववादाचा (existentialiasm) पुरस्कार करतो भांडवलदारी अर्थव्यवस्थेत निर्माण होणारी पोकळी आहे त्याहून मोठी दाखविण्याच काम मार्क्सवाद्यानी नाही-तर कुणी करायच ? (वर उल्लेख केलेल्या स्वीडिश चित्रपटाची नायिकाही व्हिएटनाम युद्धविरोधी निदर्शनात भाग घेणारी एक मार्क्सवादी तरुणीच आहे) गतिहीन मध्यमवर्गीय समाज अखेर लैंगिक विकृतींच्या भोवऱ्यातच सापडणार हे दाखविणारे विषयच हा निवडतो Orgy या नावाच यानं लिहिलेल एक नाटक नुकतच रंगभूमीवर आलं सहा प्रवेशाच्या या नाटकाची सुरुवात होते पति-पत्नीमधील संवादान हा नवरा लैंगिक विकृतीनं पछाड-लेला Sadist आहे– स्वत ची नेमक काय करण्याची इच्छा आहे, हे तो प्रथम पत्नीला सविस्तर सांगतो आणि आपली ती इच्छा पूर्ण करतो त्याची कृती सपल्यावर बायको आपल्या दोन मुलाना ठार मारून आत्महत्या करते यानंतर तो एका वेश्येला घरी आणतो विवस्त्र करतो तिला आपली इच्छा

सागतो ती घाबरते. त्याच अवस्थेत पळून जाते, अखेर तो स्वत विवस्त्र होतो तिचे कपडे अगावर चढवून नटतो आणि आत्महत्या करतो. सोफोकल्स् या ग्रीक नाटककाराच्या शोकांतिकेवर आधारित ' Oedipus Rex ' हा यान दिग्दर्शित केलेला चित्रपट सध्या लडनमध्ये चालू आहेच व्हॅटिकनन बदी घातलेला Theorem नावाचा, याचा एक नवचित्रपटही चालू आहे स्वत च्या पित्याचा वध करून आईबरोबरच रतिसुख घेण्याच प्राक्तन राजा ईडिपस्च्या नशिबी होत ही कथावस्तू त्यातील साऱ्या भीषण नाट्यासकट उभी करण्यात पॅसोलिनन पूर्ण यश मिळवल आहे खर तर Oedipus Rex पाठोपाठ Theorem पाहणार होतो, पण ' Oedipus Rex 'चा दणका इतका की अजून Theorem च्या वाटेला जाण्याच धैर्य काही होत नाही

□

## घुसखोरांचा कायदेभंग

' Ten Indians who were found inside a van stopped by police were refused permission to enter Britain last night Detectives and Immigration officers from South-ampton questioned the Indians and last night they were believed to be in Winchester prison A Home office spokesman said they would be detained until they could be sent back to their own country '

शनिवारी रेडिओवरून सांगितली गेलेली आणि रविवारी सर्व वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेली ही बातमी आहे इथे आल्यावर दर आठ-पधरा दिवसानी याच स्वरूपाची बातमी वाचायला मिळाली नाही असं झालेलं नाही ब्रिटन-मध्ये बेकायदा घुसण्याचा हा उद्योग ' पजाब ' या एकाच प्रातातील भारतीय आणि पाकिस्तानी गेले कित्येक वर्षे अविरतपणे करीत आले आहेत या बेकायदा प्रवेशाचे मुख्यत्वे दोन मार्ग । पजाबमधून निघून खुष्कीच्या मार्गाने थेट फ्रान्स अगर बेल्जियम्पर्यंतचा पल्ला गाठायचा तिथे एखाद्या तरवाल्याला ( yacht owner) गाठून त्या तरीतून प्रवास करून खाडी पार करून इग्लडच्या किनाऱ्यावर कुठेतरी गुपचूप पाय टेकायचे ! ब्रिटिश कायद्यानुसार बेकायदा प्रवेश करणाऱ्या अशा व्यक्तीला ३० दिवसाच्या

अवधीत पोलीस हद्दपार करू शकले नाहीत, तर त्यानंतर त्याची हकालपट्टी होत नाही खर तर पूर्वी ही मुदत केवळ २४ तासांची होती पण या बेकायदा प्रवेशाच प्रमाण वाढल्यावर ती ३० दिवसाची केली गेली ब्रिटिशाचे ब्रिटिशाकरता असलेले इथले कायदे आणि त्यांच्या अमदानीत केले गेलेले भारतातील कायदे यात बरच अतर आहे ही गोष्ट इथे आल्यावर लगेचच लक्षात येते रेल्वेने प्रवास करीत असता तिकीट काढी-पर्यंत गाडी चुकण्याची वेळ भारतात बरेच वेळा येई इथे तस होण्याची वेळ आली तर सरळ गाडीत बसायच ज्या ठिकाणी उतरायच असेल त्या स्थानकावर, आपण कुठून प्रवास केला ते सागून तिकिटाचे पैसे दिले की झाल ! ‘ Travelling without ticket हा गुन्हा नाही, ‘ travelling without ticket with intent to avoid payment हा गुन्हा आहे प्रसगी तिकीट काढलेल्या ठिकाणाहून पुढच्या स्थानकावर उतरायच झाल तर मधला फरक तेवढा द्यावा लागतो ज्या तिकीट तपासनिसाला हे पैसे द्यायचे, तो पावती इत्यादीच्या भानगडी करीत बसत नाही की ‘ तुम्ही इथूनच कशावरून आलात ’ ही शकाही घेत नाही रात्रीची शेवटची गाडी पकडणारा एक मित्र तिकिटाच्या खिडकीजवळ गेला तेव्हा तिथल्या कार-कुनान त्याला नम्रपणे सांगितल, ‘ तिकीट देईपर्यंत गाडी चुकेल तुम्ही आधी गाडीत जाऊन बसा ! ’ मात्र ‘ गुन्हा’, मग तो मोटारवाल्याचा असो, की लाचलुचपतीबाबतचा असो, त्याबाबत शिक्षा भोगल्याखरीज कुणाचीही सुटका नाही शिक्षेच प्रमाणही इतक कडक की गुन्हा करण्यापूर्वी कुणीही दहा वेळा विचार करील बेकायदा प्रवेशाचा दुसरा मार्ग म्हणजे इथे स्थायिक असलेल्या एखाद्याचा नातेवाईक असल्याची बतावणी करून, लडन विमानतळावरील प्रवेश अधिकाऱ्याना (Immigration officers) बनवून राजरोस प्रवेश करायचा इथेही ब्रिटिशाची सभ्यताच ब्रिटिशाना नडते प्रचलित कायद्यानुसार इथे स्थायिक झालेल्या व्यक्तीला स्वत:ची पत्नी, १४ वर्षांपर्यंतची मुल आणि स्वत:चे अगर पत्नीचे वृद्ध आई-वडील यांना आणण्याची परवानगी आहे या नातेवाईकाना प्रवेश करताना ‘ entry certificate ’ची सक्ती नाही ते नातेवाईक असल्याबाबत अधिकाऱ्याची खात्री पटवून काम भागत. या सवलतीचा भयानक गैरफायदा घेण्यात

आला आहे गेल्या ७–८ वर्षांत नोकरी परवाने घेऊन जे 'उपरे' इथे आले, त्यांनी १ १० या सरासरी प्रमाणात आपले 'नातेवाईक' आणले ही आकडेवारी पुरेशी बोलकी आहे

लडन विमानतळावर नातेवाईक म्हणन बनवाबनवी करणाऱ्यात पजाबी शीख जास्त की पाकिस्तानी जास्त हे सांगणं कठीण ! एका शीख तरुणान तर चक्क मुलीचा वेष घेऊन प्रवेश करण्याचा प्रयत्न केला हा प्रयत्न फसला कसा याबाबतची मनोरजक हकीगत भारतातल्या वृत्तपत्रानीही प्रसिद्ध केली होती कुणाचा तरी नियोजित 'वर' किंवा 'वधू' म्हणून येण हाही प्रकार इतका बोकाळला होता की सुमारे महिन्यापूर्वीच याबाबतीत खास कायदा करून नियोजित वराना प्रवेशबदी लागू करण्यात आली एअर इडियान आणलेल्या प्रवाशांपैकी १७९२ प्रवाशाना गेल्या एका वर्षात प्रवेश नाकारण्यात आला विमानान येणाऱ्या प्रवाशाची जबाबदारी त्या त्या विमान कपनीची असल्यान या साऱ्यांच्या 'परतपाठवणीचा खर्च एअर इडियालाच करावा लागला BOAC कपनीच्या विमानातून आले, त्यांचा भुर्दंड त्या कपनीन सोसला TWA या कंपनीन एका प्रवाशाला केवळ फ्रँकफूर्ट इथून लडनपर्यंत आणल होत तरीही त्याचा दिल्लीपर्यंतचा उलट प्रवास या कपनीच्या 'भत्त्यातून' झाला आता तर एअर इडियाच्या चार कर्मचाऱ्यानाच या कटात भागीदार असल्याच्या आरोपावरून अटक झाली आहे

इनॉक पॉवेल याच्या कृष्णवर्णीय उपऱ्याबाबत गाजलेल्या वक्तव्यानतर थोड्याच दिवसात इथल्या Sunday Telegraph पत्रान इग्लिश खाडीतून होणाऱ्या बेकायदा प्रवेशाबाबत एक सचित्र लेखमाला प्रसिद्ध केली या गुपचूप प्रवेशाच्या कामी, वाटेत ठिकठिकाणी या लोकाना कस कस साहाय्य मिळत याची सारी माहिती या लेखमालेत होती नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका अदाजानुसार गेल्या तीन-चार वर्षांत ६५००० हून अधिक माणस या वाटेन ब्रिटनमध्ये घुसली असावीत घुसखोरीच्या या कर्मात पाकिस्तान्याची ख्याती जास्त ! स्त्रियाकरता काढलेल्या एका नवीन पोषाखाची माहिती देताना एका वृत्तपत्रान लिहिल होत 'The new Pyjamas are ideally suited for a smuggler Anyone wearing them can carry a

number of articles hidden beneath and still leave room for a Pakistani !' पाकिस्तान्याची दाटी झालेल्या 'लेस्टर विभागाला 'खैबर खिंड' हे टोपणनाव इथल्या गोऱ्यानी दिलं आहे

तसं पाहिलं तर पंजाबपासून इंग्लंडपर्यंतचा हा प्रवास पाच-सहा हजार मैलाचा ! विविध राष्ट्राच्या सीमा पार करून फ्रान्स-बेल्जियम् गाठीपर्यंत प्रत्येक व्यक्तीला २००-२५० पौंड खर्च करावे लागतात शिवाय अखेरचा महत्त्वाचा टप्पा—इंग्लंडची खाडी पार करताना, ५०-१०० पौंड मोजावे लागतात इतकं करून प्रवेश करता येईल याची खात्री नाहीच ! दरवर्षी हजारो माणसं सतत हे प्रयत्न करतात याचा अर्थ तरी काय ? अर्थ तसा स्पष्ट आहे इंग्लंडमधील परिस्थितीबाबत अतिरम्य चित्र रंगवून अशिक्षित किंवा अर्धशिक्षित लोकाना नादी लावणाऱ्या संस्था ( agencies ) पंजाबमध्ये असल्या पाहिजेत या संस्थांच्या नादी लागून पाच-सहा हजार रुपयांचा चुराडा करून, इथे तुरुंगवास भोगून परत पाठवणी झालेल्या लोकाकरवी, याबाबत काही माहिती मिळवण्याचा प्रयत्न झाला तर बऱ्याच गोष्टी उजेडात येतील वर्णभेदाच्या प्रश्नावरून इथलं वातावरण नाजूक बनलेलं असताना या असंतोषात भर टाकणारे प्रकार चालू राहणं कुणाच्याही हिताचं नाही हा प्रश्न केवळ एवढ्यापुरताच मर्यादित नाही— साऱ्या भारतीयाच्या 'सामाजिक नीतिमत्तेचीच' लक्तरं अशा वेळी चव्हाट्यावर मांडली जातात आश्चर्य याच वाटत की इथे हायकमिशनर म्हणून होऊन गेलेल्या नामवंतापैकी एकालाही हा प्रश्न धसाला लावावासा वाटला नाही बेकायदा प्रवेश करण्याचा हेतुतः प्रयत्न करणं हा गुन्हा ठरवून भारतात परतताच या लोकावर खटले भरून काहींना कडक शिक्षा होतील तर या प्रकारास निश्चित् आळा बसेल 'कायदेभंगाची' ही चळवळ जितक्या लवकर मागे घेतली जाईल तितकं चांगलं !

ब्रिटनमध्ये बेकायदा घुसण्याच्या प्रयत्नात पकडल्या गेलेल्या १० भारतीयावर पोलिसांनी भरलेल्या खटल्याचा निकाल लागून सर्वांना कैदेच्या शिक्षा झाल्या शिक्षा भोगून होताच, सर्वांना भारतात पाठवण्यात येईल या सर्व कटाचा मुख्य सूत्रधार असलेल्या साधूसिंग जस्सल या सरदारजीला अडीच वर्षे कैदेची शिक्षा मिळाली तीन ब्रिटिश नावाड्या-

नाही भिन्न मुदतीच्या शिक्षा झाल्या निकाल देताना न्या बाऊन् यांनी म्हटल, ' I consider this conspiracy a very serious matter liable to cause great damage to public good and the good of the Commonwealth citizens who are legally in this country Anyone who saw the unfortunate Sikhs giving evidence (सापडलेले १० जण) can have no doubt that it was very cruel to them I feel it is my duty to pass sentences to make it clear that this is a very serious matter ' साधूसिंग ९ वर्षांपूर्वी ब्रिटनमध्ये आला आठवड्याला सुमारे वीस पौंड कमावणाऱ्या या इमारत कामगाराच्या खात्यात ऑगस्ट ते डिसेंबर या काळात २००० पौंड जमा झाल्याचं आढळून आल खटल्यात पुढे आलेल्या माहितीनसार प्रत्येकाला किमान ३०० पौंड (रु ५४००) इतका खर्च झाला– हे सार करूनही अखेर सर्वांना भारतातच परताव लागल ' How immigrant smugglers operate ' या मथळ्याचा एक मोठा लेख Times नं प्रसिद्ध केला

ईस्टरच्या काळातील एक घटना. बारा वर्षांचा एक मुलगा लोहमार्गा-वरील दोन रूळामधोमध समांतर झोपला. लंडनहून न्यूकॅसलला जाणारी एक्स्प्रेस गाडी ताशी ७० मैल वेगान त्याच्या अंगावरून धडधडत गेल्यावर पोरगा मजेत उठून उभा राहिला त्याचा तेरा वर्षांचा एक भाऊ आणि दहा वर्षांची बहीण हा सारा प्रकार कौतुकान पाहात होती पुढे ड्रायव्हरन हा प्रकार अधिकाऱ्यांना कळवल्यावर पोलिसांनी या पोराला बालगुन्हेगारी कोर्टात हजर केल न्यायाधीशान विचारल, 'बाबारे हा प्रकार का केलास ? पोरान उत्तर दिल, We got fed up and I thought I would lie down between the lines and see what it was like I did not get killed though, did I ?' न्यायाधीश म्हणाला, ' you are lucky to be alive ' पोरगा हळूच म्हणाला, ' I have done this once before '

# राजा ईडिपस

कर्मविपाक सिद्धान्ताबद्दल महाराष्ट्रात सध्या बरंच लिहिलं–बोलल जात आहे हिंदू तत्त्वज्ञानाप्रमाणेच ग्रीक तत्त्वज्ञानातही या साऱ्या भानगडींचा पगडा होता निसर्ग आणि सृष्टी हे काही नियमानी बद्ध असतील तर त्याच निसर्गान निर्माण केलेला मानव हाही नियतसयत नियमानी बद्ध असला पाहिजे माणसाला पाप का करावस वाटत याला उत्तर नसल तरी पापकर्माच फळ भोगाव लागण्याची कल्पना मग ओघानेच येते एखाद्या जन्मी हे फळ भोगणं राहून गेलं तर ते दुसऱ्या जन्मी भोगल पाहिजे जन्माला येणारा प्रत्येक जीव हे प्राक्तन बरोबर घेऊन येतो या प्राक्तनाच ज्ञान असलेला एखादा मनुष्य मग दुसऱ्याच्या भविष्यात काय वाढून ठेवल आहे, हे अचूक सागू शकला पाहिजे एकोणिसाव्या शतकातील इतर अनेक ग्रीक शोकातिकांप्रमाणे सोफोकल्स् या नाटककाराची ही शोकातिकाही प्राक्तनाच्या कल्पनेवर आधारलेली आहे पीअरे पावलो पॅसोलिनीसारख्या कम्युनिस्टाला स्वत च पटकथा लिहून ही कथा पडद्यावर आणावीशी का वाटली हे तस एक कोडच माणसाच्या तत्त्वचिंतनाची गाडी ‘ Theory of Determinism ’ पासून निघाली ती आइन्स्टीन्, हेझेनबर्ग (Uncertainty is the only certainty ) फ्राइड् यांची वळण घेत आता अस्तित्ववादावर येऊन पोचली आहे माणसाच्या

कामविकाराचं मूळ त्याच्या बालपणात शोधण्याचा फ्राईडन प्रयत्न केला त्यानंतर लैंगिक स्वातंत्र्याबाबत इथला समाज खूपच पुढे गेला असला, तरी या सर्व धकाधकीच्या काळात एक गोष्ट बरीच शाबूत राहिली आहे– कुटुंबकल्पना ! निकटच्या नात्यातील एकाच रक्ताच्या माणसांनी लैंगिक संबंध ठेवणे ही कल्पना अद्यापही इतकी भयंकर समजली जाते की त्याबाबतची चर्चासुद्धा सर्वसाधारणपणे टाळली जाते ( एकांतात असताना केव्हातरी धर्मराजाच्या मनात कुंतीबद्दल वासना निर्माण झाली हे सांगणारा महाभारतकार एखादाच) अद्यापी पादाक्रांत न झालेल्या या क्षेत्राची अस्तित्ववाद्यांना आठवण करून द्यावी असा तर पॅसोलिनीसाहेबांचा हेतू नसेल ना ?

ईडिपसचं प्राक्तनही भयंकरच नवीन जन्मलेला हा मुलगा आपल्या रतिसुखात व्यत्यय आणील या कल्पनेनं पछाडलेला राजा लायस् (Laius) या मुलाला मारून टाकण्याकरता नोकराच्या स्वाधीन करतो नोकर ऐनवेळी कच खातो-मुलाला दूर वाळवंटात सोडून निघून येतो हा मुलगा वाढतो मग दुसऱ्याच एका घरी– बालपण तसं ठीक जातं पण वयात आलेल्या ईडिपसला मधूनमधून वाईट स्वप्नं त्रास देतात अखेर आपलं भविष्य जाणून घेण्याकरता हा मुलगा एक भविष्य जाणणाऱ्या योग्याला भेटतो तो योगी भविष्य सांगतो, ' मुला, तू तुझ्या वडिलांचा खून करशील आणि आईबरोबर रतिकर्म करशील. ' या असल्या भविष्यावर कोण विश्वास ठेवील? खिन्न मनानं भांबावून ईडिपस परत येतो काही दिवसांनी त्या वाळवंटातील एका रस्त्यावर त्याची वाट एका घोडागाडीमुळे अडते ईडिपस रस्ता सोडण्याचं नाकारतो– त्यानंतर झालेल्या खणाखणीत ईडिपस घोडा-गाडीतील सर्वांचा निकाल लावतो त्याला ठाऊकच नसतं, त्या घोडागाडीतील प्रमुख व्यक्ती राजा लायस् असते असं एक भविष्य खरं होतं आणखी काही दिवसांनी वाळवंटात फिरणारा ईडिपस एका चेटकिणीमुळे त्रस्त झालेल्या गावात येतो–जिवाचा धोका पत्करून त्या चेटकिणीला ठार मारतो– तिथल्या प्रथेप्रमाणे मग त्याला Thebes राज्याचा राजा बनावं लागतं त्याचं तिथल्या विधवा राणीशी लग्न लागतं दुसरं भविष्यही असं खरं होतं. वयानं थोडी मोठी असली तरी

राणीच्या चेहऱ्यावरील शांत गूढ भाव मनाला भुरळ घालणारे असतात तिच्या अनुभवी, पुष्ट शरीराचा आस्वाद घेताना तर ईडिपस वेडावूनच जातो त्याला ते सुख मुक्तपणे देताना राणीचा चेहराही समाधानानं फुलतो— याच वेळी राज्यात प्लेगची भयकर साथ सुरू होते— पटापट माणस मरून पडू लागतात हे अस का घडतय म्हणुन ईडिपस एका आंधळ्या योग्याला विचारतो आणि त्याला कळत की या पापाचे धनी आपणच सतापाच्या भरात ज्या स्त्रीमुळ हे सारं घडल त्या आपल्या आईला तो ठार मारतो आणि स्वत चेही डोळे फोडून घेऊन आंधळा बनतो अँजेलो नावाचा त्याचा दोस्त त्याला राज्य सोडताना एक बासरी देतो— उर्वरित आयुष्यात भणग ईडिपसाची साथ ती बासरी तेवढी करते

या कथावस्तूमधील सारं भीषण नाट्य साकार करण्यात पॅसोलिनी खूपच यशस्वी झाला आहे मूळ नाटकात साऱ्या घटना ग्रीसमध्ये घडत असल्या, तरी या कथावस्तूस आवश्यक अशी पार्श्वभूमी हवी म्हणून पॅसो-लिनीच्या चित्रपटातील साऱ्या घटना अरेबिया अगर तत्सम कोणत्यातरी वाळवटात घडतात या वाळवटाला साजेलस भयाण पार्श्वसगीत साऱ्या चित्रपटभर चालू असत चित्रपटातील पात्र बोलतात खूपच कमी- जे थोडे-फार संवाद ते अर्थवाही म्हणून या शांततेच्या पार्श्वभूमीवर आघात करीतच झडतात छोट्या ईडिपसचे हात आणि पाय काठीच्या एका टोकाला बांधून ती काठी एखाद्या गवळ्याच्या कासडीप्रमाणे खांद्यावर टाकून वैराण वाळवट तुडवणारा नोकर, टाहो फोडून त्या अवस्थेत रडणारा छोटा ईडिपस, त्यापूर्वी त्याला अगावर पाजताना त्याच्या आईच्या चेहऱ्यावरच समाधान आणि बापाच्या मनातील क्रूर हेतू ईडिपसला त्याच प्राक्तन सागून झाल्यावर दोन मुडक्याच्या आवरणाखालून खदखदा हसणारा जाणकार योगी, पितापुत्राच्या लढाईच्या वेळी होणारा शस्त्रांचा खणखणाट, चेटकि-णीला ठार मारल्यावर थीबस् राज्यातील प्रजाजनांचा आनंद, राणीबरो-बरची शयनदृश्य, प्लेगच्या साथीत मरून पडलेल्या माणसाची विद्रूप शरीर आणि त्या प्रेताच्या चेहऱ्यावरील भयानक भाव, आईला-आपल्या पत्नीला टागून ठार मारल्यावर तिच्या नग्न प्रेताच्या पायाशी बसून शोक करणारा

राजा ईडिपस– ही सारी दृश्य मनावर असा काही परिणाम करतात की त्यांच्या आठवणीनंही मनुष्य बरेच दिवस बेचैन राहतो

हे सारं नाट्य तसं कालातीतच आहे हे दाखवण्याकरता चित्रपटाची अखेर होते ती आधुनिक काळात एका आलिशान शहराच्या रस्त्याच्या कडेला बासरी वाजवीत बसलेला आंधळा ईडिपस आणि त्याची वेदना ठाऊक नसल्याने केवळ कुतूहलाने त्याच्याकडे पाहत जाणारे अगर दुर्लक्ष करणारे गर्दीतील लोक कटाळा येतो तेव्हा ईडिपस बाजूला खेळत असलेल्या अँजेलोला हाक मारतो आणि त्याच्या खांद्यावर हात टाकून चालू लागतो

लहानग्या ईडिपस ची आई आणि राजा ईडिपसच्या प्रेयसी पत्नीची भूमिका Silvana Mangano सारख्या नटीन नाही तर कुणी करायची ? या चित्रपटातील तिच्या सौंदर्याचा आविष्कार पाहिला आणि कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेबाबत शिवाजीनं काढलेले उद्‌गार खरेच असले पाहिजेत असं तेव्हापासून वाट लागल एवढ मात्र खरं

□

# अविस्मरणीय चित्रपट

पावसाळी ढगाळ वातावरण आणि वातावरणात जाणवू लागलेला गारठा अशी हवा असली की एकतर घरीच बसून टेलिव्हिजन पाहायचा नाही तर कुठे तरी सिनेमा-नाटकाला जाऊन बसायचं गेल्या आठवड्यात तेच केलं गेले वर्षभर लंडनमध्ये चालू असलेला आणि सर्वत्र अफाट गाजलेला Belle De Jour नावाचा एक चित्रपट पाहून आलो

Belle De Jour हे एका स्त्रीचं नाव खर तर तिचं नाव सीव्हरीन्. ( Severine ) पीएर् सेरीझी ( Pierre serizy ) नावाच्या एका डॉक्टरची सुस्वरूप पत्नी तस पाहिलं तर भोवती सारं सुखच सुख असत नवरा प्रेमळ, शरीरान उमदा, वागणुकीनं अतिशय सुसंस्कृत, हॉस्पिटलमधल्या आपल्या कामात रस घेणारा पिएर् आपल्या सहकाऱ्यांत, विद्यार्थ्यांत आणि वरिष्ठांच्या वर्तुळात सर्वांचा आवडता असतो या साऱ्या व्यापात त्याचा बराचसा वेळ जात असला तरी आपल्या पत्नीवर त्याची जिवापाड माया असते एखाद्या पाखराला जपाव तसा तो सीव्हरीनला जपत असतो बर्फा-वरील खेळात त्याच्याबरोबरीन भाग घेणारी सीव्हरीन् थंडीतापानं आजारी होते तेव्हा म्हणूनच तो घाबरून जातो– तिचा ताप निघून ती पूर्ववत् होण्याकरिता शुश्रूषेचा धडपडाट करतो

पीएर् जवळ असला की त्याच्या आधारानं सीव्हरीन कशी सुखात असते.

पण तो कामावर गेला की सारं घर कसं खायला उठतं शरिरानं विकल झालेल्या सीव्हरीनच्या मनातली भूतं अशा एकलेपणी जागी व्हायची कसल्यातरी अनामिक भीतीचं दडपण जाणवू लागायचं भोवतीच्या अंधाऱ्या कल्पनाविश्वातून एक राकट पुरुषाकृती येऊन तिचा पाठलाग करू लागायची त्या आकृतीपासून दूर पळणारी सीव्हरीन् अखेर इतकी थकायची ! या आणि अशाच कल्पनादृश्यानी तिचं मन भरून यायचं हळूहळू या कल्पना-विश्वाचीच तिच्या मनाला चटक लागते आणखीही एक गोष्ट तिच्या ध्यानी येते त्या भीतीचे शहारे तिला वाटतात तितके दुःखदायक नसतात– नव्हे त्या शहाऱ्यातच एका विकृत समाधानाची चाहूल असते

एरव्हीच्या सुखी, समाधानी सीव्हरीन्‌चा या सावल्यांच्या जाचातून मुक्त होण्याचा धडपडाट चालू असतो या अस्वस्थपणात भर घालण्याचं काम हुसन नावाचा पीएरचा एक मित्र करीत असतो बऱ्याच चविष्टपणे जग पाहिलेला हुसन तिच्या घरी येई, तो नेमका पीएर् नसताना त्याची कीर्ती तिला ऐकून ठाऊक असतेच– पण माणूस नावडता असला तरी नवऱ्याचा मित्र म्हणून शिष्टाचार पाळणं आलंच स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव असलेला हुसन बोलता बोलता तिच्या शरीराची स्तुती करून जाई– शांतपणे– निढावलेल्या नजरेनं तिच्याकडे पहात त्याची नजर एखाद्या झुरळाप्रमाणे तिच्या शरिरावरून फिरे –तिला अस्वस्थ करी तिला त्याचा राग येई त्याचं बोलणं असह्य होई तरीही त्याच्या त्या स्तुतीनं एका अनामिक सुखाचे रोमांच आपल्या अंगावर उभे राहतात हे तिच्या नंतर लक्षात येई एरव्हीच्या सुखी, समाधानी सीव्हरीनच्या शरीरात पाशवी सुखाकरिता तळमळणारी एक वेगळी बया राहते आहे हे तरीही तिला समजतच नसतं. मग एक दिवस अचानक एक मैत्रीण भेटते आणि तिला सांगते, 'अग, ती हेन्‍रीएट– ती म्हणे हल्ली धंदा करते– त्या तसल्या जागी जाऊन ! शी ऽ काय बाई होत असेल तिला. .'

आणि 'त्या तसल्या जागी' काय काय चालतं– स्त्री शरीराचे काय हाल होतात, याचं रसभरित वर्णन पुढचा अर्धातास ती सीव्हरीनला ऐकवते ते सारं वर्णन ऐकून सीव्हरीन मुळी भानावरच राहत नाही– तिच्या शरीरात दडून बसलेली ती बया, एरव्हीच्या शांत, सुखी सीव्हरीन्‌चा जणू

पूर्ण कबजा घेते खरच, काय वाटत असेल स्त्रीला हे सारं होत असताना ? कोणत्याही गलिच्छ, ओबडधोबड माणसान यायच, पचवास-तीस फ्रँक्स् मोजायचे आणि मन मानेल ती मजा लुटायची– स्त्रीच्या शरीरावर मन मानेल ते प्रयोग करायचे आपण तिथे गेलो तर आपल्या शरीराची अशीच दशा होईल ? या साऱ्या विचारांसरशी उन्मादसुखाची एक लाट तिच्या शरीरात पसरत जाते त्या तसल्या जागांचे एक-दोन पत्ते बोलताबोलता हसन सहजपणे देऊन टाकतो मनाचा हिय्या करून सीव्हरीन् प्रथम टॅक्सी-तूनच ते घर पाहून घेते, दुसऱ्यावेळी त्या घराभोवती पायीच घुटमळून परतते– तिसऱ्या वेळी सरळ आत जाते

एका नवीन आयुष्याला सुरुवात होते पीएर हॉस्पिटलमध्ये गेला की ही मध्यमवर्गीय, कुलीन स्त्री 'त्या घरी' जाते– दोन ते पाच या ठरलेल्या वेळात Belle De Jour या नावान तिथ वावरते आणि वेळ सपताच एक कुलीन पत्नी बनून पुन्हा घरी येते 'त्या तसल्या' जागी जाणारी माणससुद्धा त्याना हव ते निर्लज्जपणे देणाऱ्या स्त्रिया पसत करीत नाहीतच प्रत्येकाला हवी असते ती लाजाळू, विनयशील, पुरुषाच्या अहकाराला फुकर घालणारी स्त्री त्यातून ती कुणाची तरी प्रेयसी किंवा पत्नी असली तर तिच्याबद्दलच्या आकर्षणाला पारावारच नाही Belle De Jour या नावानं आलेली ही नवीन भुरकट केशा स्त्री (Blonde) म्हणूनच लोकप्रिय होते Charlotte आणि Mathilda या त्या ठिकाणच्या तिच्या मैत्रिणी खरं तर तिच्याहून अधिक सराईत, निढावलेल्या ! पण त्यांनाही हेवा वाटावा अस Belle De Jour च शरीर सुरुवातीची भीती– लाजरेपणा लवकरच संपतो आणि एखाद्या योग्याच्या स्थितप्रज्ञेने पुरुषाच्या कामवासनेचे वेगवेगळे आविष्कार सीव्हरीन पाहू लागते मैत्रिणीदेखत एखाद्या गिऱ्हाइकान तिच्याबरोबर वासनातृप्ती करून घेतली तरी काही वाटू नये इतक मन हळूहळू निढावत पुरुषाचे वासनातृप्तीचे प्रकार तरी किती निरनिराळे ! तिला स्वत:ची मृत पत्नी कल्पून, शवपेटीत निजायला लावून शोकविलाप करणारा एक सधन गृहस्थ, लहान मुलाप्रमाणे गुडघ्यावर रांगून चाबकाचे फटके खाल्यावर कामवासना जागृत होणारा आणखी एक जण– प्रकाशकाकडून मिनतवारीनं मिळवलेल्या स्वत:च्या पुस्तकाच्या पहिल्या प्रती त्या पोरींमध्ये वाटून

[illegible] एक का दोन !

या साऱ्या विटंबनेत आणि अवहेलनेत सीव्हरिनच्या शरीरातली ती बया आपल सुख शोधीत असते. त्या वेश्यागृहात प्रवेश केल्यापासून बाहेर पडे-पर्यंत वावरणारा Belle De Jour निराळी आणि पीएरची पत्नी असलेली एरव्हीची सीव्हरीन निराळी आपल्या वागणुकीचा सुगावा पीएरला लागेल या भीतीच्या छायेत या एरव्हीच्या कुलीन सीव्हरीनच आयुष्य जात असत मात्र पीएरच प्रेम आणि शरीराला असलेली पाशवी सुखाची भूक या दोनही गरजा भागवायच्या तर आहे हेच आयुष्य चालू ठेवल पाहिजे हे तिला आता उमगलेल असत मनावरच दडपण असह्य झाल की ती हताशपणे स्वतःला समजावते, या साऱ्याची फळ केव्हातरी भोगायची आहेतच पीएरला सार सांगून टाकाव का—छे—त्याला त्याचा अर्थ कळणारच नाही—केव्हातरी परस्पर कळेल काय करील तो ? घटस्फोट घेईल ? घर सोडील ? की आपणच आत्महत्या करून आपली आणि त्याची मुक्तता करून टाकू ?'

अखेर एक दिवस जे घडायच ते घडत तिची कल्पनाही नसताना नवऱ्याचा मित्र म्हणवणारा हसन् त्या वेश्यागृहात दाखल होतो आपली डाळ शिजू न देणाऱ्या सीव्हरीनच Belle De Jour नावाच्या एका वेश्येत झालेल रूपांतर पाहून तोही दचकतो पुढे वाढून ठेवलेल्या भविष्याच्या कल्पनेनच सैरभैर झालेली सीव्हरिन्, तो निघून जाताच त्याच्यावर मारेकरी घालते हसन करता योजलेली पिस्तुलाची गोळी प्रत्यक्षात लागते मात्र पीएरला तो मरत नाही पण विकलांग होतो आपल्या पापाच प्रायश्चित्त त्या पुण्यवान इसमाला भोगाव लागाव याची खंत वाटणारी सीव्हरीन् अखेर सारा प्रकार नवऱ्याला सांगते Belle De Jour अशी संपते.

## कॅथरिन डेनेव्ह

चित्रनिर्मितीकरता या पुस्तकाचे हक्क विकताना, कादंबरीचा लेखक जोसेफ केसल् यान एकच अट निर्मात्याला घातली या चित्रपटातली Belle De Jour ची भूमिका Catherine Deneveuc (कॅथरिन् डेनव्ह) या नटीन केली पाहिजे आपल्या पंचविशीतली ही फ्रेंच नटी आज फ्रान्सची सर्वोत्कृष्ट

नटी आहे Roger vadım या ख्यातनाम दिग्दर्शकान प्रथम तिला प्रसिद्धीच्या झोतात आणली Brigitte Bardot पासून Jane Fonda पर्यंत अनेक सौदर्यखनींशी विवाह करून, त्याच्या अनावृत्त शरीराची प्रदर्शन स्वत च्या चित्रपटातून करणारा हा दिग्दर्शक–यान कॅथरिन् डेनेव्हचही एका मदनमस्त चंद्रिकेत (Sex symbol) रूपांतर करून टाकल त्याच्यापासून तिला एक मुलगाही झाला–मात्र त्यान विवाहाची विनंती केल्यावर कॅथरिनन त्याला नकार दिला केवळ सोनेरी केस आणि लोभसवाण शरीर याहून अधिक काही देणगी कॅथरिन जवळ होती स्वत च अस व्यक्तिमत्व ! अन्यायाच भक्ष्य बनलेल्या स्त्रीच कारुण्य मूर्तिमत उभं करण्याची अभिनयकला. असल्या भूमिका ती केवळ करीत नाही– जगते चेहऱ्यावरील शात, गूढ भाव-हालचालीत कुमारिकेचा डौल आणि स्वत च मार्दव न सोडताही पुरुषी हल्ल्यापासून बचाव करताना स्त्रीच्या अगी येणारा निर्धार या साऱ्या गोष्टी कॅथरिनच्या अगी मुळातच असाव्यात Roger vadım च्या पहिल्या चित्रपटातही विकृत कामवासनेचं भक्ष्य बनलेल्या एका स्त्रीचं विटंबित जीवन तिन साकार केल होत Belle De Jour च्या भूमिकेकरता तिची झालेली निवड अपरिहार्यच होती मुख्य नटी ठरल्यावर मग दिग्दर्शक शोधायला सुरुवात झाली अनेक नाव नाकारून अखेर हिन Luıs Cunuel हा दिग्दर्शक पसत केला Cunuel न चित्रपटाच सपूर्ण दिग्दर्शन केल–चित्रपटाच्या दृष्टीने मूळ कथेतील प्रसगात काही बदलही त्यानं केले त्यान आणखीही एक गोष्ट केली– Belle De Jaur च्या भूमिकेबाबत कॅथरिन् डेनेव्हला काहीही दिग्दर्शन दिल नाही. त्या भूमिकेच सार कारुण्य कॅथरिनन तरीही मूर्तिमत साकार केल नशिबान हुसनची भूमिका करणारा Mıchel Pıccolı हा नट तिच्याइतकीच समजून भूमिका करणारा त्याच्याबरोबर आतापर्यंत पाच चित्रपटातून तिन कामे केलेली आहेत लपट, निर्ढावलेला पुरुष आणि त्याला प्रथम झिडकारणारी पण अखेर त्याच्यापुढे हार खाणारी स्त्री, हा या दोघांच्या भूमिकांचा साचा आता जवळजवळ ठरून गेला आहे (Benjamın या चित्रपटातील या दोघांच्या भूमिका या दृष्टीनं मुद्दाम पाहाण्याजोग्या आहेत )

Belle De Jour पाहून चित्रगृहातून बाहेर पडताना प्रेक्षक जवळजवळ

भानावर नसतोच त्या पीएरप्रमाणेच तो घायाळ झालेला असतो पीएर-प्रमाणेच त्याला सीव्हरीन आवडलेली असते–अगदी प्रेम जडण्याइतकी सामान्यत प्रकट न होणाऱ्या स्त्रीसुलभ विकृत वासनेपायी (Masochism) काही किळसवाण्या पुरुषाकडून होणारे Belle De Jour चे धिडवडे म्हणूनच त्याला पाहवत नाहीत सीव्हरीनचा राग येत नाही– कीव येते

सीव्हरीन्‌सारखी स्त्री हा अपवाद असला तरी थोडयाफार फरकाने अशा साहसाला प्रवृत्त होणाऱ्या स्त्रिया कोणत्याही समाजात सापडतीलच. स्वतःच्या पत्नीचं असलं वर्तनही समजून घेऊन तिच्याशी संसार चालू ठेवणारा पिएर मात्र अगदी एखादाच असले चित्रपटही केवळ हे फ्रेंच लोकच काढू जाणोत भारतात असलं काही भलतसलतं दाखवायला सुरुवात झाली तर ? छे, छे, मधल्या सुट्टीत धड डबा खाणही सुचणार नाही नवरे-मंडळींना !

# लंडनमधली सायंकाळ

रविवारची दुपार सकाळपासून सर्वत्र कडक उन्ह पडलेली कुणीतरी व्हाऊचरवाल्याच्या खोलीवर चार-सहा दोस्त मंडळी जमलेली असतात सारेच सडेफटिंग करायचे तरी काय ? आताशी कुठे १२॥–१ वाजलेला असतो सगळा दिवस अजून पुढे पडलेला असतो आणि रात्री ९ वाजेपर्यंत [illegible] दिवसच असतो उन्हाळ्यात नाही [illegible]
पण जेवणाला वेळ तो किती ! कुणीतरी एकाने कांदे-बटाट्याची भाजी करायची आणि सकाळीच आणलेल्या भल्यामोठ्या पावाचे तुकडे भसाभस सर्वांनी त्या भाजीबरोबर खायचे, लोणचं– दह्याचे वाडगे मदतीला शेवटी कॉफी ढोसली की झाल जेवण

दोन वाजता अगदी कंटाळा येतो बाहेर अशी लख्ख उन्हे असली की सिनेमालासुद्धा जाऊन बसावस वाटत नाही शिवाय सिनेमे काय, महिनो-गणती तेचतेच चालू असतात X'चित्रपट बहुतेक कुणी ना कुणी पाहिलेले. कोणताच चित्रपट पसंत पडणारा नसतो नाटकाच्या वाटेला तर कुणी जातच नाही- तेव्हा तो प्रश्नच नसतो Strip--tease ला जाऊ या !' कुणीतरी सुचवतो ' च्यायला! Strip tease, Strip--tease काय रे, परवाच [illegible] तर जाऊन आलो ना ' सूचना धडकावली जाते [illegible] चांगले दोन महिने तरी झालेले असतात पण त्याच त्या पोरी पुन:पुन्हा

काय पाहायच्या तशात ते अधारी, उबग आणणार वातावरण पुन्हा जागले दहा-दहा शिलिंग मोजायचे त्याकरिता त्यापेक्षा घरीच लोळत पडावं ' Playboy 'सारख एखाद मासिक चाळीत ' ' बाहेर तर पडू या–मग पाहू कुठ भटकायच ते ! ' भराभर कोट अगावर चढवले जातात व्हाउचर-वाल्यांचा तो ताडा बसस्टॉपच्या दिशेने चालू लागतो

बसस्टॉपपाशी पोचल्यावर पुन्हा प्रश्न येतोच तिकिट काढायची कुठची? Piccadilly Circus ? छे–अशा दिवशी पिकॅडिलीचा नाका म्हणजे जत्राच नुसती ठिकठिकाणाहून आलेले tourists इतकी गर्दी करतात, की धड चालताही येत नाही आणि पाहायच तरी काय ? त्याच त्याच त्या जाहिराती–सिनेमाची भली मोठी पोस्टर्स आणि मध्यभागीच्या इरॉसच्या पुतळ्याभोवती तळ ठोकून बसलेले हिप्पीज् ! दिवसभर इथे अस नुसत बसून काय करतात कुणास ठाऊक ! मळलेले पोषाख, अस्ताव्यस्त वाढलेले केस– भकास चेहरे ! यत्रसस्कृतीचे हे बळी– भोवतीच्या जगाचे बरेचसे नियम झुगारून दिलेले–(तरीही प्रत्येकाच्या जवळ पोरगी असतेच हे विशेष) या हिप्पींची ही वसाहत आता इतकी वाढली आहे की, या पुतळ्याभोवतीची सारी जागा आता अपुरी पडते Piccadilly Circus अर्थातच कटाप होते एक गोष्ट करण्याजोगी असते Hyde Park ला जाण ज्यांना पटत ते निघतात– ज्याना फारस पटत नाही तेही निघतात वेळ कसा घालवायचा या प्रश्नाची विविध उत्तर तिथ सापडतात हे त्यानाही ठाऊक असत

## हाइड पार्क

हाइड पार्क ! लडनच्या मध्यभागी असलेली साडेतीनशेहून जास्त एकर क्षेत्रफळाची नयनरम्य हिरवळ खर तर लडन शहरात अशा हिरवळी (greens) जागोजाग आहेत हाइड पार्कची खरी प्रसिद्धीही हिरवळीकरता नाहीच या अफाट मैदानाला आतरराष्ट्रीय प्रसिद्धी दिली आहे ती ' Speakers Corner नावाच्या याच्या एका छोटया कोपऱ्यान राज-कारणात रस असलेले–जगात घडणाऱ्या बऱ्या वाईट घटनाबद्दल मनापासून काहीतरी वाटणारे हौशे, नवसे आणि गवशे आपली वक्तृत्वाची सारी हौस भागवतात ती या ठिकाणी जगातल्या सर्व राजकीय घटनाची लवकर

रविवारी दुपारी या ठिकाणी धुतली जातात. याला अपवाद फक्त ब्रिटन-संबंधी राजकीय भंडामोडीचा. ब्रिटिश राजकारणात पुढारी बनू पाहणाऱ्या लोकांनी वक्तृत्वाचे पहिले पाठ घेण्याकरिता या कोपऱ्याचा वर्षानुवर्षं वापर केला. पण आता तो काळ इतिहासजमा झाला. या कोपऱ्याकडे आता ब्रिटिश माणस फारशी फिरकतच नाहीत. एरवी अगदी निर्मनुष्य असणारा हा कोपरा रविवारी दुपारी गजबजून जातो, तो या देशात आलेले ठिकठिकाणचे उपरे आणि लंडन शहरातल्या इतर गमतीप्रमाणेच या ठिकाणची गंमत पहायला आलेल्या प्रवासी (tourist) मंडळी यांनी. ब्रिटनबद्दल आस्था यांपैकी कुणालाच नसते. ब्रिटिशांची यथेच्छ निंदानालस्ती मग या ठिकाणी चालते. स्वतःच्याच परसदारी स्वतःची इतकी निंदा-नालस्ती सहन करणारा ब्रिटन हा जगातला एकमेव देश असावा.

या ठिकाणी भाषण करणं तसं अगदी सोपं. एखाद्या रिकाम्या खोक्यावर उभं राहायचं आणि सुरुवात करायची, ' friends ' किंवा ' Ladies and Gentlemen ' समोर या वेळी कुणीच फ्रेंड नसतो— पण हां हां म्हणता चार दोन टाळकी जमतात. काहीतरी नवीन गंमत ऐकायला मिळणार म्हणून. तरीही इथल्या वक्त्यांच्या जागा तशा ठरलेल्या. मध्यभागी एका उंच शिडीवर, बरीच गर्दी जमवणारा एक वक्ता असतो. त्याचं नाव रॉय शॉ. उलटे फिरवलेले केस, डोळ्यांवर काळा चष्मा, अंगात निळा सदरा-मिस्किल हसरा चेहरा. मार्क्सवादाचे कट्टर संस्कार झालेले— Black racialist म्हणता येईल इतकी गोऱ्यांची टवाळी करणारा. याच्याभोवती कायम गर्दी असते. बहुसंख्य गोरेच असतात. याच्या बोचऱ्या, चिमटे घेणाऱ्या भाषणाचा त्यांनाही मोह पडतो. बोलता बोलता एखादा उच्च विनोदही करून जाईल. भोवतीचे लोक फारसे हसत नाहीत. ' Too much for the working Class ' हा स्वतःशीच अर्धवट म्हणतो आणि खट्याळपणे खादे उडवीत हसतो. याच्या डाव्या बाजूला थोड्या अंतरावर असतं एक निग्रोंचं व्यास-पीठ. भोवती गर्दी असते तीही सर्व निग्रो लोकांची. पाहुणारांना कससंच वाटावं इतक्या तावातावानं हा वक्ता काहीतरी सांगत असतो. कशाबद्दल? निग्रोंची चळवळ, गोऱ्यांचा वसाहतवाद, नायजेरिया— बिआफ्रा संघर्ष. इनॉक पॉवेलचं भाषण! प्रयत्न करूनही नेमकं समजत नाहीच. पाय दुसरीकडे

वळतात लक्ष वेधल जात एका भल्या मोठ्या फलकाकडे 'The End of the world is near' अस त्यावर लिहिलेल असत तो फलक गळ्यात अडकवून एकजण काहीतरी सागत असतो जीझस् खाइस्ट– बायबल– काही काही शब्द तुटकपणे समजतात चार पावलावर एक सोशालिस्ट रशियामधील क्रांतीचं खर श्रेय लेनिनला नसून ट्रॉटस्कीला आहे हे पटवून देत असतो श्रोत्यापैकी एक दोघे रशियन त्याला खोडण्याचा प्रयत्न करीत असतात पलीकडे एक कम्युनिस्ट, भाडवलदारी अर्थव्यवस्थेविरुद्ध बरच काही सांगू पाहत असतो त्याच्या बाजूच्याच वक्त्याचा राजकारणाशी सबध नसतो त्याच्या मुलाला पोलिसानी चुकीन फाशी दिलेला असतो ते सिद्ध करणारा सर्व पुरावा तो लोकासमोर ठेवत असतो या सर्वांवर मात करतात ते इस्रायली ज्यू अक्षरश शेकडो ज्यू रविवारी इथे असतात अरब इस्रायल सघर्षातली बाजू कळवळून मुद्देसूदपणे मांडली जात असते इस्रायलचा तारा असलेला ध्वज उभारलेला दिसतो मग मधूनच आठ-दहा इस्रायली स्त्री-पुरुष हातात हात गुफून वर्तुळाकृतीत नाचू लागतात भोवतीच्या साऱ्या श्रोत्याच्या साथीन एक साधिक आवाज घुमू लागतो इस्राएल– इस्रायल! अरबाबरोबरच्या आजवरच्या प्रत्येक सघर्षात मिळवलेल्या विजयाचा उन्माद सर्वांच्या चेहऱ्यावर कसा फुलून आल्यासारखा वाटतो काही हातांच्या अतरावरच अरबाच व्यासपीठ असत. गर्दी तशी बरीच असते पण उत्साहाचा अभाव जाणवतोच आजवरचे सारे पराभव चेहऱ्यावर कसे स्पष्ट दिसतात काही दिवसापूर्वीची गोष्ट अरबाच्या दहशतवादाने अरब-इस्रायल सघर्ष सुटण्यास मदत होणार नाही अस श्रोत्यांपैकी एक इस्रायली स्त्री, अरब तरुणाना परोपरीन सागत होती भाषण सपली– वक्ते खाली उतरले– त्या स्त्रीबरोबर परिचय करून घेण्याकरता हस्तांदोलन करीत असताना त्या स्त्रीन सागितल, 'मी सौ दयान्!–' मोशे ह्याची ती पत्नी होती अरब-इस्रायली सघर्ष कितीही उग्र झालेला असो– हाइड-पार्कवर आलेले अरब आणि ज्यू एकमेकांशी सभ्यपणे वागतात प्रसगी ज्यूची आणि अरबांची दोन-दोन, तीन-तीन व्यासपीठ असतात प्रत्येक ठिकाणी तेच वातावरण

एका ठिकाणी एका धिप्पाड अरबाभोवती काही ज्यू गोळा झालेले

असतात त्याला डिवचणारे प्रश्न विचारीत असतात शांतपणे तरीही तो बोलत असतोच मग पाहता पाहता त्या अरबाची जागा एक पाकिस्तानी पोरगा घेत त्याची रसवती वाहू लागते, ‘ The Great Mohommed created us to rule the world . Pakistan will send battalion to Israel and finish it- We will kill all the men but we will not kill the women we muslims like women . we will take all the women ’ इतका वेळ त्याच्या दर्पोक्तीकडे दुर्लक्ष केलेले हे ज्यू आता मात्र अस्वस्थ होतात वेडवाकड न बोलण्याबद्दल त्याला सुनवतात कुणीतरी काश्मीरचा उल्लेख करत– आता त्या पाकिस्तान्याला खरा वाव मिळतो– Oh Bloody Indians .Don’ t talk of them soon all of India will become Pakistan भीक नको झालेला तो अरब कसाबसा त्या पाकिस्तानी कुत्र्याला आवरतो दोन किडकिडीत चष्मा लावलेली पोर तेवढ्यात एक शिडी उभारतात– तीवर लिहिलेल असत, ‘ India Forum !’ आपल्या तद्दन भिकार इंग्रजीत एक पोरगा काहीतरी बोलू लागत इतका वेळ त्या अरबामध्ये घुटमळलेल्या पाकिस्तान्याचं एक टोळकच्या टोळक त्या ठिकाणी धावून येत त्यांना करायचा असतो धागड-धिंगा– आपल्या भारत आणि हिंदुद्वेषाच नागड प्रदर्शन ! शिडीवरचा वक्ता जीव तोडून काही सांगू पाहत असतो– त्याला बरच काही सागायच असत– भारताची शांतताप्रियता– गांधीच मोठेपण– नेहरूच पुरोगामी परराष्ट्रीय धोरण– ताश्कद कराराची थोरवी- भारतीय राज्यघटनेच धर्मालिप्त स्वरूप असच काहीतरी ! यातल काहीच सागून होत नाही पाकिस्तान्याचा तो तांडा वेडेवाकडे प्रश्न विचारू लागतो– हुल्लडबाजी– ढकलाढकली सुरू होते– पोलिसाच लक्ष नाहीस पाहून प्रसगी एखाद्याला मारहाण ! जमावात असले नसलेले गोरे निघून जातात एखादा राहिलाच तर [illegible]. विचारतो, What is the nature of India s religious troubles ? आठ-दहा भारतीय डो[illegible] जेष्ठांनी हे सार पाहत असतात India Forum लवकरच आटपतो खाली उतरलेल्या वक्त्याला समजावल जात, ‘ बाबा रे, हे लोक दर रविवारी इथे दगल करतात उगीच मार खाण्यात काय अर्थ आहे ? ’ तेही खरच ! हाइडपार्कच्या त्या विस्तीर्ण

वळतात लक्ष वेधल जात एका भल्या मोठ्या फलकाकडे 'The End of the world is near' अस त्यावर लिहिलेल असत तो फलक गळ्यात अडकवून एकजण काहीतरी सागत असतो जीझस् खाइस्ट– बायबल– काही काही शब्द तुटकपणे समजतात चार पावलावर एक सोशालिस्ट रशियामधील क्रातीच खर श्रेय लेनिनला नसून ट्रॉटस्कीला आहे हे पटवून देत असतो श्रोत्यांपैकी एक दोघे रशियन त्याला खोडण्याचा प्रयत्न करीत असतात पलीकडे एक कम्युनिस्ट, भाडवलदारी अर्थव्यवस्थविरुद्ध वरच काही सागू पाहत असतो त्याच्या बाजूच्याच वक्त्याचा राजकारणाशी सबध नसतो त्याच्या मुलाला पोलिसानी चुकीन फाशी दिलेला असतो ते सिद्ध करणारा सर्व पुरावा तो लोकासमोर ठेवत असतो या सर्वांवर मात करतात ते इस्रायली ज्यू अक्षरश शेकडो ज्यू रविवारी इथे असतात अरब इस्रायल सघर्षातली बाजू कळवळून मुद्देसूदपणे मांडली जात असते इस्राय-लचा तारा असलेला ध्वज उभारलेला दिसतो मग मधूनच आठ-दहा इस्रायली स्त्री-पुरुष हातात हात गुफून वर्तुळाकृतीत नाचू लागतात भोवतीच्या साऱ्या श्रोत्यांच्या साथीन एक साधिक आवाज घुमू लागतो इस्राएल– इस्रायल ! अरबाबरोबरच्या आजवरच्या प्रत्येक सघर्षात मिळवलेल्या विजयाचा उन्माद सर्वांच्या चेहऱ्यावर कसा फुलून आल्यासारखा वाटतो काही हातांच्या अंतरावरच अरबाच व्यासपीठ असत. गर्दी तशी बरीच असते पण उत्साहाचा अभाव जाणवतोच आजवरचे सारे पराभव चेहऱ्यावर कसे स्पष्ट दिसतात काही दिवसापूर्वीची गोष्ट अरबाच्या दहशतवादाने अरब-इस्रायल सघर्ष सुटण्यास मदत होणार नाही अस श्रोत्यापैकी एक इस्रायली स्त्री, अरब तरुणाना परोपरीन सागत होती भाषण सपली– वक्ते खाली उतरले– त्या स्त्रीबरोबर परिचय करून घेण्याकरता हस्तांदोलन करीत असताना त्या स्त्रीन सागितल, 'मी मौ दयान् !–' मोशे ह्याची ती पत्नी होती अरब-इस्रायली सघर्ष कितीही उग्र झालेला असो– हाइड-पार्कवर आलेले अरब आणि ज्यू एकमेकांशी सभ्यपणे वागतात प्रसगी ज्यूची आणि अरबाची दोन-दोन, तीन-तीन व्यासपीठ असतात प्रत्येक ठिकाणी तेच वातावरण

एका ठिकाणी एका धिप्पाड अरबाभोवती काही ज्यू गोळा झालेले

असतात त्याला डिवचणारे प्रश्न विचारीत असतात शांतपणे तरीही तो बोलत असतोच. मग पाहता पाहता त्या अरबाची जागा एक पाकिस्तानी पोरग घेत त्याची रसवती वाहू लागते, ' The Great Monohimeu created us to rule the world. . Pakistan will send battalion to Israel and finish it- We will kill all the men but we will not kill the women we muslims like women we will take all the women ' इतका वेळ त्याच्या दर्पोक्तीकडे दुर्लक्ष केलेले हे ज्यू आता मात्र अस्वस्थ होतात वेडवाकड न बोलण्याबद्दल त्याला सुनवतात कुणीतरी काश्मीरचा उल्लेख करत– आता त्या पाकिस्तान्याला खरा वाव मिळतो– Oh Bloody Indians Don' t talk of them . soon all of India will become Pakistan भीक नको झालेला तो अरब

कसाबसा त्या पाकिस्तानी
लावलेली पोर तेवढ्यात एक शिडी उभारतात– तीवर लिहिलेल असत
' India Forum !' आपल्य तद्दन भिकार इंग्रजीत एक पोरग काहीतरी
बोलू लागत इतका वेळ त्या अरबामध्ये घुटमळलेल्या पाकिस्तान्याच एक
टोळकच्या टोळक त्या ठिकाणी धावून येत त्याना करायचा असतो धांगड-
धिंगा– आपल्या भारत आणि हिंदुद्वेषाच नागड प्रदर्शन ! शिडीवरचा वक्ता
जीव तोडून काही सागू पाहत असत–
भारताची शातताप्रियता– गांधीच मोठेपण– नेहरूच पुरोगामी परराष्ट्रीय धोरण– ताश्कद कराराची थोरवी- भारतीय राज्यघटनेच धर्मनिरपेक्ष स्वरूप असच काहीतरी ! यातल काहीच सांगून होत नाही पाकिस्तान्याचा तो ताडा वेडेवाकडे प्रश्न विचारू लागतो– हुल्लडबाजी– ढकलाढकली सुरू होते– पोलिसाच लक्ष नाहीस पाहून प्रसगी एखाद्याला मारहाण ! जमावात असले नसलेले गोरे निघून जातात एखादा राहिलाच तर खवचटपणे विचारतो ' What is the nature of India s religious troubles ?

आठ-दहा भारतीय डोकी काळजायुक्त चेह- ांनी हे सार पाहत असतात
India Forum लवकरच आटपतो खाली उतरलेल्या वक्त्याला समजावल
जात ' बाबा रे हे लोक दर रविवारी इथे दगल करतात उगीच मार
खाण्यात काय अर्थ आहे ?' तेव्हा खरच ' हाइडपार्कच्या त्या विस्तीर्ण

हिरवळीवर याचवेळी खरं तर दोन-अडीचशे भारतीय हिंडताना दिसतात-पण या ठिकाणी येऊन उगीच आपली सध्याकाळ कोण खराब करून घेतो? खुद्द लंडनमध्ये दोन-तीनशे संघवाले सहज निघतील योजनापूर्वक इथे येतील तर हा धिंगाणा निश्चित थांबवू शकतील. पण ..जाऊ द्या !

हाइडपार्कचा हा कोपरा हुल्लडबाजीकरता नाही, हे पाकिस्तान्यांना कुणीतरी समजावून द्यायला हवं आहेच. पण मांजराच्या गळ्यात घंटा बांधायची कुणी !

❑

# काळोख पडल्यावर

पाहतापाहता सहा वाजतात भाषणांची आतषबाजी सपते तो कोपरा निर्मनुष्य होतो माणस इतरत्र पांगतात वीसपचवीस पावलावरच्या उपाहारगृहासमोर तोबा गर्दी उसळलेली असते माणसाच्या रागाच्या रांगा उभ्या दिसतात Pepsicola आइस्क्रीम्स्– शिकस्त म्हणजे hot dogs. खाण या विषयात, या इग्लिश लोकांना खरोखर फारस कळत नाही अगदी बेताचा तिखट चिवडा दिला तरी ' Very hot ' म्हणून ओरडत सुटतात खाऊन खातात काय, तर मांसाचे नुसते भाजलेले तुकडे– ' Fish and chips '– सँडविचेस– उकडलेले मटार किंवा वाल– आणखी असलच काही-तरी तरीही बेटे मजेत असतात हे विशेष

हाइडपार्कच्या त्या विस्तीर्ण हिरवळीवर आता जागोजाग माणसांचे गट मजेत बसलेले दिसतात मुल-मुली जोडीन हिंडत असतात– चालताना मजेत थांबून एकमेकांची बेभान चुबन घेत असतात भोवतीच्या माणसांची त्यांना दखलच नसते भोवतीची माणसही जणू काही घडलच नाही इतक्या निर्विकारपणे असली दृश्य पाहून न पाहिल्यासारख करतात असल काही करण्याच वय उलटलेले अनेकजण जागोजागच्या आरामखुर्च्यांमध्ये पडलेले असतात– कुणाच वाचन चालू असत, कुणी चित्र काढण्यात मग्न असतो मैदानाच्या एका बाजूला सगीत वाद्यकारांचा ताफा असतो ज्याना सगीत

आवडत, अशी शें-दोनशे माणस या वाद्यवृंदाभोवतीच्या खुर्चीवर तल्लीनपणे बसलेली दिसतात

आता उन्ह बरीच कलतात बहुतेक साऱ्यांचे पाय Serpentine च्या दिशेने वळतात या अफाट मैदानाच्या मधोमध वाहणारा हा सर्पाकृती विस्तीर्ण जलाशय दोहो बाजूना आरामखुर्च्यांतून विसावलेली माणस जलाशयाच्या पात्रात बदक आणि हसपक्षी कसे मजेत तरंगत असतात तऱ्हे-तऱ्हेच्या छोटया-छोटया होडयाही दिसतात हौशी तरुण आपल होडी वल्हवण्याच कसब पारखीत असतात उन्हाळयात काही महिने स्त्री-पुरुषाना पोहण्याचीही सोय एका विभागात आहे तलावाच्या अगदी काठाला लागून एक चागलस उपाहारगृह आणि मद्यपानगृह दोन्हीही माणसानी फुललेली दिसतात— जो जें वांछिल, तो तें लाहो ।'

एखाद भारतीय (की पाकिस्तानी ?) कुटुब लक्ष वेधून घेत सुट, नेकटाय्– बूट या standard पोशाखातला 'तो' आणि त्याच्या समोर बसलेली साडीतली सुकेशा पत्नी बाजूला सात-आठ वर्षांचा एखादा मुलगा नाहीतर मुलगी मुलगा बहुधा आइस्क्रीम खात असतो– ती दोघ Pepsicola नाहीतर कॉफी पीत असतात तिच्या नजरेत असत त्याच्या कर्तृत्वाबद्दलच सार कौतुक त्याच्या नजरेत असत समाधान असल सुखी कुटुबचित्र इथल्या गोऱ्यानाही पाहावंसं वाटत भोवती हिंडणारे व्हाउचर-वालेही 'साडी' नीट पाहून घेतात Mini-skirts चा मोह कितीही असला, तरी एखाद्या गोऱ्या पोरीचा हात हातात घेऊन बेभानपणे हसत खिदळत जायला ते काही नीग्रो तरुण नसतात

अधार आता खूपच वाढतो इतका वेळ हसत खिदळत चालणाऱ्या जोडप्यांनी त्या हिरवळीवरच कुठेतरी लोळण घेतलेली असते बसस्टॉपच्या दिशेने झपाझप चालत असताना जागोजागच्या झाडाझुडपांच्या आडोशाने, माणसाची वर्दळ थोडी कमी असेल अशा जागी आता ही प्रणयी युगुल दिसतात हाइडपार्कच्या हिरवळीला या साऱ्या दृश्यांची सवय आहे तिन आतापर्यंत बरच काही पाहिल आहे केवळ भाषणबाजी किंवा प्रणयच नव्हे– प्रचंड मैफलीसुद्धा

**सगीत वेड्यांची रात्र—**

जुलै महिन्याच्या पधरा तारखेला Rolling Stones नावाच्या Pop Group न या मैदानात विनामूल्य कार्यक्रम केला हजारो सगीतवेडे आदल्या रात्रीपासून मैदानात जमा झाले दीड लाखाच्या प्रचड जमावासमोर या ग्रुपचा हीरो ' Mick Jagger गायला गाण तरी कसल अजब माइक हातात धरून स्टेजवर नाचत होता— घुमत होता— तीच तीच ओळ पुन पुन्हा म्हणत होता अगात फक्त विजार— वर सगळा उघडा ! उकाडा होत होता ना मोहरमचे वाघ याहून फारसे वेगळे नाचत नाहीत आणि माइक-मध्ये तोंड घालून त्याला घुमताना पाहताना महालक्ष्मीच्या रात्री घागर फुकणाऱ्या ' झाडाची ' आठवण झाली मात्र इथे केवळ गायकच घुमत नव्हता समोरचा दीड लाखाचा श्रोतृवृंदही झिंगला होता मध्येच एखादी पोरगी उठून घुमू लागत होती— आसपासचे दोघे-तिघे तिची साथ करू लागत होते काहीजणी तर इतक्या बेभान झाल्या की, त्या सरळ स्टेजवरच चढल्या तिघा-चौघांकरवी उचलबागडी करून त्याना स्टेजखाली आणण्या-चीही ' सोय ' होतीच (तरी बर, एवढ्यावरच भागल गेल्या पधरवड्यात ' Isle of wight ' या ठिकाणी अमेरिकेत गाजलेल्या Bob Dylon नावाच्या Pop गायकानं असाच जाहीर कार्यक्रम केला ऑस्ट्रेलिया—स्वीडनपासून मुलामुलींचे थवे त्या बेटावर धावले एक-दोन रात्री उघड्यावरच थडी-वाऱ्यात झोपले असाच एक-दीड लाखाचा जमाव जमला प्रत्यक्ष कार्य-क्रमाच्या वेळी एक मुलगी इतकी बेभान झाली की तिन अगावरचे सारे कपडे काढून स्टेजवर नाचायला सुरुवात केली अखेर पोलिसाच्या मोटारी-तून तिची रवानगी करावी लागली )

मात्र नवसगीत शौकिनाचा जमाव कितीही मोठा असला, तरी एरवी तसा निरुपद्रवी हाइडपार्कच्या या कार्यक्रमाला (Stones in the Park) इतकी प्रचड गर्दी होऊनही मैदानाची नासधूस काही नाही कार्यक्रम सपल्या-वर कित्येकानी साफसफाईला हातभार लावला

बसमधून घरी परतताना हे सार उगाळल जात एका गोष्टीबाबत मात्र

साऱ्याच एकमत होत, ‘ एक संध्याकाळ कशी छान गेली ! ’ रात्री अंथरुणाला पाठ टेकली की पुन्हा सारं नजरेसमोर येत तो वाद्यवृंद– तो जलाशय– हातवारे करीत घसा खरडून भाषण करणारे ते भाषणवेडे ते पाकिस्तानी पोरग तर नजरेसमोरून हलतच नाही– The Great Mohommed created us...’

# लंडनचे हिप्पी

कुणाची कल्पनाही नसताना गेला पंधरवडा गाजवला तो लंडनच्या हिप्पींनी. Piccadilly Circus च्या नाक्यावरील Eros ' च्या पुतळ्या-भोवती ठाण मांडणाऱ्या या हिप्पीजची ही जात तसं पाहिलं तर अगदी निरुपद्रवी परीक्षेत नापास झाल्यामुळे निराश होऊन म्हणा, की औद्योगिक समाजव्यवस्थेत कराव्या लागणाऱ्या धावपळीला आणि स्पर्धेला कंटाळून म्हणा, या ना त्या कारणाने एकूण आयुष्याबाबत उदासीन बनलेली, नोकरी-धंदा न करता समाजापासून स्वतःची फारकत करून घेतलेली ही सन्यासी मंडळी ! वेष आणि एकूण अवतारही तसाच मळलेला पोषाख, वाढवलेले केस आणि दाढ्या– गळ्यात चित्रविचित्र माळा Eros च्या पुतळ्या भोवतीची या मंडळीची संख्या हळूहळू इतकी वाढली होती, की कौतुकाने Piccadilly Circus चा नाका पहायला येणाऱ्या tourist मंडळींना Eros चं दर्शन घेणंही मुष्किल झालं होतं तरीही इथले पोलिस आजपर्यंत कधी या मंडळीच्या वाटेला गेले नव्हते सकाळपासून संध्याकाळपर्यंतचा सारा वेळ इथे बसून काढणं हा काही गुन्हा नव्हता

उन्हाळा होता तोवर सारं ठीक होतं संध्याकाळ होईपर्यंत पिकॅडिलीच्या नाक्यावर असं बसायचं रात्र पडू लागली की तिथून जवळच असलेल्या Green park ची वाट धरायची (लंडनचे इतर सारे पार्क रात्री लोकांना बंद असले, तरी हा एक पार्क तेवढा प्रयोगादाखल रात्रभर खुला ठेवण्यास

गेल्या वर्षापासून सुरुवात झाली होती ) पार्कमधल्याच तीन-चार आराम-खुर्च्या घेऊन आडोसा निर्माण करायचा आणि दोघा दोघा, तिघा तिघांनी Sleeping bag मध्ये घुसून रात्र काढायची सकाळ झाली की पुन्हा चलो पिकॅडिली सर्कस पोटापाण्याची तशी अगदीच ददात नाही– आठवड्याला सात पौंडाचा बेकारभत्ता प्रत्येकाला मिळतो आहेच त्यातून पैसे कमी पडलेच, तर लंडनसारख्या महागड्या शहरातही काही गोष्टी अगदी फुकटात कशा मिळवायच्या याच व्यवहारी ज्ञान तस प्रत्येकाला आहेच या विषयावर बहुमोल ज्ञान प्राप्त करून देणारी ' Project London–Free नावाची एक पधरापानी पुस्तिकाच यांपैकी एका महाभागान प्रसिद्ध केली होती पुस्तिकेच्या सुरुवातीलाच टीप होती, ' Mainly concerned with Survival Tactics for the Urban Gorilla who has dropped out and is busy infiltrating the old Society ' पुस्तिकेत वेगवेगळ्या सूचना होत्या रात्र सुखात काढायची असेल तर Harrods Banking Hall ला चला जवळ जवळ आरामात बसता येण्याजोग्या पन्नास खुर्च्या तिथ आहेत एखाद्या क्लबमध्ये बसल्यासारख वाटेल एखादी Bon Voyage पार्टी चालू दिसली– खुशाल घुसाव शॅपेन–Lobster Salad– खाण्या-पिण्याची मजाच मजा होते केव्हातरी पैसे लागले, तर एखाद्या जागी कपबशा भांडी विसळण्याची नोकरी पकडावी, नोकरी मिळवताना पोषाख ठाकठीक असू द्या दुसऱ्या दिवशी घाणेरडे–मळके कपडे घालून कामावर जा– काम करत असताना मॅनेजरच्या लक्षात येईल अग खाजवीत राहा– जणू कपड्यात ढेकूण शिरला असावा अशा तऱ्हेने बहुधा त्याच दिवशी आठवड्याचा पगार आणि डिच्चू मिळेल एक दिवस काम– पगार मात्र आठवड्याचा, कटाळा आला तर करमणूक म्हणून चर्चमध्ये शिराव फुकट सगीत ऐकायला मिळत बाहेर पडताना दानाच्या पेटीत हात घालून पैसे घेता येतात का पाहाव खाटकाच्या दुकानात जाव आणि आपल्या कुत्र्याकरिता म्हणून काही हाड मिळवावीत भाजीपाल्याच्या दुकानातून कोबीचा पाला, गाजरं असं काही मिळवाव– सूप कस मस्त होत ! वेटरचा ड्रेस करून लडन विमानतळा-वरील हॉटेलच्या पिछाडीस गेल तर भरपेट खायला मिळतं

या मूल्यवान् पुस्तिकेच्या काही मोजक्याच प्रती अर्थात उपलब्ध होत्या

ज्याना आवश्यक, अशानाच त्या देण्यात येत असत पुस्तिकेच्या अखेरचा सदेश सर्वांत महत्त्वाचा त्यात म्हटलं होत under no circumstances, should you have paid for this hand book If you did, you got screwed (म्हणजे तुमचा अगदी ' मामा ' झाला )

थडीचा कडाका वाढू लागला तस Green Park च्या मैदानाहून अधिक चागला आडोसा शोधण भाग आलं अखेर १५ सप्टेंबरला अगदी पहाटे सुमारे २०० हिप्पी मडळींनी पिकॅडिलीच्या नाक्याजवळच्याच १४४ क्रमाकाच्या एका साठ खणी प्रचड इमारतीचा ताबा घेतला. इमारत तशी रिकामीच होती बाजूच्या तीन-चार इमारतींसह ही इमारतही पाडून तिथे नवीन इमारती व्हायच्या होत्या गृहहीन लोकांनी एखाद्या इमारतीत घुसून कबजा घेण्याचा हा प्रकार खर तर गेल्या काही महिन्यात दोन-तीनदा तरी झाला होता Shelter नावाच्या गृहहीनांना मदत करणाऱ्या एका खासगी सस्थेचा अहवालही याच सुमारास प्रसिद्ध झाला होता दमट घर आणि उपऱ्या, अडगळीच्या जागातून कशीबशी राहणारी कुटुबं जमेस धरली, तर ब्रिटनमध्ये १० लाख कुटुब गृहहीन आहेत अस या अहवालात म्हटल होत आणि गेल्या वीस-पचवीस वर्षांतील टोरी आणि मजूर सरकारच्या या बाबतीतल्या निष्क्रियतेवर कडाडून टीका केली होती ' १४४ पिकॅडिली या इमारतीचा ताबा घेणाऱ्या हिप्पी मडळीनीही नाव धारण केल होत ' London street commune, या मडळीच्या म्होरक्याच नावही अगदी समर्पक डॉ जॉन मोफत ' ( Da John moffat ) इमारतीचा ताबा घेऊन होताच या मडळीनी आपल निशाणही फडकावल लाल आणि काळ्या रगाच निशाण– त्यावर हिरव्या रगात C च्या आकाराच काहीतरी चिन्ह डॉ मोफत यान जाहीर केल– ' काय वाटेल ते झाल तरी आता आम्ही बाहेर पडणार नाही ही इमारत आता इतरही साऱ्या गृहहीनांना आसरा आहे '

त्या दिवशी रात्रीपर्यंत जवळ जवळ चारशे हिप्पीमडळी इमारतीत जमली ही इमारत ताब्यात असलेल्या इस्टेट एजन्सीन १७ तारखेला कोर्टात दिवाणी अर्ज केला आणि साऱ्या हिप्पींना हुसकण्याचा हुकूम आणला तोपर्यंत या इमारतीशेजारच्या १४३ क्रमांकाच्या इमारतीतही

काही मडळी घुसली होती कोर्टाचा हुकूम सुटताच इमारतीभोवती पोलिसांचा पहारा सुरू झाला विशेष म्हणजे हकालपट्टीचा हुकूम मिळाल्या-वरही या इस्टेट कपनीच्या प्रतिनिधीन पतप्रधान विल्सन् यांच्या कचेरीशी सपर्क साधला आणि हिप्पी मडळींना बाहेर हुसकण्याच काम माणुसकीची जाण ठेवून अगदी समजुतीन करण्यात याव अशी विनती केली पोलिसांची धाड येण हे अटळ आहे हे दिसताच आता हिप्पींनी प्रतिकाराची तयारी सुरू केली लोखडी सळया–काठ्या– मिळेल ते हत्यार ! पेट्रोल बॉम्ब् तयार करण्यात आले–' Molotov cocktails 'ची तयारी झाली सरक्षणाच्या कामाकरिता एक खास सेनाच स्थापण्यात आली– तिच नाव Hells Angels. इमारतीसमोर बघ्याची ही गर्दी जमली यातले सारे केवळ बघे नव्हते, हिप्पींचा सताप आलेली बरीचशी माणसं त्यात होती त्यांच म्हणण होत की गरजेपोटी काही गृहहीन कुटुबांनी इमारतीत घुसून बसण निराळ आणि कामधदा मिळत असूनही तो न करणाऱ्या ऐतखाऊ हिप्पींनी तस करण निराळ (B B C Radio च्या वार्ताहरानं एका हिप्पीची मुलाखत घेताना विचारल होत 'तुम्ही असे का वागता ?' 'जागा भाड्यान घ्यायला पुरेसे पैसे आमच्याजवळ नाहीत' उत्तर मिळाल वार्ताहरान विचारल, 'मग तुम्ही नोकरी करून पैसे का मिळवीत नाही ?' 'काय म्हणून ? मला काम करण बिलकूल आवडत नाही' (Why should I ? I don't like it तात्काळ उत्तर मिळाल )

या हिप्पी मनोवृत्तीचा तिटकारा असणारी एक नवीन सेना काही दिवसापूर्वीपासून इथे तयार झाली आहे तिच नाव Skinheads पधरा–सोळा वर्षांची कामगार थरातली ही मुलं. केस अगदी 'झिरो मशीनन कापायचे पायात आकारापेक्षा कितीतरी मोठे बूट घालायचे– बुटाना नाल मारलेले जाडच्याभरडचा फिट्ट बसणाऱ्या लांब विजारी (Jeans) वर गळाबद स्वेटर्स घालायचे आणि हाणामारीला कुठे 'चान्स्' मिळतो का हे पाहत हिंडायच राजकारणाबद्दल तिटकारा ! (टोरी– मजूर– लिबरल सारेच लेकाचे चोर ! ) यातला कुणी शाळेत गेला असेल, तर मास्तरला मारण्यापुरता मात्र सारी हाणामारी लाथाबुक्क्याची सुरामारी वगैरे नाही यातले काहीजण स्वत:ला Peanuts म्हणवून घेतात हिप्पी आणि त्यांचे

लांब केस पाहिले की याच पित्त खवळतं

शनिवार, २० तारखेच्या रात्री या Skinheads नी १४४ पिकॅडिली वर हल्ला करण्याचा बरेच वेळा प्रयत्न केला पोलीस नसते तर आतल्या हिप्पींची धडगत नव्हती एरवी क्षुद्र वाटणाऱ्या घटनेतून आता दगलीचा उद्रेक होण्याची शक्यता होती मजूर सरकारच्या Social Security च्या कल्पनेवर या निमित्ताने काहीजणांनी हल्ला चढवला काम करणाऱ्या लोकाकडून सरकारन तीस ते चाळीस टक्के income-tax वसूल करायचा आणि त्यातून या कामचुकार लोकांना पोसायच हा कुठला न्याय? या खात्याचे मंत्री श्री इनॉल्स यांनी तातडीने एक खास हुकूम काढला आणि '१४४ पिकॅडिली' हा पत्ता देणाऱ्या कुणालाही बेकार भत्ता मिळणार नाही, अशी व्यवस्था केली काही लोकसभा सदस्यांनी गृहसचिव कलाहन् यांना तारा केल्या एकान म्हटल, ' These Hippies are parasites on the face of London and should be purged away इमारतीतल्या हिप्पींची सख्या एव्हाना ८०० पर्यंत पोचली होती- ती १५०० पर्यंत पोचावी याकरता Hyde Park वर Pop सगीताचा खास कार्यक्रम चालू झाला होता पोलिसानी अर्थात् आणखी हिप्पी इमारतीत शिरणार नाहीत याची काळजी घेतली

अखेर २१ तारखेला अपेक्षित ते घडल पोलिसांनी हिप्पींचा गड काबीज केला इमारतीत प्रवेश करण्याकरिता फूटपाथपासून एका खिडकीपर्यंत एका फळीचा पूल तेवढा होता पोलीस येताच ही फळी काढून घेतली जात असे आतमध्ये ५०००० पर्यंत पेट्रोल बॉम्ब्सही तयार होते तरीही पोलिसांनी काही मिनिटात आपली कामगिरी पार पाडली दोन वरिष्ठ पोलीस अधिकारी प्रथम गेले आणि गोडीगुलाबी करून– आत कुणाला वैद्यकीय मदत हवी आहे का हे विचारण्याच्या मिषाने– त्यांनी प्रवेश मिळवला त्यातला एकजण लगेच त्या फळीवर आडवा झोपून राहिला शिटी वाजताच 'बदोबस्त' ड्यूटीच्या मिषाने आसपास असलेले अनेक पोलीस धावत आले आणि त्यानी इमारतीत प्रवेश मिळवला वरून सर्व तऱ्हेच्या वस्तूचा मारा होत होताच– पण पोलिसाच्या डोक्यावर शिरस्त्राण होती पाच-दहा मिनिटांत सारा खेळ खलास काही मुला-मुलींची अक्षरश उचलबांगडी!

पैकी २५ मुली १६ वर्षांखालच्या एक मुलगा तर बारा वर्षांचा

२२ तारखेला इथल्या साऱ्या वृत्तपत्रांची पहिली पान याच बातमीन आणि चित्रानी भरलेली माओत्से तुगच्या आजाराची बातमीसुद्धा एका कोपऱ्यात कुठेतरी छापलेली

हिप्पींची ही कहाणी खर तर इथेच संपायची पण नाही– १४४ क्रमाक-मधून हुसकले गेल्यावर पुढचे दोन दिवस या मंडळींनी एका रिकाम्या शाळेचा कबजा घेतला– पुन्हा तेच रामायण या निमित्तान एकूण समाज-व्यवस्थेबद्दलच वृत्तपत्रे आणि टेलिव्हिजन–रेडिओवर साधकबाधक चर्चा सुरू झाली डॉ जॉन् मोफतची B B C टेलिव्हिजनन खास मुलाखत घेतली सर्व गृहहीन कुटुबांना घर मिळावीत असा या चळवळीचा हेतू आहे का, असा प्रश्न विचारल्यावर मोफतसाहेब म्हणाले, ‘The family is the basic way in which, society conditions people into accepting the present way of life We are anti–family ’ डेव्हिड् फ्रॉस्ट यान आपला एक कार्यक्रम या हिप्पींबरोबर चर्चा करण्यात खर्चला प्रत्येक हिप्पीन सांगितल ‘काम करण ही काहीतरी खास गौरवाची बाब का मानली जाते, हे आम्हाला कळत नाही दुसऱ्या कुणाचे तरी खिसे भरण्यासाठी काम करण्यास भाग पाडणारी ही समाजव्यवस्थाच आम्हाला मान्य नाही ’ मात्र कुणीच कसलच काम केल नाही तर व्यवहाराचा गाडा कसा चालवायचा यावर समाधानकारक उत्तर कुणाला देता आल नाही दरम्यान हिप्पींनी एखाद्या इमारतीचा कबजा करायचा– पोलिसांनी तिथून हुसकायच– काही जणाना कोर्टात उभ करायच– हा प्रकार पुढचे दोन आठवडे सतत चालू होता

या हिप्पी रामायणाची सांगता एका चांगल्या तऱ्हेने होण्याची शक्यता आता अचानकपणे निर्माण झाली आहे डब्लिनपासून सुमारे वीस मैलावर असलेल एक छोटस ओसाड बेट या मंडळींना २०००० पौंडांत विकत देण्याची तयारी एका इस्टेट एजन्सीन दाखवली आहे ही योजना मान्य होऊन प्रत्येकी २० पौंड देणारे सुमारे १००० अनुयायी मिळवण्यात हिप्पी-मंडळी सध्या गर्क आहेत या ओसाड बेटाच हिप्पींच्या नंदनवनात रूपातर करण्याच्या या योजनेचा पहिला टप्पा ३० सप्टेंबरला पूर्णही झाला या

साऱ्या प्रकरणाची हकीगत कळताच उत्तर अमेरिकेहून लंडनला येऊन एका व्यक्तीने २००० पौंड रकमेचा पहिला हप्ता त्या दिवशी भरला हिप्पींकरता इतका त्याग करणाऱ्या या व्यक्तीचे नाव आहे स्वामी विष्णुदेवानंद ! भारतासारख्या दूर ठिकाणाहून इथे येऊन या पाश्चात्यांना अध्यात्म आणि परमार्थाचे धडे देऊन स्वतःही बरीच 'माया' जवळ केलेले 'स्वामी' आणि 'गुरू' इथे आता बऱ्याच संख्येने आहेत इतके की, 'India Guru' हा आता चित्रपट–नाटकांतून बरेच वेळा थट्टेचा विषय म्हणून वापरला जातो अमेरिकेहून आलेले हे स्वामी भारतातीलच आहेत की गौरवर्णीय आहेत, हे अद्याप कळलेले नाही सोयीकरता हिप्पीमंडळी 'स्वामी', एवढंच संबोधन वापरतात या ओसाड बेटाचा अध्यात्म चिंतनाकरता उपयोग व्हावा हीच स्वामींची इच्छा !

हिंदू संस्कृतीच्या अभिमान्यांना आनंद व्हावा अशी आणखीही एक गोष्ट याच आठवड्यात घडली Pop संगीताच्या तबकड्यांचे लोकप्रियतेनुसार लावण्याची इथे प्रथा आहे पहिल्या वीस क्रमांकातील गाण्यांचा 'Hit Parade' म्हणून विशेष बोलबाला होतो या hit parade मधील तेराव्या क्रमांकाचे स्थान आता चक्क एका भजनाने पटकावले आहे हरे रामा, हरे रामा–हरे हरे–रामा रामा हरे कृष्णा, हरे कृष्णा–हरे हरे–कृष्णा कृष्णा एवढेच गाण्याचे बोल International society for Krishna consciousness नावाची एक संस्थाच अमेरिकन तरुणांनी स्थापली असून तिच्या सदस्यांनी हे गाणं म्हटलं आहे खुद्द लंडनमध्ये या मंडळींनी राधा-कृष्णाचं एक मंदिर स्थापलं आहे जन्माष्टमीला लंडनमध्ये जी मिरवणूक निघाली, तिची हकीगत भारतातील वृत्तपत्रांमध्ये आलीच होती

'हिप् हिप् हुर्रे' ही गर्जना 'हिप्पी–हिप्पी–हरे–हरे' या घोषणेचा अपभ्रंश आहे किंवा काय हा आता संशोधनाचा विषय होऊ शकेल

## टॉयन्बी आणि महंमद

फेब्रुवारी महिना उजाडला श्री अर्नाल्ड टॉयन्बी यांच्या Statesman दैनिकातील लेखाचं निर्भत्र्सन करून कलकत्त्यात मुसलमानांनी उठवलेल्या दंगलीची बातमी एक फेब्रुवारीला सर्वत्र प्रसिद्ध झाली टॉयन्बी झाले तरी एक ब्रिटिश इतिहासकार ! भारत निधर्मी असल्याने महंमद, कुराण, अगर शरीयतबाबत काही प्रामाणिक मतप्रदर्शन तिथ होत असाव अशी त्याची कल्पना असणार तस पाहिल तर स्टेटस्मनमधील त्याचा हा लेख होता गांधीजीवर रक्तपात न होता भारत सोडण ब्रिटिशांना गांधीजीमुळेच शक्य झाल हे गांधीजीचे ब्रिटिशांवर उपकार आहेत अस, लेखाच्या सुरुवातीला म्हटल होत लेखात पुढे होत ' पहिल्या महायुद्धात ब्रिटन अडचणीत सापडला असता, अनेक भारतीय सैन्यात शिरून फ्रान्समध्ये ब्रिटिशांच्या बाजून लढले याचा परिणाम म्हणून १९१७ सालीच भारताला स्वायत्तता देण्याचा निर्णय ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी घेतला होता हा निर्णय प्रामाणिक होता कारण आपण मानवी स्वातंत्र्याकरता युरोपमध्ये लढत आहोत असा खुद्द ब्रिटनचा दावा होता तरीही यानंतर प्रत्यक्ष सत्तांतराबाबत जी चालढकल झाली तिचे भयानक दुष्परिणाम ब्रिटिशांना भोगावे लागले असते, गांधीजींनी वातावरणाला कलाटणी दिली नसती तर ! विज्ञान आणि तंत्र यांच्या प्रगतीच्या परिणामी अणुयुगातील मानवाच्या हाती अफाट संहारशक्ती येत

असता रक्तविहीन राजकारणाचा हा मार्ग कोट्यवधी लोकांना दाखवून गांधीजींनी मानवजातीवर मोठाच उपकार केला विज्ञान आणि तत्राच्या क्षेत्रात मानव सतत यश मिळवीत आहे, तर मनुष्यजातीच्या आपसातील सबधाबाबत सतत अपयशी झाला आहे परिणामी राजकारण हे एक चिखलाच डबक बनल आहे हा चिखल साफ करायला धैर्य तर हवच पण हे करू पाहणारा स्वत च या चिखलात माखून निघण्याची शक्यता असते शुद्ध आणि उदार वृत्तीची माणस मग या राजकारणाच्या चिखलापासून अलिप्त राहू पाहतात आणि हा चिखल साफ होण्याची आशा परिणामी अधिकच मदावते एक दुष्टवर्तुळ तयार होतं एखाद्या साधुपुरुषाच्या अध्यात्माचा कस त्याच्या राजकारणाकडे पाहण्याच्या दृष्टीवरून ठरवता येतो गांधीजीच वैशिष्ट्य हे की, राजकारण करूनही या चिखलाचा स्पर्श त्यानी स्वत स होऊ दिला नाही

**बगलीची प्रतिक्रिया**

बुद्ध आणि अशोक यानीही राजकारण केल पण या दोघाचा जन्मच राजघराण्यात झाला होता गाधीजी अशा राजघराण्यात जन्मल नव्हत येशू ख्रिस्त आणि महमदाप्रमाणेच त्यांचा जन्म सामान्य घराण्यात झाला या पार्श्वभूमीवर काय दिसत 'Jesus kept clear of politics He refused to embark on the political career- a militant one that was expected by the Jewish community of Jesu's day, of any jew who claimed or was claimed to be the Messiah On the other hand Muhammad gladly seized the opportunity of becoming a political leader, that was offered to him unexpectedly at a moment, when his career as a prophet seemed to be on the verge of failure Muhammad was successful politically and suffered spiritually from his political success (at least so it seems even to a sympathetic non-muslim student of Muhammad's life)

Like Muhammad, Gandhi went in to politics deliberately but unlike Muhammad, Mr Gandhi did not take this step-

under pressure of a crisis in his personal career By the time Gandhi went in to politics, he had already become a successful law practitioner and his motive for going in to politics was neither personal ambition nor the hope of retrieving a failure in one field of activity by entering another '

एका गोष्टीच खूप आश्चर्य वाटत इथे वृत्तपत्रानी दगलीची बातमी त्रोटकपणे प्रसिद्ध केली तरीही श्री टॉयन्बी याच्या लेखाचा सबधित भाग व्यवस्थित छापला खुद्द मुबई-पुण्याच्या दैनिकाना ते धैर्य झाल नाही केसरीकारानी यावर लिहिलेला निषेधाचा अग्रलेखही पाहिला लेखातील अगोदरच्या भागावर बरीच जागा खर्ची घालून, मूळ मुद्द्याच्या ठिकाणी सारवासारव करण्याच कसब कौतुकास्पद वाटलं 'गाधीजी हे अहिंसावादी असल्याने महमदाशी त्याची केलेली तुलना मुसलमानाना आवडली नाही' हे विधान तर तद्दन दिशाभूल करणार । खुद्द श्री टॉयन्बी यांनी या दंगलीनतर Times ला दिलल्या मुलाखतीत सागितल

'I am sad if it has caused violence but cannot change my views which were based on documental historical fact '

# माउंटबॅटन आणि सेसिल किंग

'Life and Times of Mount baton' ही दूरचित्रवाणीवर गेले तीन महिने चालू असलेली कथनमाला नुकतीच सपली आहे रशियन आणि ब्रिटिश राजघराण्यांशी असलेले सबंध आणि त्याना मिळालेली माऊंटबॅटन् पिता-पुत्राच्या कर्तृत्वाची जोड यामुळे या कथनमालेचं स्वरूप केवळ कौटुंबिक न राहता ऐतिहासिकदृष्टचा अतिशय महत्त्वाच्या घटनांचा पट त्या निमित्तान उलगडला गेला ही कथमाला सादर करणाऱ्यानी या [illegible] माउंटबॅटन यानी व्याख्यानबाजी हे स्वरूप न येता त्या त्या वेळच्या घटनाच जिवत चित्रण पाहायला मिळालं यात डिकी माउटबॅटन् यांनी ' ड्यूक ऑफ विंडसर ' (एका अमेरिकन सामान्य स्त्रीशी विवाह करण्याकरता ज्यांनी पुढे राज्यत्याग केला ते प्रिन्स् ऑफ वेल्स्) यांच्याबरोबर घालविलेल बालपण आल, त्याच्याबरोबर दिल्लीत असतानाच इग्लडहून येऊन डिकीना गाठणाऱ्या पॅमेलाबरोबर घालवलेले क्षण आले–विवाह आला, मधुचंद्र साजरा करीत असताना चार्ली चॅपलिन् या विनोदी नटान घेतलेला एक गमतीचा छोटासा चित्रपट आला, दुसऱ्या महायुद्धात नाविक अधिकारी असताना जर्मनीनं त्याच्या काफिल्यातील जहाज बुडवली तो प्रसंग आला, दोस्त सैन्याचे सर्वाधिकारी (Supreme Commander of the Allied Forces) असताना नॉर्मंडीच्या

किनाऱ्यावर उतरण्याकरता करावे लागलेले चाचणी प्रयत्न आले, ब्रह्मदेशातील आघाडीचे प्रमुख म्हणून भारतीय सैनिकाकरवी घडविलेली कामगिरी आली, भारताचे शेवटचे व्हॉइसरॉय आणि पहिले गव्हर्नर जनरल म्हणून केलेली कारकीर्द आली आणि फाळणीपाठोपाठ झालेल्या दंगलीची भीषण दृश्यही आली या निमित्तानं त्याना भारताबद्दल आणि नेहरूबद्दल वाटणारा जिव्हाळाही बोलका झाला रशियन क्रांतीनंतर त्यांच्या झार कुटुंबिय नातलगाची झालेली कत्तल आणि इतर अशाच अनेक घटनांचं विवेचन खुद्द माउटबॅटन् याच्या तोडून ऐकायला मिळाल त्याचे वडील ब्रिटिश नाविकदलाचे एक प्रमुख अधिकारी असल्याने डिकींचा नाविक-दलाशी लहानपणापासून भावनिक संबंध होता मात्र माउटबॅटन् याचे वडील जर्मन रक्ताचे पहिल महायुद्ध सुरू होताच इग्लडमध्ये जर्मनीविरुद्ध जी असंतोषाची लाट उसळली, तिचा त्रास त्यांच्या वडिलांनाही झाला बॅटनबर्ग हे जर्मन आडनाव बदलून त्यानी माउटबॅटन् हे इग्रजी आडनाव धारण केल तरी हा त्रास थांबला नाही अखेर निराश होऊन त्यांच्या वडिलांनी आपल्या अधिकारपदाचा राजीनामा दिला कथनमालेत ही गोष्ट सागताना डिकी बरेच भारावले

ही कथनमाला सपताच तिनं एक वादळ उठवल भारताला स्वातंत्र्य देण्याबाबत अॅटली यांनी जी घोषणा प्रथम केली, तीनुसार जून १९४८ ही भारत सोडण्याची मुदत त्यांनी जाहीर केली होती पुढे भारतात व्हॉइसरॉय म्हणून येताना माउटबॅटन् काही खास अधिकार घेऊन आले आणि स्वातंत्र्यप्रदानाची तारीख त्यानी १५ ऑगस्ट १९४७ इतकी अलीकडे खेचली पुढे फाळणीपाठोपाठ पजाब आणि बगाल या ठिकाणी भयानक दंगली होऊन काही लाख माणसं मारली गेली भारत सोडताना झालेली घिसाडघाई हे याच मुख्य कारण असल्याचं इथे अनेकजणांचं मत आहे साऱ्या हत्येची जबाबदारी पर्यायान माउटबॅटन् याच्यावर पडते ('Divide and Quit' या पुस्तकांत श्री पेंडेरल मून् यान या स्वरूपाची खूपच कडवट टीका केलेली आहे) कथनमालेत या दगलीचा बराच ओझरता उल्लेख करून माउटबॅटन् यानी या प्रश्नाला बगल देण्याचा प्रयत्न केला असा आरोप करणारी पत्रं त्याकाळी ब्रिटिश सैन्यात अगर इतरत्र अधिकारा-

वर असलेल्या काहीजणानी इथल्या D Telegraph या वृत्तपत्रातून लिहिली यावर खुलासा म्हणून थेम्स टेलिव्हिजन या संस्थेच्या ' Today ' या कार्यक्रमात एक मुलाखत देऊन माउटबॅटन् यानी आपल्या निर्णयाचं समर्थन केल भारताला स्वातंत्र्य दिल्याबद्दल चर्चिल त्यांच्यावर खूपच सतापले होते याबाबत माउटबॅटन् म्हणाले, ' Churchill had a weakness about India He went out there as a subaltrn, (कनिष्ट दर्जाचा अधिकारी ) he played polo and he read Rudyard Kipling. He had that atmosphere in his mind and he wanted the British to rule India forever The fact is that it would have required at least seven British divisions, Nationl Service for four years in perpetuity, 30000 leaders rearrested and put back into gaol '

माउटबॅटन् ब्रिटनला परतल्यावर राजा-राणीनं त्याना लगेच एक खाना दिला या प्रसगी चर्चिल हजर होते माउटबॅटन् त्यांच्या जवळ जाताच चर्चिल त्यांना म्हणाले, ' Stop Dickie stop ! What you did in India is as though you had struck me in the face with a riding whip, इतक म्हणून चर्चिल यांनी त्यांच्याकडे पाठ फिरवली हिंदु-मुसलमानाच्या दगलीकडे त्यांनी कथनमालेत सारवासारव केली या आरोपाला मिळालेल उत्तर पाहण्याजोग आहे ' Let us get this thing into a bit of perspective The best assessment of the number of casualties was 200,000 But in October 1947, India was in the grip of one of the periodical famines Two million people died I gave up 10 per cent of military shipping space for food and saved more people from death by famine than ever lost their lives in the riots ' ( ऑक्टोबर १९४७ मध्ये मध्ये बगालमधील दुष्काळात २० लाख माणसं मेली ही गोष्ट खरी का ? असल्यास किती भारतीयांना ठाऊक आहे ? )

**फाळणी पर्व**

भारताची फाळणी करण्याचा निर्णय आपल्यास मान्य नव्हता आणि

फाळणी टाळण्याचा आपण आपल्यापरीने खूप प्रयत्न केला, हे त्यांनी कथनमालेत अनेकवार सांगितलं साध्या बहुमताच्या जोरावर मुसलमानांना पाकिस्तान हवे असेल तर त्याच तत्त्वावर पंजाब आणि बंगाल यांचीही फाळणी केली पाहिजे असं त्यांनी जिनांना सांगताच जिना म्हणाले होते ' छे, छे ! पंजाब आणि बंगालचा अखंड विचार केला पाहिजे ' यावर माउंटबॅटन् उद्गारले ' खरं तर साऱ्या भारताचाच अखंड विचार केला पाहिजे ' अनेकवेळा याच स्वरूपाचं चर्वीकरण झालं पुन:पुन्हा जिना अखंड पंजाब–बंगाल यांचा आग्रह धरीत होते, पुन:पुन्हा माउंटबॅटन् त्यांना त्यांच्या आग्रहामागील विसंगती दाखवीत होते हा कथाभाग सांगत असतां त्यांनी जिनांचे जे आविर्भाव केले त्याने इथले पाकिस्तानी अस्वस्थ झाले यात नवल नाही हैदराबादबाबतच्या सैनिकी कारवाईला त्यांची फूस होती होती हा आरोप इथे ब्रिटिशांनी त्याचवेळी माउंटबॅटन् यांच्यावर केला होता काश्मीर महाराजांनी सामिलीकरणाच्या मसुद्यावर सही केल्यावरच आपण तिथे सैन्य धाडण्यास परवानगी दिली हा उल्लेखही पाकिस्तान्यांना अडचणीचा वाटला असणार पाकिस्तान्यांचं पित्त खवळावं अशा आणखी दोन घटना याच काळात घडल्या दि ९ मार्चच्या Sunday Telegraph मध्ये श्री हॅरॉल्ड् सीव्ह् या वार्ताहरानं पाकिस्तानला रशियाकडून मिळालेल्या T 55 रणगाड्यांबाबत एक वार्तापत्र पाठवलं काश्मीरच्या प्रश्नावर पुन्हा भारताची कुरापत न काढण्याचं आश्वासन आयूबखान यांनी दिल्यावरच रशियानंही मदत पाकिस्तानला दिली असं त्यात म्हटलं होतं वृत्तात पुढे म्हटलं होतं की हे आश्वासन कराराच्या रूपानं दिलेलं नव्हतं पण कोसिजिन्–आयूब आणि शास्त्री यांच्यामध्ये झालेल्या गुप्त स्वरूपाच्या ६४ पानी पत्रव्यवहारात नमूद झालं होतं श्री सीव्ह् यांचा हा लेख प्रसिद्ध होताच, अशा तऱ्हेचा कोणताही गुप्त करार झालेला नाही असं म्हणून पाकिस्तान्यांनी या वृत्ताचा निषेध केला मात्र पाकिस्तान्यांचा खरा तिळपापड झाला तो श्री सेसिल् किंग याच्या Sunday Times मधील लेखातील महमद अली जिना यांच्याबाबतच्या उद्गारांनी !

**परखड निवेदन**

सेसिल् किंग ! ' International publishing House ' या अवाढव्य

प्रकाशन संस्थेचे माजी प्रमुख १९२२ साली ' Daily Mail ' या दैनिका- तून आणि पुढे १९२६ साली ' Daily Mirror ' या दैनिक वृत्तपत्रातून यानी आपल्या वृत्तपत्रीय कारकीर्दीला सुरुवात केली १९५१ मध्ये ते या पत्राचे प्रमुख सचालक (Director) बनले १९५० सालच्या सार्वत्रिक निवडणुकीत मजूरपक्षान हुजूरपक्षावर जो अल्पविजय मिळविला त्याच श्रेय Daily Mirror न मजूरपक्षाला दिलेल्या भरघोस पाठिंब्याला दिल गेलं. मात्र ॲटली याच्या अगी नेतृत्वाला साजेसे गुण नसल्याने १९५१, ५५आणि ५९ सालच्या पुढील निवडणुकांतून टोरी पक्षच सत्तारूढ होत गेला या सर्व काळात Daily Mirror न मजूरपक्षाचीच पाठराखण केली होती १९६४ साली विल्सन् यांच्या नेतृत्वाखाली सध्याच मजूर सरकार अधिकारावर आल्यावर श्री किंग यांची ' Bank of England ' या सरकारी बँकेच्या सचालक मडळावर नेमणूक झाली तीन वर्षांनी ' National Coal Board' या राष्ट्रीकृत उद्योगाच्या सचालक मडळावर त्यांची नेमणूक झाली. गेल्या वर्षी सरकारवर त्यानी केलेल्या टीकेमुळे त्यांना हे पद सोडाव लागलं पंचेचाळीस वर्षांच्या या कर्तृत्ववान् आयुष्यातील विविध अनुभव आणि आठवणी ' Candid Memoris of Cecil king ' या नावान आता प्रसिद्ध होत आहेत या पुस्तकातील काही भाग ' Sunday Times ' मध्ये एका लेखमालेच्या रूपाने फेब्रु-मार्च या महिन्यांत प्रसिद्ध झाला आणि त्यानं इथं खुपच खळबळ उडवून दिली.

श्री किंग यांना भेटलेल्या अनेक व्यक्तीबाबतची, त्याना वाटली ती मत, कुणाचीही मुर्वत न ठेवता या पुस्तकात त्यांनी प्रकट केली आहेत. यातून खुद्द त्यांचे स्वत चे आई-वडील आणि नातलग ही सुटले नाहीत, पण चर्चिल, गॅटस्केल, घानाचे नक्रूमा, गांधी, नेहरू, जिना, केनेडी, जॉन्सन निक्सन्, इ साऱ्यांचीच वर्णी लागली चर्चिल यानी Daily Mirror मधून पूर्वी काही लेखन केलं असल तरी पुढे तीन वेळा त्यानी या पत्रावर फिर्यादी ठोकल्या होत्या त्याच्याबाबत मत व्यक्त करताना श्री किंग यांनी लिहिल, ' मला भेटलेल्या इतर कुणालाही व्यक्तीपेक्षा चर्चिल अधिक स्वयकेंद्रित होते आपल्या सबधात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीन आपली वारेमाप स्तुती

करावी असं त्याना वाटे मूलत त्यांची प्रवृत्ती साहसी होती राजकारण हा एक रोमांचकारी व्यवसाय म्हणून त्यांनी पत्करला एरवी देशसेवा हा त्यांच्या उपरोधाचा विषय होता '

अँथनी ईडन पंतप्रधान असताना इजिप्तचे नासेर यानी सुवेझ कालव्याच राष्ट्रीयीकरण केल ब्रिटनन लगोलग सुवेझवर छत्रीधारी सैनिक उतरवले ब्रिटनच्या या कृत्याचा जगभर निषेध झाला आणि ब्रिटनला हे आक्रमण मागे घ्याव लागल श्री किंग यांच्या लेखानुसार या साहसी योजनेची बातमी त्यावेळचे विरोधी पक्षनेते गॅटस्केल यांना अधुकशी कळूनही त्याचा तीवर विश्वास बसला नाही (' Hugh Gaitskell was convinced the Government was bluffing and that it was his duty to help them bluff ') किंग याच्या लिखाणातील काही निवडक भाग पुढीलप्रमाणे (1) Nkrumah was very insistent on being called Dr. Nkrumah though the doctorate was only honorary and from a third-rate American University (2) For anyone to want the Presidency as much as John Kennedy did, is a sign of immaturity (3) I had a long talk with Jhonson, he is a big man but not a great man

**गांधींची भेट**

१९४७ साली सेसिल् किंग भारतात आले त्यांची गांधीजींशी भेट झाली याबाबत ते लिहितात, ' To me, Gandhi was a very unimpressive man to meet, small, ugly and insignificant On record he must be one of the half-dozen greatest men of my life-time He sat on a wooden shelf with a secreatary on each side of him It intrigued me that everything he said was taken down by his secretaries but nothing I said '

पंडित नेहरू आणि इंदिरा गांधी याच्याबरोबर त्यानी भोजन घेतल चर्चा केली पुस्तकात ते लिहितात, ' नेहरू कुटुंबाच्या हाती सत्ता येण्याच कारण त्याच कर्तृत्व नव्हत पटेल याच्या निधनान गांधींचा वारसा नेहरूंना

मिळाला इतकंच नेहरू हे वक्ते समजले जात– खर तर त्यांच्या भाषणात पाल्हाळच असे '

**सताप करणारे विधान**

श्री. किंग याच्या या विविध शेऱ्यावर आक्षेप घेणारी पत्र त्याच्या आप्तातील लोक, श्रीमती गॅटस्केल इ नी Sunday Times ला पाठवली. नेहरूंबाबत त्याचा उल्लेख चुकीचा होता, पटेल याच्या हयातीतच नेहरूच नेतृत्व सर्वमान्य झालं होत, या आशयाच एक पत्रही प्रसिद्ध झालं पण खरा गहजब झाला तो त्याच्या जिनांबाबतच्या लिखाणात. श्री. किंग यानी लिहिल होतं 'I also spent a morning with Mohammed Ali Jinnah to hear about his plans for Pakistan At that time it seemed unthinkable that India would be divided I thought him a most unatractive man, obviously homosexual (and I don't like homosexuals) and one of immense personal ambition He was not interested in the welfare of his Moslem Brethren He was interested in Jinnah He could not rule India so he would settle for Pakistan and would wade through blood to get what he wanted '

२ मार्चच्या अकात हे लिखाण प्रसिद्ध होताच तीन-चारशे पाकिस्तान्यांनी Sunday Times च्या कचेरीवर मोर्चा नेला. या लेखातील मत किंग यांची व्यक्तिगत मत असून ही प्रकट करून श्री. किंग यानी वृत्तपत्रीय स्वातन्त्र्याचा हक्क बजावला असा खुलासा सपादकानी केला मात्र प्रथम श्री टॉयन्बी यांचा महमदावरील लेख, माऊटबॅटन यांची भारताच्या बाजूने झुकलेली कथनमाला आणि Sunday Telegraph मधील ताश्कदबाबत गुप्त कराराचा उल्लेख, यानी आधीच दुखावलेल पाकिस्तानी लोकमत एवढ्यान शांत होणार नव्हत ४ मार्च रोजी इस्लामाबाद येथील पाकिस्तानी परराष्ट्र कचेरीन ब्रिटिश डेप्युटी हाय. कमिशनर श्री ट्विस्ट याना कचेरीत बोलावून याबाबत एक निषेध खलिता त्याच्या हाती दिला (Mr Twist had been informed of a 'nationwide reesentmnt and the Government's deep regret caused by the

malicious attack on the revered leader and founder of a common– wealth country ' या पाठोपाठ दुसऱ्या दिवशी पाकिस्तानी वृत्तपत्रानी टीकेची झोड उठवली `Dawn' नं या लेखाच वर्णन ' debasement of journalism ' या शब्दात केल आणि याबाबत बिनशर्त माफी न मागितली गेल्यास पाकिस्तान आणि ब्रिटनमधील सबध बिघडतील अशी पुस्ती जोडली ' Pakistan Times ' नं माउटबॅटन याचा उल्लेख करून लिहिल, ' Britain is not friendly to this country and is only too willing and ready to give air to any anti-Pakistan canard '

पाकिस्तानात नुकत्याच झालेल्या दंगलीत मुस्लीम लीगच्या उरल्या-सुरल्या नेत्याचा जनतेन निकाल लावला असला तरी भारतातील अल्प-सख्याकांत हा पक्ष खूपच लोकप्रिय आहे. आपल्या नेत्यांबद्दल व्यक्त झालेल्या या मताचा भारतातील लीगवाल्यानी अद्याप निषेध कसा केला नाही याचं आश्चर्य वाटत

□

## वृद्ध आणि तरुण

एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यातील घटना डॉ केनेथ विकेरी नावाच्या डॉक्टरने ' Royal society of Health या संस्थेच्या सदस्यासमोर आपला एक प्रबंध वाचला. विज्ञानाची प्रगती आणि वृद्धावस्था वेतनाची सोय, यांमुळे ब्रिटनच्या लोकसंख्येतील वृद्ध माणसांची संख्या आणि प्रमाण सतत वाढत आहे १९६१ साली ब्रिटनमध्ये ६५ वर्षे वयावरील ६० लाख माणस होती–१९७५ सालापर्यंत ही संख्या ८० लाख इतकी होईल १९६७ साली पुरुष आणि स्त्री यांच्या अपेक्षित आयुर्मर्यादा (Life expectancy at birth) ६७ आणि ७२ अशा होत्या या वृद्धात दोन तृतीयांश स्त्रिया आहेत मोठमोठ्या घरांतून ९०–९५ वर्षांची एखादी व्यक्ती सारे व्यवहार कसेबसे पण एकट्यानच करते हातपाय थरथरत आहेत अशा अवस्थेतील गलितगात्र स्त्री अगर पुरुष, चहा करण्यापासून तो बागेला पाणी घालण्यापर्यंत सारे व्यवहार करून, घड्याळाच्या टिकटिक आवाजाच्या सोबतीन तास न् तास कुठेतरी नजर लावून घालवताना, टेलिव्हिजनवरील कार्यक्रमातून पाहिले की मनाला कुठेतरी तडा जातो विसाव्या शतकातील औद्योगिक प्रगतीन इथल्या कुटुंबसंस्थेचाच बळी घेतला आहे वयाच्या पधरा-सोळाव्या वर्षी मुलगे–मुली पाखरांप्रमाणे कुठेतरी दूर जातात–नोकरी करू लागतात–एखादी खोली घेऊन वेगळे राहू लागतात– त्याचं

सार जगच निराळ होत आईवडिलाशी सबध ठेवायचा मुख्यत्वे टेलिफोन-वरील सभाषणाद्वारे प्रत्यक्ष भेट केव्हातरी षठी– सहामासी ! ८०–९० च्या वर्षापर्यंत हे बधही जवळजवळ तुटलेले असतात– मग शिल्लक उरत भकास, एकलकोंड जिण ! काही आजाराच निमित्त होऊन यापैकी एखाद्याला हॉस्पिटलमध्ये जागा मिळाली की तो सुदैवी ठरतो मृत्युपर्यंत बहुधा ही माणस मग हॉस्पिटलमध्येच राहतात रोगापासून बचाव करण्याची अतर्गत प्रतिकारशक्ती खर तर सपत आलेली असते पण वैद्यकीय ज्ञानाची प्रगती आता खूपच झाली असल्याकारणाने अशा वृद्ध रोग्यानाही वाचविण्याकरता हॉस्पिटलमधील डॉक्टर प्रयत्नाची पराकाष्ठा करू पाहतात. प्राणवायू, कृत्रिम उपायानी अन्न घालणे, इजेक्शन्स इ तऱ्हेतऱ्हेच्या उपायाचा मारा केला जातो या साऱ्याचा परिणाम इतकाच की, जो मनुष्य एरवी सरळ सुखाने चटकन मरायचा तो त्याऐवजी शरीराचे अनेक हाल होऊन, केवळ धुग धुगी आहे अशा अवस्थेत आणखी काही दिवस काढून मरतो

**त्याना सुखाने मरू द्यावे**

डॉ विकेरी यानी आपल्या भाषणात वृद्ध माणसांबाबतची ही परिस्थिती स्पष्ट केली आणि काही विशिष्ट वयोमर्यादेवरील वृद्धाना फारसे औषधोपचार न करता सुखान मरू देण्याची आवश्यकता प्रतिपादन केली अस करण्यान त्या वृद्धाचे मृत्यूपूर्वीचे हाल तर वाचतीलच, पण इतर अधिक यश मिळण्याची शक्यता असलेल्या, त्या मानाने तरुण रुग्णांकडे अधिक लक्ष पुरविता येईल असही सांगितल हे सार प्रतिपादन माणुसकीच्या दृष्टि-कोनातूनच खर तर झाल होत पण काहीतरी सनसनाटी वृत्ताकरता टपून बसलेली वृत्तपत्र आणि त्याचे वार्ताहर अशी सधी थोडीच गमावणार ! एक-दोन तासाच्या अवधीत सायदैनिकातून बातमी झळकली 'Let old people die' says Doctor आपल्या भाषणात डॉ. विकेरी यानी बायबलातील एक उल्लेख केला होता (The Bible clearly indicates that those who survive to four Score Years may pay dearly for their extra time in suffering and sorrow) त्याचा आधार घेऊन ८० वर्षांवरील सर्व लोकांना मारून टाकाव अस डॉक्टर विकेरी म्हणाले, असा आभास सर्व वृत्तपत्रातील

बातम्यांनी निर्माण झाला असाध्य रोगान तडफडणाऱ्या रोग्यांचा औषधा-योगे अत करण्याची मुभा डॉक्टरांना असावी (याला वैद्यकीय परिभाषेत euthanasia असा शब्द आहे) की नाही याबाबत थोड्याच दिवसापूर्वी इथे लोकसभेत चर्चा झाली होती तेव्हा ८० वर्षावरील माणसांबाबत euthanasia चा हे डॉक्टर मजकूर पुरस्कार करीत आहेत असं सर्वांना वाटल ज्या East bourne विभागात हे डॉक्टर काम करतात, तिथल्या वृद्ध नागरिकात खूपच खळबळ उडाली आपण नेमक काय बोललो आणि त्याचा विपर्यास कसा झाला आहे हे समजावताना या डॉक्टरच्या नाकीनऊ आले डॉक्टराच मूळ विधान अस होत की योजनाबद्ध रीतीने एखादी वयोमर्यादा ठरविण्यात आली नाही तर ब्रिटनमध्ये ' Permissive society, (बंधनमुक्त समाज! )थोड्याचदिवसात euthanasiaचा पुरस्कार करण्याची वेळ आणील डॉक्टर विकेरीच नशीब थोर, थोड्याच दिवसात New Castle–upon--Tyne विश्वविद्यालयाचे उपकुलगुरू आणि एक प्रख्यात डॉक्टर असलेल्या मिलर नावाच्या गृहस्थानी विकेरींना पाठिंबा दिला आणि आपण स्वत· काही रोग्याच्या बाबतीत अस केल्याच जाहीर केल या साऱ्या प्रकरणी मुख्य मुद्दा वयाचा नसून रोगाच्या असाध्य अवस्थेचा आहे, असा खुलासा डॉ विकेरी यांनीही केल्यावर हे वादळ शमल

**नवा लेनन्‌वाद !**

इथल्या वृत्तपत्रातील काही बातम्या पाहिल्या की permissive society हा काय प्रकार आहे याचा थोडा उलगडा होतो चित्रपट–नाटकातून तर नग्नता ही आता नेहमीची गोष्ट आहे ' Hair ' हे अमेरिकन कपनीच एक ' नव-नाटक ' गेले काही महिने इथे चालू आहे या नाटकाचा प्रारभ होतो तोच मुळी सपूर्ण नग्नावस्थेतील अनेक स्त्री-पुरुषाच्या एका ' साधिक ' दृश्यान ! Vultures नावाच्या एका अमेरिकन नृत्यनाट्याचा पहिला प्रयोग ६ मे या दिवशी एका चर्चच्या हॉलमध्ये (भाड्यान घेतलेल्या) झाला अर्ध्या तासाच्या या नृत्यनाट्याचा निम्म्याहून अधिक वेळ यातील नायक आणि नायिका नग्न अवस्थेत असतात– अखेर रगभूमीवरच याना एकमेकांच्या बाहुपाशात दाखवून सभोगही सूचित करण्यात येतो जॉन लेनन हा ब्रिटनच्या गाजलेल्या बीटल्सपैकी एक गायक Pop ' सगीताच्या

(Popular च संक्षिप्त स्वरूप) तबकड्या विकून या गायक चौकडीने अफाट पैसा कमावला आता तर घरोघर, गल्लीबोळातून Pop groups तयार झाले आहेत रेडिओवर एका ध्वनिलहरीवर चोवीस तास संगीताचा धुमाकूळ चालू असतो विसाव्या शतकाशी काहीतरी बिनसलेले हे बीटल्स थोडे दिवस महर्षी महेश योगी यांच्या सान्निध्यात योगसाधनेचा प्रयत्नही करून आले एखाद्या हिप्पीच्या वेशात वावरणाऱ्या या लक्षाधीश जॉन लेननने, योको ओनो नावाच्या जपानी गायिकेशी आता विवाह केला आहे या विवाहापूर्वी थोडे दिवस अगोदर, या दोघानी गायिलेली एक रेकॉर्ड बाजारात आली तिच्या आवरणावर या दोघाचा संपूर्ण नग्नावस्थेतील फोटो होता या आवरणासह ही ध्वनिमुद्रिका विकण्याच इथल्या विक्रेत्यानीही नाकारल–तेव्हा ही विक्री थोडे दिवस स्थगित झाली विवाह होताच या जोडप्यान आपला मधुचंद्रही एका नवीन तऱ्हेने साजरा केला व्हिएन्ना शहरातील एका हॉटेलमध्ये या दोघांनी एक खोली घेतली आणि पुढचा एक आठवडा तिथल्या बिछान्यावर झोपून घालवला या सर्व काळात अंगावर एक पाढरी चादर घेऊन हे दोघे ' bed peace ' घेत होते हॉटेलच्या भितींवर ' Total Communication, ' ' Stay in bed ' Grow your hair ' इत्यादी बोधवचन लावलेली होती तरीही तिथे जाऊन टेलिव्हिजन आणि वृत्तपत्र वार्ताहरानी त्याची मुलाखत घेतलीच हा सारा प्रकार जागतिक शाततेकरता चालू असल्याच या वार्ताहर परिषदेत लेनन यानी सांगितल जगातील सर्व पुरुष आणि स्त्रिया जर आठ दिवस सतत बिछान्यातच घालवतील तर जागतिक शांततेच स्वप्न साकार व्हायला उशीर तो किती लागणार, असा मुद्दा त्यांन माडला यानंतर थोड्या दिवसांनी लेनन यांना आणखी एक साक्षात्कार झाला–स्वत च जॉन विन्स्टन् लेनन् हे नाव बदलून त्याऐवजी जॉन् योको लेनन् नांव त्यानं धारण केल्याच जाहीर केल विवाहानतर स्त्रीन वडिलांच्या नावाच्या जागी नवऱ्याच नाव लावायच, मग नवऱ्यानही आपल्या वडिलांच्या नावाच्या जागी बायकोच नाव का लावू नये ? मार्क्स-लेनिन्वादापेक्षाही या लेनन्वादाच भवितव्य अधिक उज्ज्वल आहेस मला वाटत.

□

# भारतीय इस्लामचे प्रश्नचिन्ह

प्रा विल्फ्रेड स्मिथ ( Wilfred Cantwell Smith ) यानी १९५७ साली प्रसिद्ध केलेल्या ' Islam in Modern History ' या पुस्तकातील ' India Islamic Involvement ' या प्रकरणाचा हा परिचय

स्मिथ यानी पूर्वायुष्यात लाहोरला इस्लामी आणि भारतीय इतिहासाचे अध्यापक म्हणून काही वर्ष काम केलं भारतातील मुस्लिम बहुसख्येचे सर्व विभाग अतिपूर्वेकडील काही प्रदेश आणि जगातील सर्व प्रमुख मुस्लिम प्रदेशाचा त्यांनी प्रवास केला आहे सुमारे दहा वर्षांचा अभ्यास आणि चिंतन झाल्यावर त्यांनी हे पुस्तक लिहिल गेली पाच वर्षं Montreal येथील McGill University मध्ये Professor of Comparative Religion and Director of the Institute of Islamic Studies म्हणून ते काम करीत आहेत

भारतीय मुसलमानांसमोरील प्रश्नाच स्वरूप गेल्या तेरा वर्षांत फारस बदललेल नाही राजकीय सत्तास्पर्धेच्या खेळात जनसघावर मात करण्याच्या चिंतेने ग्रस्त असलेल्या राज्यकर्त्यांकडून, या विषयावर कोणताही महत्त्वाच मार्गदर्शन घडण्याची शक्यता नाही या सत्तास्पर्धेच्या खेळात ज्याला कसला रस नाही अशा एका विदेशी अभ्यासूचे या विषयावरचे विचार म्हणूनच महत्त्वाचे[1] परिचय करून देत असताना लेखकाच्या निवेदनाचा आशय जशाच्या तसा ठेवण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न म्हणूनच मी केला आहे

मुस्लिमाच भारतीयीकरण करण्याच्या घोषणेन आपल्याकडील काही विद्वान खूपच अस्वस्थ झाले कुणी सांगाव, हा लेख वाचल्यावर त्यातल्या काहीजणाना ती कल्पना कमी प्रक्षोभक वाटू लागेल

१५ ऑगस्ट १९४७ ला भारताच्या फाळणीबरोबरच भारतीय उपखंडातल्या मुसलमानांचीही फाळणी झाली.

हे सत्य ध्यानी येताच त्या समाजाला मोठा धक्का बसला सर्व मुस्लिम समाज हा एक अविभाज्य घटक आहे या भूमिकेतून भारतातल्या मुस्लिमानी पाकिस्तानला जन्म दिला 'भारतातील सर्व मुसलमान हे एक राष्ट्र आहेत' या मुस्लिम लीगच्या सिद्धाताचाच 'पाकिस्तान' हा उपसिद्धात होता 'आपण सारे एक राष्ट्र आहोत' अशी स्वतःची समजूत करून घेण्यात मुसलमान निश्चितच यशस्वी झाले पण मुस्लिम लीगच्या धोरणाच्या यशातूनच अशी परिस्थिती निर्माण झाली की मुसलमान ही दोन राष्ट्रे ठरली ( काही मुस्लिम याहीपुढ जाऊन म्हणतील की आम्ही आता तीन राष्ट्रे आहोत भारतीय मुस्लिमाच एक आणि पाकिस्तानी मुस्लिमांची दोन ! )

एक सीमारेषा मध्ये निर्माण झाली एवढ्याचकरता फाळणीपूर्व भारतातील मुस्लिमाची फाळणी झाली असं नव्हे– त्याहून बऱ्याच खोल अर्थाने फाळणीपूर्व भारतातील मुसलमान आता दोन राष्ट्रे आहेत यापैकी एकाला आपल्या हिताच्या वाटणाऱ्या गोष्टीमुळ दुसऱ्याचा सर्वनाश ओढवू शकेल त्याचे भौतिक हितसबध, अती एकमेकाना पूरक असले तरीही– तेच नाहीत–एकमेकांहून खूपच भिन्न आहेत त्याच्या आध्यात्मिक गरजा आणि चिताविषयही वेगळे झाले आहेत त्याची ऐतिहासिक जडणघडण एकमेकाच्या विरुद्ध उभे ठाकण्याइतकी भिन्न असेल त्याच्या इस्लामविषयक मनात आणि वागणुकीतही खूप फरक पडल या दोन गटाची भवितव्यता इतकी स्वतत्र असेल की यापुढे भारतातील मुसलमान आणि पाकिस्तानी मुसलमान हे दोन स्वयप्रेरित आणि स्वतःपुरतेच जबाबदार असे दोन स्वतत्र गट मानूनच त्यांचा विचार करावा लागेल

१९४१ साली त्या वेळच्या अखड भारतात ९॥ कोटी मुसलमान होते १९५१ साली ही सख्या १०॥ कोटी झाली पैकी सुमारे ५७ टक्के मुसलमान पाकिस्तानी राज्यात राहिले आणखी सुमारे ६ टक्के मुस्लिम स्थलांतर करून पाकिस्तानात गेले सुमारे अर्धा टक्का फाळणीकाळच्या

दगलीत मारले गेले ( सुमारे ५ लाख ) काश्मीर राज्यात ३। टक्के मुस्लिम होते त्याचं भावतव्य अद्याप निश्चित नाही उरलेले ३॥ कोटी मुसलमान भारताचे नागरिक म्हणून उरले काश्मीरमधील मुसलमानांचा ( ४० लाख ) या भारतीय मुसलमानाबरोबरच विचार करावयाचा की नाही हे आज सागता येत नसल, तरीही पूर्वीच म्हटल्याप्रमाणे या भारतीय मुस्लिमाचा एक स्वतत्र घटक म्हणूनच आता विचार करावयाचा आहे

या नवीन गटाकडे अधिक आणि उणे अशा दोन्ही बाजू आहेत या समाजातल्या कित्येक घटकाना ' आपल्याजवळ काय नाही ' याची 'आपल्या जवळ काय आहे ' यापेक्षा अधिक तीव्र जाणीव आहे. काहीजणाचा या बाबतीतला नकारात्मक दृष्टिकोन इतका पराकोटीचा आहे की ' फाळणी झाल्यानतरही पाकिस्तानात न गेल्यामुळे जे मागे उरले ते ! ' अशी स्वत ची व्याख्या ते देतील ' आपल्या घराबाहेर कोंडले गेलेले पाकिस्तानी ' ही त्याची त्याच्या समाजाबद्दलची समजूत आणि भावना राहिलेली आहे पाकिस्तानपासून अलग पडलेल्या या मुस्लिमाच्या अस्तित्वाला काही स्वतत्र अर्थ प्राप्त व्हायचा असेल, तर त्याच्याजवळील अधिक बाजूवर जास्त भर दिला गेला पाहिजे

**इस्लामचा महत्त्वाचा घटक**

आमच तर म्हणण अस की भारतीय मुस्लिम जगतातला एक प्रचड, अतिशय महत्त्वाचा आणि प्राय सर्वाधिक कल्पकशक्ती असलेला गट ठरू शकेल हा गट काय करतो आणि काय बनतो हा समकालीन इस्लामच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचा भाग ठरावा दुर्दैवाने त्याच्या अगर इतर अनेक बाह्य मुस्लिमाच्या ही गोष्ट ध्यानात आलेली नाही

हे महत्त्व केवळ आर्थिक किंवा सास्कृतिक बाबीपुरत नाही धर्म या गोष्टीचाही त्यात अतर्भाव होतो-- स्वत च्या नकळतच पण हा गट नवीन साहसी वाटचाल करतो आहे-- एक नवीन जीवन निर्मिण्याची आणि जगण्याची ' भारतीय मस्लिमाच्या मनात इस्लाम ' जो काही आकार

येईल तो त्यांचा स्वत:चा 'इस्लाम' असेल पाकिस्तानातील मुसलमान-निर्मित असलेल्या 'इस्लाम'हून या भारतीय इस्लामच स्वरूप निश्चितच भिन्न असेल– असायला हव परिस्थिती तर अशी आहे की हा भारतीय इस्लाम अधिक पुरोगामी– अधिक अतंर्मुख–अधिक प्रगल्भ–अधिक सहिष्णू असेल–सत्याच्या अधिक जवळ असेल

हे अस वाटण्याला सर्वात प्रबळ अशी तीन कारण दाखवता येतील या गटाची सख्या, त्यांची पूर्वपरंपरा आणि चहुबाजूने गुरफटून टाकणार भारतातील वातावरण एक गोष्ट नमूद केली पाहिजे ती ही की यापैकी तिसरं कारण-- अल्पसख्याक हा दर्जा–पूरक नसून बाधक आहे अस अनेकजणाना विशेषत मुस्लिमातल्या अनेकाना वाटत

या समाजाला स्वत ची ओळख पटण्याच्या मार्गातली सर्वात मोठी अडचण म्हणजे पाकिस्तानबरोबर त्याचे असलेले भावनिक सबध आणि त्यापासून तोडले गेल्याची सततची वेदना दुसरी अडचण या समाजाची हिंदूविषयक भावना आणि त्या हिंदूकडून दडपले जाण्याची त्याना वाटणारी भीती आपल्या भोवतीच्या लोकांबरोबरच्या सबधाची ही काळजी इतकी की त्यापायी आपण स्वत: कोण आहोत या प्रश्नाचा विचारच झालेला नाही

बाह्य परिस्थितीच्या प्रतिकूल फटकाऱ्यांनी त्रस्त झालेला भारतीय मुस्लीम समाज अतर्यामी अस्वस्थपणे– काहीसा चकित– स्वत ची जाणीव नसलेल्या अवस्थेत निरुत्साहीपणाने थबकून उभा आहे पण त्या जमातीच्या आजच्या आणि भविष्यातल्या पिढ्याचच केवळ नव्हे, तर साऱ्या भारताच आणि इस्लामच भविष्यही हा समाज त्यांच्यासमोरील प्रश्नांच आव्हान किती अक्कलहुशारीन स्वीकारतो, त्या प्रश्नावर मात करतो की हार खातो यावर अवलबून आहे १९४७ सालापर्यंत व्यक्तीचा हा गट एक समाज म्हणून वावरत नव्हता एका त्याहून बऱ्याच मोठ्या समाजाचा तो एक भाग होता १९४७ साली एक नवीन गोष्ट जन्माला आली, या सत्याचा यातल्या बहुतेकांच्या बुद्धीला आणि भावनेला नीटसा स्पर्शही झाला नाही मग त्या जाणिवेपाठोपाठ येणाऱ्या जबाबदार वृत्तीची बातच नको

**नवी आव्हान !**

ही परिस्थिती, तिन निर्माण केलेले प्रश्न आणि आव्हान इतकी नवीन आहेत की इस्लामच्या सबंध इतिहासावर असं आजवर कुठे कधी घडलेलं नाही म्हटलं पाहिजे एकापरीनं भारतीय मुस्लिम समाज हा पाकिस्तानी समाजाइतकाच नवा आहे. दुसऱ्या अर्थी पाहता तो तसा बराच जुना आहे. त्याच्या पाठीशी पाकिस्तानी समाजाहून थोडा जास्त इतिहास आहे काही विशिष्ट बाबतीत, खास करून धर्माच्या बाबतीत मात्र हा गट अगदी नवा आहे– कालपरवाचा आहे

इस्लामी जगातले सर्वच गट सध्या तसे सर्वस्वी अनोळखी परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडले आहेत यालाच म्हणतात विसाव्या शतकात जगणं. भारतातील मुस्लिमांचा गट याला अपवाद नाही भूतकाळात कधी उभी न ठाकलेली आणि वर्तमानकाळातही तुलना नसलेली आव्हानं भारतातल्या मुस्लिम समाजासमोर उभी ठाकली आहेत त्यांना तोंड देण्यास हा समाज पुरा ठरला तर आधुनिक इस्लामी जगातलं सर्वांत महत्त्वपूर्ण स्थान त्याला मिळेल

आजच्या जगात केवळ संख्येला तसं महत्त्व नाही इजिप्त, तुर्कस्थान, इराण यांची लोकसंख्या प्रत्येकी दोन कोटींच्या आसपासच असली तरी मुस्लिमजगात त्यांचं महत्त्व मुळीच कमी नाही पाकिस्तान आणि इंडो-नेशिया यांची लोकसंख्या प्रत्येकी सात कोटी असली तरी म्हणून केवळ ती इस्लामी जगात सर्वांत महत्त्वाची ठरत नाही पण केवळ संख्येचा विचार केला तरीही भारतातला मुस्लीम समाज हा इस्लामी जगात मोठाच ठरेल त्याची संख्या ३॥ ते ४ कोटी इतकी असल्यामुळं जगातल्या प्रमुख मुस्लीम जमातींचा विचार केला तर भारतीय मुस्लिम समाज फार वरही नाही आणि फार खालीही नाही इस्लामच्या इतिहासाला त्यानं अरबांच्या तुलनेनं कमी, पण इंडोनेशियाच्या तुलनेनं जास्त हातभार लावला आहे प्रश्न कमी अगर जास्तीचा नाही, महत्त्व याला की या गटानंही इस्लामी इतिहासाला भरपूर हातभार लावला आहे साडेतीन–चार कोटी मुस्लिमांचा हा गट एक हजार वर्षांची परंपरा पाठीशी घेऊन उभा आहे राज्यकार-भार, कला, धार्मिक विचार आणि आचार ( विशेषत सूफी ) या बाबतीत

ही परंपरा मोठी आहे केवळ इस्लामी दृष्टीने पाहिल तर ही परपरा एका जिवत आणि वैशिष्ट्यपूर्ण सस्कृतीचा भाग आहे याबद्दल वाद नाही प्रश्न एवढाच की आजच्या मुस्लिम समाजाची ही परपरा चालू ठेवण्याची क्षमता किती ?

सख्या पूर्वपरपरा आणि राजकीय अवस्था या तीन कारणांपैकी भारतीय मुस्लिमाच वैशिष्ट्यपूर्ण स्थान दाखवणार मुख्य कारण त्यांची ' राजकीय अवस्था ' मस्लीम गटांपैकी तुर्की, इराणी, पाकिस्तानी आणि इडोनेशियन गट एकेका राष्ट्राचे नागरिक आहेत– याला अपवाद भारतीय आणि अरबी मुस्लमाचा पैकी अरब हे सस्कृती आणि भाषा एक असूनही वेगवेगळ्या राष्ट्रातून विभागले आहेत, तर भारतीय मुस्लीम वेगवेगळ्या भाषा बोलणारे– सस्कृतीन बरेच समान असे असून एकाच राष्ट्राचे नागरिक आहेत हे नागरिकत्वही अशा देशाच की जो कसाही विचार करता आधुनिक जगातल्या सर्वात महत्त्वाच्या देशांपैकी एक आहे भारतीय मुस्लिमाच्या गटाच वैशिष्ट्य हे की त्याच्याहून कितीतरी जास्त सख्येने भारतीय गण-राज्याच नागरिकत्व भोगणाऱ्या इतरासमवेत त्याना या नागरिकत्वाची भागीदारी करावी लागत आहे जगातले सर्व मुस्लीम गट पाहिले तर अस दिसत की ही स्थिती केवळ भारतीय मुस्लिमांपुरतीच आहे चीन, रशिया किंवा आफ्रिकेतील निग्रोच उदाहरण कुणी घेऊ पाहतील– पण सख्येन हे गट खूपच लहान आहेत– त्याच्या पाठीशी इतिहासाचा मोठा वारसा नाही आणि सर्वांत महत्त्वाच म्हणजे खऱ्या अर्थाने ते गट स्वतत्रही नाहीत

आधुनिक काळातल्या मुस्लिमासमोर खरा प्रश्न आहे तो त्यांच्या धार्मिक-श्रद्धा आणि आधुनिक इतिहास यामध्ये असलेल्या प्रचड तफावतीचा ही तफावत सर्वांत अधिक कुणाला जाणवली असेल तर ती भारतीय मुस्लिमांना जगातल्या इतर मुस्लिमगटाना फार तर त्यांच गतवैभव लोप पावत असल्या-सारख, त्याची ऐतिहासिक वाटचाल रोखली गेल्यासारख वाटू लागल असेल भारतीय मुस्लिमाना मात्र त्याच्या साऱ्या स्वप्नांचा चक्काचूर होऊन सार भविष्यच शून्यवत् वाटू लागल इस्लामी इतिहासाची एक बाजू त्याच्या ' ईश्वरी सकेताच्या ' श्रद्धा टिकवण्यास कमी पडू लागताच भगीरथ प्रयत्न करून त्यानी ' पाकिस्तान ' निर्माण केल, की ज्यायोगे त्या निस्तेज होत

जाणाऱ्या इतिहासाची काही पानं तरी सोनेरी असल्यासारखी चमकली. पण त्याच फाळणीच्या गदारोळात पडलेला भारतीय मुस्लिमांचा हा तुकडा पूर्वी कधीही नव्हे इतका दुबळा व तेजोहीन झाला इतर मुस्लिम गटांची भौतिक अवस्था फारतर त्या त्या गटाच्या इस्लामी महत्त्वाकांक्षेला पायबंद घालत होती खंडित भारतातल्या मुस्लिमांची स्थिती मात्र आता त्यांनाच वाकुल्या दाखवीत सतावू लागली या गटाचा जन्म झाला रक्तपात आणि द्वेषातून, सारं जग युद्धानं बेजार झालं होतं अशा क्षणी शब्दांनी वर्णन करता येणार नाही अशा दंगली आणि कत्तलीतून १९४७ साली भारत आणि पाकिस्तान या राष्ट्रांचा जन्म झाला दंगलींचा हा विनाशी स्फोट होण्यापूर्वी काही वर्षे या दोन जमातीतला वैरभाव सतत वाढत गेला होता या माथेफिरू जातीय-वादाच्या पार्श्वभूमीवर एका मोठ्या गदारोळानंतर, जिला ते (मुस्लीम) कट्टर शत्रू समजत होते, आणि जिनं त्यांना (मुस्लिमांना) कट्टर शत्रू मानलं अशा जमातीच्या देशात 'अल्पसंख्य' हा शिक्का घेऊन हा गट वावरू लागला

भावनांचा उद्रेक शमल्यावर भीती कमी झाली पण अडचणी उरल्याच फाळणीच्या वेळी झालेल्या विस्कळीतपणातून नवभारतानं स्वत:ला लवकरच सावरलं आणि जगातलं एक स्वतंत्र राष्ट्र बनण्याच्या रचनात्मक– जबाब-दार– कठीण अशा कार्याला तो उत्साहानं लागला ज्या काही थोड्या मुस्लिम व्यक्तींनी मुस्लिम लीगचा विभक्तवाद झिडकारून भारतीय राष्ट्र-वादाला साथ दिली होती, त्यांनी भारताच्या या कार्यातला आपला वाटा उचलला अगदी मनापासून, सर्व उत्साहानिशी त्यांनी हे केलं त्यांच्या भोवतीच्या लोकांनीही त्यांना बरोबरीची–मित्रत्वाची वागणूक दिली मंत्रिमंडळातील प्रमुख मुस्लीम व्यक्तींच्या नावात मौलाना अबुल कलम आझादांबरोबरच– भारताच्या– सुरुवातीच्या काळातल्या, अन्नटंचाईच्या प्रश्नाचा उल्लेखनीयपणे मुकाबला करणारे रफी अहमद किडवाई यांचंही नाव घ्यावं लागेल इतरही कित्येक कर्तृत्ववान मुस्लिमांनी त्या देशाचे पर-देशातले प्रतिनिधी म्हणून नागरिक अधिकारी म्हणून इतरही अनेक बाबीत कौतुकास्पद जबाबदारीची कामं केली खुद्द दिल्लीपासून जवळच 'जामिया' सारख्या संस्थांनी आपली खूप प्रगती करून घेतली

तरीही त्या समाजाचा बराचसा भाग या कार्यापासून अलिप्तच राहिला त्याचा भोवतीच्या लोकांवर विश्वास नव्हता आणि त्या भोवतीच्या लोकाचा या गटावरचा विश्वास उडाला होता राष्ट्ररचनेच्या कार्यात भोवती उसळलेल्या उत्साहाच्या लाटेचा आपल्याशी काही सबध नाही असं या गटातल्या लोकांना वाटत होत भारतीय स्वातन्त्र्य ही त्यांच्या (मुस्लिमांच्या) शत्रूना, त्यांना दडपून टाकण्याकरिता चिरडून टाकण्याकरता–मिळालेली सधी आहे, अशीच त्यांची समजूत झाली होती नवभारताची धर्मालिप्तता हे एक ढोंग आहे अस त्यांना वाटत होत– उर्वरित भारतातल्या अहिंदूना घटनेन कोणतेही खास अधिकार न देण्याचा तो एक प्रयत्न होऊ शकत होता त्याहून खालच्या पातळीवर विचार करता एकीकडे जगाच्या डोळ्यात धूळ फेकून प्रत्यक्षात मात्र नव्यानच स्वतत्र झालेल्या हिंदूना, आपल्या द्वेषाचा आणि सूड भावनेचा वापर करून अहिंदूना पक्षपाती वागणूक देता येण्याची सोय करण्यात आलेली होती भारताच्या लोकशाहीबद्दल त्यांचं मत असच की मुस्लिमाच्या मतांना परिणामशून्य करणार ते एक गणिती हत्यार होत की ज्यामुळ जातीपातीच्या सस्कारानी भारलेल्या साचेबद हिंदू समाजाच्या हाती सतत सत्ता राहणार होती

**अल्पसख्यांक नेहमीच असुरक्षित**

तस पाहिल तर जगातल्या कोणत्याही धार्मिक अल्पसख्यकांना असुरक्षित वाटत असत भारत आणि पाकिस्तान हे त्याला अपवाद नव्हते देशाच्या रचनाकार्यात सहभागी न होणाऱ्या गटाना समाजजीवनात आनदानं सामावून घेणारी समाजरचना माणसान अद्याप शोधून काढलेली नाही अमेरिकेतले नीग्रो, ख्रिश्चन राजवटीत ज्यू, इजिप्तमध्ये कॉप्टस्, साम्यवादी देशातले deviationists या साऱ्यांनी या भीतीचा अनुभव घेतलेला आहे 'अल्पसख्याक' ही अवस्था तशी केव्हाही सोपी किंवा सुखावह नाहीच– मग त्या त्या ठिकाणच्या बहुसख्य समाजाची सहिष्णुता कशीही असो मात्र ज्या ज्या देशांतून अल्पसख्याकाना हक्क आणि अधिकार आहेत– मग ते कितीही अपूर्णावस्थेतील असोत– त्या त्या ठिकाणी त्या त्या अधिकारांची उपेक्षा करण वेडेपणा ठरेल. हेही लक्षात ठेवल पाहिजे की हक्क किंवा



22८८९

अधिकार कितीही असोत, प्रत्येक अल्पसंख्य गटाच्या मनात ही परकेपणाची भावना शिल्लक राहूण मनुष्यस्वभावाला धरूनच आहे

भारत आणि त्यातील मुस्लीम अल्पसंख्याकाच्या संदर्भात विचार करताना, घटनेने बहाल केलेले अधिकार, भारत सरकारच आणि समाजाच उदारमतवादी धोरण आणि त्या भारतीय समाजाचा पूर्वेतिहास व आधुनिक विचार यात अंतर्भूत असलेला बंधुभाव आणि माणुसकी या गोष्टींकडे कानाडोळा करणे आंधळेपणाच ठरेल. भारतान समोर ठेवलेल्या आदर्शाची आणि ध्येयधोरणाची– तसच ती गाठण्यासाठी सरकार आणि सर्वसाधारण नेते करीत असलेल्या प्रयत्नाची खरी जाण मुसलमानांपैकी फारच थोड्याजणाना आहे जाती– धर्माचा विचार न करता सर्व मनुष्यमात्रांचे कल्याण करण या भारत सरकारन जाहीर केलेल्या धोरणाची किंमत अमोल आहे हे ध्येय प्रत्यक्षात साकार करणाऱ्या कार्याला वाहून घेणारे हिंदू आणि इतर कार्यकर्त्यांचे प्रयत्नही अमोल आहेत याच हिंदू नेत्यानी, धर्मालिप्तता आणि माणुसकीकडे बोट दाखवीत मुसलमानी अत्याचारांचा बदला घेऊ पाहणाऱ्या हिंदू समाजातल्या सर्वसामान्य व्यक्तींच्या मनातील नैसर्गिक, पण उग्र अशा सूडभावनेला आवर घातला

तरीही अखेर अल्पसंख्य ते अल्पसंख्य त्यांच नैराश्य आणि भीती ही तशी राहतेच भाषिक, आर्थिक, राजकीय आणि इतरही बाबीतही भीती।

भारतीय मुस्लिमांना धर्माखालोखाल प्रिय असलेली गोष्ट– त्यांची उर्दू भाषा– तिच महत्त्व आता कमी होत आहे स्वातंत्र्योत्तर काळात इतर अनेक क्षेत्रांत ते परिस्थितीशी मिळतजुळतं घ्यायला शिकले तरी या भाषेच्या बाबतीत– ती गमावण्याची शक्यता होती तितकीच आहे

आणखी एक अडसर आहे तो हिंदू धर्मातील जातिव्यवस्थेचा मानवजातीच्या संबंध इतिहासात, बंधुभावाला खो घालणारी– इतक्या कौशल्याने अमलात आणलेली–तत्त्वज्ञानाधिष्ठित– सामाजिक अन्याय आणि विषमतेचा उद्धट पाठपुरावा करणारी असली व्यवस्था इतरत्र कुठेही सापडणार नाही

**भारतातील मुस्लिमांची पंचाईत**

या हिंदू जातीयवादाखालोखाल भारतातल्या मुसलमानांच्या असुरक्षिततेत आणि संकटात भर घालणारी गोष्ट म्हणजे पाकिस्तानची वागणूक भारता-

तील मुस्लिमांचं जीवन विस्कळीत करण्याच्या कामात पाकिस्तानच्या मुसलमानाचा वाटा बराच मोठा आहे केवळ पाकिस्तानचे स्थापनेनही भारतातील मुसलमानांची स्थिती अधिक खालावण्यास मदत झाली अविभक्त भारतात सवर्ण हिंदू ५३ टक्के तर मुसलमान सुमारे २५ टक्के होते. पाकिस्तानच्या स्थापनेनतर भारतात सवर्ण हिंदूच प्रमाण ६६ टक्के झालं मुसलमानाच्या सख्येच्या सहापट अनसूचित जातीजमातींची संख्या धरली तर हिंदूच प्रमाण ८५ टक्के म्हणजे मुसलमानाच्या आठपट होत. दुसर अस का ५१८ सर्व पर्याय झिडकारून पाकिस्तानच्या स्थापनेला या मुसलमानानी पाठिबा दिल्यामुळे उर्वरित भारतात कसलेही खास अधिकार मागण्याचा त्यांचा हक्कच नाहीसा झाला किंबहुना कसलाच अधिकार त्याना उरला नाही. आपल्या सर्व आयुष्यात ज्याला राजकारणाचा स्पर्शही झाला नाही अशा एखाद्या खेडवळ शेतकरी मुसलमानालाही आता ' तू पाकिस्तानात चालता हो ' अशी समज मिळते यावर त्याला जे काही म्हणायच असत ते कुणाला ऐकू जाण्याजोग नसत

तरीही त्या ' इस्लामी पाकिस्तानानं आपले चाळे केले नसते तर केवळ त्या स्थापनेन निर्माण झालेल्या अडीअडचणीतून भारतातील मुस्लिमांची लवकरच सुटका झाली असती केवळ मुसलमानी हितसंबंध समोर ठेवून पाकिस्तानन परिस्थितीच जातीयवादी विश्लेषण करण्याचच धोरण आखल्या- मुळे सीमारेषेच्या भारतीय बाजूला असलेल्या मुसलमानांच्या हालात खूपच भर पडली फाळणी होताच हिंदू आणि शीखांच्या कत्तलीं आणि बलात्काराच सत्र सुरू करून त्यांना बाहेर हाकलून देऊन पाकिस्तानी मुसलमानांनी याला सुरुवात केली ही भयानक परिस्थिती दोनही बाजूना अखेर हानिकारक ठरेल हे भारतात त्यामानाने लगेचच ओळखल त्याचे पुढारी आणि सर्व-सामान्य जनता या दोघानीही मानवी प्राणाचे स्वरूपातली या हत्याकांडाची किंमत ओळखली आणि भारताच्या इतिहासातील या काळ्याकुट्ट प्रकरणा-बद्दल पश्चात्ताप व्यक्त केला पाकिस्तानन मात्र या साऱ्या प्रकरणातील गुन्हेगारीतला आपला निम्मा वाटा कबूल करण्याचा मोकळेपणा आणि नैतिक धैर्य दाखवल नाही १९४७ च्या कत्तलीबद्दल लिहिताना पाकिस्तानातील सरकारी प्रकाशन आणि खासगी लिखाणातून अद्यापही ढोंगी नक्राश्रू

तेवढे ढाळण्यात येतात या प्रकरणात झालेल्या माणुसकीच्या हानीवर लक्ष केंद्रित करणाऱ्या काही उर्दू कादंबऱ्या त्यानंतरच्या काळात पाकिस्तानात प्रकाशित झाल्या आहेत पण सर्वसाधारणपणे याबाबतचा एकांगी दृष्टिकोन अद्याप आहे तसाच आहे विरुद्ध बाजूच्या (हिंदू–शीख) झालेल्या अपरिमित हानीची कल्पना त्या देशातील मुसलमानांना सर्वसामान्यपणे नाही असं म्हटलं पाहिजे जीव बचावून पळालेल्या निर्वासितांची रीघ भारतात लागताच भारतातील मुसलमानांना या कत्तलीच्या भयानकतेची कल्पना आली आणि पुढे त्याची किंमतही मोजावी लागली

**भीती अस्थानी ठरली**

१९४७ चे भीषण दिवस संपले आणि हळूहळू ते सारं विसरण्यासाठी भारत प्रयत्नशील राहिला जखमा इतक्या खोल होत्या की त्या भरून येणं कठीण होतं त्यांनी निर्माण केलेली कटुता पुढे बरेच दिवस टिकणारच होती तरीही सुमारे दहा वर्षांच्या कालावधीत मुसलमानांची भीती अस्थानी ठरण्याइतकी परिस्थिती बदलली स्पेनप्रमाणे त्यांचा समूळ उच्छेद निश्चितच केला जाणार नव्हता की त्यांना चिरडून टाकण्यात येणार नव्हतं भारतात बहुसंख्यांक जमात तसं सारं विसरलेलं नव्हती तिनं मुसलमानांना संपूर्णपणे क्षमाही केलेली नव्हती पण मुसलमानांचा सूड उगवण्यापासून तिला परावृत्त करण्यात आलेलं होतं त्या जमातीचा संपूर्ण विश्वास संपादन करण्याचे कामात ज्या अडचणी होत्या, त्यातली प्रमुख अडचण पाकिस्तानचं वर्तन हीच होती पूर्वबंगालमधील हिंदू अल्पसंख्याकांना पाकिस्तानकडून मिळणारी वागणूक आणि भारताबरोबरचे पाकिस्तानचे संबंध यानुसारच भारतातील बहुसंख्य जमातीचे मुसलमानांबरोबरचे संबंध ठरतात दोन देशांतील तणातणी वाढली, किंवा पाकिस्तानी हिंदूंची स्थिती बिघडली की त्याचा लगेच भारतातील मुस्लिमांच्या स्थितीवरही परिणाम होतो याउलट भारत-पाकिस्तानमधील संबंधांत सुधारणा झाली तर भारतातल्या मुसलमानांची स्थिती सुधारण्यास त्याची खूपच मदत होईल पूर्व पाकिस्तानातून भारता-कडे सतत वाहणारा असंतोषाचा ओघ, सीमेवरील लहानशीसुद्धा चकमक, कालवे-पाणी किंवा निर्वासितांच्या मालमत्तेबाबतचा दोन देशांमधील तंटा या साऱ्याचा भारतातील मुसलमानांवर खूपच विपरीत परिणाम होतो

यानच काश्मीर प्रश्नाची गुतागुत वाढली आहे कारण काश्मीरचं पाकिस्तानात सामिलीकरण होण– नुसता त्या मागणीचा जोर वाढला तरीही भारतातल्या मुसलमानाची स्थिती अधिक नाजुक बनते भारतीय मुस्लिमाच्या हे लक्षात आलं आहे १४ ऑगस्ट १९५१ रोजी डॉ झाकीर हुसेन आणि इतर चौदा भारतीय मुस्लिमांनी यूनोचे प्रतिनिधी डॉ ग्रॅहॅम याना सादर केलेल्या खलित्यात हे स्पष्ट केलेल आहे पण पाकिस्तानांच्या मात्र काही केल्या हे लक्षात येऊ शकत नाही भारतातील हिंदू सरकारच्या हातातली बाहुली असलेल्या मुसलमानांनी सरकारी दडपणाला बळी पडून काढलेल पत्रक अशीच पाकिस्तानन त्या पत्रकाची सभावना केली होती डॉ झाकीर हुसेन याच्यासारख्या नीतिधैर्यवान माणसाचा हा घोर अपमान तर होताच, पण राजकीय अर्थीही ही प्रक्रिया अवास्तव होती

**विकृत वागणूक विलगत तत्त्वज्ञान**

मात्र काश्मीर हा महत्त्वाचा मुद्दा नाहीच पूर्वी म्हटल्याप्रमाणे हीही एक वरवरची गोष्ट आहे– तिचे गभीर दुष्परिणाम होऊ शकत असले तरीही याहून मूलभूत महत्त्वाच आहे ते या चाळच्यापाठच पाकिस्तानी तत्त्वज्ञान । भारतीय राष्ट्रवाद आणि मुस्लिमांचे हितसबध याचं सपूर्ण जातीयवादी विश्लेषण करून पाकिस्तान जन्माला आल व त्याचे आजवरचे व्यवहार होत आले भारतातील मुसलमानांवर आपला कसलाही हक्क नाही या सत्याची दखल पाकिस्तावला त्या मानाने लगेचच घ्यावी लागली होती. भावनात्मक दृष्टिकोनातून अनधिकृतरित्या मात्र हा दावा चालूच राहिला पाकिस्तानच्या एकूण धोरणात भारताबद्दलचा खूपच आकस अद्यापही असतो पश्चिम पाकिस्तानला भेट देणाऱ्या कुणाही पाव्हण्याच्या ते लक्षात येत. सरकारी प्रकाशन Pakistan News चा कोणताही अक, डॉनसारख्या वृत्तपत्रातील अग्रलेखातून तो स्पष्ट दिसतो भारताच धर्मलिप्त स्वरूप मान्य करण्याची पाकिस्तानची अद्यापही तयारी नाही नवोदित भारताच्या धर्मनिरपेक्षतेला पाठिबा देणे, तिचा उदो करण राहोच, पण ती मान्य करणेसुद्धा पाकिस्तानी जनतेला जमलेल नाही भारतातील मुसलमानांना मिळणारा दर्जा हा मुख्यत्वे दोन बाबींवर अवलबून आहे, एक त्या मुसलमानांच भारतीयत्व (Indianness) आणि दुसरी त्या भारताची धर्मलिप्ततेकडील वाटचाल.

हे सत्य ध्यानी घेण्याऐवजी पाकिस्तानन त्या धर्मालिप्ततेची टिंगल तेवढी चालू ठेवली आहे तुच्छतापूर्वक बोळवण केली आहे (पाकिस्तानच्या मन्त्री-पदावर असताना Dr I H Quershi यानी Princeton विद्यापीठाला सादर केलेल्या एका प्रबधात लिहिल' 'पुढील शभर वर्षांत' बहुधा त्याहूनही कमी कालावधीत मुस्लीम' ही जमातच भारतातूनच नष्ट होईल'

याबरोबरच भारतातील मुसलमान मनाने भारताशी बेईमानच राहणार अस गृहित धरून त्या बेइमानीला उत्तेजन देण्याचं धोरणही पाकिस्तानन अवलबल आहे या साऱ्या विकृत वागणुकीच कारण ज्या मूळ कल्पनेवर पाकिस्तानची योजना आधारली होती त्या कल्पनेतील अतर्गत विसगती 'भारतातले सर्व मुसलमान हे एक राष्ट्र आहेत,' हा मुस्लीम लीगचा सिद्धात 'पाकिस्तानातील मुसलमान हे एक राष्ट्र आहेत' किंवा 'जगातले मुसलमान एक राष्ट्र आहेत, अस म्हणण त्या मानान सुसगत झाल असत मग ते खर असो वा नसो पण त्यावेळच्या अविभक्त भारताचा एक राष्ट्र-सलग स्वायत्त भूप्रदेश या अर्थी उल्लेख करायचा आणि त्यातील मुसल-मानाना पुन्हा एक राष्ट्र ठरवायच यात विसगती खासच होती हे विसगत तत्त्वज्ञान प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न झाल्यावर सघर्ष आणि उध्वस्तता येणारच होती ही कल्पना तशी अद्यापही जिवत आहेच आणि ती तशी असेपर्यंत तिचे दु:खद आणि खोल परिणाम होणारच आहेत पाकिस्तानच्या मूळ कल्पनेतील साऱ्या विसगतीची किंमत मुख्यत्वे भारतीय मुसलमानाना द्यावी लागत आहे

महमद अली जिना हा एक अतिशय बुद्धीमान नेता असल्याच निदान पाकिस्तानी तरी मानतात एक वादपटू आणि वकील म्हणून तो हुशार असेलही पण आपली फाळणीची योजना प्रत्यक्षात उतरवण्याच्या कामी येणाऱ्या अडचणींची पूर्व कल्पना न आलेल्या जिनाच्या राजकीय शहाणपणा-बाबत पुनर्विचार करण्याची वेळ आता आली आहे. बगाल आणि पजाबच्या नकाशाचा त्यान कधीच अभ्यास केलेला नसावा मग पजाबच्या कालवे-पद्धतीची बातच नको काश्मीरबाबत काय ? असा प्रश्न विचारला जिनान

रागारागान उत्तर दिल की प्रश्न फक्त 'ब्रिटिश इंडिया'बाबतच आहे पाकिस्तानच्या सीमारेषेबाबत प्रश्न विचारला गेल्यावर एका सकल्पित योजनेची त्यान रेवडी उडवली. प्रत्यक्षात मात्र नेमके तेच आणि तेवढेच प्रदेश पाकिस्तानात गेले पाकिस्तानन केलेल्या प्रत्येक कामगिरीचं श्रेय जर जिनाला द्यायच तर त्याच पाकिस्तानच्या अडचणीबाबतच्या जबाबदारीतून त्याला मोकळ कस करता येईल ?

पाकिस्तानच्या मागणीमागे अकरणात्मक दृष्टी, निव्वळ द्वेष आणि भीतीच जास्त होती हिंदूपासून स्वतंत्र अस आपल्या जमातीच जीवन जगण्याच्या इच्छेपेक्षाही हिंदूद्वेष जास्त होता, मुसलमान हिंदूपासून स्वतंत्र होऊ पाहताच मग हिंदूनीच त्यांना झिडकारण्यास सुरुवात केली पाकिस्तानच्या कल्पनेत करणात्मक अस जे जे होत ते पाकिस्तानच्या बाजूला गेल अकरणात्मक तेच राहिल भारतातील मुसलमान केवळ पाकिस्तानच्या सध्याच्या अपूर्णतेची किमत देतात अस नव्हे, तर त्यांचा पाकिस्तानशी संबध आहे, केवळ त्याच्या विसगतीपरता पाकिस्तानच्या विजयांत त्याना भाग घेता येत नाही पण त्यातल्या दोषामुळे येणार दुःख मात्र भोगावं लागत

या उलट भारतातल्या मुसलमानाना वाईट वागणूकच मिळत असणार याबाबत पाकिस्तानातल्या मुसलमानांनी इतकी खात्री की प्रसगी एखादी वाईट बातमी आली की तिच एक प्रकार हौन स्वागतच पाकिस्तानी करतात (प्रमुखत्वे हे त्याच्याशी सभाषण करताना जाणवत भारतातील मुसलमानांस मिळणाऱ्या वाईट वागणुकीचे वृत्त पाकिस्तानी वृत्तपत्रातील दिसते भारतात ख्रिश्चनांना मिळणाऱ्या वाईट वागणुकीच्या गोष्टी छापण्यास Pakistan News Digest आजही खूपच कष्ट घेत की ज्यामुळे त्याची मानसिक गरज भासते इजिप्तमध्ये ख्रिश्चनाना किंवा अर्जेंटिनामध्ये ज्यूना मिळणाऱ्या वागणुकीच्या गोष्टी छापण्याची मात्र त्याला अर्थातच गरज नसते )

**दुर्दशेला पाकिस्तान जबाबदार**

भारतीय मुस्लीमांचे भवितव्य दोन भिन्न गटाच्या वागणुकीशी निगडित झाले आहे एक गट त्याच्याच देशबांधवांचा की ज्यांचा धर्म वेगळा आहे. दुसरा गट त्यांच्या धर्मबांधवाचा की जे वेगळ्या देशाचे नागरिक आहेत.

या वेगळ्या देशातील मुस्लीमानी केलेल्या चुका आणि अत्याचाराची किंमत भारतातील मुसलमानाना द्यावी लागते लाहोरमधील बिगर मुसलमानांच्या कत्तली, भारतातील मुसलमानाना जखमा करतात डाक्क्यामध्ये झालेला अन्याय भारतीय मूस्लीमांना न्याय मिळणे अधिक कठीण करतो पाकिस्तानचे बाह्य स्वरूप जितके अधिक इस्लामी तितके भारतीय मुसलमान कमी सुरक्षित एखादा तऱ्हेवाईक टीकाकार तर असे म्हणेल की इस्लामचे रोपटे जो जो पाकिस्तानात अधिक बहरते तो तो ते भारतात अधिक कोमेजते

भारतातील मुसलमानाच्या दुर्दशेला पाकिस्तान मोठ्या प्रमाणावर जबाबदार आहे हे आपण पाहिले चितेची बाब अशी की याबाबतीत अधिक दोष जातो खुद्द या मुस्लीमाच्याच वृत्तीकडे व वागणुकीकडे या भारतीय मुस्लीमांची स्वत ची वागणूक वेगळी असती तरीही पाकिस्तानच्या धोरणाचा इतका वाईट परिणाम झाला नसता भारतीय मुस्लीमाचे सामाजिक जीवन उध्वस्त होण्याला पाकिस्तानला जन्म देणारे तत्त्वज्ञान आणि त्या तत्त्वज्ञानाशी सहमत होण्याची या मुस्लीमाची वृत्ती हे आहे जोपर्यंत भारतातील मुसलमान स्वत चा विचार ' परदेशात राहणारे पाकिस्तानी मुसलमान ' असा करतील, जोपर्यंत त्यांची एकूण वृत्ती आणि वागणूक पाकिस्तानी मुसलमान आणि भारतातील हिंदू याचीही तशीच समजूत करून देणारी असेल, तोपर्यंत त्याची परिस्थिती बिकटच राहील ही भूमिका आततायीपणच त्याना कृतीशून्य बनवते अंतर्यामीचा गोंधळ आणि सभोवतीचा अविश्वास याच्या परिणामी मग अतर्बाह्य, सामाजिक आणि भावनिक असुरक्षितता जन्माला येते– वाढीला लागते त्याच्या हालचाली जोपर्यंत पचमस्तभी वाटण्याजोग्या असतील तोपर्यंत भारतीय जनता त्यांना आपले म्हणणार नाही असल्या परकी मनोवृत्तीन जगण्यान त्यांचा स्वत वरचा विश्वासही ढासळेल भोवतीच्या परिस्थितीच योग्य ते मूल्यमापन करण शक्य होणार नाही

ह काड केवळ ऐतिहासिक नाही त्याचा त्याच्या धार्मिक श्रद्धेशीही संबध आहे. फाळणीन निर्माण केलेल्या एकाकी अवस्थेत मुसलमानांना आधार वाटतो तो इस्लामचा पण या इस्लाममुळेच त्यांचे पाकिस्तानाशी

असलेले नाते अधिक घट्ट होते आणि ज्या भारतीय समाजात ते राहतात त्यापासून ते अलग पडतात खरे तर हे इस्लाममुळे होत नाही तर इस्लामचा जो विशिष्ट अर्थ लावला गेला आहे त्यामुळे घडते १९४० सालानंतरच्या महत्त्वाच्या कालखंडात अनेक सुजाण मुस्लिमांनी इस्लामचा हा विशिष्ट अर्थ मान्य केला नाही, ते त्यापासून दूर राहिले पण मुस्लिमा-पैकी बहुतेकांनी हाच अर्थ मान्य केला, त्यालाच ते शरण गेले व आताही त्यापासून स्वतःची सुटका करून घेणे त्यांना जमलेले नाही फाळणीपूर्व काळातील भावनावेग आणि दृष्टिकोन बाजूला ठेवून सद्यःपरिस्थितीचे प्रश्न आणि आव्हान स्वीकारण्यास आवश्यक तो उत्साह मिळेल असा आधुनिक काळाशी सांगड घालणारा इस्लामचा अन्वयार्थ अद्याप लावला जावयाचा आहे

**हताशपणाची जाणीव**

भारतातल्या बहुसंख्य मुसलमानांना जाणीव आहे ती त्यांच्या हताश-पणाची, बाह्य शक्तीच्या हातची बाहुली बनल्याची— की ज्या शक्तीवर त्यांचे कसलेही नियंत्रण नाही हिंदू बहुसंख्यांच्या पाशातून सुटण्याकरिता एका आंधळ्या क्रोधाने त्यांनी धडपडाट केला आणि आता त्यांच्या लक्षात आले ते हे की त्याच हिंदू बहुसंख्येच्या कचाट्यात अधिक केविलवाण्या पद्धतीने ते अडकले गेले आहेत

ही जाणीव कितीही खोल आणि महत्त्वाची असली तरी मूलतः फसवी आहे वस्तुस्थिती ही की इतिहासाने घेतलेले हे वळण त्याला एखाद्या अज्ञात दैवशक्तीने किंवा परकी राजवटीने दिलेले नाही इस्लामच्या इतिहासात ही परिस्थिती मुसलमानांनी आपल्या हातानीच निर्माण केली. प्रत्यक्षातही परिस्थिती त्यांनी निर्माण केली नसली तरी ती परिस्थिती निर्माण होईल अशी पावले त्यांनी टाकली वर्षानुवर्षांच्या गुलामगिरीनंतर १९४० साला-नंतरच्या काळात जे काही स्वातंत्र्य त्यांना मिळाले, त्याचा उपयोग त्यांनी पाकिस्तान निर्माण करण्याकडे केला म्हणजेच भारताचे फाळणीसाठी केला पाकिस्तानच्या निर्मितीस खरा हातभार भारतातल्या मुस्लिमांनीच लावला आणि म्हणूनच फाळणीनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीस स्वतः तेच जबाबदार आहेत पाकिस्तानच्या चळवळीचे पुढारीपण केले ते भारतातल्या

मुस्लिमांनी– पाकिस्तानात गेलेल्या प्रदेशातील मुसलमानानी खरं तर याच अनुयायित्व केली आणि पाकिस्तानला मान्यता दिली

एक गोष्ट खरी की आपल्या भावी इतिहासाला आपण कोणत वळण देत आहोत हे या मुस्लिमाच्या त्यावेळी लक्षातच आल नव्हत स्वातत्र्याचा उपयोग करणारा शहाणा असावा, पण असतोच अस नाही– मात्र त्यामुळे येणाऱ्या जबाबदाऱ्या टाळता येत नाहीत

**नेते पाकिस्तानात पळाले !**

पाकिस्तानचा पाठपुरावा केला या एकाच कारणासाठी भारतातले मुसलमान स्वतःच्या परिस्थितीला जबाबदार नाहीत ते मूळ कारण असल तरी इतरही अनेक कारण आहेत १९४७ साली त्याच्या साऱ्याच पुढाऱ्यानी काढलेला पळ हे असच एक कारण फाळणी होताच हे सारे पुढारी पाकिस्तानात निघून गेले शिक्षण, व्यापार, उद्योगधदे, व्यवसाय, सरकारी नोकरी यापैकी एकाही क्षेत्रात या जमातीला आवश्यक तितकेही नेते शिल्लक उरले नाहीत या जमातीचे जे काही लोक अधिकारपदावर आणि प्रतिष्ठेच्या जागावर होते, त्या साऱ्याना पाकिस्तानात निघून जाण्यास मुस्लिम लीगन फूस दिला– माग राहणाऱ्या मुसलमानाची कसलीही पर्वा न करता राष्ट्रीय चळवळीशी इमान राखलेल्या काही फार थोड्या राष्ट्रीय मुस्लीम नेत्यावर या साऱ्याना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी आली– कित्येक ठिकाणापर्यंत हे नेतृत्व पोचूही शकल नाही– परिणामी नैतिक धैर्य आणि जबाबदारी यांच्या अभावी अनेक ठिकाणी होणार नकसान टळल नाही सख्येनं रोडावलेल्या आणि गलितधैर्य अशा या मुसलमानांमधून नवीन नेतृत्व उदयाला येण्यास अजून बराच कालावधी लागेल

ही स्थलातराची प्रक्रिया १९४७ पासून आजपर्यंत सतत चालू न राहती तरीही तिन इतक नुकसान झाल नसत १९४७ चा पेचप्रसग आला आणि गेला– ज्यानी पाकिस्तानात जायचा निर्णय घेतला ते तो परत फिरवणार नव्हते– ही बाब समजण्याजोगी आहे पण ज्यानी फाळणीनतरही भारतात राहण्याच ठरवून त्या देशाशी इमानी पत्करली आणि पुढे ते इमान न पाळता केव्हातरी पाकिस्तानला स्थलातर केल, त्यांची बाब अक्षम्य म्हटली पाहिजे १९४७ नतर आजवर झालेल्या या स्थलातरानी वेळोवेळी त्या

समाजाला अधिक पोरक बनवलच, पण मागे राहणाऱ्या इतर सर्वांच्या इमानाबद्दल शंका निर्माण केली. भारतातले अनेक पुढारी– हिंदू आणि मुसलमान– की जे या समाजाच्या हितरक्षणाकडे लक्ष देत होते, या व्यक्तींना मदत करू शकले असते सर्वच्या सर्व मुसलमानांना बेइमान समजणाऱ्या हिंदू जातीय शक्तींचा त्यांनी मुकाबला केला असता पण वेळोवेळी होत राहिलेल्या या स्थलांतरामुळे या मदत करणारांचे हातही पांगळे पडले भारतातील विश्वविद्यालयातून पदव्या घेऊन बाहेर पडलेल्या अनेक मुस्लीम तरुणांनी भारताऐवजी पाकिस्तानात नोकऱ्या पकडल्या विद्वान आणि धार्मिक अशा प्रतिष्ठित पदावरील माणसांनीही अधिक चांगल्या नोकऱ्या, जागा देऊ केल्या जाताच स्थलांतर करून आपल इमान पाकिस्तानला विकल पैकी एक कुप्रसिद्ध गोष्ट एका ब्रिगेडिअर जनरलची भारतीय सैन्यात अनेक जबाबदाऱ्यांच्या जागा भूषवलेला– अनेक सरकारी गुप्त फायलींची माहिती असलेला हा सैन्याधिकारी १९५५ साली आपणहून सेवानिवृत्त झाला, आणि लगोलग पाकिस्तानात जाऊन पाकिस्तान सरकारचा अधिकारी बनला !

अशा तऱ्हेच्या गोष्टींनी मागे राहिलेल्या इतर मुसलमानांच जीवन अधिकच कठीण बनेल, हे सहज लक्षात येईल ब्रिगेडिअर अनिसच्या असल्या वागणुकीनंतर इतर कुणाही मुसलमानाला ब्रिगेडिअर बनण दुष्कर होऊन बसेल 'जोश' हा उर्दू कवी पाकिस्तानात गेल्यावर उर्दूच भारतातील भवितव्य अधिकच कठीण होणार हे स्पष्टच आहे या असल्या घटनांचा उपयोगही पाकिस्तानी भारतात मुस्लिमांची अवस्था किती बिकट आहे हे दाखवण्यासाठी करतात या साऱ्या प्रचारात किती तथ्य आहे हे आपण पुढे पाहू या तूर्त इतकं निश्चित की भारतातल्या मुसलमानांची स्थिती त्यांच्यापैकी काहींच्या बेइमानीमुळे अधिक बिकट झाली आहे भारतातील सामान्य मुस्लिमांची स्थिती खरोखरच इतकी बिकट असेल तर मग या अधिकारपदावरील मुसलमानांनी पाकिस्तानात पळ काढण्याऐवजी भारतातच राहून आपल्या अधिकारपदावरून देता येईल तेवढी मदत आपल्या धर्मबांधवांना का दिली नाही, हा प्रश्नही विचारता येण्याजोगा आहे

**सरंजामी युगातील मुस्लीम**

या जमातीच भारतातील परकेपण आणि स्वत च्या परिस्थितीच योग्य ते निदान करण्याबाबतच्या असमर्थतेचा सबध पाकिस्तानइतकाच त्या जमातीच्या भूतकाळाशीही आहे आज आर्थिक परिस्थिती मुसलमानाना प्रतिकूल वाटते कारण गेल्या पाऊणशे वर्षांत होत गेलेल्या आर्थिक परिवर्तनातून वेळोवेळी निर्माण झालेल्या सधीचा या जमातीन नीटसा उपयोगच करून घेतला नाही सारी जमात, परिस्थितीच्या सतत मागे पडल्यान, त्याचे मानसिक परिणाम झाले, त्यांच्या धार्मिक आणि सास्कृतिक जीवना-वरही अनिष्ट परिणाम झाला इस्लामी सस्कृतीची जोपासना करणारी सारी केन्द्रे पाहिली, तर जमीनदाराच्या आणि सस्थानिकाच्या पैशावर ती उभी होती भूतकाळात जमा होऊ घातलेल्या अवशेषावर अवलबून होती. भारतातून ब्रिटिश सत्ता निघून जाताच, तोपर्यंत थोपवून धरण्यात आलेल्या भारताच्या आधुनिकीकरणाच्या प्रगतीला वेग चढला या उद्योग व तत्र-युगाच्या काळात मुस्लिम सरजामी सस्था उघड्या पडल्या,जमीनदारी बरखास्त करणे आणि सस्थानाचं विलीनीकरण या नवोदित भारताच्या कामगिऱ्या म्हटल्या पाहिजेत त्यामुळे भारतातील इस्लाम अडचणीत आला असेल तर त्यामुळे त्या इस्लामचा मागासलेपणाच सिद्ध होतो ज्या गोष्टीमुळे आपल्या-वर अन्याय झालास मुसलमानांना वाटत, त्या गोष्टी खरंतर केवळ दुबळेपणा उघडा करतात

याच सर्वांत चागल उदाहरण म्हणजे १९४८ सालची हैदराबाद कारवाई, आणि त्याविरुद्ध भारतातल्या मुसलमानांनी केलेला जळफळाट भारतातील लोकशाही व्यवस्थेन मुसलमानाना देऊ केलेल स्थान नाकारण्याचा तो एक मुसलमानी प्रयत्न होता निजाम आणि त्याची राजवट ही भारतातल्या सर्व मुसलमानाच्या दृष्टीन इस्लामी इतिहासातल्या एका गौरवशाली युगाची खूण होती ती राजवट कोसळून पडताच इस्लामच ते युगही कोसळल्याची अतिशय तीव्र जाणीव त्या साऱ्याना पुन्हा एकदा झाली गतवैभव निदर्शक अशा कोणत्याही चळवळीला मुसलमानाचा मिळणारा माथेफिरू पाठिबा ( उदाहरणार्थ तीस वर्षांपूर्वी खिलाफत चळवळ ) हा मुस्लिम ससेच सर्वत्र होत असलेल विघटन थाबवण्याचा एक कळकळीचा

पण अदूरदृष्टीचा प्रयत्न असतो आजच्या आणि भविष्यातल्या युगात इस्लामच भौतिक आणि अधिभौतिक श्रेष्ठत्व टिकवायच असेल तर इस्लामला नवीन आणि वेगळा आकार दिला पाहिजे हे समजून घेण्या-मागच अपयश या साऱ्या फाजतवाडयान वळोवेळी स्पष्ट होत इस्लामच्या गतवैभवाचे असले अवशेष जतन करण्याबाबत प्रत्यक्ष परमेश्वर किंवा सयुक्त राष्ट्र याना मुळीच उत्साह नसावा याचं या मागासलेल्या मुसल-मानांना फार दु ख होत भारतातल इस्लामचं भविष्यकाळातील वैभव, लढाया करणारे किंवा गतयुगाताल सरजामशाही अडगळीच्या नावान अश्रू ढाळणाऱ्यामुळे मिळणार नाही इस्लाममधील त्रिकालाबाधित अशा सत्यांची आधुनिक परिस्थितीशी सागड घालणारेच ते काम करतील हैदराबादी मुसलमानांना त्यांच्या चुकीच्या हिशेबाची भरपूर किंमत मोजावी लागली हे विसरता कामा नये भारतातील मुस्लिमाच्या अडचणीचा विचार करताना त्याच्या प्रत्येक चुकीच्या पावलागणिक त्यांच्या अडचणी अधिक वाढत जातात हे सत्य ध्यानात ठेवलं पाहिजे

**परस्परविरुद्ध विचारप्रवाह**

प्राप्त परिस्थितीच्या सदर्भात, भारतातील मुसलमानामध्ये दोन परस्पर विरोधी विचारप्रवाह दिसून येतात एक भोवतीच्या परिस्थितीशी जुळते न घेणारा– असुरक्षितपणाची भावना पोसणारा—या दोन्हीच्या दुष्टचक्रात त्यांना अधिकच गुरफटणारा आणि दुसरा– त्याना फारसा सुखप्रद नसलेला पण परिस्थितीवर मात करू पाहणारा– वास्तव परिस्थितीशी जुळतमिळत घेऊ पाहणारा आणि हळूहळू पण प्रयत्नपूर्वक, जबाबदारपणे सन्मुखपणे त्यात सहभागी होऊ पाहणारा पैकी पहिला मार्ग नैराश्याच्या पोटी जन्मलेला, पलायनवादी असा आहे दुसरा मार्ग इस्लामी समाजाला एका नवीन स्वातंत्र्याची आणि प्रगतीची पहाट दाखवणारा असा आहे की ज्याला भारताखेरीज इतर सदर्भातही खूप महत्त्व आहे

पुन पुन्हा गाठ पडते ती इस्लाममध्ये उद्‌भवलेल्या मूलभूत पेचप्रसगाशी कालबाह्य कल्पना आणि भावना जोपासणारा समाज आणि या नवीन, क्रांतिकारी युगाबरोबरच त्याचं अधिकाधिक वाढत जाणार अतर [1] हा पेचप्रसग सर्वांत अधिक तीव्रपणे जाणवतो तो भारतात त्या समाजाच्या

दु:खाचं मूळ या सत्यात आहे– त्या दु:खावरील तोडगाही इथेच शोधावा लागेल. सत्यपरिस्थितीचं आजवर जोपासलेल्या अर्धवट आणि विकृत भावनांवरचं दडपण जो जो वाढत आहे, तो तो दु:खाबरोबरच विचार-शक्तीलाही अधिकाधिक चालना मिळते आहे.

परिस्थितीचं दुष्टचक्र अर्थात थांबलेलं नाहीच. या अल्पसंख्य जमातीच्या दुबळ्या अवस्थेचं कारण तिचा पाकिस्तानशी असलेला दुवा आहे, हे आपण मागे पाहिलंच. पण या दुबळेपणापायीच हा दुवा तोडून टाकण्याची या समाजाची तयारी नाही. खरंतर हा दुवा आता तुटलेलाच आहे हे ध्यानी घेण्याची त्याची तयारी नाही. या दुव्याला ते जो जो अधिक घट्टपणे पकडू पाहतात तो तो भारतातल्या स्वत:च्या स्थानाला ते अधिकाधिक बाधा आणतात.

त्याचप्रमाणं खलिफ उझ्झमान किंवा जोश किंवा अनिस यांच्यासारख्यांनी पाकिस्तानला स्थलांतर केल्यामुळं, मागे राहिलेल्यांची अवस्था अधिक वाईट होत असूनही पुढचा मनुष्य तेच कारण दाखवून पाकिस्तानात पळ काढू पाहतो. रझाकारी चळवळीनं हैदराबादच्या मुसलमानांवर जी संक्रांत आली त्यामुळे ते अधिकच निराश झाले. कोणत्याही रचनात्मक कार्यातली आपली जबाबदारी उचलण्यास अधिकच नाखूष झाले. काही तुरळक अपवाद वगळले तर हैदराबादी सुशिक्षित मुसलमान वर्गातल्या लोकांची मनोवृत्ती सुधारली नाही.

कसलाही शहाणा, तर्कशुद्ध विचार, निरुपयोगी ठरावा इतका भावनांचा पगडा जबरदस्त आहे. पूर्वकल्पनांचं जाळं खोलवर विणलेलं आहे. असं असलं तरीही परिस्थिती हळूहळू सुधारते आहे. वर उल्लेखलेल्या दोन विचारप्रवाहांपैकी पहिल्या विचारप्रवाहाचा जोरदार पगडा पहिली काही वर्षे होता. गेली काही वर्षे त्या निराशावादापासून काही प्रमाणात तरी हा समाज मुक्त होऊ पाहत आहे. या कालावधीत घडलेल्या अनेक घटनांनी शिकवलेले धडे खूपच बोलके आहेत. स्वत:च्या विचारातली तर्कदुष्टता समजली नाही तरी त्यानुसार केलेल्या आचरणाला जी कटू फळे वेळोवेळी आली, त्यांनी त्या विचाराबाबतच्या मंथनाला चालना मिळालीच आहे. त्याचबरोबर ज्यांनी काही नवीन विचार प्रथमच धीटपणे या समाजासमोर

मांडले त्याच्या कार्याला काही प्रमाणात तरी यश मिळत असल्याची चिन्ह दिसू लागली आहेत

भारतातील मुसलमानांना आपल भौतिक आणि आधिभौतिक कल्याण साधायच असेल, तर त्या समाजाने स्वत चे पायावर उभे राहिल पाहिजे भारतातल्या परिस्थितीच्या सदर्भात असलेल स्वत च स्थान आणि मर्यादा ओळखल्या पाहिजेत– भवितव्यातील स्वताचा वाटा उचलण्याची तयारी दर्शवली पाहिजे इतरांवर आणि स्वत वरही अधिक विश्वास ठेवून नवराष्ट्ररचनेच्या कार्यात सहभागी झाले पाहिजे गेल्या काही वर्षांत या समाजाने या दिशेन थोडीफार प्रगती केली आहेस वाटत

ज्या अनेक गोष्टीमुळे त्यांना हे करण शक्य झाल त्यापैकी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारताची धर्मालिप्तता या धर्मालिप्ततेच यश अपूर्ण असल तरी मूलभूत आहे मुसलमान एका, कायदा व सुव्यवस्थेचे राज्यात रहात आहेत त्याचेविरुद्ध होणारे दगे पोलिसाकरवी थांबविण्यात आल्याच त्यांनी पाहिल आहे याच धर्मालिप्ततेमुळे अयोध्येतल्या एका मशिदीच देवळात रूपांतर करण हिंदूना शक्य झाल नाही हे त्यानी पाहिले आहे, वेगळ्या शब्दात सागायचे तर भारतावरोबर शांततेन नादण शक्य आहे, स्वत चा धर्म पाळण आणि त्याचा प्रसार करण याच स्वातत्र्य त्यांना आहे, हे त्याच्या ध्यानी येत आहे (वाटल होत त्यापेक्षा भारतातील आपली स्थिती खूपच चागली आहे ही गोष्ट माझ्याजवळ अनेक मुस्लिमानी १९५६ साली मान्य केली ) केवळ टिकून राहण्यापेक्षा काहीतरी जास्त मुसलमानांनी साधल आहे परिस्थितीशी जुळत घेण्यातले फायदे अनेकाच्या नकळतच लक्षात आले आहेत त्यांच्या अस्तित्वाची आणि प्रगतीची मदार भारताच्या धर्मालिप्ततेवरच असेल हे थोड्या प्रयत्नांती त्यांच्या ध्यानी येऊ शकेल याचा त्याच्या धर्मतत्त्वज्ञानावर होणाऱ्या परिणामाचा नेमका विचार अजून झालेला नाही पण महत्त्वाची गोष्ट हीच की धर्मतत्त्वज्ञान काहीही म्हणो, भारतातल्या मुसलमानाना धर्मालिप्ततेचा आधार मिळतो आहे ते त्यांना वरदान ठरणार आहे काही थोडे अद्यापही इस्लामी धर्मराज्याच्या कल्पनेला चिकटून आहेत या कल्पनेचा अर्थ किंवा गुण काहीही असोत, भारतीय

मुसलमानाना सद्य परिस्थिती ती गैरलागू आहे त्याच नुकसान करणारी आहे

याच सर्वांत जोरदार प्रत्यंतर त्यांना आल ते हैद्राबाद राजवट कोसळते-वेळी एका मुस्लिम गृहस्थान म्हटल आहे, ' जेव्हा हैद्राबाद कारवाईची बातमी मी प्रथम ऐकली तेव्हा मी मुसलमानाकरता रडलो मात्र त्या साऱ्या प्रकरणाचा शेवट झाल्यावर जे झाल ते भारतीय मुस्लिमांच्या भल्याकरताच झाल अस मला वाटत मुसलमानांच्या मनात तोवर तग धरून असलेल्या एका अडाणी कल्पनाविश्वाचा यावेळी शेवट झाला आणि जीवनातल्या कटु सत्याना त्याना सामोर जाव लागल '

**पाकिस्थान हा काही स्वर्ग नाही !**

भारत आणि पाकिस्तानमधील दळणवळण सुधारल्यावर आणखी एक गोष्ट मुसलमानांच्या लक्षात आली ती ही की पाकिस्तान हा स्वर्ग नाही भारतातील परिस्थिती तशी अगदी वाईट नाही हे ध्यानी येत असताच पाकिस्तानातली परिस्थिती वाटली होती तितकी चागली नाही हेही त्याना कळल आणि पाकिस्तानच्या इस्लामी राजवटीत, अल्पसख्यांना जी वागणूक दिली जाते, त्याहून कितीतरी चागली वागणूक भारतात अल्पसख्य म्हणून त्यांना मिळते ही गोष्ट कबूल करण्याइतका प्रामाणिकपणाही कित्येकाजवळ आहे

याहून अधिक उजळ बाजू पाहायची तर सयुक्त मतदारसघामुळे राष्ट्रीय हितान्वेषी राजकारणाला मदत होते-- जातीय वर्गवारीऐवजी माणूस म्हणून अधिक विचार करण सोप जात हेही त्यांना उमजल आहे उत्तर प्रदेशातील निवडणुकीतून बहुसख्य हिंदू मतदारसघातून कॉंग्रेस उमेदवाराचा पराभव करून काही मुसलमान स्वतत्रपणे निवडून आले, याचा काहीच बोध न होण अशक्य आहे १९५१ च्या सार्वत्रिक निवडणुकीत हिंदू जातीयवादी पक्षाचा धुव्वा उडाला यालाही मुसलमानाची मतच कारणीभूत होती

१९३० साली हुसेन अहमद मदानी या राष्ट्रीय मुसलमानान भारत हीच मुसलमानाची मातृभूमी आहे, अस म्हणताच कवी इक्बालन आपल्या एका कवितेत त्याचा उपहास करून म्हटल, की मुसलमानांना इस्लामखेरीज वेगळा देश नसतो हीच भावना आणि विश्वास मुसलमानांच्या मनात

खोलवर दडी मारून बसलेला होता गेल्या काही वर्षांतील घटनांनी त्या विश्वासाला धक्के तरी निश्चित दिले आहेत अस ऐकतो की अनिस आणि जोश पाकिस्तानात निघून गेले तेव्हा मुस्लिम लीग वृत्तपत्रानी देखील त्याचा निषेध केला.

१९४७ सालानतर बरेच दिवस आपल्या मुक्तीकरता, निदान मदती-करता बाह्यजगाकडे पाहण्याची पूर्वापार चालत आलेली पद्धत मुसलमानानी चालू ठेवली होती भूतकाळात कधी ब्रिटिशाकडे, कधी जगातल्या इतर इस्लामी राष्ट्राकडे, कधी भारतातल्याच मुसलमानी सस्थानी राजवटीकडे मदतीकरता पाहण्याच्या वृत्तीचंच पर्यवसान पुढे पाकिस्तानच्या यूनोकडे किंवा रशियासारख्या राजवटीकडे पाहण्यात झाल काहीतरी अघटित घडेल आणि ईश्वरी कृपेन परिस्थिती एकदम पालटेल अशी भावनाही कुठेतरी शिल्लक होती या साऱ्या प्रवृत्तींना गेल्या काही वर्षांतल्या घटनांमुळे पायबद बसला आहे हे सारे प्रयत्न फसल्यावर आलेल्या नैराश्यातून हिंदूवर अव-लबून राहण्याची वृत्ती मूळ धरीत आहे हिंदूची बहुसख्या इतकी जबरदस्त आहे की त्याच्या सहकार्यावाचून मुस्लिमांचं भल होण कठीणच

शत्रुत्वाची भावना कमी झाल्यावर अनेक मुसलमान स्थितप्रज्ञपणे हिंदू-कडून अस सहकार्य केव्हा मिळेल याची वाट पाहत होते जातीय पातळी सोडून देशात खऱ्या अर्थी सलोखा आणि सद्भाव निर्माण करू पाहणाऱ्या राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रातील सस्था आणि शक्तीचे हात बळकट करण्याकरता त्यांनी प्रत्यक्ष पावल उचलली नाहीत, पण परिस्थितीच अशी गतिशील बनली आहे, की स्वातत्र्य, लोकशाही यासारख्या कल्पनांच वारं आता कुणालाच स्वस्थ बसू देणार नाही सर्वांना डोळ्यासमोर दिसणार सत्य आहेच की हे सारे मुसलमान अखेर भारताचे नागरिक आहेत आजच्या जगात या गोष्टीला खूपच महत्व आहे हिमालयाएवढ्या अडचणी समोर असल्या तरी आजचा भारत आर्थिक, तात्रिक, सामाजिक आणि सास्कृतिक बाबींत प्रगतीचे नवे टप्पे गाठतो आहे या आर्थिक प्रगतीत कसा भाग घ्यावयाचा हा मुसलमानांसमोर प्रश्नच आहे हिंदूचे पूर्वग्रह आणि मुस्लिमांचं मागासलेपण यामुळे हे अधिकच कठीण होऊन बसल आहे.

जोपर्यंत देशात बेकारी असेल तोपर्यंत मुस्लिम तरुणांच्या बेकारीची शक्यता अधिकच जास्त असेल ज्याप्रमाणात हा प्रश्न सुटेल त्या प्रमाणात भारत आपल्याबरोबर मुसलमानानाही पुढे नेईल

**काही प्रसादचिन्हे**

साऱ्या परिस्थितीने असे वळण घेतल आहे की आधुनिक युगाच्या आव्हानांना खोटी उत्तर देऊन भागण्याजोगं नाही त्याची उत्तर देण्याचं काम काही थोड्या कर्तबगार व्यक्तीवर पडणार आहे जमीन तयार आहे, हव ते पीक तीतून काढला येईल पैकी काही बौद्धिक आणि आध्यात्मिक प्रश्नाना गांभीर्यपूर्वक आणि हुशारीने तोंड दिल जाईलस वाटण्याची चिन्हं दिसू लागली आहेत तरीही या समाजासमोरील रोजच्या जीवनातील प्रश्नांना तोंड देऊ शकेल असा इस्लामचा अन्वयार्थ लावणाऱ्या आणि तो अर्थ स्वत च्या जीवनात उतरलेला साऱ्याना दाखवणाऱ्या नेतृत्वाची गरज निकडीची आहे जन्या विध्वसक प्रवृत्तींचा त्याग करत असतानाच ३९०।मच्या। नवीन विधायक स्वरूपाच दर्शन झालं नाही, तर सुकाणू नसल्याने भरकट-लेल्या जहाजाप्रमाणे या समाजाची अवस्था होईल

राजकीय क्षेत्रात तरी अशी योग्य ती दिशा, १९४७ पूर्वीपासूनच भारतीय राष्ट्रवादाशी समरस झालेल्या राष्ट्रीय मुस्लिम नेत्यांनी दाखविलेली आहे फाळणीनतरच्या बदललेल्या परिस्थितीतही या व्यक्तींनी, लहान झालेल्या भारतातील अधिकच लहान झालेल्या आपल्या समाजाकरता योग्य ते कार्य चालू ठेवल व्यक्तिगत पातळीवर हा कार्यक्रम अनेक ठिकाणी यशस्वी झालेला आहे मात्र या सपूर्ण समाजाचा विचार करता केवळ राजकीय पातळीवरून सर्व प्रश्नांची उकल होण्याजोगी नाही

**धार्मिक तत्वज्ञानाची फेरमांडणी**

धार्मिक बाबीचा विचार करता दोन विचारप्रवाह प्रामुख्याने पुढे आलेले दिसतात एक विचारप्रवाह जमाते इस्लामीचा– पाकिस्तानबरोबरचा दुवा राखू पाहणारा या विचारांचा गट थोडाफार उत्साह जागृत करू शकला तरी द्विराष्ट्रवादाच्या राजकीय आणि सामाजिक दृष्टिकोनाला पोषक असं धार्मिक तत्वज्ञान उभ करू शकत नाही बदललेल्या राजकीय परिस्थितीच्या सदर्भात नवीन कार्यक्रमाची जुळवाजुळव हा गट सध्या करतो आहे रामपूर

इथून प्रसिद्ध होणारं 'झिंदगी' हे या गटाचं प्रमुख मुखपत्र. भूतकाळाशी ठेवलेल्या भावनिक संबंधाचा फायदा या गटाला मिळतो पण आजच्या परिस्थितीच्या सामाजिक, नैतिक किंवा राजकीय मागण्याशी या गटाचं काहीही नातं नाही आणि म्हणूनच या गटाला अभिप्रेत असलेल्या इस्लामच्या अन्वयार्थाला (की जो पूर्वी अनेकदा इतका हानिकारक ठरला) मान्यता देणाऱ्याची संख्या दिवसेंदिवस कमी होत जाण्याचीच शक्यता आहे मात्र काही कारणानं भारतात पुरोगामी सहिष्णुतावाद्यांचीच पिछेहाट झाली– धर्मनिरपेक्षताच कोसळली, आणि बहुसंख्य हिंदू जमात उद्दाम जात्यंधतेला शरण गेली, तर मात्र इस्लामी जात्यंध शक्तीही फोफावण्याची शक्यता नाकारता येत नाही भारताला रसातळाला नेण्याच्या कामी इतराबरोबर मुसलमानही या इस्लामी जातीयवादाला खतपाणी घालून मग भाग घेतील दुसरा विचारप्रवाह जमियत–उल्–उलेमाचा उलेमांची ही संघटना गेली चाळीस वर्षे भारतीय राष्ट्रवादाच्या बाजूने उभी आहे १९४७ सालानंतर थोड्याफार सरकारी पाठिंब्यावर या संघटनेनं आपले प्रयत्न अधिक जोरानं चालू ठेवले आणि भारतीय मुस्लिमांचं हित अखेर राष्ट्रीय धोरण स्वीकारूनच साधता येईल, या विचाराचा जोमानं पुरस्कार केला ही संस्था खुद्द राजकीय नसली तरी हिचे अनेक पुढारी लोकसभासदस्य, मंत्रिमंडळाचे सदस्य अगर अशासारख्या राष्ट्रीय व्यक्ती आहेत एक धार्मिक संस्था म्हणून देशभर खेड्यापाड्यापर्यंत हिचं जाळं विणलेलं आहे दिल्लीहून प्रसिद्ध होणारं 'अल जमीयत' हे या संस्थेचं मुखपत्र आपल्या राजकीय भूमिकेला साजेसं इस्लामच्या चौकटीत बसू शकण्याजोगं धर्मतत्वज्ञानही हा गट मांडतो आहे इस्लामच्या प्रारंभीच्या काळात मदिना शहरातल्या मुस्लीम गटात आणि ज्यूमध्ये 'परस्परसंमत कराराचं' हे तत्त्वज्ञान महंमद पैगंबरानं मांडलं धार्मिक भाषेत त्याला 'मुद्दा' म्हणतात त्याचं म्हणणं असं की स्वातंत्र्योत्तर काळात भारतातले मुस्लिम आणि बिगर मुस्लिम यांच्यामध्ये 'धर्मनिरपेक्ष राज्य' निर्माण करण्याबाबत परस्परसंमत करार झाला आहे ज्या भारतीय राज्यघटनेला आपणच निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या द्वारा मुस्लिमांनी पाठिंबा दिला ती राज्यघटना म्हणजेच हा मुद्दा करार [1] (ज्या घटनासभेनं भारताची राज्यघटना संमत केली, तिचे मुसलमान सदस्य मुसल-

मानांनी जातीय मतदारसंघातून निवडून दिलेले होते) भारतातल्या या मुस्लिम समाजाचं मग हे 'इस्लामी' कर्तव्यच ठरतं की त्यांनी या राज्य-घटनेला आपल्या निष्ठा वाहाव्यात आणि एकूण समाजाचा एक अल्पसंख्य विभाग म्हणून राष्ट्रीय जीवनात भाग घेत असताना, जितपत शक्य असेल तितक्या प्रमाणात व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनातील आपल्या इस्लामी निष्ठा जोपासाव्यात लोकशाही चौकटीत बसतील आणि इतरांना मान्य असतील अशा इस्लामच्या सामाजिक, आर्थिक, व्यवहारी अंगोपांगांना आकार द्यावा

वरील कल्पनेच्या महत्त्वपूर्णतेची चर्चा करण्यापूर्वी एक गोष्ट सांगितली पाहिजे ती ही की हा गट किमान दोन बाबतींत दुबळा आहे मुस्लिम लीगनं जोपासलेल्या—आणि या गटाने झिडकारलेल्या—भावना आणि महत्त्वा-कांक्षेपासून पर्यायानं सर्व मुस्लिम समाजाच्याच मनात दडून असलेल्या छुप्या निष्ठांपासून हा गट अलिप्त आहे, ही यातली पहिली बाब दुसरी बाब म्हणजे हे उलेमा राजकीय बाबतींत हुशार असले तरी त्याचं आधुनिक शिक्षण झालेलं नाही साहजिकच आपल्या समाजाची आधुनिकतेशी सांगड घालण्याच्या बाबतीत पुढाकार घालून द्यायला ते असमर्थ आहेत

आता विचार करूया सांस्कृतिक पातळीचा शिकलेसवरलेले इतकेजण पाकिस्तानात निघून गेले की केवळ मूठभर सुशिक्षितच मागे राहिले भारतीय संस्कृतीच्या विविध अंगोपांगांपैकी एक सुसंवादी अंग म्हणून इस्लामी संस्कृती कशी नांदवता येईल या प्रश्नावर यांपैकी काही थोड्यांनी लक्ष केंद्रीत केलं हुमायून कबीर आणि अबीद हुसेन यांसारख्या लेखकांनी याला आवश्यक अशी ऐतिहासिक आणि बौद्धिक पार्श्वभूमी पुरविली या प्रश्नाचं प्रतिबिंब भाषेच्या प्रश्नात पडलेलं दिसेल भारताची राष्ट्रभाषा ठरणारी हिंदी, उर्दूच्याही पुढे गेलेली पण उर्दूचा दुस्वास न करणारी हिंदी असेल, की उर्दूच्या मुळावर येणारी असेल? भारतातले मुसलमान इंग्रजी-प्रमाणेच एक अधिक शिकावयाची भाषा म्हणून हिंदी स्वीकारतील की उर्दूला पदच्युत करणारी भाषा म्हणून हिंदीचा तिरस्कार करीत असतानाच अखेर नाइलाजानं त्या हिंदीपुढं मान तुकवणं त्यांना भाग पडेल?

सर्वांत शेवटी शिल्लक उरतो तो अतिशय मूलभूत असा धार्मिक बाजूचा

प्रश्न पुढील पन्नासएक वर्षांत पाकिस्तानी इस्लामपेक्षा भारतीय इस्लाम जगाला अधिक काहीतरी देईल असं आम्ही यापूर्वीच म्हटलं आहे याचा अर्थ असा नव्हे की भारतीय इस्लामपुढील मार्ग अगदी सोपा आहे खर तर तो अतिशय यातनामय असा आहे आमच भाकित खर ठरायच असल तर त्याला कारण इतकच की आधुनिक विशाल जगाशी त्यातल्या त्यात आधुनिकतेशी 'इस्लाम'चा सरळसरळ सबध भारतातच येणार आहे परिणामी यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांची उकल प्रथम भारतातच होईल

राजकीय सत्ता आणि सामाजिक जडणघडण या इस्लामच्या दृष्टीन अतिशय महत्त्वाच्या असलेल्या प्रश्नाची उत्तर आजवर तरी हो किंवा नाही या शब्दातच देण्यात आलेली आहेत मुसलमानाच्या हाती एकतर सपूर्ण राजकीय सत्ता होती किंवा ती अजिबात नव्हती राजकीय सत्तेत आजवर मुसलमानानी कुणालाही भागीदारी करू दिलेली नाही (मदिनामध्ये ज्यू बरोबर जो पहिला 'मुहद्दा' झाला त्यामुळे या दोन जमातींना आपआपल्या परीने जगण्याचा हक्क तेवढा मिळाला— आधुनिक अर्थी एका समान जीवनाच्या उभारणीत ज्यू आणि मुसलमान त्यावेळी सामील झाले नाहीत नाही म्हणायला अलीकडच्या काळातला ख्रिश्चन बहुसख्येचा लेबनॉन हा एक देश असा आहे की जिथल्या मुस्लिम अल्पसख्याची तुलना भारतातल्या मुसलमानाबरोबर करता येईल) पाकिस्तानातले मुसलमान आजही तिथल्या अल्पसख्य हिंदूना सत्तेत भागीदार करून घ्यायला तयार नाहीत. 'स्वतःच असं वेगळ राष्ट्र नसेल तर मुसलमान खऱ्या अर्थी मुसलमान राहू शकतो का ?' या साऱ्या प्रश्नाला भारत आणि पाकिस्तानमधील मुसलमानानी अगदी फाजील उत्साहान 'नाही' अस उत्तर दिल या नकारार्थी उत्तरामागे परपरागत श्रद्धेच दडपण खूपच आहे इस्लामी कायद्याचं आज्ञाधारकपणे पालन करणारा साचेबद्द समाज घडवण हे इस्लामला अतिशय जिवलग असलेल मध्यवर्ती सूत्र आहे भारतातील बदललेल्या परिस्थितीत नेमकी हीच कल्पना कोसळू पाहत आहे एका शाश्वत सत्याचा भाग म्हणून जी गोष्ट आजवर मानली ती आता गैरलागू कल्पना ठरते आहे घडायला अतिशय योग्य असूनही प्रत्यक्ष घडण जवळजवळ अशक्य अस या अपयशाच स्वरूप नाही इतिहासात तस अनेकदा घडत कित्येक चागल्या ध्येयाची

पूर्ती राहूनच जाते एखाद स्वप्न अपुर राहिल– ध्येय साध्य झाल नाही तरी त्यामुळे सार जीवनच विस्कळीत होत नाही. अशी अपूर्ण स्वप्न उराशी बाळगून धार्मिक माणस जगू शकतात प्रश्न उभा राहतो जेव्हा एखाद ध्येय निरर्थक भासू लागत, त्या स्वप्नाचा अर्थ समजेनासा होतो तेव्हा स्वत च्या ध्येयपूर्तीच्या आड येणाऱ्या ऐतिहासिक घटनाच अर्थ समजून घेण सोप असत स्वत च्या ऐतिहासिक प्रगतीलाच अडथळा आणणाऱ्या ध्येयस्वप्नांचे अर्थ लावण मात्र तस सोप नसत.

इतिहासात मुस्लिम जमाती जिकल्या गेल्याची उदाहरण आहेत पण त्या सर्व वेळी ज्याच्याकड बोट दाखवता येईल असा [illegible] अस्तित्वात होता पराभूत झाल्याची भावना असली तरी ती अवस्था तात्पुरती असे तीतून सुटण्याची आकाक्षा धरता येत असे स्वातत्र्याकरिता धडपड करता येत असे भारतातील मुसलमानाची पचाईत अशी, की ते स्वातत्र्य मुळी त्याना मिळालेलच आहे मात्र प्राप्त परिस्थितीच्या कचाटचातून सुटण्याची कसलीही आशा त्याना नाही की तसा धडपडाट करून काही फायदा नाही

मनान भूतकाळाला चिकटून राहिलेले त्याच्यातले काही स्वप्नाळू अद्यापही सर्व भारतावर मुस्लिम सत्ता प्रस्थापित करण्याची स्वप्न पाहत असतील पण केवळ भौतिकच नव्हे तर अधिभौतिकदृष्टचाही ते अशक्य आहे काही मुसलमानाना सुख मिळाल तरी त्यांत न्यायाची गळचेपी असेल इतर काही केवळ वैतागान हिंदूकडून जिकले गेल्याची कल्पना करून घेतील आणि मिळालेल स्वातत्र्य उपभोगण्याच नाकारून पराभूत समाज म्हणून स्वत ची गणना करू लागतील ही त्याची स्वत ची आत्मवचना तर असेलच, पण स्वत वरची जबाबदारी टाळण्यासारखहो ते ठरेल यामुळे बाह्यजगात त्याचा ऱ्हास तर होईलच, पण त्याबरोबर ते आपला आध्यात्मिक विनाशही ओढवून घेतील परिस्थितीच आव्हान फारच मोठ आहे केवळ 'जित' किवा 'जेते' या कल्पनांच्या पलीकडे गेल्याखेरीज त्याला तोंड देता येणार नाही

भारतातील मुस्लिम गटाची स्थिती किती वेगळी आहे हे समजण्या-करिता सोव्हिएट रशियातल्या मुस्लिमाच उदाहरण घेऊ या एका अफाट बिगर मुस्लिम राज्यतला अल्पसख्य गट असच तेथल्या मुस्लिमाच वर्णन

करता येईल पण तिथल्या सत्तेमध्ये त्याना कोणताही वाटा नाही तिथल्या ध्येयधोरणाची निवड आणि त्याबाबतच्या जबाबदाऱ्या यात ते वाटेकरी नाहीत तीच गोष्ट तुर्कस्थानातील मुसलमानाबाबत की ज्यानी अगदी स्वेच्छेने धर्मालिप्त राज्याचा स्वीकार केला आहे तुर्कस्थानी मुसलमानांनी अस ठरवून टाकल की स्वायत्त गणराज्याच्या कल्पनेतच मुसलमानाच– निदान तुर्की मुसलमानांच कल्याण आहे हा निर्णय त्याचा स्वतःचा आहे आणि त्यातून ओघानच येणार समाजजीवन ही त्या निर्णयाचीच अमल-बजावणी आहे

भारतातल्या मुसलमानांसमोरील समस्या याहून अगदी निराळी आहे समानतेच्या नात्यान इतराबरोबर जगायला शिकण [1] इस्लामच्या सबध इतिहासात या समाजासमोर हा प्रश्न कधी उपस्थित झाला नव्हता मनुष्यप्राण्याच अस्तित्व आणि सामाजिक नीतिमत्ता याबाबतचे अधिक गहन प्रश्न या एका समस्येतून उद्‌भवतात अध्यात्मज्ञान, सत्य, इतराच्या धर्मश्रद्धाबाबतचा दृष्टिकोन, अशा इतर बाबीशी या प्रश्नाचा सबध पोहोचतो अस असूनही इस्लामच्या आजवर प्रकट झालेल्या तत्वज्ञानात आणि विचारात याबाबतच कसलही मार्गदर्शन नाही खेदाची बाब अशी की ज्या समाजाबरोबर या मुसलमानाना राहला शिकायच आहे, त्या जातिभेदाधिष्ठित हिंदू समाजालाही इतराबरोबर अशा समानतेच्या नात्यान जगायची कला अद्याप शिकायची आहे

**कठीण कोड !**

हे कोडे सुटायला कठीणच इतक कठीण की पाकिस्तानची निर्मिती हा या प्रश्नापासूनच दूर पळण्याचा प्रयत्न होता अस वाटत फाळणीनतरच्या भारतातील मुसलमानाच्या दृष्टीनं मात्र ही पळवाटसुद्धा एक मृगजळच ठरल नव्हे, पाकिस्तान निर्मितीनतर ते कोड सुटण अधिक कठीण होऊन बसल

इस्लाम आणि लोकशाही याचे परस्पर सबध काय आहेत हा प्रश्न फाळणीनतर सर्वात ठळकपणे उभा राहिला, पाकिस्तानी मुसलमानांसमोर. पण त्या प्रश्नाचा अधिक खोलवर विचार मात्र करावा लागणार होता भारता-तल्या मुसलमानाना लोकशाहीची कल्पना इस्लाममध्ये अंतर्भूत आहेच

असा दावा या शतकात अनेकवार केला गेला मात्र त्या दाव्यात एकूण विचाराचा भाग कमीच होता लोकशाही कल्पनेपाठोपाठ येणाऱ्या जबाबदाऱ्यांबाबतची जाणीव त्यामागे जवळजवळ नव्हतीच तस पाहिल तर व्यक्तिमात्राची किंमत, स्वातंत्र्य, जबाबदारपणा इत्यादी गोष्टी शिकविणाऱ्या कोणत्याही धर्मात लोकशाहीची कल्पना पर्यायान असतेच पण या धार्मिक पातळीवरच गूढ शाश्वत तत्त्व आणि रोजच्या व्यवहारात बंधुभावनेची निर्मिती या दोन गोष्टींमधल अंतर दुर्लक्ष करता येण्याजोग नाही

ऐतिहासिकदृष्ट्या पाहायच तर लोकशाहीची कल्पना मुसलमानांना नवीनच आहे खर तर हिंदूनाही ती नवीनच आहे खर तर साऱ्या जगालाच लोकशाही ही कल्पना अद्याप एक नवीन गोष्ट आहे भारत किंवा पाकिस्तानातील सध्याच्या घटनाचा विचार करताना पाश्चात्य जगात लोकशाहीला सध्याच स्वरूप येण्यापूर्वी किती वेगवेगळ्या अवस्थातून आणि झगड्यातून जाव लागल हे विचारात घेतल पाहिजे १९४७ सालापासून भारताची लोकशाही दिशेने चालू असलेली वाटचाल निश्चितच उत्साहजनक आहे. त्या नाट्यातील मुस्लिम जमातीची भविष्यातली भूमिका हीही महत्त्वपूर्ण असेल

पाकिस्तानातील मुसलमानांच्या समजुतदारपणाची कसोटी ते तिथल्या अल्पसंख्याकांबरोबर कशी वागणूक ठेवतात ही आहे भारतातील मुसलमानाची कसोटी ते बहुसंख्य समाज आणि एकूण राष्ट्राबाबत काय वागणूक ठेवतात ही आहे किती प्रमाणात, कोणत्या स्वरूपात, कसल्या तऱ्हेचा ध्येयवाद उराशी बाळगुन भारतातले मुसलमान एकूण भारतीय समाजाच्या कल्याणाच्या कार्याला वाहून घेणार आहेत ? भारतीय इस्लामच भौतिक आणि आधिभौतिक कल्याण, तिथल्या बिगर मुस्लिम भारतीयाच्या निष्ठा आणि कार्याशी ते कस निगडित करणार आहेत ?

हे प्रश्न सोपे नाहीत पूर्वी म्हटल्याप्रमाणे १९४७ साली मुसलमानानी या प्रश्नापासून दूर पळण्याचा प्रयत्न केला. भारतीय मुसलमान हा भारतीय आहे आणि मुसलमानही आहे हे द्विविध अस्तित्व नाकारण्याचा निकराचा प्रयत्न फसला आहे या दोन्हींच अद्वैत साधण्याच्या मार्गाचा अद्याप खर तर नीटसा विचारही झालेला नाही ज्या काही थोड्या व्यक्तींनी हे साधलं त्याच भल झाल पण भारतासारख्या एका आधुनिक धर्मनिरपेक्ष लोकशाही

राष्ट्रातल्या अल्पसंख्य भारतीयांच्या जीवनातल्या इस्लामचा अन्वयार्थ अद्याप लावला गेलेला नाही. यापूर्वी मुसलमानांनी कोणत्याही प्रश्नाला केवळ इस्लामी उत्तर देऊन वेळ भागवली—या वेळीची स्थिती वेगळी आहे भारतातील मुसलमान आज अगदी अलग पडलेला समाज आहे धर्मतत्त्वज्ञान कायदा आणि नीतिमत्तेसारख्या मूलभूत प्रश्नांची उत्तरं त्यानं स्वतःची स्वतःच शोधून काढायची आहेत

**बौद्धिक स्वातंत्र्य**

आधुनिक काळाला अनुरूप असा इस्लामाचा अन्वयार्थ लावण्याची निकड निर्माण झालेली असताना एक महत्त्वाची गोष्ट भारतातील मुस्लिमाला अनुकूल आहे– त्याचं बौद्धिक स्वातंत्र्य । धार्मिक प्रश्नांचा कळकळीनं, प्रामाणिकपणानं विचार करण्याचं, निर्भयपणे बोलण्याचं, जे जे लिहावंसं वाटेल ते प्रसिद्ध करण्याचं असलं स्वातंत्र्य इस्लामी जगतात इतरत्र कोठेही-तुर्कस्थानातही बहुधा नाही इतर सर्वत्र, विशेषतः पाकिस्तान आणि अरब जगतात एकीकडे सरकारी कात्री (Censorship) आणि त्याहून अधिक महत्त्वाचं असं पूर्वग्रहदूषित, संकुचित समाजशक्तीच्या भीतीचं दडपण यामुळे उघड्या, मोकळ्या चर्चेला वाव नाही भारतात मात्र ज्याला जे काही म्हणायचं असेल, मग ते परंपरागत असो किंवा नवीन असो, विध्वंसक असो की विधायक असो, ते म्हणण्याचं स्वातंत्र्य आहे आणखी दोन गोष्टी या स्वतंत्र विचाराला अनुकूल आहेत इस्लाम या विषयात कोणतंही अधिकृत धोरण भारतानं ठेवलेलं नाही आणि धर्मविषयात दादागिरी करणाऱ्या संस्थाही भारतात नाहीत सांस्कृतिक क्षेत्रातील वर्षानुवर्षांची निर्मितिक्षम भारतीय परंपरा, तिला मिळालेलं भारतीय सहिष्णुतेचं पारंपरिक पाठबळ आणि ब्रिटिश राजवटीच्या काळात उदित झालेल्या स्वातंत्र्याच्या प्रेरणा या साऱ्यांचा फायदा या विचारमंथनाला मिळेल

धर्म आणि आधुनिक जगाचे परराष्ट्रसंबंध ठरवीत असताना तें आधुनिक जग, आहे तसं सरळ नजरेनं पाहण्याचा निश्चय जरूर हवा वास्तवाला सामोरं जाण्याची तयारी हवी परमेश्वर समजणं हे अंतिम शहाणपण झालं त्या शहाणपणाची सुरुवात वास्तवाला तोंड देऊन त्या वास्तवाचं खरं स्वरूप आहे तसं समजून घेऊन करावी लागेल

**इस्लामची बंद कवाड**

याचबरोबर बऱ्याच प्रश्नांची सोडवणूक अद्याप व्हावयाची आहे हे मान्य करण्याची तयारी हवी इस्लाममध्ये हा प्रामाणिकपणा क्वचितच आढळतो सर्व प्रश्नांची उत्तर इस्लाममध्ये आहेतच अशी भूमिका घेतली जाते या सर्व प्रश्नाची उत्तर इस्लामच्या तत्त्वज्ञानात कोठेतरी केव्हातरी दिलेलीच आहेत, त्याचा नव्यान विचार करून उत्तर शोधण्याची गरजच नाही, या विचाराचा पगडा मुसलमानाच्या मनावर इतका जबरदस्त आहे की त्यामुळे त्याच्या मनाची सारी कवाड बद झाली आहेत पूर्णत्वाकडे जाण्याच साधन म्हणून नव्हे तर ते पूर्णत्व साधल्याच उदाहरण म्हणून कुराणाकडे बोट दाखवण्यात येत इस्लामी कायदे आणि इतिहास म्हणजे जणू सर्व प्रश्नाची उत्तर सापडवणारी खाण आहे थोडाफार धुडायच्या काय तो अवकाश की आजच्या कोणत्याही प्रश्नावर तिथ उत्तर सापडेल धर्म ही खर तर जीवन-मार्गावर प्रेरणा देणारी बाब, त्याऐवजी ते जीवनच तिन बदिस्त करून टाकल आहे

मुसलमानाची घोडचूक ती ही की इस्लाम म्हणजे एक सपूर्ण बदिस्त-व्यवस्था आहे अस मानण त्या व्यवस्थेची कवाड केवळ बाह्यजगातील सत्यानाच, नव्हेत तर माणसांनाही बद करण्यात आली भारतीय मुसलमानां-बाबत, पर्यायाने भारतीय इस्लामबाबत आशेला जागा हीच की ही बद कवाड उघडून ते बाहेर येतील, त्यासाठी आवश्यक ते धैर्य आणि नवीनाला सामोर जाण्याची नम्रता त्याच्याजवळ असेल इतर धर्मश्रद्धाबरोबर बधु-भावान नांदण्यास आवश्यक ती माणुसकी त्याना सापडेल

ही गोष्ट त्या समाजाच्या दृष्टीन आवश्यक आहे आपल्या सर्व घटकाची रचनाशक्ती आणि निष्ठा भारताला आवश्यक आहे, पण त्याहूनही जास्त निकडीन एकूण इस्लामी जगताला तिची जरुरी आहे कारण वर– करणी अलग पडलेला वाटला तरी भारतीय मुस्लिमाचा हा गट अखेर त्या मुस्लिम जगताचाच भाग आहे इतर मुस्लिम जगाप्रमाणे त्यालाही प्रगतीची जरुरी आहे सामाजिक न्यायाच्या प्रचलित कल्पना-नुरूप इस्लामच रूपांतर घडवणं ही अवघड जबाबदारी पाकिस्तानवर आहे बाह्यजगाबरोबर त्या इस्लामचा सुसवाद प्रस्थापित करण ही कामगिरी

भारतातल्या मुस्लिमावर आहे या दोन्ही गोष्टी एकूण मानवजातीच्या दृष्टीन महत्त्वाच्या आहेत आधुनिक काळाच्या इस्लामकडे या दोन प्रमुख मागण्या आहेत कोणतीही सस्कृती आजच्या युगात सर्वार्थानि स्वतन्त्र नाही माणसान निर्माण केलेल्या प्रत्येक सस्कृतीला असा सुसवाद आज साधावा लागतो आहे पाश्चिमात्य जगाला खर तर या बाबतीत सर्वांत अधिक शिकायची गरज आहे पण कोणत्याही सस्कृतीची यातून सुटका मात्र नाही. भूतकाळात सस्कृती अशा स्वतन्त्रपणे, इतर एखाद्या सस्कृतीच्या बरोबर किंवा तिच्या विरोधात नादल्या आता आपल्याला शिकायच आहे सहकार्य! इतराबरोबर इस्लामलाही कल्पक बनल पाहिजे बहुधा भारतातच प्रथम इस्लाम हे शिकेल

कारण मुसलमानाच एकूण जगात जे स्थान तेच भारतातल्या मुस्लिमाच भारतातल स्थान एक महत्त्वाचा अल्पसख्य गट । त्यांना त्याचा स्वत चा असा वारसा आहे स्वत ची मूल्ये आहेत भविष्याबाबतच्या खास आकाक्षा आहेत पण त्याचे प्रश्न मात्र त्याना आपणा-इतराबरोबर सोडवायचे आहेत याबाबत त्याची स्वत ची अशी भूमिका असली तरी सख्येन आणि ताकदीन त्याच्याहून वरचढ असलेल्या इतराची नीतिमूल्ये व भूमिकेशी सुसवादी अशी ती भूमिका असणार आहे जगातल्या इतर सर्व गटांप्रमाणे भारतातील मुसलमानांचं भवितव्य हे अखेर त्यांची अंतर्गत कार्यशक्ती, जोम आणि विश्वास याच्यावर आणि आपल्या देशबाधवाबरोबर कोणते सबध ते प्रस्थापित करतात यावर अवलबून आहे

**पाकिस्तान इस्लामी राज्य ?**

गतकालीन वैभवाच्या पायावर इस्लामी इतिहासाची पुनर्स्थापना करण्याच्या प्रयत्नात जगातील इतर सर्व मुस्लिम गटाहून जास्त जाणीवपूर्वक आणि गाजावाजा करीत भाग घेतला तो 'पाकिस्तानी मुसलमानांनी 'मुस्लिम' म्हणूनच एकत्र नादायची ईर्षा असलेला हा गट आहे राजकीय स्वातन्त्र्यासाठी झगडा करून या गटान ते मिळवल. एका राष्ट्राची शक्ती आता या गटामागे उभी आहे आणि आधुनिक जगात आपल्या सामाजिक जीवनाला योग्य वाटेल ते स्वरूप देण्याची जबाबदारीही म्हणूनच या गटावरच आहे एक 'सामाजिक ध्येय म्हणून दिसाव्या

शतकातील इस्लामचं रोजच्या व्यवहारातून दर्शन घडवणारा धर्मनिष्ठ समाज आता आकार घेणार— इस्लामी इतिहास पुनश्च गतिनिष्ठ बनून या आधुनिक काळातही आपला चमत्कार दाखवणार असं सतत सांगितलं जातं होतं पण पाकिस्ताननिर्मितीच्या नंतरच्या दशकभराच्या काळातच त्या राष्ट्राच्या जीवनात इस्लामचं स्थान काय याबाबत अनेक अवस्थांतून आणि विश्लेषणातून पाकिस्तानला जावं लागलं आहे यातली एकही अवस्था निर्णायक नव्हती— स्पष्ट नव्हती धर्म आणि समाजजीवन यांमधील निकटच्या संबंधावर सुरुवातीच्या काळात खूप जोर देण्यात येत असे इस्लामी समाजाचं वास्तव दर्शन घडवणं, हेच पाकिस्तानचं ध्येय असलं पाहिजे याबाबत खूप उत्साह होता तो धर्म समजून घेऊन प्रत्यक्ष जीवनात उतरवता यावा हेच पाकिस्तानच्या अस्तित्वाचं सार होतं या साऱ्यामागची सर्वमान्य भूमिका होती ती ही की, इस्लाम आणि इस्लामी समाजाला बराच कालपर्यंत दडपणाखाली ठेवण्यात आलं होतं- पाकिस्तानच्या स्थापनेमुळे आता त्या ग्रहणातून त्या समाजाची मुक्तता झाली असल्याने आपल्या इतिहासकालीन गतवैभवाच्या पुनर्प्राप्तीच्या मार्गावर जोराने वाटचाल सुरू होणं अपरिहार्य होतं

**भ्रमनिरास**

अलीकडच्या काही काळात या साऱ्याबाबत एक भ्रमनिरासाची भावना मूळ धरू पाहते आहे राष्ट्रीय जीवनात पदोपदी उद्भवणाऱ्या साऱ्या समस्या ' इस्लामी ' पद्धतीनं सोडवणं हे काम वाटलं त्याहून खूप जास्त कठीण होतं अकलेपेक्षा उत्साहाचा अधिक वापर करून काही प्रश्नांची सोडवणूक इस्लामच्या आधारे करण्याचे काही प्रयत्न झाले— ते सारे वेडे-वाकडे ठरले १९५३ मध्ये लाहोरमध्ये अहमदिया पंथाविरुद्ध ज्या क्रूर दंगली झाल्या, त्या साऱ्या धर्माचं नाव घेऊनच झाल्या— असं न्या मुनीर यांचा अहवाल सांगतो या दंगलींनंतरच्या काळात हा इस्लामी उत्साह थोडा थंडावला इस्लामचा जप सतत करणारी मुस्लिम लीग प्रत्यक्षात भरीव असं काहीच देऊ शकली नव्हती— निवडणुकीत लोकांनी तो पक्षही मग झिडकारला इस्लामी राज्याच्या कल्पनेत फारसं तथ्य नाही असं अनेकांना वाटू लागलं आणि त्यांनी आपलं लक्ष इतरत्र केंद्रित केलं

कोणतही राष्ट्र धर्माकडे सहजी पाठ फिरवू शकत नाही– इतिहासाकडे तर नाहीच नाही कोणताही समाज स्वतंत्र झाला की आपल्या धर्माची इतिहासाशी सांगड घालण्याची जबाबदारी त्याच्यावरच पडते इस्लामी राज्याची कल्पना अपेशी ठरणं सोप असल तरी त्या प्रयत्नाच महत्त्व कमी ठरत नाही पाकिस्तानची जनता आज निर्माण करीत असलेला इतिहास केवळ त्या राष्ट्राचच नव्हे, तर इस्लामचही भवितव्य घडवणार आहे त्याची इच्छा असो वा नसो, ते घडवतील तो इतिहास 'इस्लामचा' इतिहास ठरणार आहे इस्लामी राज्याची कल्पना आता कितीही अडचणीची वाटली तरी ती सोडून देता येण आता खूपच कठीण आहे– एक बदललेला निर्णय एवढच त्याच स्वरूप राहणार नसून, धार्मिक क्षेत्रात त्याचे खोलवर प्रतिसाद उमटणार आहेत आधुनिक जगात झपाट्यान प्रगती करून घेण्याच्या कामी 'इस्लामी' तत्त्वांचा फारसा उपयोग नाही याची जगातील एका फार मोठ्या मुस्लिम गटान दिलेली ती कबुली असेल इस्लामचा नवीन अर्थ लावण्याची जबाबदारी त्या पाठोपाठ येऊन पडेल कारण कसल तरी ध्येय, श्रद्धा अगर प्रेरणा नसेल तर समाज जगू शकत नाही 'इस्लाम' अपयशी ठरल्यावर त्या जागी इतर एखाद्या ध्येयाची स्थापना करावी लागेल, नाही-तर निराशेपोटी येणाऱ्या विघटनेला आणि गोंधळाला तोंड द्याव लागेल

इस्लामच्या आधारावर पाकिस्तान काही रचनात्मक कार्यक्रम आखू शकेल ही बाब अतिशय कठीण होती– मात्र धार्मिक अतिरेकवाद्यांना त्याची कल्पना नव्हती आता 'इस्लाम' बाजूला ठेवून काही रचनात्मक कार्यक्रम आखणं ही तितकीच कठीण बाब होऊन बसली आहे– मात्र त्याची धर्म-निरपेक्षतावाद्यांना नीटशी कल्पना नाही 'प्रागतिक धर्मालिप्तता' हाच एक धर्म आहे त्याला स्वत चा असा नैतिक आणि बौद्धिक पाया आहे– इतिहास आहे– हुतात्मे आहेत परपरागत धर्मश्रद्धाचा त्याग केला की धर्म-निरपेक्षता आपोआप अवतरते अशी अनेकाची समजूत असते–त्या समजुतीत तथ्य नाही पाकिस्तानचा आजचा इतिहास त्याचीच साक्ष देतो पुरोगामी धर्मनिरपेक्षतेचा अगिकार करण्याचा निर्णय कदाचित पाकिस्तान घेईलही– मात्र ते ध्येय गाठण्यासाठीही त्याला बरीच कठीण वाटचाल करावी लागेल तूर्त तरी इस्लामी राज्याची कल्पना पाकिस्तानन पक्की स्वीकारली आहे

असच आपण धरून चालू या ते ध्येय गाठण एक तर पाकिस्तानला जमेल वा कालांतरानं त्या जागी इतर एखाद्या ध्येयाची स्थापना करण्यात येईल वा यांपैकी कशालाच यश येणार नाही तिन्हीही शक्यता महत्त्वाच्या आहेत

एक आदर्श याअर्थी 'इस्लामी राज्या'च्या कल्पनेचा उहापोह आपण नंतर करू या– तूर्त इतक म्हणता येईल की, एका अर्थी पाकिस्तान हे इस्लामी राष्ट्र आहेच तर दुसऱ्या अर्थी त्या आदर्शाप्रत जाण्याची क्रिया चालू असली तरी ते ध्येय अद्याप गाठल जायच आहे मात्र त्या आदर्श स्वरूपाबाबत कितीही मतभेद असले तरी, पाकिस्तानच अस्तित्व हीच मुळी भारतीय इस्लामच्या दृष्टीन एका धार्मिक सत्याची प्रचीती आहे एका विशिष्ट धार्मिक आचार-विचाराच्या रिंगणात वावरणारा, राजकीय अर्थी स्वतंत्र असलेला समाज, हे इस्लामला अभिप्रेत असलेल मुख्य सूत्र आहे इस्लामचा हा सदेश प्रत्यक्षात उतरवण यापूर्वी काही शतके मुसलमानांना शक्य झाल नव्हत, मात्र त्याच्या याबाबतच्या आकांक्षा तरीही लोप पावलेल्या नव्हत्या एखाद्या लहानशा कारणानेही त्या उफाळून वर येत असत भारतीय सदर्भात याबाबतची उदाहरण म्हणून वलिउल्ला चळवळ, एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीची वहाब्बी चळवळ आणि काही अशी १८५७ च्या बडाचाही उल्लेख करता येईल विसाव्या शतकातील खिलाफत चळवळही याच मालिकेत बसते म्हणूनच १९४० साली, मध्यमवर्गीय मुसलमानांच प्रतिनिधित्व करणाऱ्या मुस्लिम लीगन पाकिस्तानची कल्पना माडताच तिला सर्व मुसलमानाचा जोरदार पाठिंबा मिळाला खर तर इस्लामच्या सर्व परपरागत श्रद्धा उराशी जपणारा धार्मिक मुसलमान अशिक्षित होता पाश्चात्य सस्कारापासून अलिप्त होता याउलट त्याच नेतृत्व करणारे मध्यमवर्गीय नेते पाश्चात्य सस्कार झालेले होते या आधुनिक 'बूर्झ्वा' नेतृत्वाचा परपरेशी बेताचाच सबध होता– त्याच्या स्वप्नांचा मुख्यत्वे त्यांचे स्वत:चे हितसंबध आणि महत्त्वाकाक्षा याच्याशी जास्त निकट सबध होता– मुसलमानाच्या 'धार्मिक' उत्साहाच नेतृत्व करण्याची त्याची पात्रता बेताचीच होती पण या मागणीन निर्माण केलेला उत्साह इतका प्रचड-झिंग आल्याइतका होता की, या मध्यमवर्गीय नेतृत्वान जो देऊ केला तोच कार्यक्रम इस्लामच स्वप्न साकार करण्याचा कार्यक्रम

म्हणून इतर समाजान मान्य केला,

पाकिस्तानच्या कल्पनेला मिळालेला प्रचंड—जवळ जवळ एकमुखी पाठिंबा, ज्या झपाट्यान ती कल्पना प्रत्यक्षात उतरली आणि ते होताना तिन जो भावनावेग निर्माण केला, त्यान राजकीय पुढारी स्वत च चकित झाले इस्लामी महत्त्वाकाक्षेच्या या लाटेवर आपण स्वार झालो आहोत यावर प्रथम त्याचाही विश्वास नव्हता, हाहा म्हणता इस्लामी राज्याच्या कल्पनेनं पेट घेतला— ती प्रत्यक्षात पाकिस्तानरूपान साकार झाली

भारताच्या फाळणीला याहून इतर गोष्टी कारणीभूत नाहीत असं आम्हाला सुचवायच नाही विसाव्या शतकाच्या त्या दशकात खूपच महत्त्वाच्या आणि गुतागुतीच्या घटना घडल्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, भावनिक आणि इतर अनेक कारणांनी मुसलमानाच्या वृत्तीला खतपाणी घालण्याच काम केल

**कल्पना स्पष्ट नाही**

इस्लामी राज्याच्या कल्पनेबाबत फाजील उत्साह दाखवणाऱ्या अनेक पाकिस्तान्याना जेव्हा इस्लामी राज्याबद्दलच्या त्याच्या नेमक्या कल्पना काय अस विचारल तेव्हा त्यातल्या अनेकाना त्याच उत्तर देता आल नाही काहीनी इतिहासातील पूर्वीच्या मुसलमानी राजवटीचा आदर्श म्हणून उदाहरणं दिली, तर काहीची वर्णन आधुनिक काळातील इतर देशातल्या राजवटीशी मिळतीजुळती होती प्रश्न विचारणाऱ्याचा रोख असा होता की, लोकशाहीप्रधान, धर्मनिरपेक्ष, उदारमतवादी किंवा एखाद्या ख्रिश्चन राष्ट्राच्या तुलनेत इस्लामी राज्याची दिसणारी खास वैशिष्टचे कोणती ? अशी काही खास वेगळी काढता येण्याजोगी वैशिष्टचे असती तर, इस्लामी राज्यस्थापनेबाबत जो उत्साह मुसलमानानी दाखवला त्याचा अर्थ समजू शकला असता आणि अशी काही वैशिष्टचे नसली तर ? इस्लामी राज्याची कल्पना मुळातच अर्थहीन आहे असाही ध्वन्यर्थ प्रश्न विचारणाऱ्या व्यक्तीच्या मनात होता मिळालेल्या उत्तरावरून असं दिसल की, लोकशाही— न्याय— बंधुत्व-समान वागणूक इत्यादि पाश्चिमात्य राजवटीची वैशिष्ठचेच या इस्लामी राज्याची वैशिष्ठचे होती प्रश्न विचारणाऱ्या परदेशी व्यक्तीला अर्थातच एक गोष्ट ठाऊक नव्हती— मुसलमानी मनाची घडण । इस्लामी राज्य हा

एक राज्यव्यवस्थेचा आविष्कार नव्हताच मुळी —तो खर तर इस्लामचाच एक अविष्कार होता जशी इस्लामी कला, इस्लामी तत्त्वज्ञान— तसच इस्लामी राज्य ! त्याची तुलना लोकशाही, हुकूमशाही, उदारमतवादी यासारख्या राजवटीच्या स्वरूपाशी करायची नाही, तर एक धर्म म्हणून इस्लामच्या असलेल्या अविष्काराशी करायची १४ ऑगस्ट १९४७ पूर्वी भारतातल्या मुसलमानाना कला होती, तत्वज्ञान होत— पण राज्य नव्हत. जिनान ते देऊ करताच त्याच्या उत्साहाला उधाण आल— मुस्लिम लीगच्या नेतृत्वाखाली झगडून त्यानी इस्लामला ' राज्य ' मिळवून दिल

याची काहीशी तुलना साम्यवादी चळवळीशी करता येईल' १९१७ पर्यंत साम्यवाद हे केवळ एक तत्त्वज्ञान होत— राजकीय सत्ता हस्तगत करू पाहणार पण ऑक्टोबर क्रांतीत लेनिन आणि त्यांच्या पक्षसहकाऱ्यानी रशियात सत्ता काबीज करताच त्या चळवळीला एक राज्य मिळाल रशियाचा उल्लेख एक कम्युनिस्ट राज्य असा केला जाऊ लागला याच अर्थ ते साम्यवादी आदर्श रशियान गाठले असा नव्हता, तर त्या आदर्शाकडे देश नेऊ पाहणाऱ्या साम्यवाद्याच्या हाती सर्वंकष सत्ता आली असा होता (ही तुलना अगदी बेतानच घेतली पाहिजे खर तर मार्क्सवादी तत्त्वज्ञान हे जडवादी असल्याने त्याला आदर्श अस काही मान्य नाहीच. लेनिनन मार्क्सवादाची व्याख्याच मुळी ' नाहीरेच्या क्रांतीकारी वर्गलढ्यात राजकीय सत्ता हस्तगत करण्याकरता उपयोगी पडणार साधन ' अशी केली या बरोबर उलट जाऊन, इस्लामचे आदर्श गाठण्याकरता एक साधन म्हणून मुसलमान राजकीय सत्तेकडे पाहतात )

मुसलमान राहत असलेल कोणतही स्वतंत्र राज्य हे इस्लामी राज्यच असत असा याचा अर्थ नव्हे इजिप्शियन किंवा तुर्कस्थानी लोक मुसलमान असले तरीही त्यांचा राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टिकोण पाकिस्तानप्रमाणे नाही आपल्या देशाला ' इस्लामी राज्य ' म्हणायच की नाही यावर इंडोनेशियातील लोकानीही विचार केला अजून तरी त्यांनी तसा निर्णय घेतलेला नाही पाकिस्तानी लोकांनी मात्र अगदी उत्साहान त्या कल्पनेचा पुरस्कार केला— जगातील इतर मुस्लिम राष्ट्र जे करत नव्हती ते आता आपण करून दाखवणार अस त्याना वाटत होत. त्याच म्हणण अस की इतर मुस्लिम

राष्ट्रातील नागरिक व्यक्तिश किंवा सार्वजनिक आचार-विचारात मुसलमान असले तरी त्याच राजकीय जीवन पाश्चात्यांप्रमाणेच राष्ट्रवादावर आधारित असत तत्त्वत आणि व्यवहारात, कायद्यान आणि जाणूनबुजून ते 'इजिप्शियन' किंवा 'तुर्कस्थानी' किंवा 'इंडोनेशियन' म्हणून वावरतात त्यांच्या राज्य-व्यवहाराच सूत्र इस्लाम हे नसत पाकिस्तानची गोष्ट मात्र तशी नव्हती– इस्लाममुळे ते जन्माला आल– इस्लाम हाच त्याचा अर्थ राहणार होता

१२ मार्च १९४९ ला पाकिस्तानी घटना समितीन जो उद्देशाचा ठराव पास केला त्यात हे स्पष्टपणे मांडण्यास आलं होत पाकिस्तानची व्याख्या 'इस्लामी लोकशाही, न्याय इ वर आधारित राज्य' अशी करण्यात आली होती आणि 'पवित्र कुराण, आणि सुन्नेतील इस्लामच्या सदेशानुसार आणि शिकवणुकीनुसार मुसलमानांना त्याचं व्यक्तिगत आणि सामाजिक जीवन जगण्याकरता आवश्यक ते सार करण्यात येईल' अशी हमी देण्यात आली होती हा ठराव मांडताना खुद्द पतप्रधानानी काढलेले उद्गारही महत्त्वाचे ते म्हणाले, मुसलमानांना त्यांच्या धर्माबरहुकुम वागण्यास आणि त्याचा प्रसार करण्यास मुभा ठेवूनच केवळ आमच समाधान होणार नाही धर्माच्या कोणत्याही बाबतीत सरकार त्रयस्थाची भूमिका घेऊ शकणार नाही तस झाल तर ज्या ध्येयानी प्रेरित होऊन आम्ही पाकिस्तान निर्माण केलं ती ध्येयच आम्ही झिडकारल्यासारख होईल याबबतीत सपूर्ण करणात्मक भूमिका घेऊन खऱ्या अर्थी इस्लामी समाज निर्माण करण्याकरता योग्य ते वातावरण सरकार निर्माण करील' (लियाकतअली खान–७ मार्च १९४९)

पाकिस्तानला व्यवहारीदृष्ट्या इस्लामी राज्य का म्हणायच तर 'आदर्श इस्लामी राज्य' अशी काही चीज असेल तर त्या आदर्शाकडे ते वाटचाल करू पाहते, म्हणून. इस्लामी राज्याची स्थापना हा याअर्थी एका साहसाचा प्रारभ होता शेवट नव्हता ते केवळ एक स्वरूप नव्हत– ती एक प्रक्रिया होती म्हणूनच ती स्थिर नव्हती– तिला गती होती या स्वतंत्र राष्ट्राच्या आयुष्यातल्या प्रत्येक वर्षी काहीतरी घडत राहणार होतं त्या काळात मुसल-मानाच्या कल्पनेतील इस्लामी ध्येयस्वप्न गाठली तरी जायची होती किंवा त्याना मुरड देण्यात येण्याची शक्यता होती– त्याबाबत भ्रमनिरास होऊ

शकत होता– दुर्लक्ष केलं जाणं शक्य होतं– कदाचित् त्यांना अजिबात बगलही दिली जाऊ शकत होती पाकिस्तान निर्मितीनंतरच्या या प्रारंभीच्या काळात मुसलमानांनी यांपैकी काय केलं हे आता पाहू या

पाकिस्तान मिळाल्यानंतर पाकिस्तानी मुसलमानासमोर असलेला प्रमुख प्रश्न होता त्या राज्याचं स्वरूप । या प्रश्नाला अनेक बाजू होत्या बऱ्याच जणांना अगदी मनापासून वाटत होतं ते हे की त्याचं एक आदर्श इस्लामी राज्यात रूपांतर व्हावं पण ही गोष्ट तितकी सोपी नव्हती. इस्लामी राज्य हे ध्येय ठरवलं तरी नेमकं काय करायचं हे स्पष्ट तर नव्हतंच, पण जे काही स्वरूप ढोबळ मानानं ठरवता आलं असतं ते साध्य करण्याची निश्चित योजनाही कुणाजवळ नव्हती दिवस जात होते तसतशी एक गोष्ट अधिकाधिक स्पष्ट होत होती की पाकिस्तानचं धार्मिक स्वरूप ही एकमेव नव्हेच, पण सर्वांत महत्त्वाची बाब ही नव्हती 'इस्लामी' पातळीवरून प्रश्नाची सोडवणूक करण्याबाबतही चालढकल, धार्मिक बाबी उपस्थित करून आणली गेलेली विघ्नं– इस्लमच्या नावाखाली झालेल्या मागण्या– यांपैकी कशामुळेही मूळ सत्य लपत नव्हतं की पाकिस्तान आदर्श इस्लामी राज्य झालं की न झालं तरी त्याचं इतरही आणखी काही होण्याची फार मोठी शक्यता होती

या इतर बाबी तर्कदृष्ट्या आणि व्यवहारातही अधिक महत्त्वाच्या होत्या. उदा फाळणीचा आघात– त्यापाठोपाठ झालेल्या कत्तली आणि नासधूस यातून प्रथम महत्त्वाचं होतं ते पाकिस्तान एक देश म्हणून टिकणं थोड्याफार फरकानं पाकिस्तानसमोर हे दोन्ही प्रश्न सतत उभे आहेतच एक पाकिस्तान टिकवण्याकरता काय करायचं आणि दोन त्या देशाचं स्वरूप काय ठेवायचं, या दोन्ही बाबी भिन्न आहेत आणि त्या नेहमी एकमेकीला पूरकही नसण्याची शक्यता आहे

**आर्थिक प्रगतीची समस्या**

कोणताही देश एक राष्ट्र म्हणून टिकून राहातो तो मुख्यत्वे त्या देशाच्या नागरिकांच्या नीतिधैर्यावर फाळणीनंतरच्या पहिल्या सहा महिन्यांच्या काळात केवळ त्या आधारावरच पाकिस्तान टिकलं अशा तऱ्हेचं एखादं इमान भविष्यातही असल्याखेरीज भावी काळात समोर ठाकणारी आव्हानं स्वीकारणं पाकिस्तानला शक्य नाही पाकिस्तानला 'इस्लामी' आकार

देण्यापूर्वीही महत्त्वाचं आहे तं पाकिस्तानचं अस्तित्व टिकून राहाणं. आजच्या गुतागुंतीच्या स्पर्धेनं ग्रासलेल्या तान्त्रिक जगात केवळ टिकून रहाण्याकरताही काही आधुनिकता पत्करावी लागते– औद्योगिकरण करावं लागतं– अनेक बाबींत लवचिक विचार असावे लागतात. या गोष्टी इस्लामच्या पूर्वकल्पित ध्येयात बसणाऱ्या नाहीत. काही जबाबदार, कल्पक व्यक्तींच्या ही गोष्ट थोड्याच काळात ध्यानी आली की आजच्या जगात केवळ जगणं म्हणजे ही सततची दक्षता– तान्त्रिक कौशल्य– निर्मितीक्षम हुशारी– प्रामाणिक धडपड या साऱ्या गोष्टी आल्या. रसायनशास्त्रातील संशोधनापासून तो भांडवल उभारणीपर्यंत, लष्करी ताकद आणि आर्थिक उद्योगापासून तो कारखाने– उद्योगधंद्यांच्या हुशार प्रामाणिक व्यवस्थापनापर्यंत प्रत्येक क्षेत्रात लायक व्यक्तींची गरज आता भासणार होती. राष्ट्रासमोर असलेली ध्येय केवळ मोठी असून चालत नाही– प्रश्न असतो सर्वसामान्य व्यक्तींच्या प्रेरणेचा. या प्रेरणा निव्वळ स्वार्थी आणि लोभी महत्त्वाकांक्षेच्या असू शकतात. फार मोठ्या प्रमाणावर अप्रामाणिक असू शकतात. पाकिस्तानातील माणसही अखेर तुमच्या आमच्यासारखीच माणस आहेत. देशसेवा, समाजकल्याण इत्यादी गोष्टी बाजूला ठेवून केवळ स्वतःचं भलं पाहण्याचा मोह त्याना न होणं कठीणच. पाकिस्तानच्या बाबतीत हे अनेकदा घडलं. 'नालायक कार-भार, बेकायदा वर्तन आणि लाचलुचपतीच्या' आरोपांवरून अनेक प्रांतिक सरकारं बरखास्त करावी लागली. सामाजिक नीतिमत्ता गुंडाळून ठेवली गेल्याची अनेक उदाहरणं पाकिस्तानी लोकांनी वारंवार पाहिली. इस्लाम-वादाचा उत्साह कमी करणाऱ्या या साऱ्या गोष्टी होत्या. यातल्या एकानं हताशपणे म्हटलं, 'व्याज आकारायला इस्लामची बंदी आहे. मात्र लाच खायला हरकत नाही.'

पाकिस्तानच्या राजकीय आणि आर्थिक इतिहासात या लाचलुचपतीचा वाटा खूपच मोठा आहे. तिचे धार्मिक परिणामही अनेक तऱ्हेचे होतात. लाचलुचपतीने बरबटलेली प्रचलित समाजव्यवस्था बदलून तिथे इस्लामी नैतिक मूल्ये आणि आधारित 'इस्लामी' व्यवस्था आणली पाहिजे असं म्हणणाऱ्यांचा एक वर्ग तयार होतो. याउलट इतर काहीजणाचा इस्लामच्या राजकीय क्षेत्रातील कामगिरीबाबत भ्रमनिरास होतो. ध्येय कितीही मोठी

असली तरी नीतिभ्रष्ट, नालायक माणस राजकीय संघटनेचा विचका करू शकतात म्हणून इस्लाम अगर तत्सम नैतिक चळवळींनी सामाजिक नीति-चारित्र्यवान माणस निर्माण करण्याकडे प्रथम लक्ष दिलं पाहिजे असं अनेकांना वाटू लागतं सार्वजनिक क्षेत्रातली ढोंगबाजी त्याच्या विचारांना चालना देत असते, कारण भ्रष्टाचार करणारे नेते स्वतःचे हेतू साध्य करण्याकरता धार्मिक बुवाबाजीचा आसरा घेत असतात सामान्य जनतेच्या धार्मिक भावनांशी खेळ खेळत असतात त्याच्या टीकाकारावर ते इस्लामविरोधक असल्याचा आरोप करीत असतात सत्ता पाठीशी असणारे आणि सत्तेसाठी धडपडणारे दोघेही आपल्या राजकारणासाठी धर्माचा प्रच्छन्न गैरवापर करतात केवळ पाकिस्तानमध्येच नव्हे– जगात सर्वत्र थोड्याफार फरकानं हे घडतं धार्मिक श्रद्धांवर जगणाऱ्या सर्वच गटांचा हा विशेष असतो की कसल्याही फालतू कारणाने ते भडकून जाऊ शकतात

**बुद्धिजीवी वर्गाचे वैफल्य**

या साऱ्या घडामोडींत बुद्धिजीवी वर्गानं काय कामगिरी बजावली किंवा खरं तर बजावली नाही– ते आता पाहू या जनसामान्यांवर परिणाम करणाऱ्या नवनवीन कल्पनांचा अभाव हे पाकिस्तानचं एक प्रमुख दुखणं आहे समाजासमोर उभ्या असणाऱ्या वेगवेगळ्या प्रश्नांना उत्तर म्हणून निरनिराळ्या कल्पना मांडीत राहाण्याचं काम बुद्धिवाद्यांचं असतं इक्बालच्या मृत्यूनंतर हे काम जवळजवळ थांबलंच बुद्धिजीवी वर्गानं या बाबतीतली आपली कामगिरी पार पाडण्याबाबत आवश्यक तो उत्साह, प्रामाणिकपणा आणि नीतिधैर्य दाखवलं तर नाहीच, पण एकूण समाजालाही बुद्धिजीवी वर्गाचं याबाबतीतलं महत्त्व कधी उमजलं नाही पाकिस्तानला याची जबर किंमत मोजावी लागली आहे पश्चिमी शिक्षणाचे संस्कार झालेल्या मध्यम-वर्गानं पाकिस्तानी जनतेसमोर कसलंही ध्येय अगर तत्त्वज्ञान मांडलं नाही की जे जनतेच्या दृष्टिपथातलं होतं– थोड्याशा प्रयत्नांनी साध्य होणारं होतं ज्याला विद्वानांचा पाठिंबा होता किंवा नैतिक अधिष्ठान होतं पाकिस्तानन स्वीकारलेला कार्यक्रम हा अखेर लोकांच्या आकांक्षा आणि इच्छांची पूर्ती करणाराच आहे, याबाबत जनसामान्यांची खात्री पटवण्याकरता या वर्गानं कोणतेही परिश्रम घेतले नाहीत पाकिस्तानच्या इतिहासावर याचा

फार मोठा परिणाम झाला आहे खुद्द या वर्गातील काहीजणांना वैफल्यान इतकं ग्रासलं की ते देश सोडून जाण्याबाबत विचार करू लागले 'नेतृत्वाचं अपयश' हा त्यांच्या बोलण्यातला कायमचा विषय होता. मात्र ते बदलण्या-करता कष्ट करण्याची तयारी नव्हती

या साऱ्याचा परिणाम पाहायचा तर १९५३ साली अहमदिया पंथियां-विरुद्ध झालेल्या दंगलीकडे बोट दाखवाव लागेल पंजाब प्रांतातील लोक-मताच्या संपूर्ण पाठिंब्यानिशी कित्येक हजार नागरिकांनी या दंगलीत भाग घेतला– खून केले– अहमदिया पंथियांची पद्धतशीर कत्तल केली– त्यांना धार्मिक आणि राजकीय क्षेत्राबाहेर हाकलून न दिल्याबद्दल सरकारविरुद्धही निदर्शनं केली या चळवळीला अनेक बाजू होत्या त्या मुनीर अहवालात त्या साऱ्यांची चर्चा करण्यात आली आहे आम्हाला यातील एक बाजू महत्त्वाची वाटते ती अशी की, पाकिस्ताननिर्मितीनंतर लगेचच नागरिकांत पसरलेल्या असंतोषाचा तो उद्रेक होता– पाकिस्तानातील बिघडत चाललेल्या परिस्थितीचा लोकांनी केलेला तो एक निषेध होता एक नवीन, अधिक चांगली समाजव्यवस्था घडवण्याचं पाकिस्तानी लोकांचं स्वप्न धार्मिक मुशीत घडवलेलं होतं– त्याबाबतच्या निराशेतून जन्मलेला असंतोषही मग 'इस्लामी' आकाराचा आधार घेऊन प्रकट झाला जनसामान्याला प्रिय असलेल्या इस्लामी ध्येयस्वप्नाबाबत पाकिस्तानी नेते फारसे प्रामाणिक नाहीत– ते ध्येय गाठण्याबाबत प्रयत्नशीलही नाहीत या कटू जाणिवेतून ती चळवळ जन्माला आली होती– फोफावली होती इस्लामी सामाजिक आणि राजकीय ध्येयस्वप्नाशी व्यवहाराची सांगड घालण्यात राज्यकर्ते अपयशी ठरले होते

एका वेगळ्या पातळीवरील याच दुसर उदाहरण म्हणजे प्रांतिक स्वायत्त-तेचा प्रश्न पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानइतक्या सर्वस्वी भिन्न घटकांना एकत्र आणण्याचं आणि ठेवण्याचं काम कठीणच आहे हे दोन घटक एकत्र नांदायचे तर त्याकरता राजकीय पुढाऱ्यांची चतुराई, आर्थिक प्रगतीची खात्री आणि इतर अनेक गोष्टींची मदत असावी लागेल पाकिस्तानच्या या दोन भिन्न भौगोलिक घटकांमधील एकमेव दुवा म्हणजे त्यांचा मुस्लिमपणा आहे भारताचं शत्रुत्व हा नकारात्मक घटक सोडला तर या घटकांच्या

सहजीवनाला इस्लामखेरीज इतर अर्थ नाही 'इस्लामी राज्य' या कल्पनेच वास्तव, ठाशीव स्वरूप लोकांसमोर मांडण्यात मध्यमवर्गीयांना आलेल अपयश इथेही स्पष्ट होत

असं एखाद ठाशीव स्वरूप पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानातील लोकाना एकत्र आणू शकल असत– एखाद्या राष्ट्रीय योजनेत दोनही विभागांनी भाग घेतला असता खरं तर पश्चिम पाकिस्तानी नेत्यानी– म्हणजे भारतात वाढलेल्या मुसलमानांनी पूर्व पाकिस्तानबाबत इतकी आस्था कधी दाखव-लीच नाही प्रश्न ध्येयाबाबत अपयशी ठरण्याचा नव्हता, मुळात अशी काही ध्येयच समोर नव्हती !

**अस्पष्ट कल्पनेचे घातुक परिणाम !**

इस्लामी राज्याबाबत काही स्पष्ट कल्पना नसल्याचा बगालमध्ये आणखी एका बाबतीत परिणाम झाला त्याचा सबध तिथल्या अल्पसंख्याकाशी होता इस्लामी राज्य म्हणजे इतर धर्मियाची गळचेपी नव्हे अस पाकिस्तानी नेते वारवार सागत होते. पाश्चिमात्य शिक्षणाचे सस्कार झालेल्या अनेक मध्यम-वर्गीयाना माणुसकीच्या दृष्टिकोनातून असं वाटत होतं की अल्पसख्याकानाही समान सधी, न्याय असावा. पाकिस्तानचे भारताबरोबर आणि इतर जगा-बरोबरचे सबध ध्यानी घेऊन तस करण काही प्रमाणात त्या देशाला भागही होत पण इस्लामी राज्याची कल्पना स्पष्टपणे लोकांसमोर न माडली गेल्याने अनेक जात्यध मुस्लिमाचा आणि हिंदूचाही असा समज झाला की अशा इस्लामी राज्यात बिगर मुस्लिमाना स्थान असू शकत नाही पण एकण बिगर मस्लिमाची सख्या १ कोटी १० लाख इतकी म्हणजे पाकिस्तानी लोक-सख्येच्या १४ टक्के होती– त्यामुळे हा प्रश्नही बिकटच होता तो सोडवल्या-खेरीज इस्लामी राज्याच तारू या खडकावर आपटण्याचीही शक्यता होती

विसाव्या शतकातल्या इस्लामचं दर्शन घडवण्याबाबत पाकिस्तानच्या आधुनिकतावादी नेत्याना अपयश आलं याचा अर्थ समाजातील इतर थर अधिक चागल काही देऊ शकत होते असा नव्हे. १९५३ च्या दगलींनी हेही दाखवून दिल की अस नेतृत्व मिळालंच तर ते चुकीच्या दिशेन नेणार असेल मुनीर अहवालान उलेमांबाबत अस मत प्रकट केल की एका आधुनिक

राज्याचा कारभार पहायला तर ते सारे नालायक होतेच पण इस्लाम-बाबतच्या काही मूलभूत बाबींबाबतही त्यांनी घोर अज्ञान प्रकट केल होत. चौकशी अहवालात दाखवून दिल ते हे की 'मुसलमान' या शब्दाच्या व्याख्येबाबत कोणत्याही दोन उलेमांच एकमत नव्हतं मात्र तरीही जो इस्लामी मतभेद प्रकट करील त्या प्रत्येकाला ठार मारण्याबाबत साऱ्याच एकमत होते

पाकिस्तानमधील धार्मिक परिस्थिती जाणून घ्यायची तर १९५३ च्या अहमदिया पंथियाविरुद्ध झालेल्या दगलीनतरची प्रतिक्रिया पाहण्याजोगी आहे इस्लामच्या विचारप्रणालीत जवळ जवळ ७५ वर्षांपासून एक प्रवाह दिसत होता सर सय्यद अहमद खान, अमीर अली, युसूफ अली, इक्बाल इत्यादींच्या विचारांचा तसंच सूफी परपरेचा 'धर्माच्या बाह्य अगोपागाना महत्त्व देऊ नका, इस्लामचा आत्मा महत्वाचा आहे' असं हे सारे सागत होते बऱ्याच मध्यमवर्गीयांना हा विचार मान्य होता. पण प्रत्यक्ष वेळ आली तेव्हा इस्लाम म्हणजे लुटालूट, जाळ-पोळ आणि खून नव्हे [1]— सकुचित धार्मिक अवडंबरही नव्हे— इस्लाम म्हणजे लोकशाही, स्वातन्त्र्य, समता, सहिष्णुता आणि सामाजिक न्याय ! [2] हे गर्जून सागणारा एकही नेता अगर गट समाजात नव्हता (इक्बालच नाव आधीच्या यादीत असल तरी प्रत्यक्ष या अहमदियांविरूद्धच्या दगलीच्या वेळी, त्या पथीयाविरुद्धचा लोकक्षोभ भडकवण्याला त्यान मदत केली होती ) या साऱ्या दगलींना सरकारन अखेर आवर घातला तो इस्लामच्या नावानं नव्हे तर सरकारची स्थिरता धोक्यात येणार होती म्हणून धार्मिकदृष्ट्या या दगलीत कुणाला काही निषेधार्ह वाटल नव्हतं

पाकिस्तान हे व्यवहारात इस्लामी राज्य आहे. कारण एका आदर्श 'इस्लामी राज्याची' कल्पना गृहीत धरून त्या दिशेनं वाटचाल करण्याचा

---

१) त्या मुनीर अहवालात हे शब्द वारवार आलेले आहेत

२) पाकिस्तानच्या घटनेच्या (१९५६) प्रास्ताविकातून हे शब्द घेतलेले आहेत १९४९ च्या पाकिस्तानबाबतच्या उद्देशाच्या अहवालाचा हवालाही देता येईल दोन्हीत म्हटल आहे, '..इस्लामप्रणीत लोकशाही, स्वातन्त्र्य, समता, सहिष्णुता आणि सामाजिक न्याय या तत्त्वावर आधारित वगैरे.

त्याचा निर्धार आहे असं यापूर्वी आम्ही म्हटलं आहे या आदर्शाच्या रूपरेषेची चर्चा आम्ही अजून मुद्दामच केली नव्हती कारण खुद्द पाकिस्तानी लोकांनी तोच मार्ग पत्करला होता इस्लामी राज्य म्हणजे नेमकं काय, याबाबत मुस्लिमांचीच भिन्न भिन्न मतं होती कित्येकांना एक अस्पष्ट आदर्श यापलीकडे त्याबाबत फारशी माहिती नव्हती तरीही पाकिस्तानचं अशा एका आदर्श इस्लामी राजवटीत रूपांतर करायचंच याबाबतचा उत्साह प्रचंड होता इस्लामी राज्य हे एक धार्मिक ध्येय असल्यानं त्याचा काही भाग सर्वसामान्यांना अनाकलनीय, गूढ असा असणार हे जवळजवळ गृहीतच धरण्यात आलं होतं पाकिस्तानसमोरचा महत्त्वाचा प्रश्न इस्लामी बनायचं की नाही हा नव्हताच— त्या इस्लामच्या चौकटीतली सामाजिक न्यायाची नेमकी कल्पना काय, हा होता

धार्मिक, श्रद्धावान मुसलमान माणूस त्याच्या धर्माचा अन्वयार्थ मन मानेल तसा किंवा त्याच्या समाजाला रुचेल त्याप्रमाणे लावण्यास मोकळा नसतो मात्र या विसाव्या शतकात, त्याचा विश्वास असेल अशा ईश्वरी संकेतांची कल्पना करून त्यानुसार आपल्या धर्माचा अन्वयार्थ लावण्याची मुभा त्याला असली पाहिजे त्यामुळे इस्लाम हे केवळ एक स्वप्न न राहता रोजच्या जीवनाशी संबंधित असं सामाजिक न्यायाचं एक प्रतिपादन बनतं हा अन्वयार्थ लावतांना काही गुंतागुंत भासत असेल, मन चक्रावून जात असेल, बुद्धीला ताण पडत असेल, त्याचा त्रास होत असेल, तर ती येऊ पाहाणाऱ्या समंजसपणाची निशाणी असेल याऐवजी घाईगर्दीनं, त्रास देणारे प्रश्न टाळण्याच्या भावनेनं इस्लामी राज्याचे हे किंवा ते स्वरूप ठरवणं, हा बेजबाबदारपणा ठरेल— त्याचे परिणाम नाशकारक ठरतील

पाकिस्ताननिर्मितीनंतरच्या पहिल्या काही वर्षांत ही भाबडी समजूत होती की मुसलमान म्हणून मुसलमानांकडे आलेला वारसा इतका मोठा आहे की, सांप्रतची वाईट परिस्थिती कालांतराने आपोआप सुधारेल, भविष्य उज्ज्वल बनेल दुर्दैवाने व्यवहारात तसं घडत नाही 'चांगला समाज' बांधण्याचं काम बिलकूल सोपं नाही अर्थशास्त्र, समाजशास्त्र, आरोग्यशास्त्र आणि इतर व्यवहारी क्षेत्रांतील मोठमोठ्या समस्या सोडवाव्या लागतात— आपणहून सुटत नाहीत

याबाबत काही लोकाची उतावीळी इतकी की ' चागल्या समाजाबाबतचे ' सर्व नियम इस्लाममध्ये सांगितलेलेच आहेत— प्रश्न केवळ ते घेऊन पाकिस्तानची घटना बनवण्याचा आहे, अशी त्यांची खात्री होती पाकिस्तानी घटनासमितीच्या एका सदस्याचा अनुभव खूपच बोलका आहे हा सदस्य एकदा रात्री गाडीने प्रवास करीत होता डब्यात असलेल्या सहप्रवाशाला तो घटनासमितीत असल्याच कळल्यावर तो सहप्रवासी म्हणाला, ' पाकिस्तानची घटना इस्लामी असायला हवी ' घटनासमितीचा सदस्य उत्तरला, ' ते खर, पण इस्लामी राज्यघटना म्हणजे काय हे मला अजून उमगलेल नाही तुमच्या मनात नेमक काय आहे, हे मला सागाल तर बर ' या उत्तरान त्या सहप्रवाशाला इतका जबर धक्का दिला की तो कोसळलाच. इस्लामी राज्य म्हणजे सर्व बाबतीत मुसलमानी कायदे लागू असणारा समाज अस काहीना वाटत होत काहीजण इतिहासाकडे वळत होते इस्लामचा अगदी प्रारंभीचा काळ त्याना आठवत होता काहींना भारताच्या इतिहासातील ' इस्लामी मजा ' म्हणजे मोंगली विलास आठवत होते आधुनिकतेचा स्पर्श होण्यापूर्वीच्या काळातील परपरा आठवत होत्या इतर काही जणाच्या मते ज्या राज्यात बिगर मुस्लिमाना कोणतेही अधिकार किंवा चागल्या नोकऱ्या नाहीत, ते इस्लामी राज्य ! इतर अनेकानी त्याच्या कल्पनेतल्या इस्लामी राज्याच्या कल्पना पुढे माडल्या अनेकाना अनेक उत्तर सापडत होती मात्र सर्वांना समाधान देणारी व्याख्या अखेरपर्यंत सापडली नाहीच शिक्षणामुळे ज्याच्या मनाच्या सामाजिक कक्षा विस्तारल्या आहेत, अशा सुशिक्षित वर्गाच यापैकी कोणत्याही एका संकुचित व्याख्येन समाधान होण्याजोग नव्हत मात्र समाजातील प्रतिगामी गटांकडून करण्यात येत असलेल इस्लामच प्रतिपादनच कदाचित योग्य ते प्रतिपादन असेल, अशी शका त्याच्याही मनात होती इतर कसलही करणात्मक ध्येय (Positive ideology) समोर नाही, इस्लामबाबत जे सागण्यात येत आहे, त्यानही समाधान होत नाही अशी अवस्था होती

**इस्लामी कायद्याचा गोंधळ**

इस्लामी राज्याची व्यवहारी व्याख्या करण्याकरता ' इस्लामी कायद्याची कल्पना माडण्यात आली खर तर इस्लामी कायदे म्हणजे नेमके कोणते

कायदे, याबाबतही खूप गोंधळ आहे. असे कोणतेही कायदे खऱ्या अर्थी आज अस्तित्वात नाहीत. जे नियम ढोबळपणे आहेत त्यांचा संबंध कायद्यांपेक्षा पाश्चिमात्य परिभाषेतील न्यायाच्या कल्पनेशी जास्त आहे. शरीयत म्हणजे नेमके काय आहे, याबाबत खुद्द मुसलमानांमध्ये खूपच मतभेद आहेत. काही उलेमांना आणि सरकारी अधिकाऱ्यांना वाटत होतं. हे कायदे कालातीत असल्याने त्यात बदल करण्याचाही प्रश्न नव्हता. पाकिस्तान सरकारांतील, oxford विद्यापीठाची पदवी असलेल्या एका अधिकाऱ्यानं म्हटलं, 'पाकिस्तानचा कायदा 'शरीयत' हाच असला पाहिजे– नाहीतर पाकिस्तान मागण्यात काही अर्थच नव्हता.' त्याला याबाबत अधिक विचारता, 'शरीयत म्हणजे कुराणात सांगितलेले कायदे' असं तो म्हणाला. त्याला विचारलं, 'मग सुन्नाहचा संबंध प्रेषित महमदाशी जास्त आहे– पण सर्वांत महत्त्वाचं आहे ते कुराण!'

शरीयत ही एक गतिहीन कायदेपद्धती नसून गतिशील प्रक्रिया आहे असं इतर अनेकांना वाटतं. आज अस्तित्वात असलेले कायदे काही शतकांच्या अनुभवानुसार आणि बदलानंतर बनलेले आहेत. शरीयतचे कायदे त्या काळाला अनुरूप असले तरी आता आजची गरज ओळखून त्यात आवश्यक तिथे बदल केले पाहिजेत, हे यांना मान्य आहे. शरीयत म्हणजे काय आहे आणि काय असलं पाहिजे हे ठरवण्याकरता १९५६ च्या पाकिस्तानी राज्यघटनेनं एका समितीचीच नेमणूक केली होती– या समितीला पाच वर्षांचा अवधी याकरता देण्यात आला होता.

जी गोष्ट इस्लामी कायद्याची, तीच इस्लामी इतिहासाची. इस्लामच्या संस्थापनेनंतरच्या पहिल्या काही दशकांतील 'खिलाफत अल् रशीदा' हे काही जणांच्या दृष्टीने एक आदर्श युग होतं, की जे इस्लामी राज्याचा आदर्श ठरावं. खरं तर ते युग इतकं आदर्श नव्हतं. चारपैकी तीन राज्यप्रमुखांचे (खलिफा अल् रशीदन्) त्या काळात निर्घृणपणे खून झाले– त्यांच्या राजवटीत सतत यादवी युद्धे चालू होती– साऱ्याच्या परिणामी महमद पैगंबरानंतर अवघ्या तीस वर्षांत त्या राजवटीचा शेवट झाला. स्वतःच्या मनातील अनेक आदर्श कल्पना त्या युगाला चिकटवून काही मुसलमान त्याला आदर्श मानतात. ते युग आदर्श होतं असं मानलं तरीही अरेबियाच्या

इतिहासातील ते क्षण आता पाकिस्तानला जगता येण अशक्य आहे

या साऱ्यातून निष्कर्ष निघतो तो असा की, एक धार्मिक आदर्श याखेरीज इस्लामी राज्यकल्पनेचा इतर अन्वयार्थ लागू शकत नाही मात्र केवळ तेवढ्यानं त्याच महत्त्व कमी होत नाही पाकिस्तानी मुसलमानाच्या दृष्टिकोनानुसार 'इस्लामी राज्याच्या' कल्पनेचा त्याग करण म्हणजे केवळ न्यायाचा त्याग करण्यासारखच नव्हे, तर 'न्याय' या कल्पनेवरचा विश्वासच गळून पडण्यासारख आहे पाकिस्तान जर इस्लामी राज्य बनणार नसेल, तर त्याच्या अस्तित्वालाच काही अर्थ नाही, या अतिरेकी निर्णयावर त्यातले अनेक जण येऊन पोचलेले आहेत पाकिस्तान चागल राज्य बनल पाहिजे, हे सागण्याची मुसलमानी परिभाषा म्हणजे पाकिस्तान इस्लामी राज्य बनलं पाहिजे अस म्हणण चांगल म्हणजे कस, याची जी थोडी उदाहरण– चुणूक पाकिस्तानी मुसलमानांनी प्रसगी दाखविली, ती उत्तेजनार्ह बिलकूल नव्हती एका महत्त्वाच्या गोष्टीकडे मात्र लक्ष दिल पाहिजे १९५६ च्या पाकिस्तानी राज्यघटनेत इस्लामी राज्याच्या एका अगाला निश्चित मान्यता देण्यात आली पाकिस्तान हे इस्लामी प्रजासत्ताक असल्याच जाहीर करून इस्लामी राज्य हे लोकशाहीप्रधान असत ही गोष्ट घटनासमितीन मान्य केली

**लोकशाही गतीशील कल्पना**

तत्त्वत· किंवा व्यवहारात ही लोकशाहीनिष्ठा कितपत प्रकट होईल, हे सागण इतक्यात शक्य नाही ती निष्ठा टिकवण हे सोप कामही नाही मात्र ही निष्ठा टिकते की नाही हे खूपच महत्त्वाच आहे उक्ती आणि कृती या दोन्ही हातात हात घालून जातील का ? लोकशाही ही चागली व्यवस्था आहे असा मनोमन विश्वास नसेल तर लोकशाही टिकू शकत नाही लोकशाही हीसुद्धा एक गतिशील कल्पना आहे– प्रक्रिया आहे एका विशिष्ट क्षणी एखाद्या ठिकाणी लोकशाही असण म्हणजे त्या विशिष्ट वेळच्या सरकारच स्वरूप लोकशाही आहे, एवढाच त्याचा अर्थ होईल– पण एखादा समाज लोकशाहीवादी आहे अस म्हणता येण म्हणजे त्या समाजाच्या सर्वकाळच्या श्रद्धेबाबत, इमानाबाबत, ध्येयाबाबत, नागरिकांच्या गुणवत्तेबाबत काहीतरी सांगण्यासारख आहे

पाकिस्तानातील लोकशाही ही इतर ठिकाणच्या लोकशाही व्यवस्था-

प्रमाणे अपूर्ण असेल, दोषपूर्ण असेल हे निश्चित सांगता येईल, मात्र संपूर्णपणे मोडण्याइतकी वाईट अवस्था तिला येईल की नाही हे पाकिस्तानी जनतेवर अवलंबून आहे प्रजासत्ताक राज्यघटनेचा जाहीर पाठपुरावा केला असल्याने लोकशाही हे आता इस्लामी राज्याच एक अविभाज्य अग बनवण्यात आल आहे आता लोकशाहीच अपयश हे ' इस्लामी ' अपयश असेल, एक धार्मिक अपयश असेल पाकिस्तानी मुसलमानांच्या ध्यानी आली नसली तरी ही गोष्ट आता स्पष्ट आहे इस्लामच्या इतिहासात आता नव्या युगात प्रवेश केला आहे तुर्कस्तान, इंडोनेशियाप्रमाणे पाकिस्तानी इस्लामनही लोकशाहीचा आधार घ्यायच ठरवल आहे

या एकाच गोष्टीमुळे इस्लामसमोर कितीतरी दालन उघडली आहेत इस्लामी राज्याचा परिणामकारक अन्वयार्थ आता लोकशाहीच– टिकली तर– लावणार आहे. सर्व मुसलमानांना– आणि बिगर मुसलमानानाही पसत असलेल अस ते राज्य असल पाहिजे (पाकिस्तानात बिगर-मुस्लिम अल्पमतात असले तरी कोणत्याही निवडणुकीत त्यांच्या मताचा प्रभाव ते पाडू शकतील असा प्रभाव पडू नये म्हणूनच काही मुसलमान विभक्त मतदारसघाची मागणी करीत आहेत ) शेतकऱ्यांना– कामगारांना– शास्त्रज्ञांना– पाश्चात्य शिक्षण घेतलेल्यांना– सर्वांना मिळून बहुमतान मान्य होईल तेच पाकिस्तानच स्वरूप असाव लागेल पाकिस्तानी राज्यघटनेन लोकांना केवळ राजकीय अधिकारच नव्हे, तर ' इस्लामी ' राज्याबाबतच्या वेगवेगळ्या कल्पनांपैकी कोणतीवर शिक्कामोर्तब करायच हा अधिकारही आता बहाल केला आहे (की जो अधिकार इतके दिवस फक्त उलेमांना होता– धार्मिक क्षेत्रातील हितसबधी लोकांना होता )

एक सामाजिक आदर्श म्हणून इस्लामी धर्मात लोकशाहीचा अतर्भाव करण्यात नवीन अस काहीच नाही, अस यावर काही मुसलमान म्हणतील मात्र सामाजिक, कायदेप्रणीत आणि इतर काही उदात्त तत्त्वांचा इस्लाममध्ये पुरस्कार केलेला असला, तरी राजकीय लोकशाहीला व्यवहारात मान्यता देण्याची ही पहिलीच वेळ आहे याबाबत असही म्हणता येईल की, ह्यापुढे पाकिस्तानात लोकशाही अयशस्वी ठरली तर पाकिस्तानी जनतेचा लोकशाही कल्पनेवर पुरेसा विश्वास नाही असा त्याचा अर्थ होईल पर्यायाने

त्याना अभिप्रेत असलेल्या इस्लाममध्ये लोकशाही कल्पनेचा अंतर्भाव नाही हे सिद्ध केल्यासारखे होईल

इस्लामी राज्याच्या कल्पनेला तिथल्या बिगर-मुस्लिमांचा पाठिंबा नाही हे सरळच आहे त्यांच्या विरोधाला खरीच व्यवहारी कारणेही आहेत तसं पाहिलं तर १९५६ च्या पाकिस्तानी राज्यघटनेन प्रत्येक नागरिकाला काही मूलभूत अधिकार बहाल केले होते आणि इस्लामी कायद्याच या व्यक्तिगत अधिकारावर अतिक्रमण होणार नाही याचीही खबरदारी घेतली होती त्या राज्यघटनेचा एकूण सूर निश्चितपणे समतेला अनुकूल असा होता मात्र तिथल्या बहुसंख्य जमातीच म्हणजे मुसलमानाच रोजच्या जीवनातलं वर्तन आणि इस्लामी राज्यकल्पनेचा त्यातल्या अनेकानी लावलेला अन्वयार्थ, यामुळे तिथल्या अल्पसंख्य जमातीचा विश्वास उडाला आहे लोकशाहीमध्ये अल्पसंख्याकाना न्याय देऊन केवळ भागत नाही, तर आपल्याला न्याय मिळाला असं त्याना मनापासून वाटणे आवश्यक असतं याबाबतीतलं पाकिस्तानी मुसलमानांसमोर असलेलं आव्हान मोठं होत त्यांना ते कसे तोंड देणार आहेत, हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही

अखेर एक गोष्ट स्पष्टच आहे की अल्पसंख्याक आणि इतर दुर्बल गटाना असलेले अधिकार आणि त्याना मिळणारी वागणूक, ही त्या देशातील सत्ताधारी जमातीच्या मनोवृत्तीवर अवलंबून असते सोव्हिएट रशिया-सारख्या मार्क्सवादी देशातील राज्यकर्ते, त्यांच्याच म्हणण्यानुसार असे कोणतेही आदर्श मानीत नाहीत अर्थात अशा देशात विरोधी गटांना काही अधिकार असूच शकत नाहीत माणसाला 'माणूस' म्हणून वेगळं असं अस्तित्व नसतच एका सामाजिक वर्गाचा घटक म्हणूनच तो जगू शकतो असं मार्क्सवादी तत्त्वज्ञान म्हणते 'श्रमजीवी वर्गांचा शत्रू' ठरवलेल्या व्यक्तीला मग कोणतेही अधिकार देण्यात येत नाहीत लोकशाही व्यवस्थे-मध्येही असं घडू शकतं लोकशाहीतील उदात्त तत्त्वांवर बहुसंख्य जनतेचा विश्वास नसेल, तर लोकशाही व्यवस्थेतही, सख्येन अल्पमतात असलेल्या माणसांना कसलेही अधिकार उरत नाहीत प्रसग येईल तेव्हा या अधिकारा-कडे बोट दाखवून त्याचं निभण्याजोगं नसत— बहुसंख्य जमातीच्या सदसद्-विवेकबुद्धीवरच त्याचा सारा हवाला असतो. पाकिस्तानाच अधिकृत स्वरूप

इस्लामी आहे की नाही, यापेक्षाही तिथल्या मुसलमानांची 'चागल्या राज्याबद्दल' काय कल्पना आहे हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे

**पाकिस्तान व धर्मनिरपेक्षता**

इस्लामी राज्य कल्पनेसमोर आणखीही एक आव्हान उभ आहे— धर्म-निरपेक्षतावादाचं पाकिस्तान स्थापन झाल्यावेळी, तिथले फारच थोडे लोक या धर्मनिरपेक्ष राज्याच्या कल्पनेला पाठिंबा देणारे होते मात्र या कल्पनेला पाठिंबा देणाऱ्यांची संख्या प्रतीदिनी वाढते आहे शिकल्यासवरलेल्या अनेकांनी इस्लाम च्या नावाखाली झालेला बुजबुजाट— लाड्यालबाड्या— आळशीपणा— ल चखोरपणा पाहिला आहे त्या साऱ्याची त्यांना शिसारी आली आहे— पा केस्तानन अद्यापही न सोडवलेले कितीतरी गुतागुंतीचे प्रश्न त्याना दिसत अ हेत त्या प्रश्नांच गाभीर्य त्यानी ओळखलं आहे मात्र प्रस्तुत लेख लिहिला ज ल असेपर्यंतच्या काळात, धर्मनिरपेक्षतेच्या बाजूने, म्हणावा तसा पुकारा कु ी केलेला नाही. 'इस्लाम राज्य' म्हणून पाकिस्तानचा कारभार पाहण रे लोकच, पाकिस्तान धर्मातीत राज्य झाल तरी सत्तेवर असतील, याची तर फारच थोड्यांना जाणीव आहे धर्मातीत राज्य झालं म्हणून त्याच्या वागणुकीत काही फरक पडेल असं मुळीच नाही ज्याला आवाहन करावं असा एकही नैतिक अगर बौद्धिक कार्यक्रम आज तिथल्या नेत्यांसमोर नाही पाकिस्तानमध्ये एखादा 'अतातुर्क' अवतरेल की नाही, कुणास ठाऊक— पण तो अवतरला तरी त्याला प्रथम पुरेशा संख्येन अनुयायी मिळवावे लागतील जोम, आणि हुशारी अगी असलेला एखादा नेता आणि लोकांची त्या कल्पनेला मिळालेली मान्यता या दोन गोष्टींवाचून धर्मातीत-तत्त्वाच गाडं पुढ रेटता येण शक्य नाही.तुर्कस्थानातील मुसलमानांनी धर्मातीत-

तत्त्व स्व ची काही अग ही धर्माच्या क्षेत्राबाहेरची असतात पाकिस्तानची जीवना त्याहून वाईट आहे राज्यकारभार कसा करायचा याबाबतचे काही अवस्था नीतिनियम तिथल्या राजकर्त्यांना ठाऊक नाहीतच— पण इतर धार्मिक पद्धतीन राज्यकारभार केला तर त्याला मान्यता देऊ शकणारा एखाद्य इस्ला ळ नाही इस्लामी राज्य हे धर्मातीत राज्यच असत अशी तिथल्या मुसलमानाची खात्री पटवून दिली, तरच

धर्मातीत तत्त्वाला पाकिस्तानमध्ये काही आशा आहे. त्यांच्या नजरेला जे जे काही चांगल येत, ते ते सार इस्लामी कल्पनेशी संबधित आहे, अशी त्यांची खात्री पटवणं हाच प्रगतीचा व्यवहारी मार्ग आहे

पाकिस्तानी मुसलमान इस्लामचा कोणता अन्वयार्थ लावतो, हीच सर्वांत महत्त्वाची गोष्ट साऱ्या मुस्लीम जगासमोरच आज हे बौद्धिक आणि आध्यात्मिक आव्हान उभ ठाकलं आहे कोणत्याही क्षणीचे पाकिस्तान हे जगाच्या प्रगतीचा एक टप्पा दाखवणारा एक छेद असतो आधुनिक काळात [illegible] स्वत च प्रश्न इतरांना समजावून देत आणि मुसलमान नसलेल्या इतरांबरोबर सुसंवाद राखीत जगायच कसं, हे त्याला शिकल पाहिजे त्याशिवाय त्याचा स्वत चा असा विशिष्ट इतिहास आणि त्याच्या दृष्टीसमोर असलेली ध्येयं याची सांगड घालण्याच काम त्याला करायच आहे या भूत-काळाची ते भविष्याशी कशी सांगड घालणार त्यावर त्याच्या इस्लामी स्वरूपाचं भवितव्य अवलंबून आहे आजच्या जगात नुसत जगण हीच एक कठीण गोष्ट आहे– मग एक चांगल राष्ट्र म्हणूण जगण, ही तर कितीतरी पटींनी अधिक कठीण बाब आहे मात्र कठीण बाब म्हणून पाकिस्ताननं चांगल्याकडे जाण्याचा प्रयत्नच सोडून दिला, तर त्यापरती भारतीय मुसलमानाच्या संदर्भातही, दुसरी शोकांतिका नाही

□

# महात्मा गांधी : योगी आणि कोमिस्सार

[ ऑर्थर कोस्लर याच्या लेखाचा परिचय ]

कोमिसारचा शब्दश अर्थ रशियन सरकारातील एका खात्याचा प्रमुख.

' बापूना गरिबीत जगता याव यासाठी खूपच पैसा खर्च करावा लागतो ' प्रख्यात कवयित्री सरोजिनी नायडू यांनी काढलेले हे उद्गार अगदी खरे ठरले. जेव्हा गांधींच्या खादी मोहिमेकरता त्याना पैसा गोळा करावा लागला तेव्हा या खादी मोहिमेला व्यवहारी आणि प्रतिकात्मक दोन्ही हेतू होते इंग्लंडमध्ये तयार झालेल्या कापडावर बहिष्कार घालून हातमाग आणि चरख्याच्या साहाय्याने भारताचे आर्थिक प्रश्न सोडविण्याचा खटाटोप ही त्याची व्यवहारी बाजू होती तर दुसरीकडे चरखा हे साध्या राहणीच प्रतीक बनल होत

' यग इडिया 'मध्ये गांधींनी लिहिल, ' चरख्याची हाक ही सर्वांत उदात्त अशी हाक आहे कारण ती प्रेमाची हाक आहे मरणाच्या दारातील आपल्या लक्षावधी देशबाधवाचा तो आधार आहे मी तर असं म्हणतो की आम्ही चरखा टाकून दिला तेव्हा आम्ही आमच एक फुप्फुसच काढून टाकल आता आम्ही त्यामुळे दमेकरी झालो आहोत– चरखा हाच या रोगावर उपाय आहे ' चरख्याबद्दलच हे कौतुक १९३० सालापर्यंत खूपच वाढलं त्याच्या अनुयायांत त्याचा इतका प्रचार झाला की ती जवळजवळ एक फॅशन बनली– एक पथ जन्माला आला चरख्याच हे चाक केंद्रभागी ठेवून त्यानी भारताचा राष्ट्रध्वज बनवला काँग्रेसचे सर्व सभासदांनी सूत कातावं आणि आपली वर्गणी सुताच्या स्वरूपात भरावी अशी त्यानी काँग्रेसला गळ घातली पक्षातील पदाधिकाऱ्यांना दर महिन्याला २००० वार सूत आणून द्याव लागे काँग्रेसच अधिवेशन भरलं की सरावलेले राजकारणीसुद्धा चर्चा

ऐकताना सूत कातू लागले शाळांमधून सूत कातण्याचे शिक्षण देण्यात येऊ लागल सफेत पोशाख, सफेद टोपी हा देशभक्तांचा गणवेष झाला 'चरखा' हे माझ्या आध्यात्मिक मुक्तीच महाद्वार आहे' असे उद्गार गांधींनी काढले त्याचवेळी परकीय कापडाच्या होळ्या त्यानी जागोजाग पेटवल्या आणि आपल्या पत्नीची आवडती साडी त्या जाळात फेकून स्वत:ला अटक करून घेतली

## टागोरांचा गांधीना विरोध

खादीच्या या अवडबराविरुद्ध आवाज उठवण्याच धैर्य ज्या थोड्या बुद्धिवाद्यांनी दाखवल त्यात श्री रविंद्रनाथ टागोर हे प्रमुख होते आपला एक बराच लाब अज्ञातवास सपवून १९२१ साली ते भारतात परतले भारतात चाललेल्या प्रकारांनी ते हतबुद्ध झाले त्यानी लिहिल

'कलकत्यात मी जे चाललेल पाहिल त्यान मी निराश झालो एका गुदमरवणाऱ्या वातावरणान साऱ्या भूमीला जडत्व आलेल दिसल परकीय कपड्याच्या या होळीविरुद्ध एका वृत्तपत्रान भीतभीतच नापसती दर्शवताच त्याच्याविरुद्ध इतका कोलाहल झाला, की परकीय कापड भस्मसात करणारा अग्नी त्याच वृत्तपत्रही खाक करू शकला असता

'परकीय कापडाच्या या होळ्या कशाकरता पेटविण्यात येत आहेत ? जणु ही यक्षिणीशी काडी वाटावी इतक्या प्रमाणावर ? एखाद्या विवक्षित ठिकाणी उत्पादन झालेल कापड वापराव की नाही हा खर तर अर्थशास्त्राचा प्रश्न या विषयावरील चर्चा त्याच अर्थशास्त्रीय परिभाषेत व्हायला हवी एखाद्या गोष्टीबाबत नेमका विचार करण्याची आमची पात्रताच आता नष्ट झाली असली, तर या आत्मघातकी सवयीविरुद्ध प्रथम लढाई पुकारली पाहिजे कारण आमच्या साऱ्या अनर्थाच ते मूळ कारण आहे त्याऐवजी सर्व परदेशी कापड हे अपवित्र आहे अस म्हणून आम्ही नेमकी तीच चूक करीत आहोत अर्थशास्त्राच योग्य स्थान डावलून एक फसव नैतिक तत्वज्ञान त्याजागी बसवल जात आहे एखादा विशिष्ट कपडा चढवण हा अर्थशास्त्र–आरोग्यशास्त्र किंवा सौंदर्यशास्त्राच्या दृष्टीन गुन्हा असू शकेल– त्याचा नीतिमत्तेशी काही सबध नाही

'परकीय कपड्यांची होळी करण्याचा हुकूम तर सुटलाच आहे– मी स्वत तो पाळण्यास असमर्थ आहे माणसाला गुलाम बनवणाऱ्या यंत्राविरुद्ध महात्मा गांधी लढा पुकारतात तेव्हा मी त्यात सामील होतो मात्र सर्व देशाला शरमेने मान खाली घालायला लावणाऱ्या गुलामी मनोवृत्तीला मी अमल करणार नाही।

खादीच्या कपड्यातून टागोराना काही तरी घोटाळा जाणवत होता इंग्रजी मालावरील बहिष्कार एकवेळ समजण्याजोगा होता, पण सर्वंच परकीय कापडाला 'अपवित्र' म्हणण्याचा खटाटोप भोळसटाकरिता होता भारताच्या आर्थिक हिताच्या दृष्टीन सर्व आयात बद करण योग्य ठरल असत तरीही एका मध्ययुगीन साधनाच्या आधाराने आवश्यक ते सर्व कापड उत्पादन–अगदी आदर्शवादी साध्या राहणीला आवश्यक इतकसुद्धा– देशातच करण शक्य होत काय ? पण चरख्याला 'मुक्तीच महाद्वार' सबोधून हा प्रश्न डावलण्यात आला टागोर याना उत्तर देताना गांधी राजकीय बुवाबाजीची एक पायरी वर चढले अस म्हणण्याचा मोह आवरत नाही– त्याच्या लडबडणाऱ्या विचारामागील हेतू शुद्ध होते हे ठाऊक असूनही चरख्याचा सबध मुद्देसूद विचारसरणीपेक्षा बुवाबाजीशी जास्त आहे या आरोपाच खडन करताना गांधीनी लिहिल, 'मी हा प्रश्न स्वत लाच अनेकदा विचारला आहे चरखा हे सुवर्तेच साधन आहे अस आज साऱ्या देशाला जे वाटत, त्याला विचाराची पार्श्वभूमी आहे यात शका नाही–एक पवित्र कृत्य म्हणून कविराजानी चरखा चालवावा अशी माझी त्याना विनती आहे उपासमार नसती तर चरखा लोकप्रिय झाला नसता परकीय कापडामुळ चरखा स्थानभ्रष्ट झाला म्हणून परकीय कपडे मी अपवित्र मानतो. हे पाप धुण्याकरता मी ते कपडे अग्नीच्या स्वाधीन करतो आणि शुद्ध होतो शेजाऱ्यानं बनवलेल्या खादीच्या कपड्यात आनदी बनू पहातो शेजारी कदाचित् परत चरख्याची कास धरणार नाहीतसं वाटतं तेव्हा मीच त्या चरख्याला जवळ करून लोकप्रिय करतो '

आश्रमवासीय आणि कॉंग्रेसजनात खादी खरोखरच लोकप्रिय झाली. पण ज्या लाखो अनामिकांमध्ये व्हायला हवी तिथे मात्र झाली नाही खेडोपाडी पसरलेल्या अर्धपोटी जनतेला स्वत च्या पायावर उभं करणार हे 'सुवर्तेच

साधन ' अपेक्षेप्रमाणे अयशस्वी ठरल राष्ट्रध्वजावर चरख्याच्या चक्राला जागा मिळाली— शेतकऱ्यांच्या झोपड्यातून मिळाली नाही

काही वर्षांपूर्वीची हकीगत लोकसभेचे एक सदस्य मला म्हणाले, ' मी खादी वापरतो— खर आहे— कॉंग्रेसपक्षातील बऱ्याचजणाना ती वापरलीच पाहिजेस वाटत साध्या कापडाच्या तिप्पट खर्च येतो या खादी कपड्याना '

**गांधीजीचे पुस्तक हिंदवी स्वराज्य**

१९०९ साली, आपल्या वयाच्या चाळीसाव्या वर्षी गांधीनी ' हिंदवी स्वराज्य ' हे आपल पहिल पुस्तक लिहिल दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकाचे नेतृत्व आणि वशभेदाविरुद्ध केलेली अहिंसक चळवळ यामुळे त्यावेळपर्यंत त्याना आतरराष्ट्रीय प्रसिद्धी मिळालेली होती १९२१ साली त्याच्या पुनर्मुद्रणाला लिहिलेल्या प्रस्तावनेत त्यातील सर्व मजकुराला गाधीनी मान्यता दिली १९३८ साली त्याच्या आणखी एका स्वस्त आवृत्तीच्या प्रस्तावनेत गाधीनी लिहिल, ' हे पुस्तक लिहिल्यानतरचा गेल्या तीस वर्षांचा काळ पाहता, मला या पुस्तकात काही बदल करावासा वाटत नाही ' गाधीतत्त्वज्ञानाचे सार म्हणून—आयुष्याच्या अखेरीपर्यंत त्याच्या मताचा अधिकृत दाखला म्हणून ' हिंदवी स्वराज्याकडे ' पाहता येईल त्यात हिंदी ( Indian ) सस्कृतीची स्तुती आहे आणि पाश्चात्य सस्कृतीवर कडवी टीका आहे गाधी त्या पुस्तकात लिहितात,

माझा असा विश्वास आहे की भारताने जी सस्कृती निर्माण केली आहे तिचा साऱ्या जगात पराभव होऊ शकणार नाही आमच्या पूर्वजानी जे पेरल त्याला कुठेही तोड नाही रोम सपल, ग्रीस त्याच मार्गाने गेल इजिप्तमधील राजेशाही ( pharaohs ) मोडली, जपान पाश्चिमात्यच बनला, चीनबद्दलही काही सागता येणार नाही— भारत मात्र कसा कुणास ठाऊक, आपल्या पायावर स्थिर आहे ग्रीस आणि रोमपासून युरोपचे लोक धडे शिकतात तसं केल्यानं त्याच चुका आपण करणार नाहीस त्यांना त्यांना वाटत—ही त्यांची दयनीय अवस्था आहे या साऱ्या घालमेलीत भारत अचल राहतो हेच त्याच वैभव भारताला उपदेश करणारे तसे अनेक आहेत— तरीही तो स्थिर आहे— यातच त्याच सौंदर्य आहे भारताला इतर कुणापासून काही शिकण्याजोग नाही अस म्हणतात ते बरोबर आहे

भारतीय सस्कृती हीच सर्वश्रेष्ठ आहे– युरोपची सस्कृती ही कालपरवाची नवलाई आहे

' इग्रजी भाषेशी माझ वैर नाही– त्याच्या सस्कृतीशी मात्र जरूर आहे '

पाश्चात्य सस्कृतीच्या सर्व अगोपागांबद्दल वाटणारा हा दुरावा अगदी मनापासूनचा होता– त्यामागे एक भावनाविवशता होती त्याला आधार म्हणून जे सागण्यात येई ते बरेचदा ' तर्कट ' असे पाश्चिमात्य सस्कृतीची मुख्य पाप होती रेल्वे, इस्पितळ आणि वकील वर्ग !

' निसर्गान माणसाच शरीर असच बनवल आहे की हात आणि पाय पोचतील इतकी हालचालच त्यान करावी. रेल्वे आणि तत्सम वाहनामुळे एका ठिकाणाहून दुसरीकडे धावत पोचण शक्य नसत, तर भोवतीचा कितीतरी गोंधळ नसता माणसाच्या गतिशील मनोवृत्तीला देवानच बधन घातल आहे माणसान ते बधन ओलाडण्याचे मार्ग तरीही शोधून काढले... माझी शरीररचनाच अशी की मी शेजाऱ्याला तेवढी मदत करावी त्याऐवजी जगातील प्रत्येकाला मदत करण्याच साधन माझ्याजवळ आहे अशी आता मी समजूत करून घेतो अशक्य ते साधण्याच्या या प्रयत्नात माणूस भिन्न धर्मांच्या सान्निध्यात येतो आणि गोंधळात पडतो तुमच्या आता हे लक्षात आल असेल की रेल्वेव्यवस्था ही एक धोकेबाज गोष्ट आहे–माणूस आपल्या मर्यादा ओलाडू लागला आहे '

हे सार विवेचन मान्य करायच असल तर केवळ G I P रेल्वेच नव्हे तर गाधीना प्रिय असलेली भगवद्गीताही निषिद्ध मानावी लागेल कारण त्यातील नायक अर्जुन, ईश्वरइच्छित मर्यादा ओलाडून धावणाऱ्या रथात बसला आहे खुद्द स्वत च्या आयुष्यातील बराचसा काळ गांधींनी रेल्वेच्या डब्यात बसून इकडून तिकडे धावपळ करण्यात घालवला जनतासपर्क साधण्याकरता ! गांधीच्या जीवनातील केवळ हाच एक अतर्विरोध नव्हता, खरं तर निसर्गाकडे परतू पहाणाऱ्या त्यांच्या तत्त्वज्ञानातील ( Back–to–Nature Philosophy ) प्रत्येक महत्त्वाच सूत्र स्वत चा पराभव करणार होत कॉंग्रेसचा अध्यक्ष म्हणून प्रवास करताना तिसऱ्या वर्गानं

जाण्याचा त्याचा आग्रह असे– मात्र त्याच्याकरता खास डब्याची सोय असे.

गांधीजींच्या कार्यक्रमात रेल्वेप्रमाणेच वकीलवर्गालाही स्थान नव्हतं

'माणसांनी आपली भांडणं सरळ हाणामारीनं सोडवली किंवा सग्या-सोयऱ्याकरवी सोडवून घेतली तर त्यात अधिक पुरुषार्थ असेल जेव्हा माणसं कोर्टकचेरीकडे धाव घेतात तेव्हा ती अधिकच भित्री बनतात– त्यांचा पुरुषार्थ कमी होतो हाणामारी करून तंटे सोडवणं रानटीपणाचं तर खरंच– पण कुणातरी तिऱ्हाइताला ते सोडविण्यास सांगणं त्याहून जास्त रानटी आहे कोणाची बाजू बरोबर हे फक्त भांडण करणारांनाच ठाऊक असतं. भांडणाची सोडवणूक केवळ तेच करू शकतात '

आता आठवण करा की गांधी आपल्या नेतेपदाची पहिली पायरी चढले ते प्रिटोरिया येथील एका खटल्यात वकिली विजय संपादन करून ब्रिटिशां-बरोबरील त्यांच्या वाटाघाटींच यशही केवळ त्यांच्या 'नग्या फकीरीत (इति चर्चिल) नव्हतं तर त्यांच्या नेमस्त वकिलीत होतं.

**गांधीजी व निसर्गोपचार**

ब्रिटिश राजवटीनं ज्या काही चांगल्या गोष्टी भारताला दिल्या त्यात आधुनिक औषधव्यवस्था ही प्रमुख गोष्ट पण गांधींच्या हिशेबी इस्पितळं सर्वांत वाईट 'रोग कसे होतात ? आपल्या निष्काळजीपणामुळे किंवा अतिरेकामुळे मी जास्त खातो– मला अजीर्ण होतं– मग मी डॉक्टरकडे जातो– तो मला औषध देतो– बरा करतो मग मी पुन्हा जास्त खातो आणि त्याच्या गोळ्या घेतो प्रथमच मी गोळ्या घेतल्या नसत्या तर अपचनाच्या त्रासाची शिक्षा मी भोगली असती– मग पुन्हा मी कधी जास्त खाल्लं नसतं

'मी पापकर्म करतो– एखादा रोग जडवून घेतो डॉक्टर मला त्यातून बरा करतो शक्यता अशी की मग ते पाप मी पुन्हा करतो डॉक्टर मध्ये न पडता तर निसर्गानं मला बरं केलं असतं मात्र त्यानंतर मी पुन्हा त्या फंदात पडलो नसतो– अशी अधिक सुखी झालो असतो

'इस्पितळं ही पापाची आगरं आहेत माणसं मग स्वतःच्या शरीराकडे दुर्लक्ष करतात आणि अनैतिकता वाढते '

वयाच्या चाळिसाव्या वर्षी आपल्या मित्राला लिहिलेल्या एका पत्रात गांधी लिहितात, ' इस्पितळ म्हणजे सैतानान स्वत:करता निर्माण केलेल्या सस्था आहेत त्यामुळे पाप, दु ख, मानहानी आणि गुलामी तेवढी वाढते '

आपल्या या समजुतीनुसार केवळ निसर्गोपचार, आयुर्वेदिक उपाय आणि अगणित वनस्पती– फलहाराचे त्यानी आयुष्यभर प्रयोग केले पण प्रसगोपात अपेंडिसाय्टिस्, फिस्टुला, मलेरिया, जत, अतिसार, अतिरक्तदाब यानी त्याना गाठल– साठाव्या वर्षानतर दोन वेळा त्यांना मानसिक आजारही झाला (nervous breakdown) तब्येत बरीच बिघडेपर्यंत प्रत्येकवेळी पश्चिमी वैद्यकशास्त्र आणि शस्त्रक्रियेला नकार देऊन निसर्गोपचार करीत राहिले मात्र अखेर शरणागती देऊन औषध, इजेक्शनं, शस्त्रक्रिया इत्यादी साऱ्या गोष्टी त्यानी करून घेतल्या त्याच्या तत्त्वज्ञानाचा पुन्हा एकदा असा दारुण पराभव झाला मात्र निष्काळजीपणा, अतिरेक किंवा पापकर्म यांमुळेच रोग होतात हा त्याचा सिद्धान्त बालिश असला तरी मानसिक बल हे शरीबलावर मात करू शकत, या त्याच्याच उपसिद्धान्तावरील श्रद्धेच्या जोरावर ते अनेक उपोषणाच्या दिव्यातून जाऊ शकले

**गांधीजी व शिक्षणपद्धती**

' शिक्षणाचा खरा अर्थ काय ? त्याचा खरा अर्थ अक्षर ओळख हे केवळ एक साधन आहे आणि साधनाचा उपयोग चांगला– वाईट कसाही करता येतो अनेकजण त्याचा वाईट उपयोग करताना आपण रोज पाहतो खूपच थोडे त्याचा जास्त चागला उपयाग करतात ह जर खर तर शिक्षणामुळे चांगल्यापेक्षा वाईटच झाल आहे अस म्हटल पाहिजे.

' मुलाना लिहिण– वाचण– गणित करायला शिकवण याला प्राथमिक शिक्षण म्हणतात शेतकरी प्रामाणिक कष्ट करून जगतो त्याला अगाच साधारण ज्ञान असत आपले आई-वडील, पत्नी, मुल, गावकरी यांच्याशी कस वागाव हे त्याला चागल ठाऊक असत त्याला नीतिमत्ता समजते आणि ती तो ठीक पाळतो त्याला अक्षर ओळख करून देऊन तुम्ही अधिक काय साधणार असता ? त्याच्या सुखात रतिभरही वाढ त्यान होणार असते का ? त्याच्या झोपडीबद्दल आणि परिस्थितीबद्दल त्याला असमाधानी करण असा तुमचा हेतू असतो का ?

'आता उच्च शिक्षणाकडे वळू या मी भूगोल– खगोल– बीजगणित– भूमिती इ शिकलो म्हणून काय झाल ? माझा अगर माझ्या भोवतीच्या लोकाचा त्यामुळ नेमका काय फायदा झाला ? मला प्राथमिक अगर उच्चशिक्षण न मिळत तरी काहीही विघडल नसत मी त्याचा चागला उपयोग करून घेत नाहीच

'आपली प्राचीन शिक्षणपद्धती पुरेशी होती लाखो लोकाना इग्रजी शिकवीत बसण म्हणजे त्याना गुलाम करण आहे मेकॉलेन या गुलाम करणाऱ्या शिक्षणाचा पाया घातला .दभ, जुलूम इ आता खूप बोकाळले आहेत इग्रजी जाणणारे लोक फसवणूक अगर दमदाटी करण्यात कमी पडलेले नाहीत '

याही बाबतीत गाधी आपल्या तत्त्वांना चिकटून राहिले आणि आपल्या मुलाना त्यानी शाळेत पाठवल नाही त्यांना घरीच शिकवण्याचा त्यांचा बेत होता पण त्याकरता त्याना वेळच नव्हता एखादी कला शिकून घेणही त्यांच्या मुलाना शक्य नव्हत गांधींच्याच शब्दात सागायच तर,

'मी त्याच्या शिक्षणाबाबत बेफिकीर मुळीच नव्हतो मात्र माझ्या या उच्च तत्त्वांपुढे मला त्यांच्या शिक्षणाची मातब्बरी नव्हती माझ्या मुलाची याबाबत माझ्याबद्दल तक्रार आहे दिवसाकाठी रोज केवळ एक तास मी त्याना शिकवू शकतो तर अति आदर्श अस शिक्षण त्याना मी दिल असत पण दुर्दैवान यासाठी आवश्यक ती पूर्वपीठिका मी त्याच्याबाबतीत तयार करू शकलो नाही मला वाटत, भारतीय समाजाकरता मी त्याच्या शिक्षणाचा बळी दिला ज्या ज्या वेळी एखाद्या एम ए अगर बी ए. अगर साध्या मॅट्रिक माणसाशी त्यांची गाठ पडते तेव्हा तेव्हा त्याना हे जाणवत पण मी त्याना शाळेत घातल असत तर अनुभव नावाच्या शाळेत अगर आई-वडिलाच्या सान्निध्यात राहून मिळणाऱ्या शिक्षणाला ते पारखे झाले असते '

सार्वजनिक क्षेत्रात ' भारताला गुलाम करणाऱ्या इग्रज सुशिक्षिता-बाबतची त्याची अढी, जवाहरलाल नेहरू नामक हॅरो आणि केंब्रिज् इथे शिक्षण घेतलेल्या एका तरुणाला आपला राजकीय वारस नेमताना आड

आली नाही पाश्चात्य संस्कृती भारताला विषवत् असेल तर हे विष भिनवण्याच्या कामात सर्वात अधिक निष्णात व्यक्तीला गांधींनी आपला वारस नेमला होता

**सत्याग्रह आणि ब्रह्मचर्य**

वयाच्या तिसाव्या वर्षापासून गांधींच्या मनात दोन कल्पना पक्के घर करून बसल्या होत्या सत्याग्रह आणि ब्रह्मचर्य। सत्याग्रह याचा सर्व-सामान्य अर्थ अहिंसक कृती ब्रह्मचर्य म्हणजे कामालिप्तता त्यांच्या दृष्टीने या दोहोंनाही खोल, आध्यात्मिक अर्थ होता त्यांच्या शिकवणुकीत दोन्ही कल्पना अविभक्तपणे गुंफलेल्या असत खासगी जीवनात त्याचं प्राबल्य तर जास्तच असे वयाच्या सदतिसाव्या वर्षी १९०६ साली त्यांनी ब्रह्मचर्य व्रत पाळण्याची शपथ घेतली आणि त्याचवेळी आपल्या अहिंसक चळवळी-चाही मुहूर्त केला

संभोगसुखाकडे पाहण्याचा गांधींचा दृष्टिकोण टॉलस्टॉयप्रमाणेच नकारा-त्मक होता— टॉलस्टॉयहून अधिक आक्रमक आणि गोंधळात पाडणारा होता त्यांच्या आत्मचरित्रातील एका प्रसंगात त्याचा उगम असू शकेल गांधींचं वय त्यावेळी १५ होतं १४ व्या वर्षी त्यांचं लग्न झालं होतं आयुष्याची अखेर जवळ आलेल्या आपल्या रुग्णाइत वडिलांचे पाय त्यांनी संध्याकाळी चेपले आणि त्यांचे काका वडिलांशेजारी सोबत बसल्यावर ते आपल्या शयनगृहात गेले वडिलांच्या सेवेतून मोकळीक झाल्यावर त्यांना आपल्या तरुण पत्नी-बरोबर रममाण व्हावंस वाटावं यात तसं अस्वभाविक काहीच नव्हतं पण थोड्याच वेळात त्यांच्या नोकरानं दरवाजा ठोठावला आणि त्यांच्या वडिलांच्या मृत्यूची वार्ता कळवली गांधी लिहितात,

'मी वडिलांच्या खोलीकडे धावलो भोगलालसेनं माझा कबजा घेतलेला नसता तर मी वडिलांचा असा अंतर्वेरी झालो नसतो हे माझ्या ध्यानी आलं खरं तर मी त्यांचे पाय चेपीत बसायला हवं होतं, म्हणजे माझ्या मांडीवर त्यांना मृत्यू आला असता वडिलांच्या मृत्यूच्या त्या ऐन क्षणी मी विषयसुखात दंग असावं ही किती शरमेची गोष्ट हा कालिमा मला कधीच पुसता आलेला नाही विषयोपभोगापासून माझी सुटका करून घेण्यास मला खूपच दिवस लागले— अनेक दिव्यातून जावे लागले

## ब्रह्मचर्य पिता व पुत्र

विषयसुखाकडे पाहाण्याच्या गाधीच्या दृष्टिकोणावर या प्रसगान किती परिणाम केला, ही अदाजाची बाब आहे मात्र या दृष्टिकोणाचा त्याच्या मुलावर काय परिणाम झाला हे सर्वाना जाहीर आहे मुलावर सारे सस्कार स्वत च घडवण्याच्या कल्पनेपायी त्यानी मुलाना शाळेत धाडल नव्हत आता स्वत ब्रह्मचर्याचा अगिकार केल्यावर त्यानी मुलाकडूनही तीच अपेक्षा केली त्याचा सर्वांत वडील मुलगा हरिलाल यान १८ व्या वर्षी लग्नाची इच्छा प्रकट करताच, गाधींनी त्याचा काही काळाकरता त्याग केला हरिलालन तरीही लग्नाच धाडस केलच गाधी आफ्रिकेत असताना बऱ्याच काळानतर नातलगाकडे राहिल्यान हा स्वतंत्र बाणा त्याच्या अगी आला होता १९१८ च्या इन्फ्लुएंझाच्या साथीत हरिलालची पहिली पत्नी मरण पावल्यावर त्यान पुन्हा लग्नाची इच्छा प्रकट केली गांधीनी याहीवेळी त्याला विरोध केला हरिलालच्या आयुष्याची गाडी इथून पुढे घसरलीच त्याला दारूच व्यसन जडल— तो वेश्याकडे जाऊ लागला— पुढे मुसलमान धर्माची दीक्षा घेऊन अब्दुल्ला या टोपण नावान आपल्या वडिलावर टीकेचा भडिमार करणारं एक चोपड त्यान प्रसिद्ध केल काही दिवसानी तो एका काळ्या व्यवहारात सापडला फिर्यादीच्या वकिलान गाधीना याबर एक तक्रारवजा पत्र लिहिल १८ जून १९२५ च्या 'Young India' च्या अकात गाधींनी ते मूळ पत्र आणि त्यावरील आपल म्हणण प्रसिद्ध केलं एकापरीन त्यानी हरिलालला चव्हाट्यावर उभा केला

---

'हरिलाल मो गाधी याचा मी पिता आहे ही गोष्ट सत्यच आहे. माझा हा सर्वांत वडील मुलगा ३६ वर्षाचा असून त्याला चार मुल आहेत त्याच्या कल्पना माझ्याशी जुळणाऱ्या नाहीत हे ध्यानी येताच गेली पधरा वर्षे तो निराळा राहतो आहे पाश्चात्त्याच्या भपक्याला तो भुलला— एकेवेळी मी भुललो होतो— त्याचे आर्थिक व्यवहार ही त्याची वैयक्तिक बाब आहे. त्याला श्रीमत व्हायचं आहे पैसे कमवायचे आहेत .. त्याच्या व्यवहाराची नेमकी माहिती मला नाही— मात्र ते ठीक नाहीत एवढ मी जाणू शकतो... एखादा माणूस स्वत चागला असला की त्याची मुलही

चांगली निपजतात असा काही नियम नाही '

वडील आणि मुलगा यानंतर क्वचितच भेटले असावेत गांधींच्या पत्नी कस्तुरबा यांनी त्यांच्या मृत्यूची घटका जवळ आलीशी वाटल्यावर त्याची आठवण काढली हरिलाल आला-- झिंगलेल्या अवस्थेत ! त्याला त्यांच्या-समोरून बाजूला न्यावा लागला कस्तुरबानी कपाळावर हात मारून घेऊन अश्रू ढाळले गांधींच्या अंत्ययात्रेलाही तो हजर होता वडील मुलानं वडिलांच्या साऱ्या मरणोत्तर क्रिया करायच्या असा खरा तर रिवाज-- पण हरिलालला मागेच ठेवण्यात आले त्यानंतर एकाच महिन्यात क्षयाच्या आजारानं तो इस्पितळात मरण पावला गांधींवर लिहिल्या जाणाऱ्या प्रचंड लिखाणात त्याच्या नावाचा उल्लेख क्वचितच सापडेल

हरिलाल कदाचित इतर परिस्थितीतही तसाच वागता मणिलालबाबत तसं म्हणता येणार नाही गांधींचा हा दुसरा मुलगा अखेरपर्यंत त्यांच्याशी इमान आणि निष्ठा ठेवून होता मात्र गांधींकडून त्याला तितकीच अमानुष ( inhuman ) वागणूक मिळाली याला वेगळा प्रतिशब्द नकोच आपल्या वयाच्या विसाव्या वर्षीच एका स्त्रीबरोबर संग करण्याचं घोर पातक मणिलालनं केलं गांधींना हे कळताच त्यांनी जाहीर त्रागा केला, परिमार्जन म्हणून उपोषण केलं आणि मणिलालला लग्न करण्यास कायमची मनाई केली त्या ' अपराधी ' स्त्रीला त्यांनी केशवपनही करायला लावलं पुढे तब्बल १५ वर्षांनी कस्तुबांच्या सतत विनवण्यामुळे त्यांनी ही लग्नबंदी उठवली-- मणिलाल त्यावेळपर्यंत ३५ वर्षांचा झाला होता मात्र या मधल्या काळात मणिलालला गांधींसमोर अगर आश्रमात येण्यास मज्जाव होता आपला भाऊ हरिलाल याला स्वतःच्याच शिलकेतून थोडी रक्कम मणिलालने एकदा उसनी दिली आश्रमातली सारी शिल्लक आश्रमवासियां-करताच आहे असं म्हणून गांधींनी मणिलालवर फसवणुकीचा आरोप केला आणि साऱ्या प्रकाराचा खूप गाजावाजा केला एका विणकऱ्याचा मदतनीस म्हणून त्याला आश्रमातून हाकलण्यात आलं आणि गांधी आडनाव लावण्याची त्याला बंदी करण्यात आली श्री लुई फिशर यांच्याबरोबर बोलताना पुढे मणिलालनं सांगितलं, ' बापूजी खरं तर उपोषणच करणार

होते पण मी सारी रात्र त्यांच्या शेजारी बसून तस न करण्याबद्दल त्यांना सतत गळ घातली– अखेर त्यांनी माझी प्रार्थना ऐकली माझी आवडती आई आणि धाकटा भाऊ देवदास हे अश्रू ढाळीत असतानाच मी घर सोडल'

एक वर्ष विणकर आणि एका प्रकाशकाचा मदतनीस म्हणून काम झाल्यावर गांधींनी त्याला नाताळ या द आफ्रिकेच्या शहरी, 'Indian Opinion' चा सपादक म्हणून धाडला काही किरकोळ भेटीचे प्रसग सोडले तर मणिलाल उर्वरित आयुष्यात विजनवासातच होता

गाधींवर अन्याय न करायचा तर त्यानी आपल्या दोन वडील मुलांना दिलेल्या या वागणुकीचा विचार हिंदू कुटुबव्यवस्थेत पित्याला असलेल्या अमर्याद अधिकाराच्या सदर्भात केला पाहिजे पित्याच्या हुकुमाविरुद्ध मुलगे जातात म्हणजे काय– बापू असेपर्यंत मुलगे खऱ्या अर्थी मोठे असूच शकत नाही मात्र सारा विचार केल्यावरही गाधींची मुलांवरोबरची वागणूक असाधारण जुलमाची म्हटली पाहिजे सिंदबादच्या पाठीवर बसलेल्या म्हाताऱ्याप्रमाणे ते मुलावर स्वार झाले होते

'हरिलाल झाला त्याकाळी मी सतत कामवासनेच्याा आहारी गेलेला असे त्याच्या लहानपणाचा माझा काळ भोग आणि चैन यातच गेला'

स्वत'च हे पाप ते मुलाच्या माथी मारू पाहत होते स्वत' विषयसुखा-कडे पाठ फिरवली म्हणून मुलानाही लग्नाची बदी करून त्याच पौरुष मारून टाकू पाहत होते मुलांचा अक्षम्य गुन्हा काय तर ब्रह्मचर्याच्या या तेजप्रद मार्गावर ते आपल्या पित्याची पाठराखण करू इच्छित नव्हते

आपला एक पुतण्या मगनलाल याला गाधींनी किती वेगळी वागणूक दिली हे पाहिल की वरील मुद्दा अधिक स्पष्ट होईल 'मगनलाल हा मला माझ्या मुलाहूनही अधिक प्रिय आहे' गाधीनी आपल्या भावाला एका पत्रात लिहिल होत स्वत'च्या मुलांना शाळेत न धाडणाऱ्या गाधीनी आपल्या या पुतण्याला आणखी एका पुतण्याबरोबरच– शिक्षणाकरता इग्लंडला पाठवला ही दुहेरी वागणूक कशाकरता ? वयाच्या ४५ व्या वर्षी मगनलाल मरण पावल्यावर लिहिलेल्या पत्रात गांधीनी ते स्पष्ट केल,

'माझा वारस म्हणून ज्याची मी निवड केली तो आता या जगात नाही माझं आध्यात्मिक जीवन त्यानं नीट अभ्यासलं आणि त्याचा अवलंब केला जेव्हा माझ्या सहकाऱ्यांना आणि सत्याच्या शोधात असलेल्या इतर विवाहितांना मी ब्रह्मचर्याची महती सांगू लागलो, तेव्हा इतराआधी तिचं सौंदर्य आणि जरुरी त्याला समजली'

संभोगसुखाचा उल्लेख गांधी नेहमी 'कामांधता' किंवा 'पाशवी भोग-लालसा' याच शब्दात करतात त्यातली स्त्रीची भूमिका केवळ 'भक्ष्य' किंवा 'साधन' म्हणून वर्णिली जाते स्त्रियानाही संभोगसुख हवं असतं हे खरं तर गांधीनाही ठाऊक होतं पण त्यावर त्यांचं साधं उत्तर असे 'आपल्या प्रेमभावनेचा तिनं साऱ्या मानवजातीकरता उपयोग करावा पुरुषाच्या कामवासनेचं आपण साधन होतो किंवा असू शकतो हे तिनं विसरून जावं'

**संतती नियमनाबद्दलची मते**

संभोगसुख हे केवळ संततिनिर्मितीपुरतंच त्यांनी क्षम्य मानलं होतं मग संततिनियमनाला विरोध ओघानंच आला

संततिनियमनाच्या एक प्रमुख पुरस्कर्त्या डॉ मार्गारेट सँगर यांनी १९३६ साली गांधींची भेट घेतली आणि भारताच्या वाढत्या लोकसंख्येच्या होणाऱ्या घोर परिणामाचा उल्लेख करून, त्या कामी त्यांना मदतीची विनंती केली 'भारतातले हजारो लाखो लोक तुमचा शब्द म्हणजे सतवचन मानतात' या शब्दात डॉ सँगर यांच्याच शब्दांत सांगायचं तर 'संभाषण चालू असताना ते स्वतःची कल्पना अगर विचारांचा धागा सोडीत नाहीतच दुसऱ्याचं बोलणं थोडं थांबताच जणू त्यांनी ऐकलंच नाही अशा तऱ्हेने पुन्हा त्यांचेच विचार पुढे मांडू लागतात.. त्यांच्या मनाची कवाडं उघडी असल्याचा दावा त्यांनी केला तरी स्वतःची मतं न बदलण्यात त्यांना अभिमान वाटतो'

तरुणपणी पत्नीबद्दल अभिलाषा वाटली, या कारणास्तव त्यांनी स्वतःला पशू म्हणवून घेतलं आणि संततिनिर्मितीकरता आवश्यक असली तरी संभोगक्रिया हे एक हीन कृत्य मानलं प्रत्येक जोडप्याला तीन किंवा चार

मुल असावीत हे त्याना मान्य होतं मात्र याकरता सपूर्ण वैवाहिक जीवनाच्या काळात तीन–चार वेळाच संभोग केला पाहिजे असं आग्रही प्रतिपादन केल. भारताच्या लोकसंख्येचा प्रश्न सोडवण्याचे दृष्टीने हाही उपाय चरख्याप्रमाणेच अव्यवहारी होता गाधीच्या धार्मिक श्रद्धात तरीही याला महत्त्वाच स्थान होत खादी हे मुक्तीच महाद्वार तर ब्रह्मचर्य हे 'खुद्द ईश्वराकडे नेणार माधन' होत (ब्रह्मचर्य याचा शब्दश अर्थ तोच आहे ) याबाबतच्या त्यांच्या भावना किती तीव्र होत्या हे त्यांच्याच आश्रमातील एका घटनेवरून समजून येत गांधी लिहितात,

जाहान्सबगला असताना मला आश्रमातील दोघा व्यक्तींच्या नैतिक अपराधाची हकीगत समजली एखाद वरबरच अपयश अगर राजकीय लढ्यातील पिछेहाट यापेक्षा मला या वार्तेनं जास्त धक्का दिला मी त्याच दिवशी फिनिक्स येथे जाण्याकरता गाडी पकडली श्री कालेबाग यांनी माझ्याबरोबर येण्यास आग्रह धरला माझी अवस्था ते पाहतच होते ते मला एकट्याने जाऊ देण्यास तयार नव्हते प्रवासात वाटेवर असतानाच माझा मार्ग मला दिसू लागला शिष्य चुकला तर त्याबाबत गुरुही काही अंशी दोषी असतोच याकरता मी काही साधना केली तरच आपल्या स्वत च्या अध पतनाची खरी जाण अपराध्यांना होईल म्हणून मी सात दिवस उपोषण आणि पुढे साडेचार महिने एकभुक्त राहण्याच ठरवल. कालेबाग यांनी मला यापासून परावृत्त करण्याचा निष्फळ प्रयत्न केला पण अखेर माझ म्हणण त्यानाही पटल फिनिक्सला पोचलो तेव्हा माझं मन खूपच शात झाल होत मला हवी ती माहिती मिळाल्यावर मी उपोषण केलं. मात्र प्रत्येकाला याचं वाईट वाटल सार वातावरण पुन्हा शुद्ध झाल पाप करणं ही किती वाईट गोष्ट आहे हे प्रत्येकाच्या ध्यानी आल '

**ब्रह्मचर्याचे प्रयोग**

गांधीच्या आश्रमात कसल विचित्र वातावरण होतं हे एका प्रसगावरूनही ध्यानी येऊ शकेल राजकीय बाबतीत तडजोड करण्याकडे प्रवृत्ती असणारे गाधी, उत्तरोत्तर या ब्रह्मचर्याबाबत अधिकाधिक चमत्कारी बनत गेले स्त्रियावर पडणाऱ्या स्वत च्या प्रभावाचा उपयोग करून त्यांनी

अनेकजणीना, प्रसगी नवऱ्याच्या इच्छेविरुद्ध शपथा घ्यावयास लावल्या आणि अनेकाचे संसार दु:खी केले जे अनेक ससार दु:खी झाले त्यांतील एक त्यांच्या मित्राचाच होता त्यांची भुरळ पडलेल्या स्त्रियाना त्यांनी नादी लावून शपथा घ्यावयास लावल्या अस म्हणण्यात काही वावग नाही

गाधींचे एक सहकारी प्रा निर्मलकुमार बोस यानी प्रथम या साऱ्या गोष्टींच्या परिणामांबाबत बोलण्याच धैर्य दाखवल

त्यांनी महात्माजींना सागितल, 'जेव्हा एखाद्या स्त्रीला पुरुषाबद्दल स्वाभाविक आकर्षण वाटत तेव्हा शारीरिक सुखाच्या पूर्तीमुळे त्याची मानसिक भूकही बऱ्याच अशी भागते पण तुमच्याकडे आकर्षित होणाऱ्या स्त्रीच्या बाबतीत ते घडणं शक्य नसत तुमच्या निकट सान्निध्यातील स्त्रियाची मन त्यामुळ थोडी फार तरी विकृत बनतात एक गोष्ट खरी की आपल्यापैकी प्रत्येकजण थोडाफार मानसिक आजारी ( neurotic ) असतोच पण तुमच्या सहवासाचा तुमच्या सहकाऱ्यांवर मग ते पुरुष असोत की स्त्री– धोकादायक परिणाम होतो हे नि:सशय'

भिन्नलिंगी व्यक्तीपासून काळजीपूर्वक दूर ठेवण्यात आलेल्या धर्मोपदेशक पुरुष अगर स्त्रियानी कामसुख निषिद्ध मानल तर त्याचा काही अध्यात्मिक लाभ त्याना मिळू शकेल पण आपल्या ब्रह्मचर्यसाधनेकरता गांधींनी एक खास, आडवळणी मार्ग शोधून काढला होता स्वत:च्या आत्मनिरोधनाची कसोटी पाहण्याकरता ते हेतुत: मोहाच्या सान्निध्यात राहणार होते-ब्रह्मचर्याची शपथ घेतल्यानतर आपल्या पत्नीबरोबर त्यांनी प्रथम हे प्रयोग सुरू केले आणि कालातराने इतर त्याहून तरुण स्त्रियाबरोबर केले वयाच्या ८० व्या वर्षी मृत्यूच्या दिवसापर्यंत हे प्रयोग चालू होते– त्याच्या आत्म-चरित्रात त्यांनीच म्हटल्यानुसार त्याच्या 'सत्याच्या प्रयोगातील' एका अति धाडसी योजनेचं स्थान या प्रयोगाना होतं आपल्या या प्रयोगाच समर्थन त्यांनी प्रा. बोस यांना पाठविलेल्या एका पत्रात केलं

'माझ्या या प्रयोगात स्त्रीला गौण स्थान आहे या तुमच्या समजुतीच

मला आश्चर्य वाटत तिच्या संमतीची पर्वा न करता केवळ कामांधपणे मी तिची मदत घेतली तर तस म्हणता येईल स्त्री ही सर्व बाबतीत पुरुषाच्या बरोबरीची आहे अस मी मानतो माझी पत्नी माझ्या कामवासनेच 'भक्ष्य' म्हणून केवळ होती तेव्हा कनिष्ठ' होती माझी वहीण म्हणन ती नग्न स्थितीत माझ्या शेजारी झोपली तेव्हा ते कनिष्ठत्वही सपल आमच दोघाच शरीर आणि मन कामवासनेन चाळवू न शकणारा स्पर्श आम्हाला एका उच्चतर पातळीवर नेतो

'माझ्या पत्नीऐवजी दुसरी एखादी स्त्री ही बहिणीची भूमिका आता करते यात गैर ते काय? माझ्या निकट विवस्त्र स्थितीत झोपणाऱ्या स्त्रिया अगर मुलीवर माझी पापी नजर असते अस तुम्हाला वाटत नसेलशी मी आशा करतो अ किंवा ब च्या अकाडतांडवाचा माझ्या प्रयोगावर परिणाम होणार नाही या प्रयोगापूर्वी त्या स्त्रियाजवळ जे काही होतं ते प्रयोगाननरही तसच असेल सबधी व्यक्ती मनू आहे की इतर कुणी हा मुद्दा या वादाच्या सदर्भात निरर्थक आहे'

उपरोक्त मनू म्हणजे गाधीच्या निकट नातलगातील एकाची नात गांधीच्या ब्रह्मचर्याच्या शोधसाधनेत वापरली गेलेली अखेरची शेळी ( gunea pig ) लहानपणीच तिची आई वारल्यावर कस्तुरबानी तिचा साभाळ केला कस्तुरबाच्या निधनानतर ती गांधीच्या अधिकारात आली त्यानी तिला लिहिल, 'मी अनेकांचा पिता म्हणून वागलो आहे—तुझी मात्र मी आई बनेन' एखाद्याला हे विचित्र वाटेल, पण गाधींना नेमक तेच अभिप्रेत होत— इतक की त्याच्या मृत्यूनतर तिन जे पुस्तक लिहिल त्याला नाव दिल 'बापू—माझी आई' गाधींच्याच शब्दात सागायच तर 'तारुण्य नुकत कुठ फुललेली ती अठरा वर्षांची मुलगी कामुक विचारापासून सर्वस्वी मुक्त होती' मात्र प्यारेलाल आपल्या चरित्रात लिहितात, 'गाधीजीना अशी शका भेडसावीत होती की तिला एकतर स्वत'च मन समजत नव्हत किंवा ती स्वत ला आणि इतरांना फसवीत होती 'आई' म्हणून गांधीजीना खर तर ते कळायला हरकत नव्हती, कारण मुली आपल्या वडीलाजवळ मनातल सार सागत नसल्या तरी आईपासून काही

झोपवीत नाहीत आपण तिची आई आहोत असं गांधीजींचं म्हणणं होतं आणि ते तिला मान्य होतं त्यात कितपत तथ्य होतं हे समजतं तर त्यांच्या मनातील गोंधळ तरी कमी होता ब्रह्मचर्याच्या संपूर्ण काममुक्तीच्या मार्गावर आपली किती प्रगती झाली आहे हेही त्यांना त्यानिमित्ताने समजलं असतं आईनं एरवी जे जे करावं ते ते सारं त्यांनी तिच्याकरता केलं होतं तिचं शिक्षण– खाणपिणं– कपडालत्ता– विश्रांती आणि झोपेची गरज– साऱ्याकडे त्यांनीच लक्ष पुरवलं होतं अधिक चांगली देखरेख आणि सांभाळ करता यावा म्हणून तिला ते स्वतःच्या बिछान्यात झोपवीत असत– एका पूर्ण निष्पाप मुलीला आपल्या आईबरोबर निजण्यात संकोच वाटण्याचं खरं तर कारण नव्हतं '

सरोजिनी नायडूंच्याच शब्दात सांगायचं तर बापूंच्या चित्तशुद्धीकरता बऱ्याच भानगडी कराव्या लागत होत्या मनू बाह्यात्कारी काही दाखवीत नव्हती त्यांच्या उपकाराची फेड ती आजारपणात आणि उपोषणाच्या वेळी त्यांची सेवा करून करीत होती त्यांना एकदा एनिमा देत असताना त्यांच्यावर काय परिणाम झाला हे तिनं आपल्या रोजनिशीत लिहून ठेवलं– एकदा आंघोळीच्या टबात बसून गांधीजी तिला जे म्हणाले त्याचीही नोंद केली ' आंघोळ करीत असताना बापूंनी अतिशय प्रेमाने हे शब्द उच्चारले आणि त्यांचा हात माझ्या पाठीवरून फिरला ' भारतातील, विशेषतः आश्रमातील उघडचावरचे व्यवहार पाहता असलं लाडिक वर्तन अतिनिष्पापपणीही घडू शकत होतं

गांधींच्या दृष्टीने हा प्रयोग अतिमहत्त्वाचा होता, तो यशस्वी झाला तर त्यांचं सत्यशोधन यशस्वी होणार होतं त्यांच्या विचाराची कळकळ मग मुसलमानांना समजली असती– मुस्लिम लीगमधील त्यांचे विरोधक आणि खुद्द जिना यांच्यापर्यंत पोचली असती ती न समजल्यानच ते ( जिना ) स्वतःच आणि भारताचं नुकसान करीत होते आपल्या धन्याच्या वागणुकीतील आणि विचारातील सारे बारकावे ठाऊक असलेल्या त्यांच्या अगदी विश्वासातील व्यक्तीचं– प्यारेलाल यांचं हे अवतरण आहे आपण ईश्वराचे साधन आहोत असं गांधींना मनापासून वाटे– त्यांच्या मार्गदर्शनामुळेच कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्याचा मार्ग त्यांना

सापडतो असं ते म्हणत मात्र ते साधन शुद्ध, कामलोभापासून मुक्त असायला हवं– ही शुद्धी मिळवायची तर ब्रह्मचर्याच्या प्रयोगातून गेलच पाहिजे, त्यामुळे अनादि–अनत अशा ब्रह्मतत्त्वाशी त्याचा संबंध जुळत होता हिंदू–मुस्लीम समस्या सोडवण, आपसातील त्याच्या कत्तली थांबवणं, मुस्लीम लीगची त्यांच्या हेतूबाबत खात्री पटवण– परिणामी मुस्लीम लीगनं पाकिस्तानबाबतचा आपला आग्रह सोडण याकरताही त्याना ( ब्रह्मचर्याचा ) उपयोग होता.

महात्माजींच्या दृष्टीन हे सार अगदी तर्कशुद्ध होत त्याचे सार्वजनिक, राजकीय व्यवहार आणि खासगीतले सत्याचे प्रयोग या गोष्टी अभिन्न होत्या– सत्याग्रह आणि ब्रह्मचर्य ही परस्परावलबी होती सत्याग्रह म्हणजे अहिंसक कृती नव्हे– तर आत्मबल किंवा सत्यबलाचा सारा जोर लावलेली कृती होती आयुष्याची अखेरची दोन वर्षे ते अशा अवस्थेला पोचले होते की मनूबरोबरच्या महत्त्वपूर्ण प्रयोगावर सार काही अवलबून होत– सर्वांचा हितोपदेश झिडकारून, तिन आपल्याला शय्यासोबत दिलीच पाहिजे असा आग्रह त्यांनी कायम ठेवला तो यामुळेच जून व जुलै १९४७ या भारताच्या भवितव्याच्या दृष्टीने अतिशय नाट्यपूर्ण कालात ब्रह्मचर्य या विषयावर सहा लेख त्याना लिहावेसे वाटले, त्यालाही कारण हेच स्वतःच्या व्यक्तित्वाच्या प्रभावावर दगली शमविण्याचे दृष्टीने पूर्व बगालमधील मुस्लिम खेड्यापाड्यातून त्यांचा त्यावेळी दौरा चालू होता या काळात त्याचे साथीदार बहुतेक मनू, बोस आणि एक टकलेखक एवढेच होते. त्याच्या अनेक सहकारी आणि निकट मित्रानी 'मनूप्रयोगाबाबत' आपला निषेध नोंदवला होता– त्याबद्दलची आपली नापसती त्याना स्पष्टपणे कळवली होती– काही त्यामुळे त्यांना सोडूनही गेले होते या प्रयोगाची जाहीर वाच्यता कुणी होऊ दिली नाही, पण आपल्याबाबतचा आदर कमी झाला आहे हे गांधींच्या लक्षात आलच– त्यांना आपल जीवन एकाकी आणि भकास झाल्याची जाणीव झाली गांधींच्या या प्रयोगामागची प्रामाणिक भावना ध्यानात ठेवूनही– त्या प्रयोगाचे सबधी दोनही व्यक्तींवर होणारे मानसिक दुष्परिणाम त्याच्या मनावर बिबवण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरल्यावर

खुद्द बोसही त्यांना सोडून गेले (मात्र काही महिन्यांनी गांधींच्या सेवेकरता ते परत आले) याला उत्तर म्हणून गांधींनी काळवेळाचा विचार न करता 'हरिजन' मधून जे लिहिले ते इतके लोकविलक्षण की अनेकांचे डोळे ते वाचून पांढरे झाले

काँग्रेसचे अध्यक्ष आचार्य कृपलानी यानाही त्यानी लिहिले, 'हे माझे अति वैयक्तिक पत्र आहे– खासगी मात्र नव्हे मनू गांधी– माझी नात– माझ्याच बिछान्यात झोपते . यामुळे मला अनेक सहकाऱ्याचा रोष ओढवून घ्यावा लागला आहे ..मी यावर बराच विचार केला आहे...साऱ्या जगाने झिडकारले तरी माझ्या दृष्टीने जे सत्य त्याचा मी त्याग करणार नाही .. वाळीत टाकले जाण्याचा हा धोका मी यापूर्वीही पत्करलेला आहे वस्तुस्थिती ही अशी आहे खरी ' काँग्रेसमधील इतर पुढाऱ्याबरोबर आचार्यांनी याबाबत चर्चा करावी असे गांधींनी या पत्रात पुढे सुचवले आहे स्वातंत्र्य-प्रदानाच्या वाटाघाटी महत्त्वपूर्ण अवस्थेत आलेल्या असताना !

कामविकारावर विजय मिळविण्याच्या गांधींच्या या साऱ्या धडपडीचा इतक्या विस्ताराने उल्लेख मी दोन कारणामुळे केला एक की यामुळे खुद्द त्यांच्याच पुराव्यानिशी त्यांच्या व्यक्तित्वाचे कोडे उलगडण्यास मदत व्हावी आणि दुसरे की हाच 'गांधींचा वारसा' पुढे सर्व देशाच्या सामाजिक आणि राजकीय वातावरणाचा एक चिरस्थायी अंग बनला

**'सत्याच्या प्रयोगांवर' पांघरूण !**

गांधींच्या मृत्यूनंतर त्यांच्या आयुष्यातील या अखेरच्या 'सत्याच्या प्रयोगांवर' पांघरूण घालण्याचा सरकारने प्रयत्न केला या 'तेरी चुप– मेरी चुप' कटाचा पुरावाच पाहायचा तर पूर्वी उल्लेखिलेल्या, निर्मलकुमार बोस यांच्या My Days With Gandhi या पुस्तकाचा देता येईल एक विख्यात मानवशास्त्रज्ञ आणि गांधीतत्वज्ञानाचा पुरस्कर्ता असलेल्या प्रा बोस यानी यापूर्वीही दोन पुस्तके लिहिली होती, एक 'Studies in Gandhism' आणि दुसरे 'Selections from Gandhi' गांधींच्या पूर्व बंगालमधील पदयात्रेत ते सामील होते आणि 'मनूप्रयोगाचे' सविस्तर वर्णन न करताही या प्रयोगाच्या दुष्परिणामावर त्यानी 'My Days With Gandhi' पुस्तकाचे एक प्रकरण खर्चले होते समजसपणे प्रेम आणि आदरपूर्वक

लिहिलेल हे पुस्तक– पण कुणीही प्रकाशक ते छापण्यास तयार झाला नाही– उलट ते पुस्तक प्रसिद्ध होऊ नये असे जोराचे प्रयत्न ' काही अति उच्चपदस्थ व्यक्तींकडून ' केले गेले- गाधींच्या मृत्यूनतर पाच वर्षांनी ते पुस्तक स्वत च प्रकाशात आणण्याच बोस यांनी ठरवल– मात्र भारतात ते कुठेही मिळत नाही गाधीचा एक चरित्रकार Geoffrey Ash याच्या म्हणण्यानुसार ' त्यातील एक महत्त्वाची आठवण गाळून टाकण्यात आली हे सर्वांना माहीत आहे ' मोठ्या मुष्किलीने इग्लडमध्ये त्याची एकमेव प्रत मिळवण्यात मी यशस्वी झालो ब्रिटिश म्युझियममध्येसुद्धा त्या पुस्तकाची प्रत नाही बोस याच्या काही विधानांचा उल्लेख असलेल्या माझ्या एका पुस्तकावरही भारतात बदी आहे, ' गाधीबद्दल अनादराचे शेरे त्यात आहेत या कारणास्तव

योग असा की बोस याच्या या पुस्तकानतर तीनच वर्षांनी प्यारेलाल यानी आपल अधिकृत आणि प्रचड अस गाधीचरित्र प्रसिद्ध केल– बोस यानी उल्लेखिलेल्या सर्व घटना त्या पुस्तकान खऱ्या ठरवल्या My Days With Gandhi ' या पुस्तकातील खालील उतारा या दृष्टीने पाहण्याजोगा आहे,

' गाधीच्या निकट सानिध्यातील अनेक व्यक्तीना या प्रकाराची माहिती होती गांधीबद्दलच्या गैरसमजास आपण कारणीभूत होऊ या भीतीने त्याच्या चरित्रातील हा भाग या सर्वांनी टाळणच पसत केल प्रस्तुत लेखकाला ही भूमिका कधीच मान्य नव्हती गाधीजींनी जे केल ते बरोबर नव्हतं अशी शका आम्हा सर्वांच्या मनात कुठेतरी होती मात्र त्याच्या मोठेपणावर अन्याय होऊ नये या प्रयत्नापायी आम्ही, आम्हास ठाऊक असलेल्या या गोष्टीवर पाघरूण घालण पसत केल. आपल्या काळातील एक असामान्य व्यक्तित्व समजून घेण्याचा मार्गच यामुळे बद होत होता अस मला वाटत

' .जे आम्ही प्रत्यक्ष पाहिल तेवढ्यापुरतेच आम्ही साक्षीदार असू शकतो आणि सत्याच्या भावनेनेच त्याच खरखुर चित्रण करू शकतो, भविष्यात केव्हातरी आपण आज ज्याना जिवापाड जपतो अशी अनेक मूल्ये इतिहासाच्या अडगळीत जमा झालेली असतील अशा वेळी– इतर समकालीन व्यक्तीच्या तुलनेत पर्वतप्राय व्यक्तित्व असलेल्या या व्यक्तिबाबतच खर

ज्ञान लोकांना होऊ शकेल '

पाश्चात्य जगात, गांधींचा हा ब्रह्मचर्यविषयक ध्यास एक तऱ्हेवाईकपणा गणला गेला असता भारतात मात्र त्यानं खूप खोलवर पडसाद उमटवले पाश्चात्य वाचकांना न समजण्याजोगा पण प्रत्येक हिंदूला चांगला परिचित असा एक ध्वन्यर्थ गांधींच्या या साऱ्या शिकवणुकीत होता कामनिरोधामुळे होणाऱ्या शारीरिक फायद्यांशी त्याचा संबंध पोचतो हिंदूच्या अतिप्राचीन आयुर्वेदशास्त्रानुसार, पुरुषाचं सार ओज त्याच्या वीर्यात साठवलेलं असतं या मौल्यवान अशा द्रवात त्याच्या साऱ्या शारीरिक आणि मानसिक शक्ती दडलेल्या असतात– परिणामी त्याला बिंदू, सोमरस, वीर्य या सारखी नावं आहेत या वीर्याच्या हानीमुळं शारीरिक दुर्बलता आणि मानसिक क्षीणता येते या उलट इंद्रियदमन करून हा वीर्यरस साठवल्यास त्यामुळे आध्यात्मिक बल, प्रकृती आणि आयुर्मर्यादा या बाबतीत फायदा होतो (गांधी स्वतः १२५ वर्षेपर्यंत जगण्याची उमेद ठेवून होते) यामुळे माणसाच्या शरीरावरही तेज चढतं–जे तेज गांधींसकट सर्व साधुपुरुषाच्या अंगावर होतं असं म्हटलं जातं. संभोगक्रिया चालू असतानाही वीर्यस्खलन होऊ न देणारे हठयोगाचे अनेक प्रकार अस्तित्वात आहेत

**' पाशवी वासने ' विरुद्ध लढा !**

आयुर्वेदावर गांधींचा दृढ विश्वास होता आणि आपल्या कुटुंबीय आणि मित्रमंडळींवर त्यांनी त्याचे प्रयोग केले त्यांच्या लिखाणातील अनेक उताऱ्यांवरून त्यांचा या ' वीर्यरक्षणा 'वर विश्वास होता असं दिसतं ' आरोग्याची गुरुकिल्ली या आपल्या पुस्तिकेत ते म्हणतात,

' नपुंसक मनुष्यासही कामवासना असतेच पण स्वतःचे कामविकार जाळून वीर्यवृद्धी करणाऱ्या माणसाची गोष्ट सर्वस्वी निराळी. प्रत्येकानं करावी अशी ती गोष्ट आहे वीर्यवृद्धी करून, त्याचं जीवरसात रूपांतर करून शरीरात मिसळवणं ही गोष्ट कष्टसाध्य आहे एकदा हे जमलं की त्यापासून शरीर आणि मन दोन्हींना फायदा होतो खुद्द मनुष्यनिर्मितीस कारणीभूत अशा या अद्भुतरसाचं संवर्धन करून त्याची जीवरसात परिणती केल्यानं अपार शक्ती आणि उत्साह मिळतो '

हिंदू तत्वज्ञानाचा कामविकाराकडे पाहण्याचा दृष्टिकोण दुटप्पी आहे एकीकडे पाहाव तो लिंगमाहात्म्य, मंदिरावरील उत्तान कामुक खोदचित्र, कामसूत्रासारख साहित्य आणि कामोत्तेजक जडीबुट्ट्यांचे जागोजागचे अड्डे आणि दुसरीकडे संस्कृतिमाहात्म्य, दांभिकपणा, कामविकारावर विजय मिळविण्याची पोकळ बडबड, वीर्यस्खलनाने येणाऱ्या दुर्बलतेची आणि जीवरसहानीची अतिरेकी काळजी पूर्वीजाबाबतची चिंता हिंदूमध्ये सरसकट आढळते याबरोबरच जिच्यामुळे हे सार घडतं त्या स्त्रीबद्दल एक अजाण संताप हिंदू देवदेवतांच्या मालिकेत प्रीतिदेव अगर प्रीतिदेवता नाहीच— आहे तो कामदेव ! वासनेच प्रतिनिधित्व करणारा

या मनोवृत्तीच उदाहरण म्हणून एका वार्ताहरान गांधींना लिहिलेल्या एका तक्रारवजा पत्राच देता येईल कामविकारावर विजय मिळविण्याची लढाई जिंकण्यात त्याला यश आल नव्हत— 'जरी पुनःपुन्हा या गटार-गंगेत डुबायच नाही अस ठरवल तरी'

गांधींनी याला दिलेल उत्तर पाहण्याजोग आहे, 'स्त्रीला गटारगंगा समजणारा मनुष्य मी अडाणीच म्हणेन पुरुष आणि स्त्री दोघांनाही हा विचार अन्याय करतो मुलगा आपल्या आईशेजारी बसू शकत नाही का ? किंवा गाडीत एखादा माणूस आपल्या बहिणीला खेटून बसत नाही का ?'

स्त्रीच्या बाजूने केलेली ही सारी वकिली माता किंवा बहीण या स्त्रीच्या भूमिकांबाबतच होती— पत्नी म्हणून तिच्या भूमिकेची नव्हतीच एकापरीन गांधी त्या वार्ताहाराच म्हणण आडपडद्यान मान्य करीत होते

मार्गारेट सँगर यांना त्यांनी थोडच्या कटुपणेच सांगितल होत,

'आपल्या नवऱ्याचा हल्ला कसा परतवायचा हे स्त्रियांना कळेल तर काही प्रश्नच उरणार नाही माझ्या सान्निध्यात आलेल्या विवाहित स्त्रियांना ही प्रतिकाराची कला मी नेहमी शिकवीत आलो आहे यातली मुख्य अडचण इतकीच की बहुतेक जणींना मनापासून असा प्रतिकार नको असतो'

'कामविकार' आणि 'पाशवी वासना' विरुद्ध गांधींचा हा आयुष्यभर चाललेला लढा, केव्हातरी एकदा एक 'कामुक स्वप्न' पडल तेव्हा त्यांची

जाहीर वाच्यता करून प्रायश्चित्त म्हणून त्याप्रीत्यर्थ पाळलेलं आठवड्याचं मौन, वीर्यरसाच्या सामर्थ्यावर त्यांचा असलेला विश्वास– या साऱ्या गोष्टी-मुळे कामोपभोगाकडे अपराधी दृष्टीने पाहणाऱ्या हिंदू समाजाचं ते जणू जातिवंत प्रतीकच बनले देवभोळ्या जनतेची ही समजूत स्वतः गांधींनी उत्तेजन देऊन पक्की केली परिणामी राजमान्य दांभिकतेच्या परिसरात जडीबुट्टयाचा हा व्यापार अजूनही उमेदीने चालू आहे

'गांधींचा वारसा' म्हणून ज्याला संबोधण्यात येतं, त्याचा एक लहानसा पण महत्त्वपूर्ण असा भाग म्हणजे लंघन आणि पचन, याबाबतचा सर्वदूर पसरलेला मानसिक चिंतारोग जंतुमूलक अतिसार, जंत आणि तत्सम व्याधींचा सुळसुळाट असलेल्या देशात हे घडावं यात तर आश्चर्यकारक काही नाही पण आयुष्यभर गांधींनी ध्यास घेतलेल्या लंघन–उपोषण आदि गोष्टींचाही, कामविकारावर मात करून भोगमुक्त पावित्र्य मिळवण्याच्या त्यांच्या धडपडीशी संबंध होता ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा करतेवेळी त्यांनी लिहिलं होतं, 'ब्रह्मचाऱ्याचं अन्न बेतांच, साधं, तेल–मसाले इ कमी असलेलं आणि शक्यतर बिनशिजवलेलं असावं सहा वर्षांच्या प्रयोगानं मला हे शिकवलं आहे की ब्रह्मचाऱ्याचं आदर्श अन्न म्हणजे ताजी फळं आणि शेंगदाणे इ प्रकारची सुकी फळं होत' दुधाने कामशक्ती वाढते म्हणून दूधसुद्धा शक्यतोवर वर्ज्य असावं असं त्यांना वाटत होतं– 'गोरक्षण' या नावानं त्यांनी लिहिलेल्या पुस्तिकेचा या भूमिकेशी कसा मेळ बसत होता हे समजणं कठीणच

### अहिंसेचं हत्यार

गांधींचे एक चरित्रलेखक श्री लुई फिशर यांनी त्यांना एक अद्वितीय व्यक्ती, एक थोर व्यक्ती– गेल्या एकोणीसशे वर्षातील सर्वांत थोर व्यक्ती म्हटलं आहे इतरांनी त्यांची ख्रिस्त, बुद्ध आणि संत फ्रान्सिस यांच्याशी तुलना केली आहे हिंसेचा वीट आलेल्या जगाला अहिंसेवर आधारित असे राजकीय हत्यार त्यांनी दिल्यानं ते अमर झाले आहेत असं म्हटलं जातं असहकार आणि कायदेभंगाच्या चळवळींना अंशतः मिळालेलं यश, सशस्त्र पोलिस आणि सैनिकांविरुद्धचे निःशस्त्र मोर्चे, बैठे सत्याग्रह, आनंदाने पत्करलेले तुरुंगवास, जाहीर उपोषणं– हे सारंच राजकारणात अगदी नवीन होतं असं कुणी पूर्वी

कुठे केल्याच ऐकिवातच नव्हत– त्यात आशेचा प्रकाशकिरण लोकाना दिसला– सर्वांत आश्चर्य अस की या सान्याला यश मिळू पाहत होत भारताची दास्यमुक्ती हे गाधीच चिरस्थायी कार्य नव्हे– जॉन् ग्रिग (Grigg) आणि इतर काहीच्या मतानुसार गाधी नसते तर भारतान अधिक लवकर स्वातंत्र्य मिळवल असत– तर सत्तेच्या राजकारणाहून काही वेगळे मार्ग उपलब्ध आहेत याची अगाला जाणीव करून देण हे होत आणि काही विशिष्ट परिस्थितीत अहिंसा इतर मार्गांची जागा घेऊ शकत होतीच मात्र या अहिंसेलाही मर्यादा होत्या आणि गाधीच दुर्दैव हे की एक राजकीय हत्यार म्हणून या अहिंसेचा पल्ला बेताचाच होता काही किमान परपरागत चागुलपणा अगी असलेल्या शत्रूविरुद्धच अहिंसेचा उदात्त खेळ खेळला जाऊ शकत होता– अन्यथा साघिक आत्महत्त्या हीच अहिंसेची गती होती

तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात काहीतरी नवीन सापडलेल्या तत्ववेत्त्याप्रमाणे गाधीनाही प्रथम अहिंसा हे सर्वकाळी उपयोगी पडणार साधन वाटल होत याबबतच्या निराशेचा पहिला धक्का त्याना १९१९ साली बसला– त्याच्या सविनय कायदेभगाच्या चळवळीची परिणती सर्व देशभर दगली होण्यात झाली तेव्हा गाधींनी ती चळवळ मागे घेतली– परिमार्जन म्हणून उपोषण केले आणि सत्याग्रहाच शास्त्र आणि तत्र याबाबत आपल्या अनुयायांची पुरेशी तयारी झालेली नसतानाच अशी चळवळ सुरू करण्यात ' हिमालयाएवढी चूक ' झाल्याच मान्य केल

पुढील वर्षी मुसलमानाना बरोबर घेऊन त्यानी एक नवीन कायदेभग मोहीम सुरू केली– पुन्हा तिच रूपातर दगली आणि अखेर चारी चौरा येथील कत्तलीत झाल गाधींनी पुन्हा चळवळ मागे घेऊन उपोषण केल

त्याची सर्वांत यशस्वी चळवळ म्हणजे १९३०–३१ चा मिठाचा सत्याग्रह आणि त्याबरोबरची भव्य दाडीयात्रा यावेळीही दगली झाल्याच, मात्र तरीही व्हॉइसरॉयबरोबर समझोता होईपर्यंत ती चळवळ चालू ठेवण्यात आली यानतरच्या १९३२–३४, १९४०–४१ आणि १९४२–४३ च्या चळवळी काही न साधताच खर तर थाबल्या– प्रत्यक्ष लाभाच्या दृष्टीन पाहिल तर या चळवळीचा दाखला मनावर ठसण्याजोगा नव्हता पण राजकारणी, बुद्धिवादी आणि एकूण जगावर या चळवळीनी केलेले परिणाम

प्रचंड होते– त्यांनी गांधींना एकदम अवतारी पुरुष बनवलं त्यांनी केलेली अठरा उपोषणं आणि साडेसहा वर्षांच्या तुरुंगवासानं (जोहान्सबर्ग येथील कोठडीत पहिला आणि आगाखान यांच्या राजमहालातील अखेरचा) ही प्रतिमा अधिक पक्की झाली

पण अहिंसेचा, एक साधन म्हणून उपयोग करण्याच्या गांधींच्या पद्धतीत हिमालयाइतक्याच प्रचंड विसंगती होत्या– त्यांनी इतर देशांना केलेले उपदेश बरेचदा माणुसकीच्या दृष्टीनं पाहता बेजबाबदार होते आध्यात्मिक मार्गावर बरीच प्रगती केलेली माणसंच अहिंसक प्रतिकाराचा योग्य उपयोग करू शकतात असं त्यांनी वारंवार प्रतिपादलं आणि तरीही जगात कुठेही उपयोगी पडणारं साधन म्हणून अहिंसेचा पुरस्कार केला– नाझी जर्मनीच्या अत्याचाराखाली ज्यू भरडले जात असताना त्या दुर्दैवी आणि सर्वस्वी अयोग्य परिस्थितीत! डिसेंबर १९३८ मध्ये सर्व जर्मनीभर ज्यूंची पहिली कत्तल झाली त्यावेळी गांधींनी लिहिलं, 'मी हे म्हणण्यास बिलकूल कचरत नाही की अहिंसेमुळे मिळणाऱ्या आत्मबलावर ज्यू भरवसा ठेवतील तर ते धैर्य आपल्या जुलमी पोलिसांपेक्षा अधिक वरच्या दर्जाचं आहे हे समजून हिटलर त्यापुढे नतमस्तक होईल ' पुढे १९४६ साली गॅसचेंबर्समध्ये साठ लाख ज्यूंची होळी झाल्याची विश्वास बसण्यासही कठीण अशी बातमी आली तेव्हा गांधींनी लिहिलं, 'ज्यू जनतेनं खाटिकाच्या सुऱ्यांपुढे माना ठेवावयास हव्या होत्या कड्यावरून समुद्रात उड्या मारणं हेही त्यांना करता आलं असतं सारं जग आणि जर्मनीची जनता त्यामुळं खडबडून जागी झाली असती.'

या साऱ्या उद्‌गाराचा अन्वयार्थ केवळ एकाच संदर्भात लावता येतो– आंतरराष्ट्रीय व्यवहाराबाबतचं गांधींचं भयानक अज्ञान! दुसरं महायुद्ध सुरू होताच त्यांनी दोस्त राष्ट्रांना आपला पाठिंबा व्यक्त केला फ्रान्सच्या पराभवानंतर शरणागती दिल्याबद्दल त्यांनी मार्शल पेताँ यांचे अभिनंदन केलं आणि ६ जुलै १९४० रोजी 'प्रत्येक ब्रिटिश व्यक्तीला आवाहन' प्रसिद्ध करून फ्रान्सचं अनुकरण करण्याची विनंती केली (त्यांच्या स्वतःच्या खास आग्रहावरून या आवाहनाचा मसुदा व्हाइसरॉयने British War Cabinet ला कळवला )

'ब्रिटनचा पराभव व्हावा अस मला वाटत नाही त्याचप्रमाण रानटी शक्तीच्या या स्पर्धेत तिन विजयी व्हाव असही वाटत नाही. . तुम्ही नाझींचा प्रतिकार नि शस्त्रपणे किंवा अहिंसक शस्त्रांनी करावा अस मी म्हणतो तुमच्या जवळ असलेली शस्त्र मानवजातीस निरुपयोगी म्हणून तुम्ही खाली ठेवावीत अशी माझी इच्छा आहे. तुम्हाला आपले वाटणारे देशाचे जे भाग हिटलर किंवा मुसोलिनी यांना हवे असतील, ते त्याना खुशाल घेऊ द्यात– तुमच्या निसर्गसुदर बेटाचा त्याना ताबा घेऊ द्या– तसच तुमच्या अनेक इमारतीचाही तुम्ही हे सार दिलत तरी आपला आत्मा मात्र देऊ नका त्याना तुमची घर बळकावयाची असली तर त्याच्याकरता ती रिकामी करा तुम्हाला त्यानी सुखेनैव बाहेर पडू दिल नाही तर आपली मुल आणि बायकोसकट कत्तल होऊ देण पत्करा– मात्र त्याच स्वामित्व मान्य करू नका '

बापूच्या अहिंसेकरता बऱ्याच प्रेताची जरूर लागणार होती हेच खर !

हाच उपदेश त्यानी झेक, पोलिश, फिन् आणि चिनी लोकांनाही केला होता त्याच्या आयुष्यातील अखेरच्या दिवशी, त्याची हत्या होण्यापूर्वी थोडाच काळ आधी Life मासिकाच्या प्रतिनिधीन त्यांना विचारल होत, ' तुम्ही अणुब्वम्चा प्रतिकार कसा करणार ? अहिंसेन ?' त्यांनी उत्तर दिल होत, ' मी अशावेळी आडोश्याला धावणार नाही मी उघड्यावर येईन बैमानिकाला हे समजेल की माझ्या मनात त्याच्याविरुद्ध किल्मिष नाही आमचे चेहरे त्याला इतक्या उचावरून दिसणार नाहीत हे मीही जाणतो पण आमच्या हृदयाची हाक– जिला तो धक्का पोचवणार नाही– ती त्याला ऐकू जाऊन त्याचे डोळे उघडतील '

**तत्त्वाला मुरड**

या आणि यापूर्वीच्याही अशाच वक्तव्यावरून अस वाटेल की गांधीचा अहिंसेवर सपूर्ण विश्वास होता (आपल्या ' ब्रिटिशाना आवाहन,' या आवाहनात त्यांनी म्हटल होतं की अहिंसा कामी येणार नाही असा एकही प्रसग माझ्या माहितीत नाही ) प्रत्यक्षात मात्र अनेक कठीण प्रसगाचे वेळी त्यांनी आपल्या या तत्त्वाचा प्रच्छन्नपणे त्याग केला महत्त्वाची नसली तरी १९१८

साली ब्रिटिश सैन्याकरता भरती करण्याच काम करीत असतना घडलेली घटना पाहा खेड जिल्ह्यात भाषण करीत असताना ते म्हणाले, 'ब्रिटिशा-कडन स्वायत्तता मिळवायची तर आपल्या अगी रक्षणाची पात्रता असायला हवी म्हणजेच शस्त्र धारण आणि उपयोग करता आला पाहिजे शस्त्राचा अतिसुलभ वापर करता येण हे शिकण्याकरता आपण सैन्यात शिरल पाहिजे' तीन वर्षांनी त्यानी पुन्हा सांगितल, 'स्वातत्र्य प्राप्तीनतर ज्याना शस्त्र-धारणा करू देण्याकरता लढायच असेल त्याना मीही विरोध करणार नाही '

आपल्या या चुकीच्या उद्‌गाराचा ' अर्थ अहिंसेवरील स्वत चा विश्वास कमी होता असा नव्हे— असा खुलासा त्यानी पुढे केला आणि सांगितल 'माझी मत तोपर्यंत घडलेली नव्हती माझ्या भूमिकेबाबत माझी स्वत चीच खात्री नव्हती ' मात्र त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या दोन वर्षांतील घटनाना ही सबब लागू पडणार नाही एक हिंदु-मुस्लीम दगली की ज्यांच पर्यवसान फाळणीत झाल आणि दुसरी म्हणजे काश्मीरमधील युद्ध की ज्यान अहिंसेचा पुरता निकाल लावला पूर्व बगालमधील भयग्रस्त खेड्याचा दौरा करीत असताना ज्यावेळी त्याना 'सभोवार सर्वत्र अधार ' दिसला, त्यावेळी त्यानी अशी कबुली दिली की, 'जनसामान्यांना उपयोगी पडण्याजोगा अहिंसक मार्ग शोधणच मी थांबवल होतं ' काही दिवस गेल्यावर त्यांनी लिहिल, 'हिंसा ही एक भयकर आणि अधोगतीकडे नेणारी गोष्ट आहे— मात्र स्वसरक्षणा-करता तिचा उपयोग होऊ शकतो ' आणखी काही दिवस गेल्यावर पुन्हा लिहिल, 'अहिंसक प्रतिकार हाच सर्वश्रेष्ठ प्रतिकार होय— त्याचा पराभव होऊ शकत नाही ' त्याची मती गुग झाली होती हेच खर

यापैकी एका दगलग्रस्त खेड्यात एका मुस्लिम मौलवीन त्याची भेट घेतली सकटात सापडलेल्या काही हिंदू कुटुबाना मुसलमान केल्याचा बहाणा करून त्यान त्यांचे प्राण वाचवले होते बोस वर्णन करतात, 'एक धर्मगुरू म्हणून, स्वत चा धर्मश्रद्धा न बदलता प्राणाहुती देण्याचा उपदेश त्यान त्या हिंदूना केला असता तर अधिक बर झाल असत, अस गांधीनी त्याला सांगितल स्वत चे प्राण वाचवण्याकरता असा खोटा धर्मबदल करण्यास धर्म-शास्त्राची अनुमती आहे असं त्या मुस्लीम मौलवीन सांगितल गांधीजी

त्यावर खूप अस्वस्थ झाले आणि जवळजवळ रागानच म्हणाले की जर कधी त्याना अल्ला भेटला तर अशा व्यक्तीस मौलवी का केलस अस ते त्याला जरूर विचारतील तो मौलवी यावर गप्प झाला आणि निरोप घेऊन निघून गेला.

गाधींचा फाळणीला निकराचा विरोध होता त्याच्या शब्दात ' भारताची फाळणी होणं हे माझ्या शरीराचेच तुकडे करण्यासारख आहे ' १९४७ जूनच्या १४–१५ तारखेला फाळणीला पाठिंबा द्यायचा की नाही हे ठरवण्या-करता काँग्रेसचे अध्यक्ष आणि गांधीचे आयुष्यभराचे मित्रसहकारी आचार्य कृपलानी यानी त्यावेळी आपल्या अविस्मरणीय भाषणात, भावी भारत-सरकारच धोरण म्हणजे गाधीच्या अहिंसेला रामराम असेल अस सूचित केल मार्क अँटनीच उलट अनुकरण करून त्यांनी प्रथम गाधीची स्तुती केली आणि मग गांधींना गाडणारे विचार मांडले फाळणीला पर्याय म्हणून बिहारला पदयात्रा काढून हिंदू-मुसलमानांमधील वैर मिटवण्याच्या गाधीच्या प्रयत्नांची त्यांनी वाहवा केली मात्र त्या प्रयत्नाच्या यशस्वितेबद्दल शका प्रकट केली ' दुर्दैवान आपली सारी धोरण ते ठरवीत असले तरी त्यांची अमलबजावणी इतराना करायची असते– की ज्याचे विचार भिन्न असतात या दु खद परिस्थितीमुळेच मी भारताच्या फाळणीला पाठिंबा देत आहे '

गांधीनी आपल्या भाषणात फाळणीला त्वरित पाठिंबा व्यक्तवून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला त्यांची भूमिका अशी की, ' कितीही अप्रिय असले तरी केव्हाकेव्हा असे निर्णय घ्यावे लागतात ' त्यानंतर तीनच महिन्यांच्या अवधीत स्वतत्र भारत आणि स्वतत्र पाकिस्तानच्या फौजा काश्मीरमध्ये एकमेकाना भिडल्या गाधींनी आपल्या एका प्रार्थनोत्तर भाषणात सागितले, ' मी युद्धाचा विरोधक आहे पण पाकिस्तानकडून इतर कोणत्याही मार्गाने न्याय मिळण्याची शक्यता खुटल्यावर स्वत.ची चूक मान्य करून ती सुधारण्याऐवजी पाकिस्तान चुकीच्याच मार्गाने जात असेल, तर भारत-सरकारन सरळ लढाईच केली पाहिजे ही साधी गोष्ट नाही कुणालाच ते नको असत तो विनाशाचा मार्ग असतो पण तरीही अन्यायासमोर मान तुकवण्याचा उपदेश मी करू शकत नव्हतो '

श्री किंग्स्ले मार्टिन यानी आपल्या भारत भेटीनतर लिहिल होत, ' गाधीबद्दल मला वाटणारा जिव्हाळा, ते एक थोर व्यक्ती असल्याबद्दलच

माझं मत ते अद्यापही एक हिंदूराष्ट्रवादी, ‘ महात्म्याचे ’ अपुरे शिष्यच असल्याच ध्यानी आल्यावरही बदलल नाही ’

भारतान एकतर्फी अण्वस्त्रबदी करण्याला पाठिंवा दिला असता किंवा काय याबाबत मी स्वत साशक आहे पाकिस्तानन केलेल्याहून अधिक भयानक अत्याचार केले जात असता शस्त्रत्याग करून शरण जाण्याचा उपदेश मात्र ब्रिटिश, फ्रेंच, झेक, पोलिश ज्यूना त्यांनी किती सहजपणे केला होता यापूर्वीच्या कसोटीच्या इतर क्षणांप्रमाणेच उच्च ध्येयांचा कठोर वास्तवाशी सघर्ष उडताच व्यवहारीपणानं बाजी केली– योगी कोमिस्सारला शरण गेला निसर्गोपचारावर त्याचा विश्वास असूनही प्रत्येक गभीर आजाराचे वेळी ज्याचा ते तिरस्कार करीत त्या पाश्चात्य वैद्यकशास्त्राची त्यानी मदत घेतली अहिंसा आणि सत्याग्रह यांची जादू ब्रिटिशांवर चालली, पण मुसलमानावर चालली नाही त्यांना वाटल होत त्याप्रमाणे सर्व मानवजातीला उपयोगी अस ते साधन होत का ? त्याच्या मृत्यूपूर्वी पधराच दिवस आधी उपपतप्रधान सरदार पटेल यानी काश्मीरमध्ये सैन्य धाडण्याचा निर्णय घेतलेला होता त्यावर भाष्य करताना ते (गांधी) श्री बोस यांना म्हणाले,

‘ हाती सत्ता येताच, आजवर अचूक यश मिळविलेले अहिंसेचे मार्ग भविष्यात कुचकामी ठरतील हे त्यांच्या (पटेलाच्या) ध्यानी आल मी आणि माझ्याभोवतीची माणस ज्याला अहिंसा समजत होतो ती खरी अहिंसा नसून ‘ असहकारी विरोध नावाची एक अस्पष्ट नक्कल तेवढी होती हे आता मी समजून चुकलो आहे साहजिकच या असहकारी विरोधाचा [illegible]

प्रोफेसर स्टुअर्ट नेल्सन् याना मुलाखत देताना गाधीनी पुन्हा तेच प्रतिपादल, ‘ ज्याला आम्ही सत्याग्रह समजलो तो खर तर केवळ असहकार होता– आणि असहकार हे दुर्बलांच शस्त्र असत ’ याहीपुढे जाऊन आपण आयुष्यभर मृगजळापाठीमागे धावल्याची कबुलीही गांधीनी दिली. मात्र त्याचं त्यांना दुःख नव्हत. त्याच्या दृष्टीला अशी भुरळ न पडती तर भारतान मारली तेवढी मजल मारण अशक्य होतं

बहुधा त्यांना अस वाटण हीही एक त्यांना पडलेली भुरळच भारत

स्वातंत्र्यसंपादनाच्या इतक्या जवळ आला याला कारण अहिंसा नव्हती– ब्रिटिश साम्राज्य आपणहूनच खालसा होऊ पाहत होतं राष्ट्रध्वजावर चरख्याला स्थान मिळालं असलं आणि तोंडानं गांधीवादाची जपमाळ चालू असली तरी नवीन आलेली राजवट गांधींच्या गूढवादावर अवलंबून नव्हती पाकिस्तान आणि चीन यांच्याबरोबरील संघर्षापाठोपाठ देशात संकुचित राष्ट्रवाद आणि अतिरेकी संतापाची जी लाट उसळली, ती पाहता कुणाही महात्म्याच्या शांततावादी अवताराचा लोकांवर फारसा ठसा उमटला नव्हताच म्हटलं पाहिजे– त्यानंतर मराठी आणि गांधींच्या प्रांतातील गुजराती लोकांमध्ये पुन्हा पुन्हा ज्या हिंसक दंगली (Bloody riots) उसळल्या त्यांनी या सार्‍यावर एक कडवट, उपहासजनक कळस चढवला चीनच्या सीमेवरील उपद्रवाचा सशस्त्र प्रतिकार करावा काय असं विचारता गांधींचे आध्यात्मिक शिष्य, 'पदयात्री संत' विनोबा भावे यांनी होकारार्थी उत्तर दिलं– सर्वसामान्य जनता अहिंसक प्रतिकार करण्याकरता आवश्यक त्या अवस्थेला पोचलेली नाही ही गांधींचीच सबब सांगून. संत ऑगस्टीन् (St Augustin) म्हणाला होताच, 'परमेश्वरा, आम्हाला अहिंसक कर– पण इतक्यात नको' ('Lord, give us non-violence, but not yet')

गांधींच्या दूरदृष्टीला (भुरळ पडलेली नसेल अशा क्षणी) या सार्‍याची चाहूल लागलेली होती १५ ऑगस्ट १९४७ ला, त्या महत्त्वाच्या प्रसंगी सारं जग त्यांच्या संदेशाची वाट पाहत असता गांधींनी तो दिलाच नाही नव्यानं अस्तित्वात आलेल्या सरकारच्या प्रतिनिधींनी, या मूकपणाचे वाईट अन्वयार्थ लावले जातील हे त्यांच्या ध्यानी आणून दिलं तेव्हा ते उत्तरले, 'तसं व्हायचं असलं तर होऊ दे ..' श्री बोस यांनी आपल्या रोजनिशीत नोंद केली ते म्हणाले, 'एक वेळ होती जेव्हा सारा भारत त्यांचं म्हणणं ऐकत होता आज ते अडगळीत पडले होते यंत्रे, आरमार, हवाईदल आणि इतर कितीतरी गोष्टींची जरूर लागणाऱ्या नव्या समाजरचनेत, गांधींना स्थान नव्हतं गांधींना यापैकी कशातही रस घ्यायचा नव्हता अखेरी अखेरीस त्यांच्या प्रार्थनासभांना होणारी गर्दी खूप रोडावली होती त्यांची प्रार्थनोत्तर भाषणं, पूर्वीसारखा उत्साह निर्माण करू शकत नव्हती त्यांच्या आवाजा-

तली जादू संपल्यासारखं वाटू लागल होत '

या अखेरीच्या यातनेला प्यारेलालही साक्ष होते ' त्यांच्या ओठांवर एक वाक्य कायम असे ' मी आता जवळजवळ सरणावर चढल्यासारखा आहे हे कसं दिसत नाही तुम्हाला ?' आपण आपल्या सहकाऱ्याच्या गळ्यातील धोंड तर झालो नाही ना अस ते केव्हा केव्हा स्वत'लाच विचारीत ज्या नवीन युगाची पायघडी त्यानी स्वत'च घातली, त्या युगात एक विचित्र आणि अस्थानी वस्तू आपण बनत आहोतस त्यांना वाटत होत त्यांच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावरील ते मावळतीचे दु खद भाव, मी एकामागोमाग एक कितीतरी दिवस पाहात होतो अंतर्यामीच दु'ख प्रकट करणारे ते भाव भीतिप्रद होते '

४० वर्षांपूर्वी ' हिंदवीस्वराज्य 'मधून त्यानीं ज्या तत्त्वांचा भारताचं भविष्य घडविण्याच्या हेतूने पुरस्कार केला होता, ती सारी स्वत'चा पराभव करून घेणारी ठरली होती स्वातंत्र्यसंपादनाचे जल्लोष चालू असतानाच त्या तत्त्वांचा आणि स्वत गांधींचा सपूर्ण पराभव झाला होत हा पराजय सपूर्ण करण्याचं काम अखेर त्याच्या मारेकऱ्यान केलं— जो त्यांच्या शत्रूगटातील नव्हता तर एक कट्टर हिंदू होता

१९३१ सालची गोलमेज परिषद जिथे भरली त्या St. Jame's Palace मधील गांधींबरोबरच्या एका भेटीच श्री होरॉबिन् (J F Horrabin) यांनी वर्णन करून ठेवल आहे, ' एका छोटया खोलीत आम्ही काही मिनिट बातचीत केली मग एकदम त्यांनी घडयाळाकडे पाहिलं, त्याना आणखी एका भेटीची आठवण झाली आणि खेद व्यक्त करून ते घाईनच निघून गेले राजवाडयाच्या त्या प्रशस्त दालनातून अगावरील कपडे सावरीत पायातील चपलांचा आवाज करीत अदृश्य होणाऱ्या त्यांच्या आकृतीकडे पाहता पाहता— निदान माझी मित्रमंडळी तरी गैरसमज करून घेणार नाहीत अशा आशेन धीर करून खर सांगतो— क्षितिजाकडे जात जात अदृश्य होणाऱ्या चार्ली चॅप्लीनच्या चित्रपटाची अखेर मला आठवली '

**गांधी— सामान्य माणसांचा प्रतिनिधी**

हे उद्गार गांधींची अवहेलना करणारे नव्हेत आपल्या देशबांधवावरील,

गांधींच्या अपार सत्तेचा आणि जनतेच्या त्याच्यावरील प्रेमाचा मागोवा घेण्याकरता त्याचा उपयोग व्हावा पाश्चिमात्य जगातील औद्योगिक समाजव्यवस्थेत अधिकच लहान बनलेल्या सामान्य माणसाचं चॅप्लीन प्रतिनिधीत्व करीत होता दारिद्र्यान गांजलेल्या भारतातल्या खादीधारी जनसामान्याच गाधी हे प्रतीक होते. त्याना स्वत ला याची चागली जाणीव होती श्री जे पी पटेल यांनी एकदा त्याना विचारल होत की इतक प्रचड अनुयायित्व त्यांना मिळाल तरी कशामुळ ? गाधीनी उत्तर दिल होत, ' या देशातला सामान्य माणूस मला पाहिल्यावर हे उमगतो की मीही त्याच्यासारखाच राहतो आहे– त्याच्या स्वत चाच जणू एक भाग राहावा तसा '

पश्चिमी सस्कारानी सुधारक बनलेल्या नेहरूना गाधी म्हणजे बरेचदा अडगळ वाटत पण तरीही त्याच्यावर गाधींचा खूपच प्रभाव होता– कारण त्यांच्याच शब्दात गाधी म्हणजे भारताचा आत्मा होते तो आत्मा आणि खादी याची जोडी अतूट होती. बकिंगहॅम राजवाड्यात राजे पचम जॉर्ज आणि राणी मेरी याच्याबरोबरील खान्याचे वेळी गांधीना पायात खडावा, कमरेला खादीला पचा आणि खाद्यावर केवळ एक शाल घेतली ते केवळ प्रदर्शन म्हणून नव्हे तो सारा प्रसग त्यामुळे त्वरित कहाणीरूप बनला आणि भारताच्या खेडोपाडी सर्वांना ठाऊक झाला बकिंगहॅम राजवाड्याच्या प्रवेशद्वारापर्यंत त्याची साथ केलेले, पुणे विद्यापीठाचे उपकुलगुरू यानी त्यानतर कित्येक वर्षांनतर त्याच वर्णन केल, ' आपले पाय उघडेच टाकून, एका गरीब माणसाच्या पोषाखात ते राजाला भेटले राजान विचारल, ' मि गांधी, भारताची काल हालहवाल ?' गाधी म्हणाले, ' माझ्याकडे पहा म्हणजे त्यावरून तुम्हाला भारताची हालहवाल समजेल ' गाधींना स्वत पैकीच एक समजणाऱ्या प्रत्येक अर्धनग्न गावकऱ्याला आपण इग्लडच्या राजाच्या बरोबरीचे आहोत अस त्या क्षणी वाटल शतकानुशतकांच्या आळसानतर लोकांमधील स्वत्व पुन्हा जाग करण हीच बहुधा गाधीची आपल्या लोकाना सर्वात मोठी देणगी होती

पण याबरोबरच कामसुख, अन्नाहार, वडिलकीचे अधिकार, औषधपाणी, कारखाने आणि शिक्षण या साऱ्या बाबतीत मुर्दाड बनवणाऱ्या सर्व परपरागत गोष्टीनाही त्यांनी आशीर्वाद दिला, ' सर्व दु खाना कारणीभूत असलेल

मूळ पाप ' म्हणून टागोरांनी ज्यावर कोरडे ओढले, त्या मायाजालाचा ध्यास लागलेल्या– जादुटोण्याच्या मनोवृत्तींना खतपाणी घातल जिथे जिथे त्यांनी परपरेला विरोध केला तिथे तिथे तो विरुद्ध टोकाला जाऊन केला– अस्पृश्याचे हरिजन देवांचे पुत्र झाले ज्यांच्यावर चिखलफेक चालू होती, त्याची पूजा सुरू झाली सडासफाई हा आश्रमीयाचा शुद्धीचा मार्ग बनला– जरी इतर कुणाचा बनला नाही तरी

जनतेच्या मनावर गांधीचा इतका प्रभाव की कित्येक त्याना कृष्णाचा अवतार मानू लागले विवाहित स्त्री-पुरुषानी आत्मसयम करावा या अशक्य मागणीऐवजी त्यानी सततिनियमनाचा पुरस्कार केला असता, तर भारत आज एक निराळाच देश बनलेला दिसता अस वाटल्यावाचून राहवत नाही भारतीय शेतकऱ्याच दरिद्री जीवन आणि स्वत च्या पोराबाळाना पोसण्याबाबतची त्याची अक्षमता याबाबत गांधी बरच काही बोलले– पण त्यावर त्यांनी उपाय काय सुचवला तर ब्रह्मचर्य आणि चरखा !

**गांधीजींबरोबर निरर्थक वाद**

आपल्या टीकाकारांच्या मुद्देसूद बोलण्याकडेही लक्ष देण्यास ते नाखूष असत एक प्रख्यात वृत्तपत्रकार श्री टी ए रामन् यांच्याच शब्दात सांगायच तर ' गांधीच्या स्वभावाच ठळक वैशिष्ट्य हे की त्याच्याबरोबर वाद घालण जवळजवळ अशक्य असत श्रद्धेवर जगणारी ही व्यक्ती आहे आणि अशा श्रद्धाळू व्यक्तीच्या बाबतीत मुद्देसूद विचारसरणीचा फारसा उपयोग नसतो हे मूळ कारण आणि त्याबरोबर आपण बरोबरच आहोत याबद्दल त्याना असलेली खात्री यामुळ गाधींबरोबरचा वाद तसा गोड (ते ऐकून घेण्याबाबतीत तसे पटाईत असल्यान) पण व्यर्थ ठरतो '

गाधीपंथाला चिकटून राहणाऱ्या, स्तुतिसहज पण अव्यवहारी अशा त्याच्या तत्त्वांचे नसते तोडाने गोडवे गाणाऱ्या लोकाबरोबरील वादही असेच गोड पण व्यर्थ ठरतील महत्त्वाच्या प्रश्नांकडे पाठ फिरवणारं, अवास्तवता आणि बुद्धिमांद्य यानी झपाटलेल भारतातल सध्याच वातावरण या वृत्तीतूनच जन्माला आल आहे बापूची साधुस्वरूप– लोभस छाया अद्यापही प्रभाव टाकून असली तरी तिची शक्ती दिवसेंदिवस अधिकाधिक क्षीण होत आहे. कारखाने–उद्योगधद्याची बरोबरी चरखा करू शकत नाही आणि

देशातल्या शुष्क जमिनींना मिळणारं प्रचंड, आधुनिक धरणांमधून येणार पाणी हाच सर्वांत महत्त्वाचा ' जीवरस ' असं वाटणाऱ्याची संख्या वाढते आहे इतकं म्हणावं लागेल की हा महात्मा विसाव्या शतकातील सर्वांत मोठा आणि जिवंत चमत्कार होता एखाद्याला बदनामीकारक वाटेल, पण गांधीवादाचा हा वारसा नसता तर भारताची मानसिक प्रकृती आज आहे याहून ठणठणीत आणि एकूण परिस्थिती अधिक चांगली राहिली असती असं वाटल्यावाचून मात्र राहावत नाही

□ □

# महात्मा गांधी : फॉक्स ऑर सेंट

दि न्यू स्टेटस्‌मन्‌ ’ या ब्रिटिश पत्राचे सपादक किंग्सले मार्टिन हे १६।२।६९ रोजी कैरो येथे हृदयविकाराने मृत्यू पावले. कैरोतील भारताचे वकील श्री अप्पा पत याचेकडे ते पाहुणे म्हणून गेलेले होते सत्तरी ओलांड-लेल्या या भारताच्या सच्च्या पत्रकार मित्राने, इग्लडमध्ये भारतीय स्वातत्र्याचा सतत पुरस्कार केला होता ज्या वेळी इग्लडमधील स्वातत्र्यावर समाजवादी मडळीही भारताच्या स्वातत्र्यावर मूग गिळून बसली होती, तेव्हा श्री मार्टिन यानीच काय तो भारताच्या बाजूने आवाज उठवला होता ‘ न्यू स्टेटस्‌मन ’ पत्राचे ते ३० वर्षे सपादन करीत होते भावनावश होऊन त्यानी कधीही लिहिले नाही तर्कशुद्ध वाटेल तेव्हा आपल्या मित्रावरही ते तुटून पडत असत. एखादा मनुष्य नुसता थोर आहे की महात्मा आहे याचा मुलाहिजा त्यांनी कधी ठेवला नाही काश्मीर प्रश्नाबाबत नेहरूंचे मित्र असतानाही त्यांनी नेहरूच्या भूमिकेवर सतत टीका केली आहे गांधीजींवर त्यांनी लिहिलेला Fox or saint ? हा लेख जन्म-शताब्दी निमित्त त्यांनी नुकताच इग्लडमध्ये प्रसिद्ध केला होता हा त्यांचा भारतविषयक शेवटचा लेख असावा मृत्यूनतर आपला देह लडनमधील ‘ चारीग क्रॉस हॉस्पिटल ’ला विच्छेदनासाठी द्यावा अशी त्यांची इच्छा होती. त्यांना मृत्यू कैरो येथे आल्याने त्यांच्या पत्नीने त्याचा देह, कैरो येथील ‘ कासर–एल–ऐनी ’ रुग्णालयाला दिला त्यांच्या पत्नी डोरोथी वुडमन यानी सागितले की मृत्यूनतर आपल्यासाठी चर्चमध्ये कसलेही धार्मिक विधी करू नये, अशी त्यांची इच्छा असल्याने, त्याची ती इच्छाही मी मानणार आहे

महात्मा गाधींची गणना अतिशय कुरूप पुरुषातच करायला हवी, परतु मला भेटलेल्या व्यक्तीत, अतिशय वेगळी अशी ती व्यक्ती होती त्याच्या प्रमातल्या थोर कवयित्री सरोजिनी नायडू या गाधींना ' मिकी माऊस' का म्हणत असत ते लगेच लक्षात येत असे

१९३१ साली लडन येथे गोलमेज परिषदेच्या वेळी मी त्यांना प्रथम पाहिले व १९४८ साली त्यांचा वध होण्यापूर्वी काही दिवस, मी त्यांना अखेरचे पाहिले. या एवढ्या कालखडात त्याचे रूप फारसे बदललेले मला आठवत नाही.

मला गांधी आठवतात ते जवळजवळ सपूर्ण टक्कल पडलेले, ओठावर मिशांचे खुट, ओंगळ तोंडात चपखल न राहणारी दतपक्ती आणि डोळ्यावर जुन्या बाजारात पाच-सहा आण्याला खरेदी केलेला वाटावा असा चष्मा असलेले या चष्म्याच्या काचाआडून ते प्रत्येकाकडे औत्सुक्यपूर्ण नजरेने पाहत असत, क्वचित हसत आणि थक्क करणारे खोचदार आणि विनोदी बोलत असत

गाधी कमालीचे कृश होतेच शेळीचे दूध, पालेभाज्या, सत्र्याचा आणि मोसब्याचा रस हा त्याचा आहार होता या साध्यासुध्या आहारामुळेच कदाचित असेल, परतु त्याची प्रकृती आश्चर्य वाटावे अशी चागली बळकट, काटक आणि मोठमोठ्या दिव्यातून सहज पार पडणारी अशी राहात असे त्यांच्या-पेक्षा सुदृढ माणसाला शक्य असेल त्यापेक्षा कितीतरी अधिक काळ ते उपास करू शकत असत मनाने त्यांनी सर्व शारीरिक गरजांवर विजय मिळवलेला होता

लडनमध्ये १९३१ साली ' मित्र सघा 'च्या इमारतीत मी त्यांना प्रथम पाहिले मला त्या वेळी प्रश्न पडला की हा माणूस सत आहे की ढोंगी आहे ? नतर मी या निष्कर्षावर आलो की तो सतही आहे आणि ढोंगीही आहे ! इग्लंडमध्येच त्यांनी कायद्याचे शिक्षण घेतलेले होते आणि प्रश्न विचार-

णाऱ्या माणसाचा वेध घेणारे उत्तर देऊन गोंधळवून टाकणे त्याना अवगत होते

**व्यापारी की योगी ?**

तसे ते धूर्त व्यापारी होते कुणी मुलाखत घ्यायला आला की ते प्रथम हे अजमावून पाहत असत की खरोखर या माणसाला भेटण्याची आस्था किती आहे एखादा पत्रकार, गांधींची मुलाखत हवी या प्रतिष्ठेपायी आला असला तर त्याची डाळ शिजत नसे मुलाखत्या, भारताच्या स्वातंत्र्याची चर्चा करू लागला की ते त्याला सांगत– भारताला स्वातंत्र्य द्यावे असे ब्रिटिशाना खरोखरच वाटते का ते प्रथम शोधून काढा तसे असेल तर हे कसे घडवावे याची चर्चा करून, तडजोड करण्यात काही अर्थ आहे

एखाद्या योग्याप्रमाणे त्यांची दिनचर्या असे ते आठवड्यातून एक दिवस मौन पाळीत, शारीरिक सुखाची आसक्ती निपटून काढण्याची त्यांची धडपड असे, आणि नैतिक मूल्यांवर त्याचा कटाक्ष होता संत या पदवीला सार्थ करणाऱ्या या सर्व गोष्टी होत्या लैंगिक व्यवहाराचा त्याग त्यांनी इतक्या अतिरेकीपणाने केला की त्यांच्यापासून चार मुले झालेल्या त्यांच्या पत्नीला या त्यांच्या हट्टाचा कटू सताप येत असे

भारतीय शेतकरी राहतो तशा तऱ्हेने जास्तीत जास्त जगायचा त्यांचा प्रयत्न होता तुमच्याशी संभाषण करतानाही एकीकडे ते चरख्यावर सूत काढीत असत नेहमी रेल्वेने जाताना तिसऱ्या वर्गाने जात प्रत्यक्षात त्याची स्नेहीमंडळी त्याच्यासाठी खास रेल्वेगाडीची व्यवस्था करीत असली व त्याचा मोठा खर्च सरकारी तिजोरीवर पडत असला, तरी गांधी मात्र तिसऱ्या वर्गाचे रेल्वेभाडेच देत असत

या ' नागव्या फकिरा 'ला व्हॉईसरॉयने जेव्हा भेटीला बोलावले तेव्हा चर्चिल याच्या अंगाचा तिळपापड झाला भारतीय जनतेला मात्र ही घटना मोठी लक्षणीय वाटली भारतीयाच्या दृष्टीने राजकीय सत्ता भोगणाऱ्यानी– संत मंडळीचा आदर करणे यात नवीन असे काहीही नव्हते मला असे वाटते की फक्त पंचा नेसून उघड्या अंगाने, व्हॉइसरॉय साहेबाच्या भेटीसाठी, त्यांच्या प्रासादाच्या पायऱ्या चढत असताना, गांधीजीना धन्य वाटत असले पाहिजे अशा माणसाने यावे आणि ब्रिटिश सरकारला स्वातंत्र्यासाठी बोलणे

ल्यावे ही घटना महत्त्वाचीच होती व्हॉईसरॉय लॉर्ड हॅलिफॅक्स हे स्वत:-देखील धार्मिक प्रवृत्तीचे असल्यामुळे, नैतिक तत्त्वावर अधिष्ठित राजकीय चर्चा करणे त्यानाही आवडले असावे

**ब्रिटिश आणि गांधी**

ब्रिटिशाशी गाधीजी नेहमी नम्रपणाने वागले दुसऱ्या महायुद्धासारखी आपत्ती ब्रिटिशांवर आली असताना त्याचा फायदा घेण्यास त्यानी नकार दिला त्याचे लेखन आर्जवी असे व कायदा मोडण्याचा आपला हेतूही सरकारला ते नम्रपणाने कळवीत प्रत्येक वेळी ब्रिटिश सरकारने त्याना तुरगात धाडले आणि प्रत्येक वेळी वाढत्या लोकप्रियतेने ते बाहेर आले त्याचे प्रसिद्ध असे प्रदीर्घ उपास सुरू होताच लक्षावधी माणसे त्यांच्या प्रकृतीला आराम पडावा यासाठी प्रार्थना करीत असत गाधीजी जे मागत असत ते अज्ञानी मूढ सरकार त्याना देत नाही व यासाठी हे दिव्य त्याना करावे लागत आहे याविषयी सर्वांची खात्री पटलेलीच असे

यातले काही उपास हे अतिशय लक्षणीय असे यशस्वी ठरले उपवास हा दुसऱ्यावर दडपण आणण्याचा मार्ग आहे असे मात्र गाधी समजत नसत गांधीचे उपवासात बरे वाईट होईल, ही धास्ती ब्रिटिश सरकारच्या मनात असे, ही गोष्ट तर खरीच परतु गाधी म्हणत की, मी प्रामाणिकपणे ज्याच्यासाठी भाडत होतो त्या गोष्टीचा गभीरपणे विचार करण्याची सर-कारला सधी देण्यासाठी मी उपास करीत आहे गांधी विक्षिप्त तत्त्वासाठी प्राणार्पण करावयाला सिद्ध असत जर त्यानी जगावे असे सरकारास वाटत असेल तर सरकारने गाधीचे म्हणणे मानले पाहिजे

दक्षिण आफ्रिकेतून गाधी जेव्हा प्रथम भारतात आले तेव्हा त्यांची कीर्ती ही समिश्र होती त्यानी बोअर युद्धात ब्रिटिशाना जोरदार पाठिंबा दिला होताच शिवाय त्यानी प्रत्यक्ष सैन्यातही सेवा केलेली होती त्याचबरोबर दक्षिण आफ्रिकेत अहिंसक सत्याग्रहाचे शस्त्र वापरून त्यांनी तिथल्या भारती-याना काही महत्त्वाचे विजय प्राप्त करून दिले होते याच मार्गाने भारतीय स्वातत्र्य कसे प्राप्त करून घेता येईल या दृष्टीने त्यानी आता पाऊले उचलली

गाधीचे हे सत्याग्रही तत्र लोकांना नीट उमजले असे नाही आपल्या

देशबांधवांनी आपणाप्रमाणेच मनातून ब्रिटिशांचे शत्रुत्व निपटून काढून कायदेभंग करावा असे त्यांना वाटे ज्या तत्त्वासाठी लोक उभे राहात होते आणि ज्यासाठी मरण्याची त्यांची सिद्धता होती, ती तत्त्वे जर नीट समजली तर हे शक्य आहे असे त्यांना वाटत असे

हजारो लोकांना बरोबर घेऊन त्यांनी मिठाचा कायदा मोडण्यासाठी दांडीयात्रा आरंभली त्यांना पकडून तुरुंगात टाकण्यापलीकडे सरकार काय करणार होते ? त्यांनी हे सत्याग्रहाचे नवेच तंत्र निर्माण केल्यामुळे सर्वांना ते एकदम शांततेचे उपासक या रूपातच दृग्गोचर झाले

**ख्रिश्चन तत्त्व**

सर्व जग दिङ्मूढ होऊन पाहू लागले हा असा एक देश, अहिंसक मार्गाने विजयी होण्याचे ख्रिश्चन तत्त्व अंगिकारून वाटचाल करू पाहत होता, असंख्य वेळा व्यासपीठावरून व आपल्या वृत्तपत्रातून गांधी हे सांगत होते की आपण आग्रह धरतो तीच गोष्ट बरोबर आहे, हे शत्रूला पटविणे हाच खरा विजय असतो यासाठी कारावास, मृत्यूदंड पत्करावा लागला तरी हरकत नाही हजारो माणसे पोलिसी दंडुक्यापुढे भूमीवर ठामपणे आडवी होत होती पोलिसांच्या लाठ्यांनी डोकी फुटली तर त्या गोष्टींचा त्यांना मोठा अभिमान वाटत असे कधी कधी अर्थातच जमाव गांधींची शिकवण विसरत असे जर भारतीयांच्या हातून काही हिंसक कृत्य घडले तर चळवळ मागे घेऊन गांधी आपल्या अनुयायांच्या चुकीचे क्षालन म्हणून उपासाला सिद्ध होत असत

या अहिंसक प्रतिकाराने ब्रिटिशांपुढे मोठा प्रश्न निर्माण केला ब्रिटिश जनता व सत्याग्रहींवर लाठ्या चालवणारे पोलिस भुकेल्या व कसलाही उलट प्रतिकार न करणाऱ्या जमावावर हल्ला केल्यानंतर मनात विषण्ण होत असत यामुळे ३००० मैलांवर असलेली ब्रिटिश जनता, जी अन्यथा उदासीन राहिली असती, ती भारताचा सहानुभूतीने विचार करू लागली

भारतीय स्वातंत्र्याचे जे जनक आहेत त्यात गांधीजी हे एक आहेत यात संशयच नाही त्यांनी असा एक आवाज उठवला की त्या आवाजाचे आज ना उद्या समाधान केल्याखेरीज ब्रिटिश सरकारलाच गत्यंतरच नव्हते परंतु भारताच्या स्वातंत्र्यात अहिंसेचा वाटा आवाच्या सवा सांगितला जातो ही

एक चूक आहे

श्री ॲटली यानी भारताला स्वातंत्र्य देण्याचे ठरवले तत्पूर्वी लष्करी सल्लागारांनी त्याना असे सागितले होते की, भारत आता लढा देण्याच्या व घातपात चळवळ करण्याच्या पवित्र्यात आहे भारताला पारतंत्र्यात ठेवण्या-साठी आता आपल्याला कदाचित प्रदीर्घ काळ युद्धस्थितीतच राहावे लागेल या संघर्षात आता ब्रिटिशाना जगात मानहानी सोसावी लागेल आणि अमेरिकेत तर छी थू होईल

१९४८ साली गांधीजीशी बोलताना माझ्या हे लक्षात आले की अहिंसक प्रतिकाराच्या ख्रिश्चन तत्त्वाचे गांधीजी हे सर्व श्रेष्ठ उपासक होते हा समज काही अशींच खरा आहे त्यांचे मुख्य ध्येय होते भारताचे स्वातंत्र्य शातता-मय प्रतिकार हा ते हस्तगत करण्याचा एकमेव नैतिक मार्ग होता. अहिंसक सत्याग्रह हा सर्व श्रेष्ठ असला तरी भीतीने अन्याय सहन करीत राहण्यापेक्षा लढणे श्रेयस्कर अहिंसा ही शूराची असावी भ्याडाची नसावीच— असा त्याचा आग्रह होता

त्याचा वध होण्यापूर्वी तीनच दिवस, मी त्यांची मुलाखत घेतली तेव्हा मला हे समजले की युद्धाला त्याचा सर्वथा विरोध नव्हताच या गोष्टीचे मला आश्चर्य वाटले काश्मीरची फाळणी पत्करून तो प्रश्न सोडवावा असे मी सुचवताच त्यानी माझी हजेरी घेतली बिर्ला बगल्यातील या भेटीत मी सुचवले होते— उत्तर काश्मीरचा जो भाग मुसलमान टोळीवाल्यानी व्यापला आहे, त्या रेषेवर काश्मीरची फाळणी करावी गाधींना हे मान्य नव्हते

गाधींजीचे एक तत्त्व असे होते की भारताने जातीयवाद पत्करता कामा नये. हिंदू व मुसलमानांनी निदान भारतात एकत्र राहण्यास शिकलेच पाहिजे पाकिस्तान हे इस्लामाधिष्ठित राज्य निर्माण झाले तरीही भारतात तरी हिंदू–मुस्लिमानी एकत्र राहावे असे त्याना वाटे एखादा प्रदेश हा मुसलमान बहुसख्येचा आहे म्हणून तो भारताचा भाग असू शकत नाही, हे त्याना मान्य नव्हते. काश्मीरने आपल्या हिंदू राज्यामार्फत भारतात सामिली-करण पत्करलेले असल्याने तो भूभाग भारताचाच राहिला पाहिजे

अखेरची भेट

माझ्या अखेरच्या भेटीच्या वेळी गांधीजीनी आपल्या जातीय सलोख्याच्या

म्हणण्यावर विशेष जोर दिला काहींच्या मते ६००,००० तर काहींच्या मते १,००० ००० एवढे हिंदू व मुसलमान फाळणीच्या दगलीत परस्परानी मारले गेले होते दिल्लीला तर भीषण खून पडले होते मागे राहिलेले दिल्लीतील मुसलमान प्राणभयाने गर्भगळीत झालेले होते मेहरूली या मस्लीम दर्ग्याच्या ठिकाणी प्रार्थना घेण्याचे गाधीजीनी जाहीर केले कारण ते स्थान हिंदूनी उद्ध्वस्त केलेले होते सर्व मुसलमानाना दिलासा मिळावा यासाठी हा प्रयत्न होता व काहीजण या प्रार्थनेला हजर होते

या प्रार्थनेच्या वेळी, जमावात गाधीनी मला पाहिले व खूष होऊन, व्यासपीठावर आपल्या शेजारी त्यानी मला बसवले हृदय हेलावून टाकणारा असा तो सामोपचाराचा प्रसग होता दोनच दिवसांनी एका कडव्या हिंदूने (extremist) बिर्ला बगल्यात प्रार्थनास्थळी त्याच्यावर गोळ्या चालवल्या

हिंदू व मुसलमानानी बधुभावाने एकत्र राहावे या आपल्या आग्रहाखातर गाधीजीनी हौतात्म्य पत्करले गांधीच्या निधनानतर नेहरूंनी गाधीजीच्या या ऐक्याच्या तत्त्वाचा हिरारीने पुरस्कार केला

दु खाची गोष्ट अशी की काश्मीर प्रश्न आजतागायत सुटू शकलेला नाही १९६५ च्या काश्मीर युद्धानतर दोन्ही देशात अत्यत कटू वैमनस्य निर्माण झालेले आहे व दोन्ही देश परस्पराविरुद्ध युद्धाची तयारी करीत आहेत शाततेचा अग्रदूत ही भारताची प्रतिमा आता समूळ पुसली गेलेली आहे पश्चिमेच्या अनेक मडळीनी, ब्रिटिशानी भारत सोडल्यापासून भारताची हीच चुकीची प्रतिमा डोळचापुढे ठेवलेली होती

गाधीचा हा देश आता गांधीच्या शिकवणुकीकडे ढुकूनही लक्ष देत नाही—सत–महात्मा म्हणून त्याचा उदोउदो फक्त उरला आहे ! अगदी परवा-परवापर्यंत अनेकजणाना असे वाटत होते की, जगातल्या इतर देशाहून निराळा असा हा भारत देश आहे त्याला शस्त्रसामर्थ्यावर स्वत चे रक्षण करण्याची गरज नाही गांधीजींचे चैतन्य व हिमालयाच्या रागा, यानी त्याचे रक्षण होत राहील—१९६२ चे चिनी–भारत युद्ध व नेहरूंच्या मृत्यूनतरचे १९६५ चे भारत–पाक युद्ध यानतर, आता कुणाच्याही मनात असा काही संदेह उरलेला नाही. . . . आता तर फारच थोडेजण गांधीजींच्या शिकवणीप्रमाणे जगत असतील

□

REFBK-002269